अहवाल क्रमांक : १४६

# पंचायती राज समिती

(२०१५-२०१६)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

हिंगोली जिल्हा परिषदेच्या सन २०१०-११ व पुणे जिल्हा परिषदेच्या
सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात

## चौथा अहवाल

सत्यमेव जयते

(सदर अहवाल दिनांक डिसेंबर, २०१५ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस
सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई / नागपूर
२०१५

# पंचायती राज समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

हिंगोली जिल्हा परिषदेच्या सन २०१०-११ व पुणे जिल्हा परिषदेच्या
सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात

## चौथा अहवाल

## पंचायती राज समिती

**(सन २०१५-२०१६)**

**समिती प्रमुख**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

(३) श्री.अनिल गोटे, वि.स.स.

(४) श्री.विकास कुंभारे, वि.स.स.

(५) श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.

(६) श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.

(७) श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.

(८) श्री.समीर कुणावार, वि.स.स.

(९) श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.

(१०) श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.

(११) श्री.अनिल बाबर, वि.स.स.

(१२) श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१३) श्री.हेमंत पाटील, वि.स.स.

(१४) श्री.राजाभाऊ वाजे वि.स.स.

(१५) ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.

(१६) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.

(१७) श्री.अमित झनक, वि.स.स.

(१८) श्री.राहुल मोटे, वि.स.स.

(१९) श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

(२०) श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री.पांडुरंग फुंडकर; वि.प.स.

(२२) श्री.अनिल तटकरे, वि.प.स.

(२३) श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स.

(२४) श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.

(२५) श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा ' समिती प्रमुख ' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा चौथा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१५-२०१६ करीता समिती दिनांक २५ मे, २०१५ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधान मंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक २५ मे, २०१५ रोजी केले. समितीपध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Lesgislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे

समितीसमोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत नि:पक्षपातीपणे व तपशीलात जाऊन केला जातो परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो. शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि, शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय? योजना आर्थिकदृष्ट्यासक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंतसुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला,तसेच मा. समितीसदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका

सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परीक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाई देखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्द्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणेही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणे देखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णय देखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचना देखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई देखील प्रस्तावित केली

आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरब देखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाचीकामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहित देखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

हिंगोली जिल्हा परिषदेच्या सन २०१०-११ व पुणे जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-२०१६ करीता गठीत झालेल्या समितीने हिंगोली व पुणे जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली.

समितीने हिंगोली जिल्हा परिषदेस दिनांक २४, २५ व २६ जून, २०१५ रोजी भेट देऊन श्री.राहुल रेखावार, मुख्यकार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली त्याचप्रमाणे समितीने पुणे जिल्हा परिषदेस दिनांक १०, ११, १२ व १३ ऑगस्ट, २०१५ रोजी भेट देऊन श्री. कांतीलाल उमाप, मुख्यकार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१५-२०१६ करीता गठीत झालेल्या समितीने हिंगोली व पुणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १८ व २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी जिल्हा परिषद, हिंगोली तसेच दिनांक १७, १८ व २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी जिल्हा परिषद, पुणे संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी श्री.विश्वनाथ गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.राजेशकुमार, प्रधान सचिव,पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. स.भ.तामसेकर, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,डॉ. साधना तायडे, सहसंचालक,

आरोग्य सेवा संचालनालय, श्री. मधुकर राजे अर्दड, मुख्यकार्यकारी अधिकारी, हिंगोली, श्री.विलास जाधव, अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी, हिंगोली व श्री.कांतीलाल उमाप,मुख्यकार्यकारी अधिकारी तसेच श्री.का.मा.विधाते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच हिंगोली व पुणे जिल्हा परिषदांचे मुख्यकार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या हिंगोली व पुणे जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१५-२०१६ करीता गठीत झालेल्या समितीने दिनांक१६ डिसेंबर, २०१५ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक :१६ डिसेंबर, २०१५.

**संभाजी निलंगेकर-पाटील,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| | | **जिल्हा परिषद, हिंगोली (सन २०१०-२०११)** | |
| (१) | एक | पंचायती राज समितीच्या साक्षीच्या वेळी तत्कालीन अधिकाऱ्यांनी समितीसमोर साक्षीकरिता उपस्थित रहाणे आवश्यक असल्याबाबत. | १ |
| (२) | दोन | हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत. | १० |
| (३) | तीन | टाकळखोपा - शिरला (ता.औढा ना.) डांबरी रस्त्याच्या कामाबाबत. | १६ |
| (४) | चार | जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांनी पंचायत समित्यांना भेटी देण्याबाबत. | २८ |
| (५) | पाच | हिंगोली जिल्हा परिषदेतंर्गत गैरव्यवहाराची प्रकरणे. | ३३ |
| | | **जिल्हा परिषद, पुणे (सन २०१२-२०१३)** | |
| (६) | सहा | ग्रामपंचायतींना कर आकारणीस होत असलेला प्रतिबंध. | ४३ |
| (७) | सात | पी.एम.आर.डी.ए. च्या स्थापनेनंतर अधिकृत तसेच अनधिकृत बांधकामाच्या नोंदी होत नसल्यामुळे ग्रामपंचायतींना घरपट्टीच्या महसुलापासून मुकावे लागत असणे. | ५४ |
| (८) | आठ | मौजे चांबळी, ता.पुरंदर येथील दलित वस्ती सुधार योजनेबाबत. | ७१ |
| (९) | नऊ | ग्रामपंचायत भूगाव ता.मुळशी, जि.पुणे यांना घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत. | ७५ |
| (१०) | दहा | प्राथमिक आरोग्य केंद्र मुठा येथे जननी सुरक्षा योजनेचे पैसे रुग्णांना अदा करण्यात आलेले नसल्याबाबत (पंचायत समिती मुळशी) | ७८ |

**अनुक्रमणिका--**चालू


| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| (११) | अकरा | जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख पंचायत समित्यांच्या मासिक सभेला उपस्थित राहत नसल्याबाबत. | ८६ |
| (१२) | बारा | कुटुंबनियोजन शस्त्रक्रियेच्या अनुदानाबाबत. | ९१ |
| (१३) | तेरा | मौजे ढाकाळे, ता.बारामती नळ पाणीपुरवठा योजनेबाबत. | १०१ |
| (१४) | चौदा | पंचायतसमिती क्षेत्रांतर्गत त्रिशंकु भागातील घरकुलाच्या भागातील गैरव्यवहाराबाबत. | ११५ |
| (१५) | पंधरा | ग्रामसेवक व शिक्षकांसह इतर कर्मचारी मुख्यालयी रहात नसल्याबाबत. | १२४ |
| (१६) | सोळा | घरकुलांची कामे अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत. | १३२ |
| (१७) | सतरा | भारत निर्माण योजनेचे काम अपूर्ण असल्याबाबत. | १३६ |
| (१८) | अठरा | महिला व बालकल्याण समितीमार्फत प्रशिक्षणाकरिता मोठ्या प्रमाणात निधी खर्च करणे बंधनकारक असल्याबाबत. | १४४ |
| (१९) | ऐकोणिस | पुणे जिल्ह्यातील अंगणवाड्याचा उपक्रम राज्यभर राबविण्याबाबत. | १५३ |
| (२०) | वीस | राज्यातील सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांना ड्रेस कोड लागू करण्याबाबत. | १६० |
| (२१) | ऐकवीस | नारायणगांव ग्रामपंचायतीमधील आर्थिक अनियमितता. | १६४ |
| (२२) | बावीस | सर्वसाधारण शिफारशी. | १६९ |
| | | **परिशिष्ट-अ** | |
| | | समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | १७३ |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, हिंगोली (प्रशासन)

**पंचायती राज समितीच्या साक्षीच्या वेळी तत्कालीन अधिकाऱ्यांनी समितीसमोर साक्षीकरिता उपस्थित रहाणे आवश्यक असल्याबाबत.**

पंचायती राज समितीने दिनांक २४ ते २६ जून, २०१५ या कालावधीत हिंगोली जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २००८-०९ या वर्षाच्या लेख्यावरील पुनर्विलोकन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीला परिच्छेद क्रमांक ३.४३० पाझर तलाव तोंडापूर तालुका कळमनुरी येथील कामात नियमबाह्यता झाल्याप्रकरणी संबंधित तत्कालीन अधिकारी हे त्यांना साक्षीकरिता बोलावूनही हजर राहिलेले नसल्याचे आढळून आले. ग्रामविकास विभागाचे परिपत्रक असूनही आणि पंचायती राज समितीच्या प्रत्येक दौऱ्यापूर्वी तत्कालिन अधिका-यांनी साक्षीकरिता उपस्थित रहावे याकरिता ग्रामविकास विभाग पत्राव्दारे कळवित असूनही काही अधिकारी साक्षीकरिता उपस्थित राहिले नाहीत. अशा गैरहजर अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी असे निदेश समितीने दिले.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

हिंगोली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २४ जून, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,तत्कालीन सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी बैठकीस उपस्थित रहाणे आवश्यक होते. समितीची साक्ष होणार आहे हे माहित होते. याबाबत त्यांना बोलाविले असताना देखील उपस्थित नसणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी असे निदेश समितीने दिले.

समितीच्या मते हा विषय एका व्यक्तीशी संबंधित नाही. बैठकीचा कोरम फूल पाहिजे. तसेच प्रश्नाशी संबंधित सर्व अधिकाऱ्यांनी उपस्थित राहिले पाहिजे. या ठिकाणी त्यांचे मॉनिटरिंग झाले पाहिजे. प्रत्येक प्रकरणावर डेट दिलेली पाहिजे. बैठकीस अधिकारी नसल्याने विषय बाजूला करता येत नाही. खालील अधिकारी देखील उपस्थित नाहीत. यामध्ये उप अभियंता, शाखा अभियंता, कॅफो व इतर सर्वच जण होते. अधिकाऱ्यांची साखळी तयार झालेली आहे. चौकशी करावी आणि अहवाल सादर करावा, असे प्रत्येक विषयासंदर्भात सांगावे लागत आहे. संबंधित विभागाचे अधिकारी सांगत आहे, की हे चूक आहे. त्यामुळे यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्याकडून चूक झाली, हे बरोबर आहे. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई व्हायला पाहिजे. त्यामुळे समिती सूचवेल ती कारवाई करण्यात येईल. तसेच चौकशी अहवाल देखील देण्यात येईल असे समितीस आश्वासित केले.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी

तद्नंतर समितीने उप अभियंता,मुख्य लेखा व वित्त अधिकारी शाखा अभियंता व इतर सर्वांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी. तसेच या प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. यासंदर्भातील अहवाल समितीला एका महिन्याच्या आत सादर करावा असे निदेश दिले.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

पंचायती राज समितीच्या साक्षीच्या वेळी शासनाच्या परिपत्रकान्वये तत्कालीन अधिकाऱ्यांनी समितीसमोर साक्ष देण्याकरिता उपस्थित राहणे आवश्यक होते. जिल्हा परिषद हिंगोलीने तत्कालीन अधिकाऱ्यांनी समितीसमोर साक्ष देण्यासाठी उपस्थित राहण्याबाबत कळवून देखील जे अधिकारी उपस्थित राहिले नाहीत त्यांचा खुलासा मागवून त्याद्वारे कोणकोणत्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्द्यांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

पंचायती राज समितीच्या साक्षीच्या वेळी शासनाच्या परिपत्रकान्वये तत्कालीन अधिकाऱ्यांनी समितीसमोर साक्ष देण्याकरिता उपस्थित राहणे आवश्यक होते. जिल्हा परिषद हिंगोलीने तत्कालीन अधिकाऱ्यांनी समितीसमोर साक्ष देण्यासाठी उपस्थित राहण्याबाबत कळवून देखील जे अधिकारी उपस्थित राहिले नाहीत त्यांचा खुलासा मागवून त्याद्वारे कोणकोणत्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे.

पंचायती राज समितीच्या साक्षीच्या वेळी शासनाच्या परिपत्रकान्वये तत्कालीन अधिकाऱ्यांनी समितीसमोर साक्ष देण्याकरिता उपस्थित राहणे बाबत जिल्हा परिषद हिंगोली कार्यालयाकडून कळविण्यात आलेल्या ३९ अधिकाऱ्यांपैकी एकूण १४ तत्कालीन अधिकारी अनुपस्थित होते. अनुपस्थित अधिकाऱ्यांना अनुपस्थितीबाबत नोटीस देऊन खुलासा मागविण्यात आला आहे.

सदर १४ अनुपस्थित अधिकाऱ्यांपैकी एकूण ८ अधिकारी सेवानिवृत्त झालेले असून १ अधिकारी बडतर्फ झालेला आहे. तसेच ५ अधिकारी अद्यापि कार्यरत आहेत. अनुपस्थित

असलेल्या व सद्या कार्यरत असलेल्या ५ अधिकाऱ्यांपैकी ४ अधिकारी यांनी दिलेले खुलासे समर्थनिय आहेत. १ अधिकारी हे जिल्हाधिकारी यांनी पीक पेरणीसंबंधी बोलाविलेल्या बैठकीसाठी उपस्थित राहावे लागल्याने पंचायती राज समितीच्या दौऱ्यावेळी अनुपस्थित राहीले. सदर बाब समर्थनिय न वाटल्याने अनुपस्थिती बाबत त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घेण्याविषयी सहाय्यक संचालक (कृषी) अमरावती यांना दिनांक १५/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सेवानिवृत्त झालेल्या ९ अधिकाऱ्यांचे तसेच सद्या कार्यरत ४ अधिकाऱ्यांचे खुलासे समर्थनिय आहेत. बडतर्फ झालेल्या अधिकाऱ्याकडून कोणताही खुलासा प्राप्त होऊ शकला नाही.

पंचायती राज समितीच्या दौऱ्याच्या वेळी जिल्हा परिषद हिंगोली कार्यालयाकडून उपस्थित राहणेसाठी कळविण्यात आलेल्या तत्कालीन अधिकाऱ्यांचा तसेच त्यापैकी अनुपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांकडून घेण्यात आलेला खुलासा याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | अनुपस्थित अधिकाऱ्याचे नाव | विभाग | अनुपस्थिती बाबत घेण्यात आलेल्या खुलाश्यातील कारण | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री.एस.एस.खाडे (तत्कालीन अति.मु.का.अ.) | | हे दिनांक ३१/०५/२००९ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत व त्यांचे कार्यकाळातील आक्षेप किंवा मुद्दा आलेला नाही. | सेवानिवृत्त |
| २ | श्री.एन.डी.पठाण (तत्कालीन अति. मु.का.अ.) | | सेवा निवृत्त झालेले आहेत. वास्तव्या-बाबतचा पत्ता बदल झाल्यामुळे पत्र परत आले आहे. | सेवानिवृत्त |
| ३ | श्री.व्ही.जी.पुजारी (तत्कालीन उप मु.का.अ.पंचायत) | पंचायत विभाग | दिनांक २२ जून ते ०३ जुलै, २०१५ या कालावधीत वैद्यकीय कारणास्तव रजेवर होते. | |
| ४ | श्री.बी.बी.खंडागळे (तत्कालीन ग.वि.अ.,पं.स.वसमत) | पं.स.वसमत | सद्यस्थितीत ते ग.वि.अ.पं.स.उमरगा जि.उस्मानाबाद या पदावर कार्यरत आहेत. दिनांक २५ ते २७ जून या कालावधीत त्यांचे जिल्ह्यामध्ये रोजगार हमी योजना समितीची भेट असल्यामुळे ते उपस्थित राहू शकले नाहीत. | |

**तपशील**----चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ५ | श्री.जीवन देशपांडे (तत्कालीन ग.वि.अ.पं.स.कळमनुरी) | पं.स.कळमनुरी | हे दिनांक ३१/७/२००८ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांनी अनुपस्थितीबाबत खुलासा सादर केला नाही. | सेवानिवृत्त |
| ६ | श्री.पी.बी.नांदे (तत्कालीन ग.वि.अ.पं.स.कळमनुरी) | पं.स.कळमनुरी | हे दिनांक ३०/९/२००८ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक प्रशासन अहवालाच्या कालावधी अगोदरच ते सेवानिवृत्त झालेले असल्यामुळे त्यांच्या कार्यरत कालावधीतील कुठलाही आक्षेप नसल्याचे कळविले आहे. | सेवानिवृत्त |
| ७ | श्री.जी.बी.विधळे (तत्कालीन ग.वि.अ.पं.स.सेनगाव) | पं.स.सेनगाव | श्री.जी.बी.विधळे यांना न्युरोप्रॉब्लेम मुळे त्यांचे दोनही डोळे अंध झाले असून त्यांना लिहीता वाचता येणे शक्य नाही व प्रकृती अस्वास्थामुळे उपस्थित राहू शकले नाहीत. | |
| ८ | श्री.बी.ए.साळुंके (तत्कालीन ग.वि.अ.पं.स.सेनगाव) | पं.स.सेनगाव | हे दिनांक ३०/४/२०१० रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचे कार्यकाळातील आक्षेप किंवा मुद्दा आलेला नाही. | सेवानिवृत्त |
| ९ | श्री.आर.बी.बुरुड (तत्कालीन ग.वि.अ.पं.स.सेनगाव) | पं.स.सेनगाव | श्री.आर.बी.मुरूड यांना दिनांक २४.०६.२०१४ च्या शासन आदेशान्वये शासन सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे. | बडतर्फ |
| १० | श्री.बी.एस.कच्छवे (तत्कालीन कृषी विकास अधिकारी) | कृषी विभाग | साक्षीकरिता उपस्थित राहणे बाबतचे पत्र मिळाले नसल्यामुळे उपस्थित राहू शकलो नसल्याचे कळविले. त्यांचे कार्यकाळातील आक्षेप किंवा मुद्दा आलेला नाही. | |

**तपशिल**----चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ११ | श्री.आर.एच.तांबीले (तत्कालीन कृषी विकास अधिकारी) | कृषी विभाग | हे दिनांक २४ ते २६ जून, २०१५ याकालावधीत ता.रिसोड येथे पीक पेरण्याचे काम चालू होते व या संदर्भात दिनांक २५ जून रोजी जिल्हाअधीक्षक कृषी अधिकारी व दिनांक २६ जून रोजी मा.जिल्हाधिकारी वाशिम यांचेकडे बैठक असल्या-मुळे उपस्थित राहणे शक्य झाले नाही. | |
| १२ | श्री.एस.व्ही.अग्रवाल (तत्कालीन कृषी विकास अधिकारी) | कृषी विभाग | हे दिनांक ३०.०९.२०११ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत व त्यांना पाठीच्या कणाचा त्रास असल्यामुळे उपस्थित राहणे शक्य झाले नसल्याचे कळविले. | सेवानिवृत्त |
| १३ | श्री.एम.के.सारडा (तत्कालीन उपअभियंता (यांत्रिकी) | ग्रा.पा.पु.विभाग | हे दिनांक ३१.७.२०१३ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. साक्षीच्या कालावधी दरम्यान त्यांची प्रकृती खराब असल्यामुळे ते रुग्णालयात दाखल होते. त्यामुळे ते उपस्थित राहू शकले नसल्याचे कळविले आहे. | सेवानिवृत्त |
| १४ | श्री.जी.आर.राठोड (तत्कालीन कार्यकारी अभियंता, लघु सिंचन) | लघु सिंचन विभाग | हे दिनांक ३१.०५.२०१३ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा पाय फ्रॅक्चर असल्यामुळे ते उपस्थित राहू शकले नसल्याचे कळविले आहे. | सेवानिवृत्त |

**उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | उपस्थित अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | श्री.एच.टी.जगताप | तत्कालीन अति. मु.का.अ. | |
| २ | श्री.बी.डी.पटेल | तत्कालीन प्र.सं.जिग्राविय. | |
| ३ | श्री.शिवाजी गीरी | तत्कालीन उप मु.का.अ.(साप्रवि) | |
| ४ | श्री.न.पी.धांडे | तत्कालीन उप मु.का.अ.(साप्रवि)/(बा.क.) | |
| ५ | श्री.आर.एम.चंदन | तत्कालीन ग.वि.अ., पं.स. औंढाना. | |
| ६ | श्री.सी.एम.ढोकणे | तत्कालीन ग.वि.अ., पं.स. औंढा ना. | |
| ७ | श्री.एस.आर.कुलकर्णी | तत्कालीन ग.वि.अ., पं.स. औंढा ना. वसमत. सेनगाव | |
| ८ | श्री.एस.बी.ठोंबरे | तत्कालीन ग.वि.अ., पं.स. वसमत | |
| ९ | श्री.एस.डी.कांबळे | तत्कालीन ग.वि.अ., पं.स. हिंगोली, कळमनुरी, सेनगाव | |
| १० | श्री.बी.डी.पट्टेवाले | तत्कालीन ग.वि.अ.,पं.स. कळमनुरी, सेनगाव | |
| ११ | श्री.व्ही.एन.घोडके | तत्कालीन ग.वि.अ., पं.स.सेनगाव | |
| १२ | श्री.व्ही.एन.रुणवाल | तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी | |
| १३ | श्री.आर.एस.आडकेकर | तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी | |
| १४ | श्री.टी.एम.आऊलकर | तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकारी | |
| १५ | श्री.शाम किवळेकर | तत्कालीन कार्यकारी अभियंता (बांधकाम) | |
| १६ | श्री.पी.एम.दिक्षीत | तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी | |

**तपशिल**---चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १७ | श्री.यु.एन.सोनकांबळे | तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी | |
| १८ | श्री.एम.एन.आठवले | तत्कालीन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | |
| १९ | श्री.के.आर.कुलाल | तत्कालीन शिक्षणाधिकारी | |
| २० | श्री.निसार अहेमद खान | तत्कालीन शिक्षणाधिकारी | |
| २१ | श्रीमती के.बी.क्षिरसागर | तत्कालीन उप मु.का.अ.(बा.क.) | |
| २२ | श्री.व्ही.डी.तौर | तत्कालीन कार्यकारी अभियंता (ल.सिं.) | |
| २३ | श्री.एच.डी.वसुकर | तत्कालीन कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) | |
| २४ | श्री.एस.एस.जोशी | तत्कालीन कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) | |
| २५ | श्री.एस.टी.बशिरे | तत्कालीन उप अभियंता (ग्रा.पा.पु.) | |

जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीशी ग्रामविकास विभागाकडून सहमती दर्शविण्यात आली.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने हिंगोली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १८ नोव्हेंबर व २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, हिंगोली जिल्हा परिषदेत समितीसमोर साक्षीच्या वेळी तत्कालिन अधिकाऱ्यांनी साक्षीकरीता उपस्थित राहण्याबाबत सांगितले होते. त्याबाबत कोणती कार्यवाही केली,यावर विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, हिंगोली जिल्हा परिषदेने समितीच्या साक्षीत उपस्थित राहण्यासाठी एकूण ३९ अधिकाऱ्यांना बोलावण्यात आले होते, त्यापैकी २५ अधिकारी उपस्थित झाले होते. १४ अधिकारी अनुपस्थित होते. १४ पैकी ९ अधिकारी सेवानिवृत्त झाले होते. एक अधिकारी

बडतर्फ होते. उर्वरित ४ पैकी ३ अधिकाऱ्यांचे खुलासे मान्य करण्यात आलेले आहेत. दुसरे अधिकारी वैद्यकीय रजेवर असल्याने उपस्थित नव्हते. तिसऱ्या अधिकाऱ्यांना पत्र न मिळाल्यामुळे ते गैरहजर होते. अशा प्रकारे आलेले खुलासे मान्य करण्यात आलेले आहेत. एका अधिकाऱ्याचा खुलासा अमान्य केला होता. ते जिल्हाधिकारी यांच्याकडे बैठकीला गेल्यामुळे समितीसमोर उपस्थित झाले नाही. म्हणून त्यांच्या विरोधात शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी सहसंचालक, कृषी, अमरावती यांना कळविलेले आहे.

विभागीय सचिवांनी समितीस आता कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांपैकी २०११-१२ मध्ये अनेक अधिकारी असतील. भविष्यात हे प्रश्न कमी कमी होत जातील. आताच्या काळातील अधिकारी असतील तर ते सांभाळून घेतात. २००८-२००९ चे हे आक्षेप असल्यामुळे प्रॉब्लेम झाला आहे. भविष्यात हे आक्षेप कमी होईल अशी माझी अपेक्षा आहे. २-३ वर्षाने समितीने भेट दिली पाहिजे. समितीने भेट दिल्यामुळे त्या प्रमाणे शासनाला काही नियम तयार करावे लागतील.

## अभिप्राय व शिफारशी

समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना अनेक वेळा काही अधिकारी नुकतेच रुजू झालेले असतात, काही अधिकाऱ्यांनी आक्षेपित नमूद केलेल्या नस्त्या हाताळलेल्या नसतात, काहींना राबविलेल्या योजनांबाबत माहिती नसते म्हणून समितीने तत्कालीन अधिकाऱ्यांना समितीसमोर लेखा आक्षेपातील खुलाशाकरिता उपस्थित राहण्याबाबत कळविलेले आहे. त्याचप्रमाणे शासनानेदेखील यासंदर्भात परिपत्रक निर्गमित करुन सर्व संबंधित तत्कालीन अधिकाऱ्यांनी समितीच्या भेटीच्या वेळी समितीसमोर खुलाशाकरिता उपस्थित राहण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना कळविलेले आहे असे असूनदेखील काही अधिकारी जाणीवपूर्वक समितीसमोर येण्याचे टाळतात व साक्षीपासून पळ काढण्याचा प्रयत्न करतात. हा समितीचा एकप्रकारे अवमानच आहे. समिती अवमानाची कारवाईदेखील करु शकते. तथापि, याची संख्या मोठ्या प्रमाणावर होणार असल्यामुळे कार्यवाही वेळखाऊ दीर्घकाळ चालणारी आहे म्हणून समिती सर्व संबंधित अधिकारी जे समितीसमोर

उपस्थित राहणार नाहीत अशा अधिकाऱ्यांकडून त्यांचा खुलासा मागविण्याबाबत व असा खुलासा समाधानकारक नसल्यास त्यांच्याविरुध्द दंडात्मक त्याचप्रमाणे सेवापुस्तिकेत नोंद घेण्याबाबत जिल्हा परिषदांना निदेश देते. सबब, **समितीने कळवूनही जे अधिकारी समितीच्या साक्षीसमोर उपस्थित राहिले नाहीत आणि ज्यांचा खुलासा समाधानकारक नाही अशा सर्व अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई म्हणजेच तात्पुरत्या स्वरुपात वेतनवाढ रोखण्याबाबत कार्यवाही करुन तत्संबंधित नोंद संबंधित अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तिकेत घ्यावी अशी समिती शिफारस करते. या जिल्हा परिषदेच्या संदर्भात जे अधिकारी समितीसमोर जाणीवपूर्वक उपस्थित राहिले नाहीत व ज्यांचा खुलासा समाधानकारक नाही अशा अधिकाऱ्यांवर उपरोक्त नमूद केल्यानुसार दंडात्मक प्रकारची योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, हिंगोली (प्रशासन)

### हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २४ ते २६ जून, २०१५ या कालावधीत हिंगोली जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २००८-०९ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालावरील साक्षीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले की, हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची बरीच पदे रिक्त आहेत. अतिरिक्त सीईओ, शिक्षणाधिकारी, कृषी अधिकारी, डीएचओ इत्यादींची पदे रिक्त आहेत. त्यामुळे कामामध्ये अनियमितता होत आहे.

समितीच्या मते शासनाने याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. जिल्हापरिषद योग्य चालविणे समितीची किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांची जबाबदारी आहे, तशीच ती शासनाचीही आहे म्हणून शासनाने मदत केली पाहिजे. वर्ग-१ ची ५० टक्के पदे रिक्त आहेत. कर्मचाऱ्यांची ५० टक्के पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषदेचे कामकाज योग्य रितीने व जलद गतीने होण्याकरिता अधिकारी/कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते. शासनाने याबाबतची गांभीर्याने दखल घेऊन या जिल्हा परिषदेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत साक्षीस उपस्थित असलेले श्री. शिंदे, सह सचिव, ग्राम विकास विभाग यांनी तातडीने कार्यवाही करावी असे समितीने सांगितले असता श्री. शिंदे (सह सचिव, ग्रामविकास विभाग) यांनी समितीस आश्वासित केले की समितीने दिलेल्या सूचनेप्रमाणे हिंगोली जिल्हा परिषदेतील सर्व रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

समितीने विचारणा केली की एकूण किती पदे रिक्त आहेत, यावर समितीस अशी माहिती देण्यात आली की, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प अधिकारी डीआरडीए, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, डीएचओ, शिक्षण अधिकारी (प्राथमिक) इत्यादी पदे रिक्त असून वर्ग २-३ संवर्गातील अनेक पदे रिक्त आहेत. समितीने पुढे अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेमध्ये अनेक पदे रिक्त असून यासंदर्भात माहिती देण्यात यावी. हिंगोली जिल्हा परिषदेमधील प्रत्येक विषयामध्ये अनियमितता असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.बैठकीला संबंधित अधिकारी उपस्थित नाहीत. पदे रिक्त असल्यामुळे अनियमितता होत आहे, असेही निदर्शनास येते.

समितीने जिल्हा परिषद अधिकाऱ्यांना अशी विचारणा केली की, हिंगोली जिल्हा परिषदेतील सर्व रिक्त पदे दोन महिन्यामध्ये भरणे आवश्यक आहे. या कालावधीत ही पदे भरण्यात येतील असे आश्वासन श्री. शिंदे, सह सचिव देऊ शकतील काय? यावर श्री.शिंदे यांनी समितीस असे उत्तर दिले की,विविध विभागातील पदे रिक्त आहेत. ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील पदांच्या भरती संदर्भात ग्राम विकास विभागाच्या प्रधान सचिवांना माहिती देऊन सदरहू पदे लवकरात लवकर भरण्याबाबत प्रयत्न केला जाईल. इतर विभागाची पदे भरण्याबाबत समितीची शिफारस त्या विभागाकडे पाठविण्यात येईल.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ संवर्गाअंतर्गत पदे रिक्त आहेत ती तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्द्यांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांची १२३ पदे मंजूर असून ९५ पदे भरलेली आहेत. तर आज रोजी २८ पदे रिक्त आहेत. रिक्त असलेल्या २८ पदांची विभाग व पदनिहाय स्थिती खालीलप्रमाणे आहे. सदरची रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हा परिषद हिंगोली कार्यालयाकडून शासनाच्या संबंधित विभागांना केलेल्या पाठपुराव्याचे विवरण सोबत जोडले आहे.

| अ.क्र. | विभागाचे नांव | पदाचे नाव | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | सा.प्र.वि. | अति.मु.का.अ. | १ |
| २ | " | प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. | १ |
| ३ | " | उप मु.का.अ. (सा.प्र.) | १ |
| ४ | बांधकाम विभाग | उप अभियंता (बांध.) वसमत | १ |
| ५ | लघु सिंचन विभाग | उप कार्यकारी अभियंता | १ |

**विवरण**---चालु

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| ६ | ग्रा.पा.पु.विभाग | कार्यकारी अभियंता (ग्रापापु) | १ |
| ७ | " | उप अभियंता (ग्रापापु) | १ |
| ८ | " | उप अभियंता (यांत्रिकी) | १ |
| ९ | आरोग्य | अति.जिल्हा आरोग्य अधिकारी | १ |
| १० | " | सहा.जिल्हा आरोग्य अधिकारी | १ |
| ११ | " | तालुका आरोग्य अधिकारी | २ |
| १२ | " | वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र | ५ |
| १३ | पशुसंवर्धन विभाग | पशुधन विकास अधिकारी | ३ |
| १४ | कृषी विभाग | कृषी विकास अधिकारी | १ |
| १५ | शिक्षण | शिक्षणाधिकारी (माध्य.) | १ |
| १६ | जि.ग्रा.वि.यं. | स.प्र.अधिकारी पाणलोट | १ |
| १७ | " | उप अभियंता जि.ग्रा.वि.व. | १ |
| १८ | " | उप अभियंता PMGSY | १ |
| १९ | प्र.मं.ग्रा.स.योजना | कार्यकारी अभियंता, स.शि.अ. | १ |
| २० | सर्व शिक्षा अभियान | उप अभियंता (यांत्रिकी) | १ |
| | | एकूण . . | २८ |

**उपरोक्त मुद्द्याबाबत ग्रामविकास विभागाकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

हिंगोली जिल्हा परिषदे अंतर्गत महाराष्ट्र विकास सेवा गट-अ संवर्गात ०९ पदे मंजूर असून ०६ पदे भरले आहेत. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.ही दोन पदे तदर्थ पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे. उप मु.का.अ.(सा.) हे पद सरळसेवा/पदोन्नती/बदलीने भरण्यात येत आहे. तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येणाऱ्या अवर्षण प्रवण क्षेत्र कार्यक्रम (DPAP), एकात्मीक पडीक जमीन विकास कार्यक्रम (WDP), हरियाली इत्यादी कार्यक्रम संपुष्टात आल्यामुळे

व सद्यस्थितीत बहिर्गमन प्रक्रिया (Exit protocol) अंतिम टप्प्यात असल्यामुळे सदर कार्यक्रमाकरीता निर्माण केलेला अधिकारी/कर्मचारी यांची आवश्यकता नसल्याने पाणलोट प्रकल्पासाठीच्या सहाय्यक प्रकल्प अधिकारी (कृषी) या पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या सेवा मूळ विभागाकडे प्रत्यावर्तीत करण्यात आल्या आहेत/येत आहेत. त्यामुळे जि.प.हिंगोली सदर रिक्त असलेले पद भरण्यात येणार नाही.

उर्वरित रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हा परिषद, हिंगोली मार्फत संबंधीत प्रशासनिक विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षी दरम्यान समितीने हिंगोली जिल्हापरिषदेमध्ये वर्ग १ संवर्गाअंतर्गत रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी विदित केले की, शासनाने वर्ग १ बाबत महत्वाचा निर्णय घेतला आहे. बदली करत असताना पदोन्नती किंवा थेट नेमणूक करताना पसंतीक्रम दिला पाहिजे. नाशिक, मराठवाडा,अमरावती व नागपूर या चार विभागांमधील पदे भरल्यानंतर इतर विभागातील पदे भरली जातील, असा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमामुळे या विभागातील पदे भरली जातील. ही पदे भरली जाणार आहेत यावर समितीने आणखी असे मत व्यक्त केले की, ज्या वेळी प्रश्न विचारला त्यावेळी जीएडीमधील अधिकारी तेथे नव्हते. हिंगोली एवढी पदे इतरत्र कोठेही रिक्त आढळून आली नाहीत. मुख्य कार्यकारी अधिकारी नवीन असल्यामुळे ते म्हणाले की, मला येऊन चार महिने झाले. तेथे एचओडी नव्हते. विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर येत नव्हते. एचओडी नियुक्त करणे हे शासनाचे काम आहे. समितीच्या मते एखाद्या मोठ्या जिल्हा परिषदेमध्ये हे पद रिक्त राहणे योग्य होणार नाही. औरंगाबाद मधील सर्व चार्जेस गटशिक्षण अधिकाऱ्याकडे आहेत. त्यांची काय कार्यक्षमता असणार आहे, तेथे शिक्षण कसे असेल, तेथे पुन्हा एचओडी देऊन उपयोग नाही. हा प्रश्न सचिवांच्या साक्षीसमोर घ्यावा. एचओडीचे पद एक ते दीड महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त राहू नये. ते पद लगेच भरले पाहिजे. काही जिल्हा परिषदेमध्ये डेप्युटी सीईओ जनरलचा चार्ज बीडीओच्या खालच्या अधिकाऱ्याला दिलेला आहे. २-३ जिल्हा परिषदेमधील

मी आपल्याला उदाहरण देईन. चुकीच्या कर्मचाऱ्याला अशा पदावर बसवल्यामुळे घोटाळा होऊ शकतो. यामुळे हा प्रश्न आला. एचओडीचे पद भरण्यासाठी कालावधी ठरवला पाहिजे. रिक्त पदे भरण्यासाठी प्रमोशन देता येईल. समाज कल्याण विभागामध्ये देखील कनिष्ठ पातळीवरील अधिकारी काम करतो. याकरिता यंत्रणा निश्चित केली पाहिजे. यावर विभागीय सचिवांनी वेगवेगळ्या विभागाकडून पदे भरली जातात. आम्ही त्यांना पत्र पाठवतो व पाठपुरावा करतो. नवीन पदोन्नती व नेमणुकीच्या संदर्भात निर्णय घेतला आहे. हिंगोली, वाशिम, परभणी या जिल्ह्यात सर्वात अधिक पदे रिक्त आहेत. बीडीओची ९० टक्के पदे राज्यात भरली आहेत. आता इतर इश्यू सोडवू. बीडीओंची पदे भरलेली आहेत. डेप्युटी सीईओ, ॲडीशनल सीईओची काही पदे रिक्त आहेत, ती देखील भरली जातील. मूळ इश्यूबद्दल आम्ही काळजी घेतो असे समितीस विदीत केले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक २४ ते २६ जून, २०१५ या कालावधीत हिंगोली जिल्हा परिषदेला भेट दिली भेटीच्या वेळी समितीने सन २००८-०९ या वर्षाच्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालावरील साक्षीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले की, हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ अधिकाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत. यात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, कृषी अधिकारी, जिल्हाधिकारी यांचा समावेश आहे. उपरोक्त पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्यामुळे हिंगोली जिल्हा परिषदेचे प्रशासन कोलमडण्याच्या स्थितीवर आहे. जिल्हा परिषदेचे कामकाज योग्य रीतीने व जलद गतीने होण्याकरिता अधिकाऱ्यांची आवश्यकता असते. शासन याबाबतची गांभीर्याने दखल घेऊन या जिल्हा परिषदेतील अधिकारी व कर्मचाऱ्याची पदे भरण्याबाबत हिंगोली जिल्हा भेटीच्या वेळी शासनाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित असलेले सह सचिव, ग्राम विकास विभाग यांनी तातडीने कार्यवाही करावी आणि या जिल्हा परिषदेतील सर्व रिक्त पदे भरण्याबाबतचा अहवाल समितीत द्यावा असे निदेश दिले होते.

या प्रकरणी जिल्हा परिषदेकडून लेखी स्वरुपात पाठविलेल्या माहितीत हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांची १२३ पदे मंजूर असून ९५ पदे भरलेली आहेत. तर आज रोजी वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांची सुमारे २८ पदे रिक्त आहेत. यामध्ये

सामान्य प्रशासन विभाग, बांधकाम विभाग, लघुसिंचन विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, आरोग्य विभाग, पशु संवर्धन विभाग, कृषी विभाग, शिक्षण विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, प्रधान मंत्री ग्राम सडक योजना, सर्व शिक्षा अभियान इत्यादी विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. सदरची रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हा परिषद हिंगोली यांच्यामार्फत संबंधित प्रशासनिक विभागाकडे पाठपुरावा सुरु असल्याचे उक्त लेखी माहितीत नमूद केले आहे.

समितीला हिंगोली जिल्हा परिषदेमध्ये वरील अधिकाऱ्यांची इतकी मोठ्या प्रमाणावरील रिक्त पदे इतरत्र कोठेही आढळून आली नाहीत. मुख्य कार्यकारी अधिकारी गेल्या ४ महिन्यांपूर्वीच या जिल्हा परिषदेत रुजू झाल्याने तसेच अनेक विभाग प्रमुखांची नियुक्ती या जिल्हा परिषदेत केली नसल्यामुळे बहुतेक विभागाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्याकडे सोपविला आहे. त्यामुळे साहजिकच या अधिकाऱ्यांवर कामाचा प्रचंड प्रमाणात तणाव असल्याचे समितीला जाणवले आहे. विभाग प्रमुखाचे पद हे एक ते दीड महिन्यांपेक्षा जास्त काळ रिक्त राहू नये. तसेच कधी एखादे पद लगेच भरणे शक्य नसेल तर अशा पदाचा अतिरिक्त कार्यभार हा समकक्ष अधिकाऱ्याकडे सोपविणे इष्ट वाटते. तथापि, या जिल्हा परिषदेमध्ये सदर बाबींचे पालन केल्याचे आढळून येत नाही. **समिती उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता असे निदेश देते की, शासन स्तरावर प्रलंबित असलेली रिक्त पदे भरण्याबाबतचे विविध प्रलंबित प्रस्ताव संबंधित विभागाने तातडीने निकाली काढून या जिल्हा परिषदांमधील विभाग प्रमुखांची पदे तसेच वर्ग-१ अधिकाऱ्यांची पदे तातडीने भरण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच सदरची रिक्त पदे कोणत्याही परिस्थितीमध्ये येत्या तीन महिन्यांच्या कालावधीत पूर्णपणे भरण्यात यावीत व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, हिंगोली (प्रशासन)

### टाकळखोपा - शिरला (ता.औढा ना.) डांबरी रस्त्याच्या कामाबाबत.

पंचायती राज समितीने दिनांक २५ जून, २०१५ रोजी टाकळखोपा-शिरला रस्ता ग्रामा ६१ च्या किमी ३/२०० ते ३/७०० या रस्त्याची पाहणी केली असता समितीला सदर रस्त्यावर योग्य प्रकारे स्प्रे व सिलकोट केलेले नसणे तसेच रस्त्याचा सरफेस प्लेन असल्याचे आढळून आले नाही. तसेच बी.बी.एम. ७५ पेक्षा कमी वापरला असल्याचे आढळून आले, या प्रकरणी समितीने दक्षता व गुणनियंत्रण मंडळाकडून या रस्त्याच्या गुणवत्तेची तपासणी करण्याबाबत निदेश दिले.

तद्नंतर समितीने जिल्हा परिषद सभागृह हिंगोली येथे दिनांक २६ जून, २०१५ रोजी सन २०११-१२ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान अशी विचारणा केली की, या प्रकरणाची गुण नियंत्रण अधिकाऱ्यांकडुन तपासणी करण्यात आली आहे काय, असल्यास उक्त तपासणी अहवाल सादर करण्यात आला आहे काय, रस्त्यांच्या कामासंदर्भात जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम या मध्ये प्रत्येक किमीला निधी वितरणाचे प्रमाण काय आहे. सदर रस्त्याच्या कामाचा लॅब टेस्टींग रिपोर्ट व टेम्प्रेचर रजिस्टर मधील नोंद दाखविण्याची सूचना समितीने केली.

समितीच्या मते ५०० मीटरच्या रस्त्याला १२ लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहे. परंतु प्रत्यक्षात खर्च ४-५ लाख रुपये खर्च झाला असेल. अशा पद्धतीने कामे होत असतील तर ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था सुधारणार नाही, या कामाची वर्क ऑर्डर रिपोर्ट न करता बील काढण्यात आले ते कुठल्या खात्यावर दाखविले त्याचे उत्तर संबंधित अधिकाऱ्यांना देता आले नाही, ५ टक्के न दाखविता कुठल्या अॅटमवर दाखविले हे सांगता आले नाही, ५ टक्के न दाखविता चेक देणे गुन्हा आहे, १० लाख ७० हजार रुपयांचे बील दिले आहे की, ५०-५० हजार रुपयांची चेकिंग दाखविली आहे, साईटवर न जाता, चेकिंग न दाखविता, सर्व नियमांची पायमल्ली केलेली आहे. यावर कार्यकारी अभियंता बां. (जि.प.) यांनी समितीला विदीत केले की, सदरहू योजना १०.७० लाखाची मंजूर होती. आरएसी १०.७० लाखाचे दिलेले आहे. १ लाख ३० हजार रुपये राहिले आहे. साईट बार लावायचा राहिलेला आहे.

समितीने पुढे विचारणा केली की, सदरहू कामाचा ठेकेदार कोण आहे,कोल्ड मिक्सर बंद झालेले आहे. कोल्ड मिक्सर करुन दुसरा गुन्हा केलेला आहे.यामध्ये ४० टक्के काम कमी केलेले आहे. त्यामुळे सुमारे ६० टक्के भ्रष्टाचार झाल्याचे दिसून येत आहे. समितीने प्रत्यक्ष पहाणी केली असता बीबीएम आणि कारपेट ९५ एमएम होणे आवश्यक असताना ते ५५ ते ६० टक्के झालेले निर्दशनास आले आहे. कार्यकारी अभियंता बां. (जि.प.) यांनी समितीला विदीत केले की, श्री. आर. सी. जयस्वाल नावाचा ठेकेदार आहे. या कामाकरिता कोल्ड मिक्सर केलेले आहे.७५ ते ९५ टक्के पर्यंत पाहिजे. यावर समितीने असे निदेश दिले की, ७५ ते ९५ टक्के आवश्यक असताना त्यांनी ५५ ते ६० टक्के असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व या रस्त्याच्या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी या रस्त्याच्या कामासंबंधी जबाबदार असणारे कनिष्ठ अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता यांची संपूर्ण जबाबदारी आहे. या रस्त्याचे काम चुकीचे झालेले आहे हे संबंधित अधिकाऱ्यांनी मान्य केले. म्हणून समितीची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अशी सूचना आहे की, या रस्त्यांची तपासणी क्वालिटी कंट्रोलिंग अधिकाऱ्यांकडून करुन घेण्यात यावी. चुकीचे काम झाले असेल तर संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठवावा.सिरला-टाकळखोपा या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाची तपासणी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी क्वॉलिटी कंट्रोलरच्या मार्फत तपासणी करुन त्याचा अहवाल समितीला सादर करावा.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.**

सदर रस्त्यावर योग्य प्रकारे स्प्रे व सिलकोट केलेले नसणे तसेच बीबीएम ७५ पेक्षा कमी वापरला असल्याचे समितीला पाहणी करताना आढळून आले. या प्रकरणी समितीने गुणनियंत्रण अधिकाऱ्यांच्या विभागाकडुन तपासणी करण्याबाबत निदेश दिले होते. त्यानुसार या प्रकरणाची गुण नियंत्रण अधिकाऱ्यांकडुन तपासणी करण्यात आली आहे काय? असल्यास उक्त तपासणी अहवाल सादर करण्यात आला आहे काय? रस्त्यांच्या कामासंदर्भात जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम यामध्ये प्रत्येक किमीला निधी वितरणाचे प्रमाण काय आहे ?

**चौकशी समितीचा अहवाल**

सदरहू प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्यात यावा या समितीच्या निदेशानुसार जिल्हा परिषद हिंगोली यांनी चौकशी करुन अहवाल पाठविला आहे. सदरहू अहवालात प्रस्तुत प्रकरणी १) कामामध्ये आढळून आलेली खडीकरण, बीबीएम, डांबरीकरणाची जाडी मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्यात आलेल्या मापांशी व अंदाजपत्रकीय तरतुदीमधील बाबीशी सर्वसाधारणपणे मिळतीजुळती आढळली.

२) कारपेट व सिलकोट साठी वापरण्यात आलेल्या डांबराचे प्रमाण आवश्यक प्रमाणाच्या अनुज्ञेय मर्यादेमध्ये असल्याचे आढळून आले.

३) कामाची सर्वसाधारण गुणवत्ता समाधानकारक असल्याचे आढळून आले.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली.**

या कार्यालयाचे पत्र क्र. २०८८ दिनांक ३/९/२०१५ रोजी मा.अधिक्षक अभियंता दक्षता व गुणनियंत्रण मंडळ औरंगाबाद यांना टाकळखोपा ते शिरला या रस्त्याच्या कामाची गुणवत्तेची तपासणी करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार दि. ०६.१०.२०१५ रोजी दक्षता व गुणनियंत्रण मंडळामार्फत कामाची तपासणी करण्यात आली व तपासणीचा अहवाल दिनांक १४/१०/२०१५ रोजी प्राप्त झाला आहे. सदरहु तपासणी अहवालातील निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

१) कामामध्ये आढळून आलेली खडीकरण, बी.बी.एम.डांबरीकरणाची जाडी मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्यात आलेल्या मापांशी व अंदाजपत्रकीय तरतुदीमधील बाबींशी सर्वसाधारणपणे मिळतीजुळती आढळली.

२) कारपेट व सिलकोटसाठी वापरण्यात आलेल्या डांबराचे प्रमाण आवश्यक प्रमाणाच्या अनुज्ञेय मर्यादेमध्ये आढळून आले.

३) कामाची सर्वसाधारण गुणवत्ता समाधानकारक असल्याचे आढळून आले.

वरील निष्कर्ष विचारात घेता या प्रकरणी कोणीही दोषी आढळून येत नाही. रस्त्याच्या कामासंदर्भात जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम यामध्ये प्रत्येक कि.मी.ला

निधी वितरणाचे प्रमाणाबाबत नमूद करण्यात येते की रस्त्याच्या प्रकारानुसार तसेच रस्त्याच्या प्रत्यक्ष परिस्थितीनुसार रस्त्याचे कामासाठी अंदाजपत्रकीय तरतुद करुन त्यानुसार निधीचे वितरण करण्यात येते.

उपरोक्त मुद्यासंदर्भात समितीने विचारणा केलेल्या शासनाच्या अभिप्राया संदर्भात ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद हिंगोली यांनी कलेल्या कार्यवाहीस व अभिप्रायाशी सहमती दर्शवली.

समितीने दिलेल्या निदेशानूसार जिल्हा परिषदेने सर्वक्षम चौकशी करुन विभागीय साक्षीच्या वेळी चौकशी अहवाल सादर केला.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने हिंगोली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ नोव्हेंबर व २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. दिनांक १८ नोव्हेंबर रोजीच्या साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले की, या संदर्भात क्वॉलिटी कंट्रोलमार्फत तपासणी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. अधीक्षक अभियंता, दक्षता विभाग, औरंगाबाद यांच्याकडून तपासणी करण्यात आली. गावामध्ये झालेले खडीकरण किंवा डांबरीकरणाची क्वालिटी चांगली आढळून आली असून कारपेट व सीलकोटसाठी डांबराचे प्रमाण मर्यादेमध्ये आढळून आले आहे. कामाची गुणवत्ता समाधानकारक असल्याचे त्यांच्या रिपोर्टमध्ये नमूद केले आहे. तद्नंतर समितीने हिंगोली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी ताब्यात घेतलेली नस्ती अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे ताब्यात दिली.

दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या साक्षीत उपरोक्त मुद्यांवर समितीने विभागीय सचिवांना विचारणा केली की, हिंगोली जिल्हा परिषदेच्या भेटीच्या वेळी समितीने टाकळखोपा-शिरला डांबरी रस्त्याची पाहणी केली होती. त्या कामाची अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्याकडून तपासणी करण्याची सूचना दिली होती. त्यांनी जो अहवाल दिला आहे तो आपल्या मुद्याशी मिळताजुळता नाही. सदर रस्त्यावर योग्य प्रकारे स्प्रे व सिलकोट झालेले नव्हते, ७५ पेक्षा कमी बीबीएम वापरला असल्याचे समितीला पाहणीच्या वेळी आढळून आले होते. परंतु तपासणी अहवालामध्ये

म्हटले आहे की, कामामध्ये आढळून आलेली खडीकरण, बीबीएम डांबरीकरणाची जाडी मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्यात आलेल्या मापाशी व अंदाजपत्रकीय तरतुदीमधील बाबींशी सर्वसाधारणपणे मिळतीजुळती आढळली. कारपेट व सिलकोटसाठी वापरण्यात आलेल्या डांबराचे प्रमाण आवश्यक प्रमाणाच्या अनुज्ञेय मर्यादेमध्ये आढळून आले. समितीच्या पाहणीमध्ये सिलकोट व स्प्रे केलेला नसल्याचा उल्लेख केलेला होता. ७५ बीबीएम डांबरीकरणाचा एस्टीमेटमध्ये उल्लेख असला तरी प्रत्यक्ष पाहणीमध्ये तसे आढळून न आल्याचा उल्लेख आम्ही केला होता. या ठिकाणी विसंगत उत्तर दिलेले आहे.त्यामुळे समितीने सदरहू अहवालास सहमती नाकारली. कार्यकारी अभियंत्यांना ज्या मुद्यांची माहिती नाही ती माहिती समिती सदस्यांना आहे. खडीचे प्रमाण किती, डांबरीकरणाचे प्रमाण किती याची त्यांना अचूक माहिती असते. त्यांनी रस्त्याच्या कामात जी अनियमितता दिसून आली ती रेकॉर्डवर आणली आहे. याबाबत समितीने आक्षेप घेतला त्यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, समितीने जी शिफारस केली होती त्या अनुषंगाने गुणनियंत्रक अधिकारी यांच्याकडून तपासणी करण्यात आलेली आहे. गुण नियंत्रक यंत्रणा ही थर्डपार्टी आहे.

समितीने पुढे आणखी अशी विचारणा केली की, कामाची तपासणी करताना ७५ मि.मी. बीबीएमची जाडी आढळून आली असे उत्तर एम.बी.रेकॉर्ड करताना देण्यात आले आहे. ही बाब चुकीची असल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना शोकॉज नोटीस दिली आहे काय, पंचायती राज समितीने रस्ता प्रत्यक्ष खोदून पाहिलेला आहे. रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून पंचायती राज समितीने आक्षेप नोंदविलेला आहे.रस्त्याला सिलकोट केलेला नव्हता, गुण नियंत्रण पथकाने असत्य माहिती दिलेली आहे. त्यावर विभागाच्या उपसचिवांनी ही तांत्रिक बाब आहे याबाबत मला काही सांगता येणार नाही असे विदित केले.

समितीने पुढे असे प्रतिपादन केले की, दक्षता व गुण नियंत्रण मंडळाने तपासणी केलेली आहे, त्यांनी अहवाल दिलेला आहे. तो अहवाल समितीस कळविलेला नाही. या कामाची देयके देण्यात आलेली आहेत. प्रत्यक्षात त्या ठिकाणी ७५ मि.मी.सिलकोट केलेला नाही. त्यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दक्षता व गुण नियंत्रण मंडळाने जो अहवाल पाठविला आहे त्यातील परिच्छेद क्रमांक ६ ते ८ मी समितीला वाचून दाखविला.

६. तांत्रिक मान्यताप्राप्त अंदाजपत्रकानुसार कामाचा वाव खालीलप्रमाणे आहे. टाकळखोपा ते शिरला रस्ता ३/२०० ते ३/७०० किलोमीटर साखळी क्रमांकादरम्यानच्या ५०० मीटर लांबीत चाकोऱ्या भरण्यासाठी ६० मि.मी. खडी व मुरुम गोळा करुन चाकोऱ्या भरणे, पूर्ण लांबीत ३.०० मीटर रुंदीसाठी ४०मि.मी. खडीच्या ७.५ सेमी.(दबाईनंतर) जाडीच्या खडीथराने मजबुतीकरण करणे, ७.५ सेमी.जाडीचा बीबीएम चा थर देणे व यावर २० मि.मी.जाडीचे कारपेटचा थर देऊन Liquid seal coat करणे या बाबीचा समावेश आहे.

७. टाकळखोपा ते शिरला रस्त्याच्या ३/२०० ते ३/७०० या ५०० मीटर लांबीत काम करून मोजमाप पुस्तिका क्रमांक ७५०, पृष्ठ क्रमांक १ ते १२ मध्ये केलेल्या कामाची मोजमापे नोंदवून झालेल्या कामापोटी एकूण रुपये १०,६३,८११/- एवढ्या रकमेपैकी शासकीय येणेपोटी कपात केलेल्या रकमांच्या कपातीनंतर संबंधित कंत्राटदार श्री.आर.बी.जयस्वाल यांना धनादेश क्रमांक ६१४८४, दिनांक ३१/०३/२०१५ अन्वये रुपये ९,५२,४७२/- इतक्या रकमेची प्रथम धावत्या देयकापोटी अदाई केल्याचे दिसून येते.

८. या कार्यालयाच्या दक्षता पथकाने विषयांकित कामास दिनांक ६/१०/२०१५ रोजी भेट देऊन तपासणी केली, तपासणी अंती---

१. ३/२०० ते ३/७०० या साखळी क्रमांकात seal coat काम केल्याचे आढळून आले.

२. कामाची तपासणी करताना या रस्त्याच्या ३/२५३ या साखळी क्रमांकात संबंधित अधिकाऱ्यांसमक्ष चाचणी खड्डा घेण्यात आला, चाचणी दरम्यान निदर्शनास आलेले निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत. कारपेटची जाडी अंदाजपत्रकानुसार अपेक्षित २० मि.मी. प्रत्यक्षात आढळून आलेली जाडी २४ मि.मी. इतकी आहे. अंदाजपत्रकानुसार अपेक्षित बीबीएमची जाडी ७५ मि.मी. पाहिजे. प्रत्यक्षात आढळून आलेली बीबीएमची जाडी ७४ मि.मी. आहे. अंदाजपत्रकानुसार अपेक्षित डब्ल्युबीएमची जाडी ७५ मि.मी. पाहिजे प्रत्यक्ष आढळून आलेली डब्ल्युबीएमची जाडी ७६ मि. आहे.

## निष्कर्ष

१. कामामध्ये आढळून आलेली खडीकरण, बीबीएम डांबरीकरणाची जाडी मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्यात आलेल्या मापांशी व अंदाजपत्रकीय तरतुदीमधील बाबीशी सर्वसाधारणपणे मिळतीजुळती आढळली.

२. कारपेट व सिलकोटसाठी वापरण्यात आलेल्या डांबराचे प्रमाण आवश्यक प्रमाणाच्या अनुज्ञेय मर्यादेमध्ये असल्याचे आढळून आले.

३. कामाची सर्वसाधारण गुणवत्ता समाधानकारक असल्याचे आढळून आले.

समितीने पुढे आणखी विचारणा केली आहे, या रस्त्याच्या कामाची पंचायती राज समितीने प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. पाहणी केली त्यावेळी रस्त्यावर सिलकोट केलेला नव्हता. त्यानंतर हा रिपोर्ट तयार करण्यात आलेला आहे. सदर रिपोर्ट कोणत्या तारखेला तयार करण्यात आलेला आहे, त्यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, दक्षता व गुण नियंत्रण पथकाने दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ रोजी रिपोर्ट दिलेला आहे. हिंगोली जिल्ह्यामध्ये पंचायती राज समिती जून महिन्यात आली होती. पंचायती राज समितीने दिलेल्या सूचनेनुसार दक्षता व गुण नियंत्रण मंडळाने ऑक्टोबर महिन्यात सदर रस्त्याची तपासणी करुन अहवाल दिलेला आहे.

समितीने सदर मुद्दावर आक्षेप घेत प्रतिपादन केले की, पंचायती राज समितीसमोर चुकीचे उत्तर देत आहोत. ज्या वेळी पंचायती राज समितीने रस्त्याची पाहणी केली त्यावेळी तेथे ५० लोक हजर होते. संबंधित कार्यकारी अभियंता यांनी मान्य केले की, सदर रस्त्याला सिलकोट केलेला नाही. आता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सांगत आहेत की, सदर रस्त्यावर सिलकोट केलेला आहे असा अहवाल देण्यात आलेला आहे. समितीने दक्षता पथकाने पाठीशी घातले असा समितीने आक्षेप घेतला.

समितीच्या मते मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेले उत्तर समितीने स्वीकारु नये. पंचायती राज समितीने रस्ता खोदून रस्त्याची पाहणी केली होती. त्यानंतर दक्षता व गुण नियंत्रण मंडळाने रस्त्याची पाहणी केलेली आहे. या पथकाने पाहणी करण्याच्या अगोदर त्या रस्त्यावर काम करण्यात आले आहे काय ? समितीची दिशाभूल करणारे उत्तर देणे योग्य नाही.

समितीने हा विषय अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळे पंचायती राज समितीची तीन सदस्यांची उप समिती गठीत करुन त्या रस्त्यांची पुन्हा पाहणी करण्याचा व त्यासंदर्भात उप समितीने तपासणी करुन अहवाल सादर करावे असे निदेश दिले.

## उप समितीचा अहवाल

पंचायती राज समितीसमोर मंगळवार, दिनांक २४ नोंव्हेंबर, २०१५ रोजी जिल्हा परिषद, हिंगोली येथे दिलेल्या भेटी संदर्भात झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या अनुषंगाने टाकळखोपा-शिरला येथील कामाची सोमवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी पुन:श्च तपासणी करुन आपला अहवाल विधिमंडळाच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनापूर्वी समितीस सादर करण्याकरिता सन्माननीय सदस्य सर्वश्री आर.टी.देशमुख, राहुल मोटे व अमित झनक यांची एक उप समिती गठीत करण्यात आली. सदरील कामाची तपासणी करण्यासाठी उप समिती सोबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ता.अंबाजोगाई, जि.बीड येथील बांधकाम विभागाचे उपअभियंता यांना रस्त्याच्या कामाची गुणवत्ता तपासण्याकरिता नियुक्त करण्यात आले आहे.

उप समितीने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी शासकीय विश्रामगृह येथे उपरोक्त मुद्दावर बैठक घेतली. सदरील चर्चेदरम्यान दक्षता व गुण नियंत्रण मंडळाचे अधीक्षक अभियंता, श्री.बोडखे यांनी माहिती दिली की, टाकळखोपा-शिरला येथील कामाच्या गुणवत्तेची तपासणी करण्याकरिता जिल्हा परिषद, हिंगोली यांचेकडून दिनांक ३ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानंतर दक्षता व गुण नियंत्रण मंडळाने सदरील कामाबाबतची सविस्तर माहिती जिल्हा परिषद, हिंगोली यांचेकडून मागविली होती व ती दिनांक ३ ऑक्टोबर, २०१५ अन्वये प्राप्त झाली. कामाची सविस्तर माहिती प्राप्त झाल्यानंतर दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ रोजी दक्षता व गुण नियंत्रण मार्फत सदर कामाच्या गुणवत्तेची तपासणी करण्यात आली. सदर तपासणी मध्ये (१) खडीकरण, बीबीएम, डांबरीकरणाची जाडी मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्यात आलेल्या मापांशी व अंदाजपत्रकीय तरतुदीमधील बाबीशी सर्वसाधारणपणे मिळतीजुळती आढळून आली. (२) कारपेट व सिलकोटसाठी वापरण्यात आलेल्या डांबराचे प्रमाण आवश्यक प्रमाणाच्या अनुज्ञेय मर्यादेमध्ये असल्याचे आढळून आले. (३) कामाची सर्वसाधारण गुणवत्ता समाधानकारक आढळून आली. सदर प्रकरणी कामाच्या गुणवत्तेचा अहवाल दक्षता व गुण नियंत्रण मंडळाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना दिनांक ९ ऑक्टोबर, २०१५ रोजी सादर केला आहे.

यानंतर उप समिती प्रमुख यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सदर कामाबाबत त्यांचे म्हणणे मांडण्यास सांगितले.सदर प्रकरणी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.जाधव यांनी माहिती देताना सांगितले की, समितीने हिंगोली दौऱ्याच्या वेळी दिनांक २५ जून, २०१५ रोजी टाकळखोपा-शिरला येथील प्रगतीपथावर असलेल्या रस्त्याच्या कामाची तपासणी केली होती. त्यावेळी सदर ठिकाणी मी उपस्थित नव्हतो. सदर कामाची समितीने तपासणी केली त्यावेळी जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता (बांधकाम) हे उपस्थित होते. सदर प्रकरणी दिनांक २६ जून, २०१५ रोजी घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये सदर रस्त्याच्या कामाच्या गुणवत्तेची तपासणी दक्षता व गुण नियंत्रण मंडळाकडून करुन घेण्याची सूचना समिती प्रमुखांनी केली होती. त्यानुसार जिल्हा परिषद, हिंगोलीने दिनांक ३ सप्टेंबर, २०१५ रोजी सदर कामाची तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्यास अधीक्षकअभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना कळविले. सदरील कामाबाबतची सविस्तर माहिती जिल्हा परिषद, हिंगोली यांचेकडून अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ रोजी कामाच्या गुणवत्तेची तपासणी केली. तद्नंतर त्याबाबतचा अहवाल दिनांक ९ ऑक्टोबर, २०१५ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना सादर केला होता व तो १४ ऑक्टोबर, २०१५ रोजी प्राप्त झाला होता. दक्षता पथकाने ज्यावेळी कामाची तपासणी केली होती त्यावेळी टाकळखोपा-शिरला रस्त्याचे काम पूर्ण झाले होते, ही अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली. तसेच, सदर प्रकरणी विभागीय सचिवांच्या साक्षीमध्ये काही माहिती सांगण्याचे राहून गेले असल्यास त्यांनी त्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली.

सदरील प्रकरणी उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ता. अंबाजोगाई जि. बीड यांनी उप समितीस सदरहू कामाची गुणवत्ता तपासणी करुन अहवाल सादर केला. सदरहू अहवाल दक्षता व गुण नियंत्रण मंडळाच्या अहवालाची पुष्टी करणारा असल्याचे मत समितीने नोंदवले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक २५ जून, २०१५ रोजी टाकळखोपा- शिरला (ता.औढा ना.) डांबरी रस्त्याची पाहणी केली असता समितीला सदर रस्त्यावर योग्यप्रकारे स्प्रे व सिलकोट केले नसल्याचे आढळून आले. तसेच रस्त्यांची सरफेस प्लेन असल्याचे आढळून आले. सदर रस्त्याचा बी.बी.एम. ७५ टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे आढळून आले. सदर रस्त्याच्या कामाचे लॅब टेस्टींग रिपोर्ट व टेंपरेचर रजिस्टरमधील नोंद घेण्याबाबत समितीने सर्व संबंधितांना आदेशित केले. एकूणच या रस्त्याच्या कामाच्या गुणवत्तेबाबत समितीला शंका आल्याने समितीने याबाबत या रस्त्याच्या डांबरीकरणाची तपासणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गुण नियंत्रण विभागामार्फत तपासणी करुन त्याची संपूर्ण चौकशी व तपासणी करुन समितीला अहवाल सादर करण्याबाबत निदेशित केले. त्यानुसार समितीला अहवाल प्राप्त झाला असून उक्त अहवालात दिनांक ६-१०-२०१५ रोजी मा.अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण, औरंगाबाद यांनी या रस्त्याच्या कामाची तपासणी केली असून सदरचा तपासणी अहवाल समितीला सादर केला आहे. या तपासणी अहवालामध्ये अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांनी या कामामध्ये आढळून आलेल्या खडीकरण, बी.बी.एम., डांबरीकरणाची जाडी मोजमाप पुस्तिकेत नोंदविण्यात आलेल्या मापांशी व अंदाजपत्रकीय तरतुदीमधील बाबींशी साधारणपणे मिळतीजुळती आढळल्याने कारपेट व सिलकोटसाठी वापरण्यात आलेल्या डांबराचे प्रमाण आवश्यक प्रमाणाच्या अनुज्ञेय मर्यादेमध्ये असल्याचे आढळून आले. कामाची सर्वसाधारण गुणवत्ता समाधानकारक असल्याचे आढळून आले. या रस्त्याच्या कामाची चौकशी केली असता त्यातील उपरोक्त निष्कर्ष विचारात घेता या प्रकरणी कोणीही दोषी आढळून येत नाही. या कार्यवाहीस शासनाने सहमती दर्शविली.

दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय साक्षीच्या वेळी उपरोक्त अहवाल विचारात घेता समितीने या अहवालास नापसंती दर्शविली व सदरच्या रस्त्याच्या कामाची पुन्हा तपासणी करण्याची मागणी केली. यावर मा. समिती प्रमुखांनी समितीच्या अनुमतीने मा.श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स., मा.श्री.राहुल मोटे, वि.स.स. व मा.श्री.अमित झनक, वि.स.स. यांची एक उप समिती गठीत करुन या उप समितीने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी टाकळखोपा-शिरला, ता.औढा या डांबरी रस्त्याच्या कामाची पुन्हा तपासणी करण्याबाबत निदेश दिले. त्यात या समितीसमवेत एक त्रयस्त अधिकारी म्हणून

श्री.एम.बी.शिंदे, उपअभियंता, दक्षता व गुण नियंत्रण अधिकारी, ता. अंबाजोगाई, जि.बीड यांची नेमणूक केली. त्याचप्रमाणे या तपासणीच्या वेळेला औरंगाबाद येथील ज्या अधिकाऱ्यांनी याबाबतचा उपरोक्त नमूद केलेला तपासणी अहवाल समितीला सादर केला त्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांनीदेखील त्या ठिकाणी उपस्थित राहण्याबाबत समितीने निदेश दिले. त्यानंतर श्री.राहुल मोटे, वि.स.स. व श्री.अमित झनक, वि.स.स. यांच्यासह विधान-मंडळ सचिवालयातील अवर सचिव, श्री. प्रदिप सखाराम मयेकर यांच्या समवेत जिल्हा परिषद अधिकाऱ्यांच्या समक्ष उक्त रस्त्याला भेट देऊन सर्व संबंधितांसमक्ष पाहणी केली. उप समिती कामाची पाहणी करीत असताना सदरील रस्त्यावरुन जाणाऱ्या एका वाहन चालकास उप समितीने सदरहू रस्त्याचे काम कधी झाले याबाबत विचारणा केली असता, वाहन चालकाने या रस्त्याचे काम सुमारे दोन महिन्यांपूर्वी झाले असल्याचे समितीला सांगितले. तद्नंतर सदरील रस्त्याच्या कामाच्या गुणवत्तेची फेरतपासणी करण्यासाठी श्री.एम.बी.शिंदे, उपअभियंता यांना रस्त्याच्या कामाच्या गुणवत्तेची तपासणी व मोजमाप करण्यास उप समितीने सांगितले. श्री. शिंदे यांनी उप समितीसमोर रस्त्याची पाहणी केली व सदर रस्त्यावर किमी ३/३५७ साखळीमध्ये चाचणी खड्डा घेतला व त्यानंतर श्री.शिंदे यांनी समितीला अशी माहिती दिली की, कारपेटची जाडी अंदाजपत्रकाप्रमाणे २० मि.मी. असणे अपेक्षित होते व ती प्रत्यक्ष २६ मि.मी. आढळून आली आहे. बी.बी.एम. ची जाडी अंदाजपत्रकाप्रमाणे ७५ मी.मी. अपेक्षित होती व ती ७६ मि.मी.. आढळून आली आहे. डब्ल्यू.बी.एम.ची जाडी अंदाजपत्रकाप्रमाणे ७५ मी.मी. अपेक्षित होती व ती ८० मि.मी. आढळून आली आहे. रस्त्याची रुंदी अंदाजपत्रकाप्रमाणे ३ मीटर अपेक्षित होती, ती प्रत्यक्ष ३ मीटर आढळून आली आहे. रस्त्याचे डांबरीकरण, बी.बी.एम. व खडीकरण अंदाजपत्रकातील तरतुदी व मोजमाप पुस्तिकेतील मोजमापाशी मिळतेजुळते असल्याचे दिसून आले आहे. कामाचे साईड शेल्डर सिलकोटसह काम पूर्ण केल्याचे दिसून येत आहे. कामाचे अंतिमीकरण झालेले नसून कामाचे धावते देयक अदा करण्यात आले आहे. श्री. शिंदे यांनी उप समितीला उक्त माहिती दिल्यानंतर उप समितीने त्या बाबतीत समाधान व्यक्त केले. या बाबतचा अहवाल तयार करुन समितीस सादर करण्याच्या सूचना उप समितीने दिल्या.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता समितीने व्यक्त केलेली शंका औरंगाबाद येथील दक्षता व गुण नियंत्रण अधिकाऱ्यांनी पाठविलेल्या चौकशी अहवालातील निष्कर्ष तसेच उप समितीने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी प्रत्यक्ष रस्त्याच्या ठिकाणी भेट देऊन त्या रस्त्याची त्रयस्त अधिकारी श्री. शिंदे, उप अभियंता दक्षता व गुण नियंत्रण अधिकारी, ता.अंबाजोगाई, जि.बीड यांनी समितीला दिलेली माहिती ही दक्षता व नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांनी सादर केलेल्या अहवालाशी मिळतीजुळती असल्याने याबाबत समितीने समाधान व्यक्त केले. असे करीत असताना या प्रकरणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता यांनी समितीला सहकार्य केल्याबाबत समिती त्यांचे अभिनंदन करते.

प्रकरण चार

## जिल्हा परिषद, हिंगोली (प्रशासन)

### जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांनी पंचायत समित्यांना भेटी देण्याबाबत.

पंचायती राज समितीने दि. २४ ते २६ जून, २०१५ या कालावधीत हिंगोली जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१०-२०११ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावर तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोनबाबत दिनांक २५ जून, २०१५ रोजी हिंगोली जिल्ह्यातील विविध पंचायत समित्यांना भेट दिली असता जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांनी पंचायत समितीला भेटी देणे आवश्यक असताना त्या दिल्याचे समितीला आढळून आले नाही. याबाबत समितीने असमाधान व्यक्त केले.

साक्षी दरम्यान समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समितीला भेट देऊन पंचायत समितीच्या अंदाजपत्रकाची तपासणी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केली आहे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पंचायत समितीला किती भेटी दिल्या आहेत यावर समितीला मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी एक भेट दिलेली आहे असे सांगण्यात आले. यावर समितीने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी वर्षाला तीन भेटी देणे अपेक्षित आहे.

ग्रामीण पाणीपुरवठा अधिकारी यांनीदेखील भेटी देणे गरजेचे आहे. ग्रामीण भागामध्ये पाणी टंचाई असते त्यामुळे त्यांनी भेटी दिल्या पाहिजेत. यावर समितीस अशी माहिती प्राप्त झाली की, यातील मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची एक भेट ही पुढील आर्थिक वर्षातील आहे. त्यामुळे मागील आर्थिक वर्षातील एक व पुढील आर्थिक वर्षातील एक अशी मिळून भेटींची संख्या दोन दर्शविण्यात आली आहे.

समितीने पुढे आणखी अशी विचारणा केली की, हिंगोली पंचायत समिती क्षेत्रात किती आरोग्य केंद्र व उपकेंद्र आहेत, त्यापैकी किती केंद्राना जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी भेटी दिलेल्या आहेत, यावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी असे उत्तर दिले की, पंचायत समिती क्षेत्रात एकूण ४ प्राथमिक आरोग्य केंद्र असून एकूण २३ उपकेंद्र आहेत. त्यापैकी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रांना १९ वेळा व उपकेंद्रांना ४ वेळा भेटी दिलेल्या आहेत.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी दिनांक २५-११-२०१० रोजी भेट दिलेली आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी वेळोवेळी पंचायत समितीला भेट देऊन मार्गदर्शन केले पाहिजे. सध्याची परिस्थिती यापेक्षा वेगळी असेल असे मला वाटत नाही. सर्व विभाग प्रमुखांनी पंचायत समित्यांना नियमाप्रमाणे भेटी देणे आवश्यक आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटी देणे बंधनकारक केले पाहिजे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी वर्षातून एकदाच भेट दिली आहे असे सांगितले आहे. आता येथे लेखी उत्तरात मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी दोन वेळा भेटी दिल्याचे नमूद केले आहे. तेव्हा यातील खरे उत्तर कोणते आहे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा आरोग्य अधिकारी, कार्यकारी अभियंता (बांधकाम), कृषी विकास अधिकारी, समाज कल्याण अधिकारी, यांनी भेट न देण्याचे कारण काय आहे,समितीला यावर उत्तर प्राप्त झाले नाही त्यामुळे समितीने असे निदेश दिले की, ज्या अधिकाऱ्यांनी वर्षभरामध्ये एकही भेट दिली नाही अशा अधिकाऱ्यांची चौकशी करून त्याची सेवा-पुस्तिकेमध्ये नोंद घेण्यात यावी.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून खालील मुद्द्यांची माहिती मागितली.**

समितीने विविध पंचायत समितीला भेट दिली असता त्या पंचायत समितीला वर्षभरातून जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांनी भेटी देणे आवश्यक आहे. ज्या अधिकाऱ्यांनी निर्देशित केलेल्या भेटी सर्व संबंधित पंचायत समित्यांना दिल्या नाहीत त्या अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी केली आहे काय? तसेच चौकशीअंती ज्या अधिकाऱ्यांनी पंचायत समित्यांना भेटी दिल्या नाहीत त्यांचेविरुध्द सेवापुस्तिकेत नोंद घेतली आहे काय?

**उपरोक्त मद्द्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन २०१०-११ या वर्षात हिंगोली जिल्हा परिषदेतील ८ अधिकाऱ्यांनी पंचायत समित्यांना भेटी दिल्या नाहीत. संबंधित कार्यालयाकडून प्राप्त माहितीच्या आधारे खालील अधिकाऱ्यांची पंचायत समित्यांना भेटी दिल्या नसल्याचे आढळून आले आहे.

(१) श्री.एस.एस.जोशी, तत्कालीन कार्यकारी अभियंता, ग्रापापु.

(२) श्री. आर.डी.वाहणे, तत्कालीन कार्यकारी अभियंता, ग्रापापु.

(३) श्री.श्याम किवळेकर, तत्कालीन कार्यकारी अभियंता बांधकाम

(४) श्री. जि.आर.राठोड, तत्कालीन कार्यकारी अभियंता बांधकाम,ल.सि.

(५) श्री.बी.एस.कच्छवे, तत्कालीन कृषि विकास अधिकारी

(६) श्री.एस.पी.अग्रवाल, तत्कालीन कृषी विकास अधिकारी

(७) श्री. यु.डी.तोटवार, तत्कालीन समाज कल्याण अधिकारी

(८) श्रीमती संगीता आर मकरंद, तत्कालीन समाज कल्याण अधिकारी

मा.समितीने निर्देशित केल्याप्रमाणे वरील अधिकाऱ्यांनी पंचायत समिती कार्यालयांना विहित केलेल्या भेटी न दिल्यामुळे त्यांचे सेवापुस्तीकेत या बाबीची नोंद घेण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४५७०, दिनांक ०५/१०/२०१५ अन्वये वरील अधिकारी सद्यस्थितीत ज्या कार्यालयात कार्यरत आहेत त्या कार्यालयास व त्यांच्या वरिष्ठांना कळविण्यात आले आहे.

तसेच यापुढे सर्व अधिकारी यांनी नियमितपणे त्यांना विहित केलेले पंचायत समित्यांचे दौरे करण्याबाबत या कार्यालयाचे पत्र दिनांक १२/१०/२०१५ अन्वये सर्व अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे.

उपरोक्त मुद्द्यासंदर्भात समितीने विचारणा केलेल्या शासनाच्या अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास विभागाने जिल्हा परिषद, हिंगोली यांनी कलेल्या कार्यवाहीस व अभिप्रायाशी सहमती दर्शवली.

समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने सर्वक्षम चौकशी करुन विभागीय साक्षीच्या वेळी चौकशी अहवाल सादर केला.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने हिंगोली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. समितीने विविध पंचायत समित्यांना भेट दिली असता जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांनी वर्षभरात त्या पंचायत

समितीला विहित केलेल्या भेटी दिल्याचे आढळून आले नाही. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, वर्षभरातून जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांनी किती वेळा पंचायत समित्यांना भेटी देणे आवश्यक आहे, ज्या अधिका-यांनी निर्देशित केलेल्या भेटी सर्व संबंधित पंचायत समित्यांना दिल्या नाहीत त्या अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी केली आहे काय, तसेच चौकशीअंती ज्या अधिकाऱ्यांनी पंचायत समित्यांना भेटी दिल्या नाहीत त्यांचेविरुध्द सेवापुस्तिकेत नोंद घेतली आहे काय, त्यावर विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले की, सन २०१०-२०११ या वर्षात हिंगोली जिल्हा परिषदेतील ८ अधिकाऱ्यांनी पंचायत समित्यांना भेटी दिलेल्या नाहीत. श्री.एस.एस.जोशी, तत्कालीन कार्यकारी अभियंता, ग्रापापु, श्री.आर.डी.वहाणे,तत्कालीन कार्यकारी अभियंता,ग्रापापु, श्री.शाम किवळेकर,तत्कालीन कार्यकारी अभियंता बांधकाम, श्री.जी.आर.राठोड,तत्कालीन कार्यकारी अभियंता, बांधकाम /ल.सि., श्री.बी.एस.कच्छवे, तत्कालीन कार्यकारी अभियंता/ ल.सि, श्री.एस.पी.अग्रवाल,तत्कालीन कृषी विकास अधिकारी, श्री.यु.डी.तोटवार,तत्कालीन समाज कल्याण अधिकारी, श्री.संगीता आर मकरंद,तत्कालीन समाज कल्याण अधिकारी समितीने निर्देशित केल्याप्रमाणे वरील अधिकाऱ्यांनी पंचायत समिती कार्यालयांना विहित केलेल्या भेटी न दिल्यामुळे त्यांच्या सेवापुस्तिकेत या बाबीची नोंद घेण्याबाबत या कार्यालयाने पत्राने कळविलेले आहे. तसेच पुढील काळामध्ये विहित पंचायत समितीचे दौरे नियमितपणे करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समिती राज्यातील विविध जिल्हा परिषदांना भेटी देत असताना राज्यातील जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालावर तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन संदर्भात विविध पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांची साक्ष घेत असते. अशी साक्ष घेत असताना उक्त प्रश्नावली क्रमांक दोन मध्ये पंचायत समितीला जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांनी किती भेटी दिल्या इत्यादी बाबत विचारणा केली असता बहुतेक जिल्हा परिषदांचे विभाग प्रमुख पंचायत समितीला भेट देत नाहीत काही विभाग प्रमुख १ किंवा २ पंचायत समित्यांना भेटी देतात. नियमानुसार पंचायत समितीच्या प्रत्येक मासिक सभेस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नेमून दिलेल्या विभाग प्रमुखांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. असे असतानाही शासन नियमांचे पालन होत नसल्याचे समितीला आढळून आले आहे. त्यामुळे शासनाच्या विविध कल्याणकारी

योजना राबविताना या अधिकाऱ्यांची प्रशासनावर पकड राहात नाही असे समितीला आढळून आले आहे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पंचायत समितीने अर्थसंकल्प कसा तयार करावा, विविध योजनांसाठी निधी कसा राखून ठेवावा व तो कसा खर्च करावा, नियोजनांच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक कसे पाळावे, जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी आरोग्य विषयक समस्या, विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत समस्या मुलांच्या आरोग्याबाबत सूचना देणे आदि-बाबत कार्यवाही करणे आवश्यक असते. शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा, सिंचन, पशुसंवर्धन इत्यादी सर्वच विभागप्रमुखांनी पंचायत समितीला भेट देऊन आपल्या विभागाच्या अडचणी लक्षात घेऊन गट विकास अधिकारी यांना सूचना देऊन कार्यवाही करणे आवश्यक असते.

शासनाने विभागप्रमुखांच्या भेटीबाबत वेळोवेळी परिपत्रकेही निर्गमित केलेली आहेत. असे असूनही जिल्हा परिषदांचे विभाग प्रमुख याची गांभीर्याने दखल घेत नाहीत याबाबत समिती अतिव खेद व्यक्त करते. समितीला प्रशासकीय अधिकाऱ्यांवर असलेल्या अधिकच्या जबाबदारीची जाणीव आहे. परंतु **पंचायत समित्यांच्या मासिक सभेस उपस्थित रहाणे ही विभागप्रमुखांची प्राथमिक जबाबदारी आहे. हेही तेवढेच खरे आहे. म्हणून यापुढील काळात शासनाच्या ग्रामविकास विभागाने याप्रकरणी कडक स्वरुपाच्या सूचना देऊन विभागप्रमुखांनी पंचायत समित्यांच्या मासिक सभेस उपस्थित राहाणे अनिवार्य करावे व त्याप्रमाणे कार्यक्रमाची आखणी करुन ती सर्व जिल्हा परिषदांना पाठविण्यात यावी अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.**

**हिंगोली जिल्हा परिषदेच्या भेटीच्या वेळी जे अधिकारी पंचायत समितीच्या मासिक सभेस जाणीवपूर्वक उपस्थित राहिले नाही यांचा खुलासा मागविण्यात यावा व त्यांचेविरुध्द योग्य ती कार्यवाही करावी मात्र जे अधिकारी एकाही बैठकीस उपस्थित राहिले नाहीत अशा अधिकाऱ्यांच्या सेवापुस्तकात नोंद घेऊन त्यांच्याविरुध्द सक्त कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यांच्या आत सादर करावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, हिंगोली (प्रशासन)

**हिंगोली जिल्हा परिषदेंतर्गत गैरव्यवहाराची प्रकरणे.—**

पंचायती राज समितीने हिंगोली जिल्हा परिषदेला दिनांक २४ ते २६ जून, २०१५ या कालावधीत भेट दिली. भेटीच्यावेळी समितीने सन २०१०-११ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावर तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक एकवर दिनांक २६ जून, २०१५ रोजी जिल्हा परिषदेमध्ये अफरातफर तसेच गैरव्यवहारासंबंधित प्रलंबित प्रकरणांबाबत जिल्हा परिषदेने काय कार्यवाही केली आहे,विभागीय चौकशीसंबंधी माहिती द्यावी, अशी विचारणा समितीने केली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला अशी माहिती दिली की, या सर्व प्रकरणांचा पाठपुरावा सुरु आहे. काही प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्यामुळे किंवा तांत्रिक अडचणी असल्यामुळे निकाली निघालेली नाहीत.पहिल्या प्रकरणामध्ये न्यायालयात अभियोग दाखल करण्याची कार्यवाही चालू आहे. दुसऱ्या प्रकरणामध्ये ३ प्रकरणांपैकी १ प्रकरणाची विभागीय चौकशी पूर्ण झाली असून २ प्रकरणाची चौकशी सुरु आहे. तिसऱ्या प्रकरणामध्ये कौटुंबिक अडचण असल्यामुळे चौकशी करण्यामध्ये अडचण येत आहे.

यावर समितीने आणखी अशी विचारणा केली की, श्री. एस. आर. राठोड, से.नि. ग्रामसेवक, पंचायत समिती, सेनगाव यांची अपहारीत वसूलपात्र रक्कम रु.१३,८२,३१३/- असून वसूल होणे बाकी आहे. तात्पुरती सेवानिवृत्ती वेतन मंजूर असल्याचे आपण दिलेले आहे. यासंबंधी कोणती कारवाई सुरु आहे? यावर समितीला अशी माहिती प्राप्त झाली की, श्री. एस. आर. राठोड यांचे १९९८ ते २००१, २००९ ते २०१० आणि २०११ ते २०१२ असे ३ निलंबन कालावधी आहेत. त्यांचा निलंबन कालावधी नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. दोन निलंबन प्रकरणाची संचिका तयार आहे. तसेच वसुलीची कार्यवाही करणार आहोत.

समितीने अशी विचारणा केली की, वसुली कशी करणार आहात? यावर समितीला अशी माहिती प्राप्त झाली की, सदरहू रक्कम मोठी आहे. वेतनातून किंवा पेन्शनमधून वसूल करण्यास वेळ लागेल. त्यामुळे सेवानिवृत्ती लाभातून किंवा इतर असलेल्या तरतुदीनुसार वसूल करावी लागेल. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, काल

या प्रकरणासंबंधी उत्तर देत असताना श्री. राठोड हे निलंबित झाले असा आपण खुलासा केला होता. तसेच वसुली झाली असल्याचे सांगितले होते आणि आता सांगत आहात की, सेवानिवृत्ती लाभातून करता येईल. श्री. एच. आर. राठोड यांच्या प्रकरणाची विभागीय चौकशी लावली होती काय ? श्री. राठोड यांची निवृत्त होण्याची वाट पाहिली जात होती, असा संशय येतो. त्यांना मुद्दा संरक्षण दिले जात आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला अशी माहिती दिली की, श्री. राठोड यांची ३ प्रकरणे आहेत. कालचे प्रकरण वेगळे होते. श्री. राठोड दिनांक ३१-०३-२०१२ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. ३ पैकी एका प्रकरणाची विभागीय चौकशी पूर्ण झालेली आहे व २ प्रकरणाची कार्यवाही सुरु आहे. वसूल पात्र रक्कम ज्या काही तरतुदी असेल त्यानुसार वसूल करण्यात येईल.

जिल्हा परिषद, हिंगोलीच्या प्रलंबित सेवानिवृत्ती प्रकरणाबाबत दर महिन्याच्या कार्या.अधीक्षक/कक्ष अधिकारी बैठकीत विभागनिहाय आढावा घेण्यात येतो, असे दिलेले आहे. प्रत्येक महिन्याला अशा बैठका होतात काय, अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यामधील ज्यांचा सेवानिवृत्तीचा कालावधी २०१७ पर्यंत आहे, त्या प्रकरणांसंदर्भात महिन्याला विभागनिहाय बैठक घेण्यात येते, असे स्पष्ट केले.

त्यावर समितीने अशा आक्षेप घेतला की, सेवानिवृत्ती प्रकरणाबाबत प्रत्येक महिन्याला बैठक लावण्यात येते असा उल्लेख आहे. बैठका होत असतील तर निर्णय का होत नाही ? बैठका कागदोपत्रीच होतात काय? त्यावर समितीस उत्तर प्राप्त झाले नाही.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, श्री. यु. डब्ल्यु. लांडगे यांची अपहाराची रक्कम १ लाख ७५ हजार ८१२ रुपयांचा अपहार असल्याचे आपण सांगितले. स्पष्टीकरणामध्ये ८७ हजार ९०७ रुपये वसूल होणे बाकी आहे, असे दिलेले आहे. उर्वरित रक्कम वसूल झाली आहे काय, सदरहू प्रकरण २०१२ चे आहे, अपहारीत रक्कम मागील ३ वर्षांत वसूल का केली नाही, आपण सांगितल्याप्रमाणे दर महिन्याला एक बैठक यानुसार मागील ३ वर्षांत ३६ बैठका झाल्या असतील. या बैठकामध्ये निर्णय न घेण्याचे काय कारण आहे. श्री. लांडगे यांची विभागीय चौकशी पूर्ण झालेली आहे. आता अपहारीत रक्कम त्यांच्या सेवानिवृत्तीच्या लाभातून वसूल केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी समितीने असे निदेश दिले की, मागील तीन वर्षे बैठका झाल्या परंतु निर्णय घेतला नाही. हे प्रकरण प्रलंबित ठेवल्या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावी. आपल्या अधिकाऱ्याकडून यास विलंब करण्यात आला असेल तर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी. याबाबतचा अहवाल समितीला एका महिन्याच्या आत पाठवावा.

श्री. पेडगावकर यांच्या प्रकरणासंबंधी न्यायालयाने आदेश दिले आहे की, विभागीय चौकशीच्या अधिन राहून कारवाई करण्यात यावी. तरी देखील हा विषय प्रलंबित का ठेवण्यात आलेला आहे ? श्री.पेडगावकर यांची विभागीय चौकशी झाली होती. त्यानंतर या प्रकरणी न्यायालयाने कोणत्या तारखेला आदेश दिला होता ? अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अभियंता यांनी स्पष्ट केले की, समितीने काल यासंदर्भात सूचना केली होती की, या दोन्ही नस्ती समितीसमोर ठेवण्यात याव्यात. मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, दिनांक १३-०८-२०१२ रोजी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या आदेशातील दोन ओळी मी वाचून दाखवितो. माननीय उच्च न्यायालयाने अपिलात निर्देश दिले की, माननीय उच्च न्यायालयाचा निर्णय विचारात घेऊन वित्त विषयक प्रकरणे व्हेरिफॉय करुन निर्णय घ्यावा आणि ते प्रकरण निकाली काढण्यात यावे. बडतर्फीची जी कारवाई केलेली आहे त्याचा फेरनिर्णय घ्यावा आणि त्यांना रिइस्टेट करण्यात यावे. या प्रकरणाच्या रिइस्टेट संदर्भात कालच सन्माननीय सदस्यांनी सूचना दिली होती. त्यांचा चौकशी अहवाल मुख्य कार्यकारी अभियंता समितीकडे सुपूर्द केला. त्यावर समितीने त्यांचेवर विश्वास व्यक्त करत निदेश दिले की, ज्या व्यक्तीने हे प्रकरण हाताळले त्याच्याविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करावेत आणि कठोरातील कठोर शिक्षा करावी, तसेच दंडात्मक कारवाई करावी आणि सदरहू प्रकरणाचा अहवाल समितीकडे पाठवावा.

अपहाराच्या व गैरव्यवहाराच्या ७८ प्रकरणांपैकी १८ प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. एकूण रक्कम ६६ लाख १ हजार ४६ रुपयांमध्ये ८ प्रकरणांची विभागीय चौकशी सुरु आहे. ३ कोटी ८१ लाख १७ हजार ७१७ एवढी रक्कम प्रलंबित आहे आणि उर्वरित रक्कम ४४ लाख ८७२ रुपये एवढी आहे.

समितीने विचारणा केली की, ही रक्कम वसूल न होण्याचे कारण काय आहे, सदरची रक्कम वसूल करण्यासंदर्भात काय कार्यवाही सुरु आहे, जे कर्मचारी सेवानिवृत्त होतात त्यांना एनओसीसाठी यावे लागते. एनओसी देणारे अधिकारी कोण आहेत, त्यांच्यावर काय कारवाई केली आहे? तत्कालीन शिक्षणाधिकारी कोण आहेत, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, महोदय, मी आजची समितीची बैठक सुरु होण्यापूर्वीच एकछोटेसे करेक्शन केलेले आहे. ३ कोटी ८१ लाख ऐवजी ३८ लाख १८ हजार ७१७ असे वाचण्यात यावे. प्रिंटेड मिस्टेक झालेली आहे. पंचायत स्तरापासून ते जिल्हा स्तरावर या सर्व प्रकरणांमध्ये वसुलीची कार्यवाही सुरु आहे. रिव्हेन्यू रिकव्हरी सर्टिफिकेट घेण्यात येत आहेत. पर्टिकुलर व्यक्तींची संपत्ती, जमीन, प्लॉट, घर असेल तर ही माहिती उपलब्ध करुन घेण्यात येत आहे. त्या संपत्तीवर बोजा चढविणे, लिलाव करणे, ही प्रोसिजर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पूर्ण करण्यात येत आहे. मागील चार महिन्यांत आर.आर.सी.चे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविले आहेत. उरलेले सर्व प्रस्ताव एक महिन्यात जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवू आणि एकत्रित सर्व प्रस्तावांचा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा करण्याचा प्रयत्न करु.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, आता पर्यंत किती रक्कम वसूल करण्यात आली आहे, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, दिनांक ३१ मार्च २०१३ अखेर पर्यंत अपहारित प्रकरणांची संख्या ७८ होती. यात एकूण रूपये १५१८६९३५/- इतकी रक्कम गुंतलेली होती. त्यापैकी रूपये २८९०१०७/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे. यावर समितीने पृच्छा केली की, प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्याच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, अपहारित रक्कम वसूल करण्यासाठी संबंधितांविरूद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच अपहारित रक्कम वसूल करताना कर्ज उभारताना खुल्या बाजारातील जो व्याजदर असतो त्यापेक्षा एक टक्का जास्त दराने वसुली करण्यात यावी असे निदेश सर्व विभाग प्रमुखांना दिलेले आहेत.

**समितीने साक्षीच्या वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील माहिती मागविली.---**

७८ प्रकरणांपैकी १८ प्रकरणे न्यायप्रविष्ठ असून त्यात रक्कम रुपये ६६.१लक्ष गुंतलेली असून ८ प्रकरणांमध्ये विभागीय चौकशी सुरु असून त्यात ३.८१ कोटी इतकी रक्कम प्रलंबित आहे आणि उर्वरीत रक्कम ४४ लक्ष ८७२ एवढी वसूल करणे बाकी आहे. प्रकरणांची संख्या पाहता न्यायप्रविष्ठ प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासंदर्भात शासन निश्चित अशी भूमिका घेणार आहे काय ; तसेच विभागीय चौकशीची प्रलंबित प्रकरणे त्वरेने निकाली काढण्यासंदर्भात शासनाची काय भूमिका आहे व उर्वरीत थकीत रक्कम वसूल करण्याबाबत देखील प्राधान्याने वसुली कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे काय ;

**समितीस ग्रामविकास विभागाकडून उपरोक्त मुद्दयाची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.---**

जिल्हा परिषद हिंगोली अंतर्गत एकूण ७८ अपहारीत प्रकरणापैकी (१८ ऐवजी) ११ प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. सदर ११ प्रकरणांमधील एकूण रु. ६२,७१,९१९/- अपहारीत रक्कमेतुन आज रोजी रु. १०,५४,५९६/- एवढी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

प्रलंबीत रक्कमेच्या वसुलीसाठी ११ पैकी ९ प्रकरणांमध्ये मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे आर.आर.सी चे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. उर्वरीत २ प्रकरणांमध्ये उक्त प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर न्यायालयीन प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी जि.प. पॅनल वरील विविज्ञांना या कार्यालयाचे पत्र दिनांक १२-१०-२०१५ अन्वये सदर प्रकरणांमध्ये आवश्यक तो पाठपुरावा करुन प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## न्यायप्रविष्ठ प्रकरणांची सद्यस्थिती

| अ.क्र. | विभागाचे नाव | प्रकरणाची संख्या | जबाबदार अधिकारी/ कर्मचारी संख्या | इतर व्यक्ती | अपहार प्रकरणात गुंतलेली रक्कम | अपहार प्रकरणात वसूल झालेली रक्कम माहे सप्टेंबर २०१५ अखेर | अपहार प्रकरणात प्रलंबित रक्कम | त्यापैकी निलंबित कर्मचारी संख्या | बडतर्फ कर्मचारी संख्या | त्यापैकी विभागीय चौकशी प्रस्तावीत असलेली प्रकरणे | फौजदारी गुन्हा/ न्यायप्रविष्ठ प्रकरणे | आर. आर. सी. ची कार्यवाही प्रस्तावित प्रकरणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| १ | पंचायत | ५ | ४ | ६ | ९७५१३४ | ३५१२५६ | ६२३८७८ | १ | १ | १ | ५ | ५ | |
| २ | पशुसंवर्धन | १ | ३ | १ | ४३००० | ० | ४३००० | ० | ० | ० | १ | ० | |
| ३ | ग्रा.पा.पु | ३ | ३ | ३ | १७५०००० | ० | १७५०००० | ० | ० | ० | ३ | ३ | |
| ४ | पंस. कळमनुरी | १ | ९ | ० | २४७४४२ | ७०३३४० | १७९४१०२ | ० | ० | ० | १ | ० | |
| ५ | पं.स. सेनगाव | १ | १ | ० | १००६३४३ | ० | १००६३४३ | ० | ० | ० | १ | १ | |
| | एकूण . . | ११ | २० | १० | ६२७१९१९ | १०५४५९६ | ५२१७३२३ | १ | १ | १ | ११ | ९ | |

उपरोक्त संदर्भात समितीने विचारणा केलेल्या शासनाच्या अभिप्रायासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून जिल्हा परिषद हिगोंली यांनी केलेल्या कार्यवाहीस व अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात आली परंतु ग्रामविकास विभागाने प्रस्तुतबाबींवर हिंगोली जिल्हा परिषदेने आणखी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता वर्तवली.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने हिगोंली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली उक्त साक्षीच्या वेळी ७८ प्रकरणांपैकी १८ प्रकरणे न्यायप्रविष्ठ असून त्यात रक्कम रु. ६६.१ लक्ष गुंतलेली असून ३.८१ कोटी इतकी रक्कम प्रलंबित आहे आणि उर्वरित रक्कम रु. ४४,००,८७२ एवढी वसूल करणे बाकी आहे. प्रकरणांची संख्या पाहता न्यायप्रविष्ठ प्रकरणे तातडीने निकाली काढणे संदर्भात शासन निश्चित अशी भूमिका घेणार आहे काय ? तसेच विभागीय चौकशी प्रलंबित प्रकरणे त्वरेने निकाली काढण्यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे व उर्वरित थकित रक्कम वसूल करण्याबाबत देखील प्राधान्याने वसुली कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे काय, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, जे निवृत्त झालेले आहेत त्यांच्याकडून वसुली होत नाही यासाठी त्यांच्या ७/१२ किंवा नमुना नं.८ चा उतारा घेऊन आर.आर.सी.चे १५ प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविले आहेत. उर्वरित प्रकरणात डॉक्यूमेंट प्राप्त त्याचेही प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे वसुलीसाठी पाठविणार आहोत.

समितीने आणखी पुढे अशी विचारण केली की, जी ११ प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहे त्यात किती रक्कम गुंतली आहे, यावर अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ६२.७१ लाखापैकी १०.५४ लाख रुपये वसूल झाले आहेत. उर्वरित रक्कम वसूल होण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रॉपर्टीवर बोजा चढविण्यासाठी प्रस्ताव पाठविला आहे. असा खुलासा केला.

अशा अपचाऱ्यांमध्ये ज्यांच्याकडे प्रॉपर्टी नाही असे काही लोक आहेत का, असे समितीने विचारले असता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की,

प्रॉपर्टी आहे अशा १५ प्रकरणांमध्ये प्रस्ताव पाठविला आहे. इतर लोकांबाबत सर्च सुरु. आहे. सेवा पुस्तकामध्ये मूळ गावाचा उल्लेख असतो, त्या ठिकाणी पत्र पाठवून सर्च घेऊन डॉक्यूमेंट प्राप्त करुन घेऊन तसा प्रस्ताव पाठविणार आहोत.

समितीने याबाबत असे मत मांडले की, न्यायप्रविष्ठ विषय वेगळया पध्दतीने समोर ठेवण्यात येतो. नागपूर जिल्हा परिषदेला समितीने भेट दिली असता तेथे न्यायालयीन आदेश आणि न्यायप्रविष्ठ प्रकरण अशा दोन वेगळ्या बाबी दिसून आल्या होत्या. न्यायालयीन आदेश असतील अशी प्रकरणे वेगळी करावीत.न्यायप्रविष्ठ बाबीखाली मोठ्या प्रमाणात विलंब होतो. न्यायालयाने स्टे दिला असेल अशी प्रकरणे बाजूला ठेवून इतर प्रकरणातील रक्कम सक्तीने वसूल करण्याचे आदेश जिल्हा परिषदांच्या सीईओना दिले पाहिजेत. वसुलीची ॲक्शन घेऊ नये असा कोर्टाने स्टे दिला असेल तर आम्ही मान्य करु. परंतु न्यायप्रविष्ठ या सदराखाली सर्व विषय बाजूला ठेवणे योग्य नाही. न्यायालयाने स्टे दिलेला नाही अशी अपहार व अनियमिततेची प्रकरणे बाजूला करुन त्यातील रक्कम जिल्हा परिषदांनी सक्तीने वसूल करण्याचे आदेश आपण द्यावेत.न्यायप्रविष्ठ या शब्दाचे इंटरप्रिटेशन चुकीचे केले जाते. न्यायालयात प्रकरण दाखल केल्याची प्रत आणून दिली तरी प्रकरण न्यायप्रविष्ठ म्हणून थांबविता येते का ? नियमाप्रमाणे शासकीय प्रोसीजरबाबत कोर्ट स्टे देत नाही. समितीने हिंगोली जिल्हा परिषदेला भेट दिली त्यावेळी हा विषय चर्चेला आला होता. अपहार झाला याची निश्चित माहिती आहे. समितीने सूचना दिल्यानंतर आपण जिल्हाधिकाऱ्यांकडे आर.आर.सी.चा प्रस्ताव पाठविला आहे, आपण याबाबत पाठपुरावा केला तर शासनाची रक्कम वसूल होऊ शकते. न्यायालयीन व्यवस्थेचा आधार घेऊन मोठी रक्कम बाजूला ठेवण्याचे काम होत असेल तर सक्तीने वसुली होण्याबाबत आपण आदेश दिले पाहिजेत.

**अभिप्राय व शिफारशी :**

समितीने सन २०१०-११ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेली प्रश्नावली क्र.१ वर दिनांक २६ जून, २०१५ रोजी जिल्हा परिषदेमध्ये अफरातफर तसेच गैरव्यवहाराच्या प्रलंबीत प्रकरणांबाबत जिल्हा परिषदेव्दारा या सर्व प्रकरणांचा पाठपुरावा चालू आहे. काही प्रकरणे न्यायप्रविष्ठ असुन काही प्रकरणे

तांत्रिक अडचणींमुळे निकाली काढण्यास अडचणी निर्माण होत आहेत. प्रलंबीत प्रकरणांपैकी एक न्यायालयात प्रलंबीत असुन दुस-या तीन प्रकरणापैकी एका प्रकरणात विभागीय चौकशी पूर्ण झाली असुन दोन प्रकरणांची चौकशी चालू आहे. तिस-या प्रकरणात कौंटुबिक अडचणीमुळे चौकशीत अडचण येत आहे असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले, त्याचप्रमाणे श्री.एस.आर.राठोड से.नि.ग्रामसेवक यांचेकडून एकूण अपहारीत रक्कम १३,८२,३१३/- लक्ष वसूल होणे बाकी आहे. त्यांचे तात्पुरते सेवा निवृत्ती वेतन सुरु करण्यात आले आहे. त्यांचा १९९८ ते २००१, २००९-१०, २०११-१२ असा निलंबन कालावघी आहे. त्यांचा निलंबन कालावधी नियमीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दोन निलंबन प्रकरणांची संचिका तयार आहे परंतु अद्याप वसुलीची कारवाई सुरु केली नाही. त्याचप्रमाणे श्री. लांडगे यांची अपहारीत रक्कम रु.१.७५ लाख असुन त्यापैकी ८७०००/-रुपये वसूल होणे बाकी आहे. श्री. लांडगे यांची विभागीय चौकशी पूर्ण झाली असुन त्यांची अपहारित रक्कम त्यांच्या सेवानिवृती लाभातुन वसूल केली आहे.

जिल्हा परिषद, हिंगोली अंतर्गत एकूण ७८ अपहारीत प्रकरणापैकी (१८ ऐवजी) ११ प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. सदर ११ प्रकरणांमधील एकूण रु.६२,७१,९१९/- अपहारीत रक्कमेतून आज रोजी रु. १०,५४,५९६/- एवढी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. प्रलंबीत रक्कमेच्या वसुलीसाठी ११ पैकी ९ प्रकरणांमध्ये मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे आर.आर.सी चे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. उर्वरीत २ प्रकरणांमध्ये उक्त प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर न्यायालयीन प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी जिल्हा परिषद पॅनल वरील विधिज्ञांना या कार्यालयाचे पत्र दिनांक १२-१०-२०१५ अन्वये सदर प्रकरणांमध्ये आवश्यक तो पाठपुरावा करुन प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत. उपरोक्त विशद केलेली माहिती लक्षात घेता संबंधित अपहारीत तसेच गैरव्यवहाराच्या प्रकरणामध्ये सर्व संबंधीत अपचारी कर्मचारी/अधिका-यांकडून वसुली करण्यास जिल्हा परिषद प्रशासन तोकडे पडलेले आहे असे समितीला वाटते. जिल्हा परिषदेने जाणीवपूर्वक या प्रकरणी दुर्लक्ष केले असुन वसुलीची कारवाई प्रलंबीत ठेवून गैरव्यवहार करणाऱ्या

अधिका-यांना एक प्रकारचे अभय देऊन त्यांनी पाठीशी घातले असल्याचे समितीस दिसुन येते. ७८ पैकी ११ प्रकरणे न्यायप्रविष्ठ असुन त्यात ६६.१ लक्ष रक्कम गुंतलेली आहे. सदरची रक्कम वसूल करण्यास किंवा न्यायालयीन प्रकरणे त्वरेने निकाली काढण्यासंदर्भात जिल्हा परिषदेने कुठलीही ठोस कार्यवाही केली नाही. समितीने सांगितल्यानंतर पॅनल वकीलांना पत्राव्दारे कळविले आहे परंतु स्वयंप्रेरणेने जिल्हा परिषदेने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्याचप्रमाणे ८ प्रकरणामध्ये ३.८१ कोटी गुंतलेले असुन त्यापैकी केवळ ४४,००८७२/- एवढी रक्कम वसूल होणे बाकी आहे. सदर प्रकरणी विभागीय चौकशी प्रलंबीत असल्याचे दिसून येत आहे. मोठ्या प्रमाणावर रक्कम गुंतलेली असुनही विभागीय चौकशी प्रलंबीत असणे सुप्रशासनाच्या दृष्टीने धोकादायक आहे. यामध्ये जिल्हा परिषदेने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले असुन जिल्हा परिषदेच्या संबंधीत विभागप्रमुखांनी अपचारीत कर्मचा-यांना एक प्रकारे पाठीशी घातल्याचे दिसते. या सर्व प्रकरणांची त्वरेने चौकशी करुन अपचा-यांना शासन नियमाप्रमाणे दंडित करणे अपेक्षित होते. परंतु तसे घडले नसल्यामुळे समीती तीव्र खेद व्यक्त करते. आणि अधिका-यांच्या कार्यतत्परतेवर शंका उपस्थित करुन जे अधिकारी या अपहाराच्या प्रकरणी वसुलीस विलंब लावत आहेत त्यांची प्रकरणनिहाय चौकशी करुन खुलासा मागविण्यात यावा व खुलासा समाधानकारक नसल्यास संबंधीत सादरकर्त्या अधिका-यावर कारवाई करावी अशी शिफारस समिती करीत आहे.

**न्यायप्रविष्ठ प्रकरणे त्वरेने निकाली काढण्यासंदर्भात मोहीम हाती घ्यावी मग ते लोकअदालत असो किंवा सामोपचाराने निकाली काढणे असो कारण जिल्हा परिषदेव्दारे वकिलांची फी देखील संशोधनाचा विषय असल्यामुळे या प्रकरणी देखील जिल्हा परिषदेने अपहारीत रक्कमेपेक्षा वकीलांची फी जास्त देण्यात आली आहे किंवा कसे याची प्रकरणनिहाय माहिती तपासण्यात यावी त्यानुसार अपहारीत रक्कमेपेक्षा वकीलांची फी हा खर्च जास्त येत असल्यास सदर अपहारीत प्रकरणे न्यायालयातुन मागे घेण्याबाबत तसेच ते वगळण्याबाबत कारवाई करावी. अशा वगळलेल्या प्रकरणांमध्ये संबंधित कर्मचाऱ्यां विरुध्द कठोर अशी प्रशासकीय कारवाई करावी जेणे करुन शासनाची अपहारीत रक्कम वसूल होईल. अशीही समितीची शिफारस आहे. त्याचप्रमाणे प्रलंबीत वसुली त्वरीत करावी व केलेल्या वसुलीचा भरणा शासकीय कोषागारात करावा अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती ३ महिन्यांच्या आत समितीस देण्यात यावी.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

## ग्रामपंचायतींना कर आकारणीस होत असलेला प्रतिबंध.

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधी पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांशी अनौपचारीक चर्चा केली असता पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. प्रदिप कंद यांनी समितीला काही सूचना केल्या.

श्री.कंद यांनी केलेल्या सूचनांमध्ये प्रामुख्याने पुणे जिल्हा परिषदेसह राज्यातील सर्व जिल्हा परिषदा व एकंदर सर्व पंचायती राज संस्थांना भेडसावणाऱ्या समस्येला वाचा फोडली. सद्यःस्थितीत राज्यात ग्रामपंचायतींना कर आकारणी करण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे अनेक ग्राम पंचायतींना त्यांचे स्वतःचे उत्पन्न मिळत नाही, पर्यायाने त्यांचा विकास होण्यासाठी अडचणी निर्माण झालेल्या आहेत. यापूर्वी पंचायती राज समितीच्या अध्यक्ष पदी असताना माननीय श्री.शितोळे साहेबांनी समितीच्या माध्यमातून ग्रामपंचायत कर रचना कशी असावी, याबाबत शिफारस केली होती, त्याचा विचार होणे अत्यंत गरजेचे आहे. कर वसूल करता येत नसल्याने निधी अभावी ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रतिकुल परिणाम होण्यास सुरुवात झालेली आहे. त्यामुळे या विषयाबाबत लवकरात लवकर निर्णय होण्याकरिता समितीच्या माध्यमातून शिफारस करण्यात यावी.

मालमत्ता कराची आकारणी हा केवळ पुणे जिल्हा परिषदेचा प्रश्न नसुन संपूर्ण राज्यात अशी परिस्थिती उद्‌भवली असून पंचायती राज संस्थांच्या दैनंदिन कारभारावर परिणाम होत असल्यामुळे विभागीय सचिवांच्या साक्षीत सदर मुद्दा चर्चेस घेवून मार्ग काढण्याची गरज समितीने प्रतिपादीत केली.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून खालील मुद्याची माहिती मागितली.**

समितीने पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली असता समितीच्या अनौपचारिक चर्चेच्या वेळी पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष (श्री.कंद) यांनी राज्य शासनाने ग्रामपंचायतींना कर

आकारण्यास प्रतिबंध केल्यामुळे ग्रामपंचायतींना स्वतःचे उत्पन्न मिळत नाही, त्यामुळे ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम होत नाहीत, परिणामी त्यांच्या विकास कामावर परिणाम होत आहे, अशी माहिती दिली आहे. ही बाब विचारात घेता ग्रामपंचायत कर रचना निर्माण करुन त्याद्वारे ग्रामपंचायतींना कर आकारण्याचे अधिकार व नियंत्रण देण्यासंदर्भात शासनाची काय भूमिका आहे.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग परिपत्रक क्र.पीआयएल-२६१४/प्र.क्र.३३९/पंरा-४,दि.०६ एप्रिल,२०१५ अन्वये ग्रामपंचायत कर वसुलीस पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देणेत आलेली असून त्या संदर्भात विचारणा करणेत आलेनुसार हरकती व सूचना घेणेत येऊन स्थायी समिती सभा दि.०५-०७-२०१५ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या दि.२०-०७-२०१५ च्या अधिसूचनेबाबत भांडवली मुल्य कर आकारणीस तीव्र विरोध दर्शविलेला आहे.

तसेच मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, मुंबई यांना पत्र क्र.जिप/पंचा/९/१०५१/१५,दि.२१-०८-२०१५ अन्वये दि.०३-१२-१९९ मधील तरतुदी नुसार चौरस फुटास कर आकारणी केलेस ग्रामपंचायतीला कर आकारणी करणे संयुक्तिक राहील असे मत आहे, असा अभिप्रायासह प्रस्ताव सादर करणेत आलेला असून सदर बाब शासनस्तरावर निर्णयाधीन आहे.

**समितीस ग्राम विकास विभागाकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे लेखी स्वरुपात माहिती प्राप्त झाली.**

राज्यामध्ये दिनांक ३ डिसेंबर,१९९९ पूर्वी राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये भांडवली मूल्य किंवा वार्षिक भाडे मूल्यावर मालमत्ता कर आकारणी करण्यात येत होती. दिनांक ३ डिसेंबर,१९९९ च्या अधिसूचनेनुसार सदर कर आकारणी ही क्षेत्रफळावर आधारित करण्यात आली. मात्र, जनहित याचिका क्र.६०/२००१ मध्ये दर क्षेत्रफळावर कर आकारणीस

मा.उच्च न्यायालयामध्ये आव्हानित करण्यात आले. यामध्ये मा.उच्च न्यायालयाने सदरची क्षेत्रफळावरील कर आकारणी ही घटनेच्या अनुच्छेद १४ चा भंग करणारी असल्याने दिनांक ३ डिसेंबर,१९९९ च्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (सुधारणा) नियमातील नियम २ ते ४ आणि ५ (अ) हे रद्दबातल केले आहेत.

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठाचे आदेश विचारात घेता कर आकारणी पध्दतीमध्ये सुधारणा करणे अपेक्षित असल्याने दिनांक ९ जानेवारी,२०१५ च्या शासन निर्णयान्वये एक अभ्यासगट स्थापन करण्यात आला होता. सदरील अभ्यासगटाने दिनांक १६ एप्रिल,२०१५ रोजी अहवाल सादर केला आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशास अनुसरुन दिनांक ३ डिसेंबर,१९९९ च्या अधिसूचनेमध्ये करण्यात येणाऱ्या मालमत्ता कर वसुलीस दिनांक ६ एप्रिल,२०१५ च्या शासन निर्णयान्वये स्थगिती देण्यात आली आहे.

उपरोक्त अभ्यासगटाने सादर केलेल्या अहवालावर अधिक अभ्यास करणे आवश्यक असल्याने व ग्रामपंचायतींचे मालमत्ता कराच्या स्वरुपातील उत्पन्न स्थगित झाल्याने ग्रामपंचायतींना किमान उत्पन्न उपलब्ध होण्याच्या दृष्टीने दिनांक ३ डिसेंबर, १९९९ पूर्वी अस्तित्वात असलेल्या करप्रणालीनुसार ग्रामीण भागात भांडवली मुल्य/वार्षिक भाडेमुल्यावर आधारित कर आकारणीबाबत शासन अधिसूचना क्र.व्हीपीएम २०१५/ प्र.क्र.१४०/पंरा-४,दिनांक २० जुलै,२०१५ अन्वये हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या.

सदरचे प्रारुपावर विधानमंडळाच्या उपविधान समितीच्या दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत समितीने सदरहू अधिसूचनेबाबत कोणतेही अभिप्राय व्यक्त केलेले नाहीत. मात्र राज्यातील नागरिकांकडून सदर प्रारुपाबाबत जवळपास ७५०० हरकती व सूचना शासनाकडे प्राप्त झाल्या असून त्याचा विचार करुन आता शासनाने ग्रामपंचायतीतील मालमत्ता कर आकारण्याकरिता नवीन कर प्रणाली तयार केली असून त्याबाबतचा प्रारुप मसुदा पुन:श्च प्रसिध्द करुन त्यावर जनतेच्या हरकती व सूचना मागविण्याची कार्यवाही सुरु आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने दि. १० ते १२ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे दि. १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी उपरोक्त मुद्यावर [विभागीय सचिवांची] साक्ष घेतली. सदरहू साक्षी दरम्यान समितीने विभागीय सचिवांना विचारणा केली की, ग्रामपंचायतीना कर आकारणीस होत असलेला प्रतिबंध मुद्याबाबत विभागाच्या लेखी माहितीत असे म्हटलेले आहे की, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, यांना दिनांक अमूक रोजीच्या तरतुदीनुसार चौरसफुटास कर आकारणी करणे व ग्रामपंचायतीस कर आकारणी करणे व कराची वसुली करणे संयुक्तिक राहील असे मत आहे. अशा अभिप्रायासह प्रस्ताव सादर करण्यात आला असून सदर बाब शासन स्तरावर निर्णयाधीन आहे. या प्रकरणी निर्णय झाला आहे काय किंवा तो किती दिवसांत होईल, त्यावर विभागीय सचिवांनी समितीला असे विदीत केले की, राज्यात आपण सन १९९९ पासून ग्रामपंचायतीची कर पद्धती राबवित आहोत. सन १९९९ पासून जी पद्धत राबविण्यात येत होती ती व्यवस्थित होती. परंतु मागील डिसेंबर महिन्यात कोल्हापूर येथील मोरेवाडीतील एक व्यक्ती उच्च न्यायालयात गेली. त्यावर उच्च न्यायालयाने अशा ऑर्डर्स दिलेल्या आहेत की, आपण जी पद्धती अवलंबिलेली आहे ती योग्य नाही. ती अनकॉन्स्टीटयुशनल आहे. आम्ही त्यावर ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेऊन त्यास स्थगिती दिलेली आहे. त्यावेळी असे लक्षात आले की, यामध्ये काही विषयांच्या बाबतीत सुधारणा करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे आम्ही मे आणि जूनमध्ये तूर्त एक ड्राफ्ट नोटीफिकेशन तयार करुन त्याची प्रसिद्धी केली. आम्ही कॅपिटल व्हॅल्यू बेस पद्धतीने कर आकरणी करणार होतो. पण त्या संदर्भात अनेक आक्षेप आले. ग्रामपंचायतीचा कर आठ ते दहा पटीने वाढणार आहे असा आक्षेप आला. आम्ही त्या आक्षेपचा अभ्यास केला. सध्या त्याची अंमलबजावणी न करता पुन्हा एकदा नवीन पद्धतीबाबत सर्वांचे अभिप्राय घेणार आहोत. आम्ही स्थानिक सब कमिटी स्थापन केलेली आहे. सब कमिटी स्थापन करुन नवीन पद्धती राबविणार आहोत. आम्ही तो मसुदा वेबसाईटवर टाकणार आहोत आणि सर्वांचे अभिप्राय घेऊन नोव्हेंबर अखेर किंवा डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात त्यास अंतिम स्वरुप देण्याचा

विचार आहे. कर आकारणीस स्थगिती दिलेली आहे, हे खरे आहे. कोर्टाच्या निर्णयानंतर आम्ही मसुदा तयार करुन तो प्रसिद्ध केला होता. त्या संदर्भात आक्षेप आला म्हणून आम्ही त्यामध्ये दुरुस्ती केलेली आहे. आम्ही अजून त्यास अंतिम स्वरुप दिलेले नाही. या महिन्यात विधी व न्याय विभागाची मान्यता मिळाल्यावर आम्ही मसुदा प्रसिद्ध करणार आहोत. लोकांकडून आक्षेप मागविण्यासाठी नियमाप्रमाणे पंधरा-वीस दिवस देणे आवश्यक आहे. तेव्हा नोव्हेंबर अखेरपर्यंत किंवा डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यातपर्यंत अंतिम पद्धती निश्चित होईल.

समितीने नागरीकांचा आक्षेप काय होता याबाबत जाणून घेण्यासाठी विभागीय सचिवांना पृच्छा केली.विभागीय सचिवांनी समितीला विदीत केले की, सन १९९९ च्या आधी आपली कॅपिटल बेस सिस्टीम होती आणि त्यानुसार आपण टॅक्स आकारणी करीत होतो. जो मालमत्ताधारक होता म्हणजे ज्याची ॲसेट असायची त्याला त्याच्या मालमत्तेचे मूल्य विचारले जायचे आणि त्यानुसार त्याच्यावर टॅक्स आकारत होतो. परंतु मालमत्ताधारक मालमत्तेचे मूल्य कमी सांगायचा त्यामुळे ग्रामपंचायतीला टॅक्स कमी मिळत होता. नंतर आपण स्क्वेअर फूटानुसार कर आकारत होतो. स्क्वेअरफूटामध्ये कुठेही मॅन्युप्युलेशन करता येत नाही आणि स्क्वेअरफूट माहीत असल्यामुळे आपणास टॅक्स आकारणी परफेक्ट करता आली. त्यामुळे ग्रामपंचायतीचा टॅक्स खूप वाढला. सन २००१ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात आणि सन २००४ मध्ये नागपूरमध्ये एक केस दाखल झाली. त्याचा निर्णय डिसेंबर आणि मार्च महिन्यात आला. दोन्ही केसमध्ये न्यायालयाने सांगितले की, आपली टॅक्स पॉलिसी ॲनकॉन्स्टीटयुशनल आहे आणि घटनेच्या १४ व्या अनुच्छेदाला डावलणारी आहे. या करामध्ये समानतेचे तत्व डावलले जात आहे. त्यामुळे या पॉलिसीला तत्काळ स्टे देण्यात यावा आणि न्यायालयाने असे सांगताना सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या तीन निवाड्यांचा उल्लेख केला. आपण आपल्या पॉलिसीमध्ये टाईम पिरीयड विचारात घेत नव्हतो. म्हणजे २५ वर्षापूर्वीचे घर आणि २५ वर्षांनंतरचे घर या दोघांनाही सारख्ाच टॅक्स लागत होता. त्याशिवाय आपण प्लेस विचारात घेत नव्हतो. पुण्यातील घर, गडचिरोलीतील घर, अमरावतीतील घर, औरंगाबाद येथील घर या सर्वांना स्क्वेअरफुट बेसिसवर समानतेच्या तत्वानुसार टॅक्सेशन लावले जायचे.

आपण कॅपिटल बेसवर नवीन सिस्टीम केली. कॅपिटल बेसवर कर आकारणी करीत असताना लॅन्ड कॉस्ट, कन्स्ट्रक्शन कॉस्ट या दोन्हींचा विचार करणे आवश्यक होते. यामध्ये अभ्यास करण्याची गरज होती. दरम्यानच्या काळात आमच्या असे लक्षात आले की, ग्रामपंचायतीला करापासून वंचित रहावे लागत आहे. म्हणून आम्ही १९९९ पूर्वीची सिस्टीम पुन्हा राबविण्याचा प्रयत्न केला. घरांच्या किंमती रेडीरेकनरप्रमाणे कॅल्क्युलेट केल्यामुळे टॅक्स अवास्तव वाढला हे आमच्या लक्षात आले. आमच्याकडे साडेसातशे ऑब्जेक्शन्स आल्या. आम्ही त्याचा पूर्ण साकल्याने अभ्यास केला. आता टॅक्स वाढणार नाही याची आम्ही काळजी घेत आहोत. आम्ही तयार केलेले प्रारुप मंत्री महोदयांनी मंजूर केले आहे. आता आम्ही ते प्रारुप विधी व न्याय विभागाकडे पाठविणार आहोत. कालच आमची विधी व न्याय विभागासोबत फायनल मिटींग झाली. त्यांनी ते टॅक्स प्रारुप क्लिअर केलेले आहे. आम्हाला दोन दिवसांत ती फाईल मिळेल. मंत्री महोदयांकडून मान्यता मिळाल्यानंतर विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात येईल. दिनांक १६ नोव्हेंबर, २०१५ रोजी आमची विधी व न्याय विभागासोबत बैठक झालेली आहे. येत्या दोन दिवसांत विधी व न्याय विभागाची मान्यता मिळेल.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, विभागाकडून अंतिम निर्णय काय घेण्यात येणार आहे, त्यावर विभागीय सचिवांनी नवीन पध्दतीची थोडीशी रुपरेषा समितीस विदीत केलेली अशी की, जमिनीची किंमत ही रेडीरेकनरनुसार होणार आहे. इमारतीची किंमत सुध्दा रेडीरेकनरनुसार होणार आहे आणि इमारत तयार करताना बिल्डिंगचा प्रकार काय आहे त्यानुसार आम्ही वेटेज देणार आहे. जुन्या बिल्डींगचे क्षेत्र १.४० टक्के पेक्षा जास्त होणार नाही. मागील दरानुसार १०० रुपये घेतले तर नवीन दर १२५ रुपये होईल याप्रमाणे सुधारणा करण्यात येईल. जास्त फरक आला तर लोकांमध्ये नाराजी येईल. त्यानंतर आदिवासी दुर्गम भागातील लोकांना थोड्याशा सवलती देतो. शहराच्या बाजूला असलेल्या बिल्डिंगला थोडा जास्त दर असणार आहे. बिल्डिंगचा उपयोग कमर्शियल, घरगुती वापरासाठी सुध्दा आम्ही वेटेज देणार आहोत. पैसे वेळेवर भरल्यास थोड्या जास्त सवलती देण्यात येतील आणि उशिरा भरला तर दंड आकारण्यात येईल असे मुद्दे आम्ही ठेवलेले आहेत.

समितीने शंका व्यक्त केली की, अशी अधिसूचना ग्रामविकास व जलसंपदा विभागाकडून आलेली आहे. शिवडीच्या धर्तीवर शासनाने कार्यवाही करावी. शासनाने ग्रामपंचायतीला त्याप्रमाणे करुन द्यावे. एकीकडे आपण म्हणता की, ४० टक्क्यांच्या वर वाढायला नको. हे सर्व नियम जर लागू केले तर १०० टक्के दर वाढणार आहेत. आपण एक नियम घालून द्यावा की, दर वर्षांनी याचे मुल्यांकन झाले पाहिजे. दिडपटच्या वर होणार नाही अशी अट त्यात टाकून द्यावी. त्यावर विभागीय सचिवांनी सहमती दर्शवली की, याची आम्ही याठिकाणी काळजी घेतलेली आहे.

समितीने आणखी सूचना केली की, जी शहरालगतची गावे आहेत तेथे लोक प्राध्यान्याने घरे बांधित आहेत. कारण त्या भागात टॅक्स लागत नाही. शहरी भागात टॅक्स लागतो. आजही नगरपालिकांमध्ये धार्मिक स्थळांना टॅक्स माफच आहे. पूर्ण महाराष्ट्रालाच धार्मिक संस्थांना करातून सूट देण्यात यावी जेणे करुन हा प्रश्न संपून जाईल.

समितीच्या मते सदर कर नगरविकास विभागाच्या धर्तीवर पाहिजे. कारण नगरविकास विभागामध्ये जे चालले आहे ते जर चुकीचे असते तर आतापर्यंत हे काम बंद झाले असते. शहरी भागाच्या लगतच्या ग्रामपंचायतींना फार अडचणी आहेत. त्यावर विभागीय सचिवांनी समितीस स्पष्ट केले की नगरविकास विभागाच्याच धर्तीवर केलेले आहे. समितीच्या लक्षात येईल.

समितीने शहराच्या बाजूला ज्या त्रिशंकू जागा आहेत त्याठिकाणी लोक फार मोठ्या प्रमाणावर घरे बांधीत आहेत. ही घरे ग्रामपंचायती आणि नगरपालिकेमध्येही नसतात अशा वस्तीतील लोकांसाठी शासनाचे काय धोरण आहे. अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, याबाबतीत ग्रामविकास विभागाचा एक शासन निर्णय आहे त्यात स्पष्ट उल्लेख आहे की, त्रिशंकू विभाग ज्याठिकाणी असेल तो विभाग प्रथम कलेक्टर साहेबांकडे देऊन त्याचे रिव्हेन्यु व्हिलेजमध्ये रुपांतरित करायला पाहिजे. एकदा रिव्हेन्यु व्हिलेज स्थापन झाली म्हणजे आपल्याला यामध्ये तिनही ऑप्शन खुले होतात. पहिली गोष्ट म्हणजे लोकसंख्या आर्थिक निकषात बसत असेल तर आपण त्याची नवीन ग्रामपंचायत स्थापन करु शकतो. दुसरा भाग म्हणजे त्यामध्ये असलेल्या ग्रामपंचायतीला आपण जोडू शकतो किंवा बाजूला एखादी नगरपरिषद असेल तर त्यामध्ये आपण घेऊ शकतो.

समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिले की, लोकांची मागणी असूनही याप्रमाणे शासन निर्णय घेत नाही. काही भागामध्ये तीन हजारापेक्षा जास्त लोकवस्ती आहे, पण तो त्रिशंकू आहे. त्यावर विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले की, आम्ही संपूर्ण महाराष्ट्रात त्रिशंकू किती आहेत याची माहिती घेतो. हा आढावा घेत असताना बारामतीचा विषय लक्षात आला आणि काही वर्षापूर्वी आम्ही एक आढावा इश्यू केलेला आहे.

समितीने आणखी सूचना केली की नगरविकास विभागाच्या प्रस्तावाप्रमाणे शासनाच्या विचाराधीन आहोत. आपण सांगितले की, याठिकाणी साडेसात हजार हरकती आल्या. आपण हरकती मागवायला सुरुवात करुन त्यावर कार्यवाही करीत आहात, पण त्याला कालावधी ठरवून द्यावा.

समितीने या विषयाशी संदर्भात आणखी एक सचिवांच्या निदर्शनास आणले की, मतदार यादीमध्ये त्यांचे नाव एका ग्रामपंचायतीमध्ये आणि घरपट्टी लागते शेजारच्या ग्रामपंचायतीमध्ये हा काय प्रकार आहे. आता निवडणूक सदोष म्हणायची का ग्रामपंचायत सदोष म्हणायची पण हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. रायगड जिल्ह्यातील रोहा ग्रामपंचायतीमध्ये असाच प्रकार आहे आणि हा मुद्दा अनेकवेळा चर्चेला आलेला आहे. पेण तालुक्यामध्ये सुध्दा अशाच प्रकारची ग्रामपंचायत आहे. अशा ग्रामपंचायतमधील लोकांनी काय करायचे. तेथील पदाधिकारी सांगतात त्यांना कायद्याने पैसा खर्च करता येत नाही.

समितीच्या मते कर आकारणीबद्दल काही म्हणणे नाही तो तर नागरिकांना भरावाच लागणार आहे. प्रश्न असा आहे की, कर एका ग्रामपंचायतीमध्ये भरतात आणि त्यांची नावे दुसऱ्या ग्रामपंचायतीमध्ये आहेत. त्यामुळे दोन्ही ग्रामपंचायती यातून अंग झटकतात. त्यांचे म्हणणे असे आहे की, तुम्ही आमच्या हद्दीमध्ये नाही त्यामुळे आम्ही तुमचे काम करु शकत नाही आणि ज्यांच्याकडे कर भरतात त्यांचे म्हणणे असे आहे की, तुम्ही दुसऱ्या ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये आहात. मतदार यादीमध्ये नाव आहे त्यांचे म्हणणे असे आहे की, तुम्ही आम्हाला कर देत नाही त्यामुळे आम्ही काही करु शकत नाही. हा प्रश्न एवढा मोठा आहे की, यामुळे तेथील निवडणूक रद्द होऊ शकते. सर्वसामान्य मतदारांच्या हक्कावर गदा आणणारा हा प्रकार आहे. यावर विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की मालमत्ता बदलणार नाहीत परंतु संबंधित व्यक्तींनी आपली नावे बदलून घेणे आवश्यक आहे. तसेच याबाबत माहिती घेवून समितीला अहवाल सादर करण्यात येईल.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांशी अनौपचारिक चर्चा केली असता पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, श्री. प्रदिप कंद यांनी पुणे जिल्हा परिषदेसह राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमधील ग्रामपंचायतींना कर आकारणी करण्यास बंदी घातल्यामुळे अनेक ग्रामपंचायतींना त्यांचे स्वतःचे उत्पन्न मिळत नाही पर्यायाने त्यांचा विकास होण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या आहेत. ग्राम पंचायतींची कर रचना या बाबतदेखील श्री. शितोळे साहेबांनी समितीच्या माध्यमातून शिफारस केली होती.

कर वसुली होत नसल्याने निधीअभावी ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रतिकूल परिणाम होण्यास सुरुवात झालेली आहे आणि त्यामुळे या समितीच्या माध्यमातून यावर शासनाला शिफारस केल्यास तातडीने निर्णय घेण्यास मदत होईल असे नमूद केले आहे.

जिल्हा परिषदेकडून या संदर्भात लेखी स्वरुपात पाठविलेल्या माहितीत असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग परिपत्रक क्रमांक टीआयएल-२६१४/प्र.क्र.३३४/पंरा-४ दिनांक ६ एप्रिल, २०१५ अन्वये ग्रामपंचायतीकरिता वसुलीस पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात आली असून त्या संदर्भात विचारणा करण्यात आल्यानुसार हरकती व सूचना घेण्यात येऊन स्थायी समितीसोबत दिनांक ५.७.२०१५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २०.७.२०१५ रोजीच्या अधिसूचनेबाबत भांडवली मूल्य कर आकारणीस तीव्र विरोध दर्शविला आहे. तसेच शासनाकडे तरतुदीनुसार चौरस फुटास कर आकारणी केल्यास ग्रामपंचायतीला कर आकारणी करणे संयुक्तीक राहील असा अभिप्रायासह शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असून तो निर्णयासाठी प्रलंबित आहे. ग्राम विकास विभागाकडून या संदर्भात माहिती प्राप्त झाली असून त्यात राज्यामध्ये दिनांक ३ डिसेंबर, १९९९ पूर्वी राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये भांडवली मूल्य किंवा वार्षिक भाडे मूल्यावर मालमत्ता कर आकारणी करण्यात येत होती. दिनांक ३ डिसेंबर, १९९९ च्या अधिसूचनेनुसार सदर कर आकारणी क्षेत्रफळावर आधारीत करण्यात आली. मात्र मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका क्रमांक ६०/२००१ मध्ये क्षेत्रफळावर कर आकारणीस आव्हानीत करण्यात येऊन यामध्ये मा.उच्च न्यायालयाने सदरची क्षेत्रफळानुसार कर आकारणी ही घटनेच्या अनुच्छेद १४ चा भंग करणारी असल्याने उपरोक्त नमूद अधिसूचनेनुसार महाराष्ट्र ग्राम पंचायत कर व फी (सुधारणा) नियमातील

नियम २ ते ४ आणि ५ (अ) हे रद्दबातल केले आहेत. मा.न्यायालयाच्या मान्यतेनुसार दिनांक ९ जानेवारी, २००५ च्या निर्णयान्वये एक अभ्यास गट स्थापन करण्यात आला असून सदरहू अभ्यास गटाने दिनांक १६ एप्रिल, २०१५ रोजी अहवाल सादर केला आहे. तसेच उपरोक्त नमूद दिनांक ३ डिसेंबर, १९९९ च्या अधिसूचनेमध्ये आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता कर वसुलीस दिनांक ६ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयान्वये स्थगिती देण्यात आली आहे. शासनाने कर आकारणीसंदर्भात अधिसूचना प्रसिध्द करुन नागरिकांकडून यावर त्यांचे अभिप्राय मागविले असता सुमारे ७५०० हरकती व सूचना शासनाकडे प्राप्त झाल्या असून त्याचा विचार करुन आता शासनाने ग्रामपंचायतीतील मालमत्ता कर आकारणीकरिता नवीन कर प्रणाली तयार केली असून त्या बाबतचा प्रारुप मसुदा पुन्हा प्रसिध्द करुन त्यावर जनतेच्या हरकती व सूचना मागविण्याची कार्यवाही सुरु आहे.

या प्रकरणी विभागीय साक्षीमध्ये विभागीय सचिवांनी असे विदित केले की, अमूक रोजीच्या तरतुदीनुसार चौरस फुटाप्रमाणे कर आकारणी करणे व ग्राम पंचायतीद्वारे कर वसुली करणे संयुक्तीक राहील असे मत व्यक्त केले व त्या बाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर निर्णयासाठी प्रलंबित असून त्याच्यावर किती दिवसात निर्णय होईल हे सांगता येत नाही. या प्रकरणी न्यायालयाने सदरचा करआकारणी असंविधानिक असल्याचा निर्णय दिल्यामुळे आम्ही त्यावर राज्याचे महाअधिवक्ता यांचे मत मागवून कर आकारणीस स्थगिती दिली. आता एक अधिसूचना प्रसिध्द केल्यानंतर त्यावर जनतेकडून अनेक आक्षेप आले. या अधिसूचनेनुसार ग्रामपंचायतीचे कर ८ ते १० पटीने वाढत आहेत असा आक्षेप आला आहे आणि शासन स्तरावर त्या आक्षेपांचा अभ्यास केला असता त्याची अंमलबजावणी न करता पुन्हा एकदा जनतेच्या सुचनांचा विचार करुन नव्याने प्रारुप तयार करुन त्यावर जनतेकडून सूचना मागविण्यात येऊन आणि त्यावर सर्वांचे अभिप्राय घेऊन नोव्हेंबर व डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात त्यास अंतिम स्वरुप देण्याचा विचार आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतर आम्ही कर आकारणीसंदर्भात नवीन मसुदा तयार करुन त्यास विधी व न्याय विभागाची मान्यता मिळाल्यानंतर आम्ही मसुदा प्रसिध्द करणार आहोत. लोकांकडून आक्षेप मागविण्यासाठी नियमाप्रमाणे १५ ते २० दिवस देणे आवश्यक आहे. तेंव्हा नोव्हेंबर अखेर किंवा डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत अंतिम पूर्तता निश्चित होईल असे समितीस सांगितले.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता शासनाने दिनांक ३ डिसेंबर, १९९९ च्या अधिसूचनेनुसार ग्राम पंचायतीच्या क्षेत्रातील कर आकारणी ही क्षेत्रफळावर आधारित करण्यात आल्याचे कारणावरुन मा.उच्च न्यायालयात आव्हानीत करण्यात आलेल्या याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने सदरच्या अधिसूचनेतील काही तरतुदी ह्या संविधानाच्या अनुच्छेद १४ चा भंग करणाऱ्या असल्याने ती रद्दबातल केली.

**त्यानंतर विभागाने पुन्हा नव्याने एक अधिसूचना प्रसिध्द करुन ती जनतेकडे अभिप्रायासाठी सादर केली असता त्यावर सुमारे ७५०० लोकांच्या हरकती व सूचना प्राप्त झाल्या याचाच अर्थ सदरच्या सूचनेस जनतेचा प्रचंड विरोध असल्याचे दिसून येते. असा विरोध प्रशासनाकडे प्राप्त झाल्यानंतर प्रशासन पुन्हा नवीन अधिसूचना प्रसिध्द करुन ती विधी व न्याय विभागाच्या मान्यतेनंतर प्रसिध्द करण्यात येणार असल्याचे सांगितले असून ती नोव्हेंबर अखेरपर्यंत किंवा डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत अंतिमरित्या प्रसिध्द केली जाईल असे समितीला आश्वासीत केले आहे. त्यानुसार सदरचे प्रारुप अद्यापही प्रसिध्द झाले नसल्यामुळे यावर अजूनही निर्णय झाला नसल्याचे समितीला दिसून येत आहे. कारण त्याबाबतची कुठलीही कागदपत्रे अद्यापपर्यंत तरी समितीसमोर सादर केलेली नाहीत. राज्यातील ग्रामपंचायतीने कर आकारणी करणे हे ग्रामपंचायतीचा विकास होण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सध्याच्या करप्रणालीमधून ग्रामपंचायतीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन, नागरिकांना सोयी-सुविधा इत्यादीबाबत ही कर वसुली तुटपुंजी असल्यामुळे शासन स्तरावरुन या संदर्भात मोठ्या प्रमाणावर ग्रामपंचायतींना अनुदान देणे यावर ही मर्यादा असून आर्थिक बाबीसंदर्भात ग्राम पंचायतींना मोठ्या प्रमाणावर अडचणीस सामोरे जावे लागत असल्याची वस्तुस्थितीदेखील समितीसमोर आली आहे. या सर्व बाबींचा विचार करता शासनाने ग्राम पंचायतीतील प्रस्तावित क्षेत्रातील कर आकारणी धोरणाबाबत ठोस भूमिका घेऊन सुधारित कर आकारणी करण्यासंदर्भात जनतेच्या हरकती व सूचना विचारात घेऊन एक सर्वंकष धोरण निश्चित करुन समितीस आश्वासीत केल्याप्रमाणे ते जनतेच्या अभिप्रायासाठी त्वरेने प्रसिध्द करण्यात यावे व सदरची कार्यवाही ही कोणत्याही परिस्थितीमध्ये दोन महिन्यांच्या आत करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### पी.एम.आर.डी.ए. च्या स्थापनेनंतर अधिकृत तसेच अनधिकृत बांधकामाच्या नोंदी होत नसल्यामुळे ग्रामपंचायतींना घरपट्टीच्या महसुलापासून मुकावे लागत असणे.

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्ह्यातील विधानमंडळ सदस्यांशी केलेल्या अनौपचारीक चर्चेदरम्यान ग्रामपंचायत क्षेत्रात बांधकामांच्या नोंदी घेण्याच्या संदर्भात पुणे जिल्हा परिषदेस कोणत्या अडचणी येतात या संदर्भात सन २००९ मध्ये महाराष्ट्र टाऊन प्लॅनिंग ॲक्टनुसार एमएमआरडीएच्या धर्तीवर पुण्यामध्ये पीएमआरडीए व रायगडमध्ये आरएमआरडीए तयार केली. ग्रामपंचायत ॲक्ट, स्टॅम्प ॲक्ट, नोंदीचा कायदा अशा २-३ कायद्यांमध्ये सुधारणा करणे अपेक्षित होते, त्या कायद्यात प्रोव्हिजन झाल्यामुळे नोंदी करण्यात येऊ नये असे ठरले. त्यामध्ये जिल्हाधिकारी कॉम्पिटंट ऑथोरिटी जाहीर करण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांच्या अखत्यारित गेल्यामुळे ग्रामपंचायतीचे अधिकार गेले. जिल्हाधिकाऱ्यांनी गावठाणांमध्ये नोंदी करू नये असे आदेश दिल्यामुळे काही ठिकाणी गावठाणांमध्ये नोंदी होत नाहीत आणि गावठाणांच्या बाहेरही नोंदी होत नाहीत अशी स्थिती निर्माण झाली आहे. मात्र त्यानंतर त्यांनी त्यामध्ये थोडी शिथिलता आणून गावठाणांच्या नोंदी करण्यास मान्यता दिली. दिनांक १० फेब्रुवारी, २०१० पासून पुणे जिल्ह्यात गावठाणांच्या बाहेरच्या नोंदी करणे पूर्णपणे थांबले आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून एनए, बांधकाम सुरू करण्याची एनओसी, सीसी अशा परवानग्या असणाऱ्या बांधकामांच्या नोंदी होतात. जेथे ही कागदपत्रे नाहीत तेथे नोंदी होत नाहीत. आता पीएमआरडीए अस्तित्वात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व अधिकार त्यांना दिले आहेत. माननीय पालकमंत्री त्याचे अध्यक्ष आहेत, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, महापौर सदस्य आहेत, जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, तालुक्यांचे सभापती सदस्य आहेत. सदर बाबतीत सुलभता आणण्यासाठी श्री. स्वाधिन क्षत्रिय यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. समितीने त्या संदर्भातील प्रारूप सुध्दा शासनाला सादर केले होते. महाराष्ट्र टाऊन

प्लॅनिंग ॲक्ट, ग्रामपंचायत ॲक्ट, स्टॅम्प ॲक्ट, नोंदणी ॲक्ट यामध्ये सुधारणा सुचविल्या आहेत आणि त्यासाठी विधानमंडळात त्या संदर्भातील विधेयक देखील ठेवण्यात आले होते. मात्र त्या संदर्भात समितीने पुनश्चः विचार करावा अशी चर्चा झाली आणि त्या अनुषंगाने फेरविचार करावा असे ठरले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या निवेदनानंतर समितीने असे प्रतिपादन केले की, पुणे आणि रायगड येथे मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झाल्याचे सांगितले जाते. वास्तविक पाहता या दोन जिल्ह्यांव्यतिरिक्त राज्याच्या इतरही जिल्ह्यांमध्ये अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. ज्यावेळी अनधिकृत बांधकामे सुरु होती त्यावेळी प्रतिकार करण्यात आला नाही. पूर्वीच्या कालखंडात अनधिकृत बांधकामे झाली, आजही सुरु आहेत आणि पुढेही सुरुराहतील. त्यामुळे पुणे आणि रायगड जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामांच्या बाबतीत निर्णय घेणे आवश्यक आहे. ही बांधकामे अनधिकृत असली तरी आपण कोणतेही घर पाडणार नाही. ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये बांधकाम करण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेतली नाही हे खरे असले तरी त्या क्षेत्रात झालेले बांधकाम सर्वांना दिसते. जर ही बांधकामे पाडावयाची झाली तर हजारो रहिवाशी रस्त्यावर येतील. त्यामुळे ग्रामपंचायत क्षेत्रात होणाऱ्या अनधिकृत बांधकामाच्या नोंदी होणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकाम झाले तर त्या बाबतच्या नोंदी होत नाहीत. परंतु महापालिका मात्र त्या रहिवाशांकडून टॅक्स वसूल करण्यास तयार असते. परंतु ग्रामपंचायतीच्या बाबतीत जे निर्बंध घातले आहेत ते योग्य नाहीत.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, या विषयाच्या अनुषंगाने शासनाने शासन निर्णय निर्गमित केला आहे काय? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, ग्रामपंचायत क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाच्या नोंदी कराव्यात अशा सूचना नाहीत. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता अधिनियमांतर्गत वेगळ्या तरतुदी आहेत. त्या तरतुदी अंतर्गत आदेश पारित करुन निर्णय घेतला जातो. जिल्हा परिषद, पुणे यांनी या विषयाच्या अनुषंगाने शासनाकडे एक पत्र पाठविले आहे. आम्ही शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे की, अनधिकृत बांधकामामुळे जिल्हा परिषदेचे रेकॉर्ड खराब होते. अनधिकृत बांधकामाच्या नोंदी केल्या नाही तर जिल्हा परिषद स्तरावर वेगळी आणि फील्डवर वेगळी परिस्थिती निर्माण होते. शिवाय अनधिकृत बांधकामाच्या घरपट्टीला ग्रामपंचायतीला मुकावे लागते.

अवैध बांधकामांची नोंद आणि त्यावरील कर आकारणी हा केवळ पुणे जिल्हा परिषदेचा प्रश्न नसुन संपूर्ण राज्यात अशी परिस्थिती थोड्या फार फरकाने भेडसावत आहे. नागरी भागामध्ये नगर पंचायती, नगर परिषदा व महानगर पालिकांमध्ये अवैध बांधकामांवर कर आकारणी केली जाते. अशा महसुला पासून त्या संस्था वंचित राहत नसतील तर पंचायती राज संस्थांना अशा महसुला पासून वंचित ठेवणे योग्य नाही. अतः सदरहू बाब विभागीय सचिवांच्या साक्षीत चर्चेस घेवून मार्ग काढण्याची गरज समितीने प्रतिपादीत केली.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून खालील मुद्याची माहिती मागितली.**

(१) दिनांक १० फेब्रुवारी, २०१० पासून गावठाणांच्या नोंदी इत्यादी नागरीकांच्या दैनंदिन जिवनाशी निगडीत बाबी जिल्हाधिकारी यांचेकडे कार्यान्वित केल्या असून संबंधित अधिनियमांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे काय, असल्यास याबाबत शासनाची भूमिका काय आहे.

(२) महानगरपालिका व नगरपालिका हद्दीत अनधिकृत बांधकामांवर मालमत्ता कर आकारला जातो. परंतु ग्रामपंचायत क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावरील घरपट्टीच्या महसूलापासून ग्रामपंचायतीला मुकावे लागते. तसेच ग्रामपंचायतीचे रेकॉर्ड देखील सदोष होते. सदर विषयावरील जिल्हा परिषद पुणे यांचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला असून त्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

दि.१० फेब्रुवारी,२०१० चे मा.जिल्हाधिकारी यांचेकडील पत्राबाबत व गावठाण क्षेत्रातील बांधकाम परवानेबाबत शासनाने दि. २९ डिसेंबर,२०१४ रोजी महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम २०१४ प्रसिध्द केलेला आहे. त्याप्रमाणे प्रादेशिक योजना जाहीर झालेल्या क्षेत्रात गावठाणामधील बांधकाम परवान्याचे अधिकार ग्रामपंचायतींना देणेत आलेले आहेत.

मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, मुंबई यांना पत्र क्र. जिप/पंचा/९/१०५१/१५ आणि पत्र क्र. जिप/पंचा/५/१४७२/१४, दि.०१/१२/२०१४ अन्वये सविस्तर अहवाल सादर करणेत आलेला असून पुणे जिल्हा अंतर्गत पंचायत समित्यांकडून प्राप्त झालेल्या सन २०१० नंतर पूर्ण झालेल्या परंतु ग्रामपंचायतीकडे नोंदी न झालेल्या बांधकामामुळे ग्रामपंचायतीचे होणाऱ्या नुकसानीबाबतच्या प्राप्त माहितीनुसार परवानगी घेतलेल्या परंतु मंजूर क्षेत्रफळापेक्षा/क्षेत्रफळापेक्षा जास्त बांधकाम केलेमुळे नोंदी न केलेल्या बांधकामांची व अनधिकृत/ विनापरवाना बांधकाम केल्यामुळे नोंदी न केलेल्या बांधकामांची व अनधिकृत/ विनापरवाना बांधकाम कराची रक्कम ३९.१३ कोटीचे (एका वर्षाला) ग्रामपंचायतीचे कराचे नुकसान होत असलेने ज्यामध्ये विनापरवाना, अनधिकृत, अतिक्रमित वा परवानगीपेक्षा जादा बांधकाम केलेल्या इमारती/ बांधकामांच्या नोंदी फक्त कर आकारणीसाठी घेणेत याव्यात व या रजिस्टरला समांतर/ विनापरवाना बांधकामे नोंदवही संबोधण्यात यावे. पंचायतीचे नियमित कर आकारणी रजिस्टर नमुना नं.८ पेक्षा हे रजिस्टर वेगळे असेल याला ८ ब/ समांतर रजिस्टर संबोधण्यात यावे, असे सूचविलेले आहे. सदर प्रस्ताव शासनास सादर करणेत आलेला असून सदर बाब शासनस्तरावर निर्णयाधीन आहे.

**समितीस ग्रामविकास विभागाकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

राज्यातील ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर बांधकामे होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्याने अशा अनधिकृत बांधकामांबाबत प्रभावीरित्या कार्यवाही करणे, अशी अनधिकृत बांधकामे पुढे होऊ न देणे, बांधकाम परवानगीच्या प्रक्रियेचे सुलभीकरण करणे इ. विषयी उपाययोजना व धोरण सुचविण्याकरीता शासनाने शासन निर्णय दि.७/९/२०१२ अन्वये अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशीस अनुसरुन दि. २८-२-२०१४ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार डिसेंबर,२०१४ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम,२०१४ (सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४३)

पारीत करण्यात आला आहे. या सुधारणा अधिनियमान्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ५२, ५३ व १७६ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. उक्त सुधारणा शासन अधिसूचना दिनांक १५ मे, २०१५ पासून लागू करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ५२ नुसार बांधकाम परवानगीबाबत तरतूद आहे. उक्त करण्यात आलेल्या सुधारणानुसार ग्रामीण भागातील गावठाण तसेच, प्रादेशिक योजना नसलेल्या गावांमधील बांधकामांना पंचायत समिती स्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या नगररचना अधिकाऱ्यांच्या पुर्वसंमतीने परवानगी देण्याचे अधिकार ग्रामपंचायतींना देण्यात आलेले आहेत.

(२) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १२४ अन्वये पंचायतीस कर व फी आकारणीबाबतची तरतूद असून त्यानुसार ग्रामपंचायतीला गावाच्या हद्दीतील सर्व इमारतींवर कर बसविण्याचा अधिकार आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा संहिता २०११ अन्वये तयार करण्यात आलेल्या नमुन्यांतील नमुना नं.८ हे कर मागणीचे पत्रक असून या नमुन्यामध्ये ग्रामपंचायत हद्दीतील करपात्र असणाऱ्या सर्व इमारतींची नोंद घेऊन त्यावर वसूलपात्र कराची रक्कम नमूद करण्यात येते व त्यानुसार कराच्या नोटीसा पाठविल्या जातात. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की,—

(अ) पुणे जिल्ह्यामध्ये जसा अनधिकृत बांधकामांचा प्रश्न आहे तसा राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये ही असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अनधिकृत बांधकामांकरीता स्वतंत्र नमुना नं.८ ठेवण्याबाबत राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये काय परिस्थिती आहे याबाबत पडताळणी करणे आवश्यक असून त्याअनुषंगाने माहिती घेऊनच संपूर्ण राज्यांकरीता सर्व समावेशक अशा सूचना द्याव्या लागतील.

(ब) अशा अनधिकृत बांधकामांची नोंद नमुना नं.८ ला घ्यावयाची झाल्यास त्याआधारे खरेदी-विक्रीचे व्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे. नमुना नं.८ हे फक्त कर मागणीचे पत्रक असून त्याद्वारे मालकी हक्क सिध्द होत नाही. त्यामुळे अशाप्रकारे नमुना नं.८ ला नोंद घेतल्यास नोंदणी विभागाच्या निबंधकांना तशा सूचना देणे क्रमप्राप्त आहे. प्रादेशिक योजना असलेल्या गावांमध्ये याबाबत नगर विकास विभागाच्या काही सूचना असल्यास त्यांचाही विचार करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने महसूल विभाग आणि नगर विकास विभागाशीही विचारविनिमय करावा लागणार आहे.

(क) शासनाने नमूद केलेल्या उक्त तरतूदींनुसार जी बांधकामे होतील ती अधिकृतच असतील व त्याच्या नोंदी घेणे अभिप्रेत आहे. अनधिकृत बांधकाम झाल्यास त्याचे निष्कासन करण्याबाबतच्या तरतूदीही ग्रामपंचायत अधिनियमामध्ये करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे अनधिकृत बांधकामांच्या नोंदी घेण्याबाबत किंवा त्या घेण्याकरीता स्वतंत्र असा नमुना विहित केल्यास अनधिकृत बांधकामांना प्रोत्साहन देण्यासारखे आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत जरी अनधिकृत बांधकाम असले तरी सदर बांधकामामुळे उभी होणारी इमारत ही करपात्र असल्याने त्याची नोंद घेऊन त्यावर कर आकारणी करणे अपेक्षित आहे. मात्र अशी नोंद घेतल्यामुळे सदर अनधिकृत बांधकाम अधिकृत झाले असा त्याचा अर्थ होत नाही. कारण महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रांमध्ये सुध्दा अनधिकृत बांधकामांकरीता कर आकारणीच्या नोटीसा पाठविल्या जातात.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी एमएमआरडीएच्या स्थापनेनंतर अधिकृत तसेच अनधिकृत बांधकामांची यादी होत नसल्याने ग्रामपंचायतींना घरपट्टीच्या महसूलापासून मुकावे लागत असून यामध्ये दिनांक १० फेब्रुवारी, २०१० पासूनच्या नोंदी जिल्हाधिकारी यांच्याकडे केल्या असून संबंधित अधिनियमामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत शासनाची भूमिका काय आहे यावर विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले की, अध्यक्ष महोदय, एकाच विषयामध्ये दोन विषय आहेत. दिनांक १० फेब्रुवारी, २०१० रोजीचा जो रेफरन्स देण्यात आलेला आहे त्या रेफरन्सचे पत्र आपल्या रेकॉर्डला आहे. त्यामध्ये पीएमआरडीए स्थापन होण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांनी असे पत्र दिले होते की, मेट्रोपॉलिटिन कौन्सिल २००९ मध्ये स्थापन झाली होती. त्यामुळे त्या भागातील सर्व बांधकामांची परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे गेलेले होते. बांधकाम परवान्याचे अधिकार हे फक्त जिल्हाधिकाऱ्यांनी वापरावेत, ग्रामपंचायतींनी वापरु नयेत असे त्या पत्रामध्ये नमूद करण्यात आलेले होते आणि ते आपल्या रेकॉर्डला आहे. यामध्ये कुठेही असे

म्हटलेले नव्हते की, त्यांनी बांधकामाच्या नोंदी घेऊ नयेत किंवा कर आकारणी करुनये असे या पत्रामध्ये कुठेही म्हटलेले नाही. यानंतर एक पत्र निघाले होते त्यावेळी त्यावेळच्या विभागीय आयुक्तांनी त्यामध्ये असे कुठेही म्हटलेले नव्हते की, कर आकारणी करु नये. कारण कर आकारणी करणे हा वेगळा विषय आहे आणि बांधकाम परवानगी देणे हा वेगळा विषय आहे. यानंतर दिनांक ३१ मार्च, २०१५ ला पीएमआरडीएची स्थापना झाली आणि त्यानंतर असे कुठल्याही प्रकारचे पत्र देण्यात आलेले नाही. या अगोदर दिनांक २९ डिसेंबर, २०१४ ला शासनाने व्हिलेज पंचायत आठ आणि नियमावलीमध्ये दुरुस्ती करुन गावठाण हद्दीतील बांधकामाच्या ज्या परवानग्या आहेत त्याचे अधिकार पुन्हा ग्रामपंचायतींना देण्यात आलेले आहेत. कराचा पूर्वीप्रमाणेच सेक्शन १२४ व्हिलेज पंचायत आठ प्रमाणे पूर्वीही कर आकारणी ग्रामपंचायतीकडे होती. कलेक्टरनी त्याला स्थगिती दिलेली नाही. कर आकारणीमध्ये कोणत्याही प्रकारचा संभ्रम असण्याचे काही कारण नाही.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, महसूल उपलब्ध करुन देणारा हा विषय ग्रामपंचायतीचा आहे. पुण्याच्या हद्दीमध्ये अशा ग्रामपंचायती मोठ्या प्रमाणात आहेत की, त्याठिकाणी अशा इमारती झालेल्या आहेत. ज्यावेळी समितीने पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली त्यावेळी अशा अनेक बाबी समोर आल्या. ज्या ग्रामपंचायतींनी या कारणास्तव अशा इमारती टाकलेल्या आहेत त्या अनधिकृत इमारती असतील पण त्याठिकाणी जो कर असतो ते सर्व वसूल करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीला असतात. कारण हा निधी शासनाच्या तिजोरीत जमा होणार आहे. त्यामुळे समिती आपल्याला अशाप्रकारची सूचना देत आहे. त्यावर विभागीय सचिवांनी पीएमआरडीएच्या आयुक्तांनी जो मुद्दा याठिकाणी मांडलेला आहे त्याला सहमती दर्शवून पुढे समितीस विदीत केले की, सन २००९ मध्ये पीएमआरडीएच्या एमआरटीपी खाली एका विशिष्ट एरियात ४६२ गावांचा समावेश करण्यात आलेला होता. याठिकाणी पीएमआरडीए मार्च, २०१५ ला स्थापन झालेले आहे. यामधला कालावधी जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकारात होता. सन २००९ ते मार्च, २०१५ या कालावधीत बिल्डिंग बांधकामाचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे होते. ग्रामपंचायत अधिनियम आणि एमआरटीपी ॲक्ट, रजिस्ट्रेशन ॲक्ट तसेच यामध्ये ज्या कायदेशीर अडचणी निर्माण झाल्या होत्या त्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी तत्कालीन

विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. या समितीने त्यांचा अहवाल मंत्रालयात सादर केला. तत्कालीन महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी तयार केली. सध्याचे माननीय मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली ही कमिटी होती. या कमिटीने अहवाल सादर करुन कायद्यामध्ये दुरुस्त्या सुचविल्या होत्या. यानंतर या कायद्यामध्ये दुरुस्ती करुन डिसेंबर, २०१४ च्या अधिवेशनामध्ये यामध्ये दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता अनधिकृत इमारती बांधण्यात आलेल्या आहेत. ग्रामपंचायत ॲक्टमध्ये आपल्याला काही नव्याने तरतुदी कराव्या लागतील. ज्याने अनधिकृत बांधकामे केलेली आहेत त्यांना वीज, पाणी ह्या जीवनावश्यक बाबी असल्याने या सोयी देण्याचे शासनाचे धोरण असल्याने त्यांना आवश्यक त्या सोयी देण्यात येत आहेत. याबाबत माननीय प्रधान सचिव साहेब यांच्याबरोबर चर्चा विनिमय करुन मार्ग निश्चितपणे काढू.

सध्या डिसेंबर, २०१४ च्या अधिवेशनात नियमामध्ये दुरुस्ती केल्यामुळे सध्या टाऊन प्लॅनर प्रत्येक तालुक्याला असावा अशी नियमामध्ये अमेंडमेंट आलेली आहे. त्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्याला प्रत्येक पंचायत समितीला नगर रचना विभागाबरोबर विचार विनिमय करुन करणार आहे. त्या ठिकाणी बांधकाम झालेले आहे नियमामध्ये बसते ते कंपाऊंडीगसुध्दा गाईड लाईन इश्यू करणार आहोत. एकदम अनधिकृत असले तर ते रेग्युलराईज करणे शक्य होणार नाही. अशा पध्दतीने कुठपर्यंत सुलभता आणता येईल या दिशेने काम करीत आहोत.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, त्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम जरी असले तरी कर वसूल करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीचा आहे. ८ अ च्या बाबतीत शासनाकडून निदेश प्राप्त करुन घ्यायचे आहेत. त्याबाबत चर्चा करुन मार्ग काढू. त्यावर विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले की, आपण अनधिकृत बांधकामे आणि अधिकृत बांधकामे यासाठी सध्या कर आकारणीची जी कर पध्दती राबविलेली आहे. त्यामध्ये तुमची इमारत उभी राहत असेल तिला कर आकारणी बंधनकारक आहे. त्यामध्ये अनधिकृत आणि अधिकृत बांधकामे यांच्या परवानगीच्या बाबतीत किंवा त्यावर घ्यावयाच्या ॲक्शनच्या बाबतीत डिफर होवू शकते. परंतु कर आकारणी बाबतीत दोन्ही पध्दतीने अशा प्रकारे

आता श्री.झगडे सरांनी सांगितले की, त्यामध्ये कर आकारणीसाठी कुठेही कायदा प्रतिबंधीत नाही की, अनधिकृत बांधकामांना कर आकारणी करु नये ही बाब नंबर एक झाली. बाब नंबर दोन अशी आहे की, अनधिकृत इमारती ज्या आहेत त्याच्यामध्ये दोन प्रकार आहेत. काही अनधिकृत काही अवैध आहेत. रेग्युलर बिल्डींग परमिशन घेणे अपेक्षित आहे अशा प्रकारे अंतर न सोडणे, परमिशन न घेणे याच्यामुळे बिल्डींग अनधिकृत ठरली जाते. अवैध म्हणजे शासकीय प्रापर्टीवर जी अतिक्रमणे होतात त्यांना अवैध म्हणतो. ग्रामपंचायत ॲक्टमध्ये याबाबतीत पूर्णपणे तरतुदी आहेत. ग्रामपंचायत अधिनियम ५२ (४) नुसार दंड बसविता येतो, ५२ (५) नुसार डिमोलेशन कारवाई करु शकतो, ५३ नुसार अवैध इमारत डिमॉलिश करतो. अशा प्रकारे अवैध इमारती असतील तर त्यांच्यावर कारवाई करायला पाहिजे. पुढचा मुद्दा मांडला तो कंपाऊंडींगचा त्याबाबत ड्राफ्ट तयार केलेला आहे. तोही आमच्या विचाराधीन आहे. कंपाऊंडींगमध्ये असे करतो आहोत की, अशा प्रकारे अनधिकृत बांधकामे जी आहेत. ती ठराविक एक्सटेंड पर्यंत परमिशिबल ठेवू. कुठले एक्सटेंड आहे ते जिल्हाधिका-यांच्या कन्सल्टेशननुसार फायनल होईल. कंपाऊंडीच्या डायरेक्शन नगररचना धर्तीवर तयार केलेल्या आहेत. अशा प्रकारे कंपाऊंडींग स्ट्रक्चर प्रशंगिक संरचना म्हणून आपण त्यांना म्हणणार. अनधिकृत इमारती ह्या अधिकृत होणार नाहीत. त्यामुळे अधिकृतसाठी त्यांना न्यायालयात क्लेमही करता येणार नाही. अशा प्रकारच्या तरतुदी करतो आहोत. प्रशासनिक संरक्षणसाठी त्यांना वेगळा प्रशमन आकार आकारला जाईल मग फक्त किरकोळ दुरुस्ती करण्याची पॉवर राहील. परंतु त्याच्यामध्ये त्यांना रिडेव्हलपमेंट करायची असेल तर त्यांना रितसर सर्व परवानग्या घ्याव्या लागतील. डिटेल तरतूद कायदयामध्ये करण्याची ऑलरेडी प्रोसेस चालू आहे ऑलमोस्ट संपत आलेली आहे. समिती जशी निदेश देईल त्यापध्दतीने आम्ही कारवाई करु.

समितीने पुढे आणखी अशी विचारणा केली की, ब-याच गावांमध्ये गावठाण शिल्लक नसते. त्या ठिकाणी बाहेरील शेतीचे खासगी प्लॉट असतात त्याठिकाणी बांधकाम होत असते. बांधकाम होत असेल ते आपण थांबवू शकत नाही का, त्यावर विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, त्यामध्ये अधिकृत व अनधिकृत हा फरक राहणार आहे. अनधिकृत

बांधकामाच्या संबंधी डिटेल गाईड लाईन्समध्ये घेवू व कव्हर करु. अनधिकृत बांधकाम होवूच दिले नाही तर. तशीच तरतूद आहेत. आपल्याला हे सांगू इच्छितो की, आतापर्यंत डिटेलमध्ये डिस्कस करत नव्हतो. कारण हा विषय अतिशय डिटेलमध्ये आहे. परंतु आता सांगतो अशा प्रकारे बांधकाम होणे, किंवा या बांधकामाला उत्तेजन देणे, अशा प्रकारे बांधकामावर कारवाई न करणे, याबाबतीत आम्ही पिनल प्रोव्हीजन केलेली आहे त्यांच्याविरुध्द गुन्हे दाखल करून संबंधित जे कोणी अधिकारी/ पदाधिकारी त्यांना मदत करतील त्यांच्याविरुध्द गुन्हे दाखल करुन इप्रिझनमेंट व्हिथ पनिशमेंट इथपर्यंत प्रपोज केलेले आहे. आपण सूचविलेले सर्व मुद्दे डिटेलमध्ये कंसिडर करतो आहोत.

समितीने पुढे अशी सूचना केली की, यामध्ये एक दुसरा विषय असा आहे की, टाऊन प्लॅनिग तालुका स्तरावर आहे. आज त्या कामासाठी लोकांना जिल्हा स्तरावर जावे लागते. अनेक लोकांना आठ-आठ दिवस, महिना-महिना परवानगी मिळत नाही. त्याबाबतीतही लवकर निर्णय घेणे गरजेचे आहे. परवानगीचे काम ६० दिवसात होत नसेल तर डिम कंडिशन घालावी.

त्यावर विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, लोकांना टाईम प्लॅन देण्याबाबत विचार सुरु आहे. लोकांना प्रत्येक वेळी जिल्हास्तरावर जाण्याची गरज नाही. याबाबतच्या सूचना नगर विकास विभागाकडून आलेल्या आहेत. प्रत्येक वेळी लोकांना जिल्हास्तरावर जाणे शक्य होत नसते. मॉडेल प्लॅन असेल तर तो मान्य व्हावा. १० दिवसांची ही कंडिशन मसुद्यामध्ये आहे. मी याबाबत पुन्हा सांगू इच्छितो की, असे १० टाऊन प्लॅन पास केलेले आहेत. शासन निर्णय प्रोसेसमध्ये आहे. त्याची फाईल माननीय राज्यमंत्र्यांकडे आहे. नगर विकास विभागाच्या मान्यतेने अगोदरच १० प्लॅन फायनल केलेले आहेत. अर्ज कसा करावा, कोणाला करावा यासंबंधीची फाईल नगर विकास विभागाकडून क्लीअर होवून आलेली आहे. सर्व फायनल झालेले आहे. अत्यंत सुलभिकरण होण्याच्या दृष्टीने १० पैकी एखादया टाऊन प्लॅन निवडला तर तुम्हाला ग्रामपंचायत लगेच परमिशन देवू शकेल अशी तरतूद करतो आहोत ही बाब क्रमांक १ झाली. बाब नंबर २ बाबत आपण सांगितले त्याप्रमाणे ६० दिवसा संदर्भात परमिशनच्या बाबतीत डिम कंडिशनची अट समाविष्ट केली आहे. ग्रामपंचायत ॲक्टमध्ये ५२ (३) नुसार आम्ही ती

तरतूद केलेली आहे. ६० दिवसांमध्ये परमिशन मिळाली नाही तर त्यामध्ये डिम परमिशन आहे असे मानायला हरकत नाही. ही परमिशन व्हीथ ऑल टाऊन प्लॅनिंगचे जे रेग्युलेशन्स् आहेत ते सर्व रेग्युलेशन्स् तुम्हाला ॲप्लीकेबल होवून परमिशन मिळालेली आहे असे गृहीत धरण्यात येईल. परमिशननुसार डिव्हाईड केले फॉलटर केले तर ते पुन्हा अनधिकृत बांधकाम धरले जाईल. अशा प्रकारच्या तरतुदी कायद्यामध्ये केलेल्या आहेत त्या ५२ (३) नुसार आहेत.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली असता उक्त भेटीच्या वेळी झालेल्या अनौपचारिक चर्चेत पुणे जिल्ह्यातील ग्राम पंचायत क्षेत्रात अधिकृत/ अनधिकृत बांधकामाच्या नोंदी घेण्यासंदर्भात पुणे जिल्ह्यातील असलेल्या अडचणीसंदर्भात समितीला अशी माहिती प्राप्त झाली की, सन २००९ मध्ये मुंबई नगर रचना अधिनियमानुसार एमएमआरडीए च्या धर्तीवर पुण्यामध्ये पीएमआरडीए व रायगडमध्ये आरएमआरडीए स्थापन केली असून मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, मुद्रांक अधिनियम, नोंदणी अधिनियम अशा २-३ अधिनियमामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे आणि पीएमआरडीए व आरएमआरडीए ही स्थापन झाल्यामुळे व तशा तरतुदी झाल्यामुळे येथे जिल्हाधिकारी हे सक्षम प्राधिकारी जाहीर करण्यात आले आहेत आणि त्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्याच्या अखत्यारीत गेल्यामुळे त्यांनी महानगरपालिका, नगरपालिका हद्दीबाहेरील बांधकामांना पुर्णत्वाचा दाखला देणेबाबत दिनांक १० फेब्रुवारी, २०१० रोजी परिपत्रक निर्गमित केले असून उक्त परिपत्रकात पुणे जिल्ह्यामध्ये पुणे महानगर प्रदेश अधिनियम, २००९ च्या तरतुदी लागू झालेल्या आहेत. पुणे जिल्ह्यतील महानगरपालिका, नगरपालिका, कॅन्टोन्मेंट बोर्ड, पिंपरी-चिंचवड नवघर प्राधिकाऱ्यांनी यांच्या हद्दीबाहेरील जमिनीबाबत जिल्हाधिकारी पुणे हे नियोजन प्राधिकारी आहेत त्यामुळे जिल्हाधिकारी पुणे हे नियोजन प्राधिकारी असलेल्या क्षेत्रामध्ये विकास कामे करावयाची झाल्यास अकृषिक परवानगी देण्यासह बांधकाम आराखडे मंजूर करुन बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देणे वगैरे जबाबदारी जिल्हाधिकारी पुणे यांचेवर आहे.

यापूर्वी जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतीमार्फत त्यांना अधिकार नसताना बांधकाम आराखडे/ रेखांकन मंजूर करणे तसेच बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देणे अशा प्रकारची कार्यवाही झाली असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिनांक ८-५-२००९ च्या पत्राद्वारे कळवून त्यात ग्रामपंचायत हद्दीमध्ये गावठाण हद्दीच्या बाहेर कोणत्याही बांधकामास परवानगी देण्याचे अधिकार ग्रामपंचायत, सरपंच, ग्रामसेवक यांना नाहीत. त्यामुळे त्यांनी कोणत्याही बांधकामास परवानगी देऊ नये असे सर्व संबंधितांना कळविले आहे. याबाबत आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी देखील दिनांक २२-१२-२०१० रोजी अनधिकृत बांधकामास आळा घालण्याबाबत परिपत्रक निर्गमित केले असून पुणे जिल्ह्यातील ग्रामपंचायतीकडून त्यांचे अखत्यारीतील मोकळ्या जागेवर इमारत बांधकाम करण्यास परवानगी दिली जाते. सदरची परवानगी देताना कोणतेही नियम पाळले जात नाहीत. अकृषिक परवानगी प्राप्त नसताना देखील गावातील मोकळ्या जागेवर मोठ मोठ्या इमारती, बंगले इत्यादी बांधकाम केले जाते. मात्र या वसाहतीकडे जाण्यासाठी योग्य रस्ते, सांडपाण्याची व्यवस्था, पाणीपुरवठा इत्यादीची कोणतीही व्यवस्था बांधकाम व्यावसायीकाकडून केली जात नाही व या संबंधीचा सर्व भार संबंधित ग्रामपंचायतीवर पडतो व त्यांना सुविधा द्याव्या लागतात. या परिपत्रकाद्वारे ग्राम पंचायत हद्दीमध्ये व गावठाण हद्दीच्या कोणत्याही बांधकामास परवानगी देण्याचे अधिकार ग्राम पंचायत सरपंच, ग्रामसेवक यांना नसल्याने कोणत्याही बांधकामास परवानगी देऊ नये असे कळविलेले आहे.

यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी समितीला असे विदित केले की, जिल्हाधिकाऱ्यांनी गावठाणामध्ये नोंदी करु नये असा आदेश दिल्यामुळे काही ठिकाणी गावठाणामध्ये नोंदी होत नाहीत आणि गावाच्या बाहेरही नोंदी होत नाहीत अशी स्थिती निर्माण झाली आहे. मात्र त्यानंतर त्यांनी त्यामध्ये थोडी शिथिलता आणून गावठाणात नोंदी घेण्यास मान्यता दिली. जिल्हाधिकारी यांच्या दिनांक १० फेब्रुवारी, २०१० च्या पत्रान्वये पुणे जिल्ह्यात गावठाणाच्या बाहेरील नोंदी करणे पूर्णपणे थांबविले आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून एनए, बांधकाम सुरु करण्याची एनओसी, सीसी अशा परवानग्या असणाऱ्या बांधकामाच्या नोंदी होतात. जेथे सदरहू कागदपत्रे नाहीत

तेथे नोंदी होत नाहीत. याबाबत सुलभता आणण्यासाठी श्री.स्वाधीन क्षत्रिय, अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. सदर समितीने या संदर्भातील प्रारुपसुध्दा शासनाला सादर केलेले होते व या ग्राम पंचायत अधिनियम, मुद्रांक अधिनियम आणि नोंदणी अधिनियम यामध्ये सुधारणा सुचविल्यानंतर सदर सुधारणांवर समितीने पुन्हा फेरविचार करण्याचे ठरविण्यात आले.

समितीने सदर समस्येवर मत व्यक्त करताना असे प्रतिपादन केले की, पुणे आणि रायगड येथे मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकाम झाल्याचे सांगितले जाते. वास्तविक पाहता या दोन्ही जिल्ह्याव्यतिरिक्त राज्याच्या इतरही जिल्ह्यामध्ये अनधिकृत बांधकाम झालेली आहेत. पूर्वीही अनधिकृत बांधकामे झाली होती आणि आता देखील सुरु आहेत. पुणे आणि रायगड जिल्ह्यातील अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत निर्णय घेणे आवश्यक आहे. ग्राम पंचायत क्षेत्रामध्ये बांधकाम करुन पूर्वी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेतली नाही हेही खरे असले तरी त्या क्षेत्रात झालेले बांधकाम सर्वांना दिसते. जर हे बांधकाम पाडावयाचा निर्णय घेतला तर राज्यातील लाखो लोक बेघर होऊन रस्त्यावर येतील त्यामुळे ग्राम पंचायत क्षेत्रात होणाऱ्या अनधिकृत बांधकामाच्या नोंदी होणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या क्षेत्रात अनधिकृत बांधकाम झाल्यास त्याबाबत नोंदी होत नाही. तथापि, संबंधित राहिवाशांकडून कर आकारणी करुन कर वसुली केली जाते. परंतु ग्रामपंचायतीच्या बाबतीत जे निर्बंध घातले आहेत ते योग्य नाहीत.

याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, शासनाला एक पत्र पाठवून त्यात अनधिकृत बांधकामामुळे जिल्हा परिषदेचे रेकॉर्ड खराब होते, अनधिकृत बांधकामाच्या नोंदी घेतल्या नाहीत तर जिल्हा परिषदस्तरावर वेगळी आणि फिल्डवर वेगळी परिस्थिती निर्माण होते शिवाय अनधिकृत बांधकामाच्या घरपट्टीला ग्रामपंचायतीला मुकावे लागते. अवैध बांधकामाच्या नोंदी आणि त्यावरील कर आकारणी हा केवळ पुणे जिल्हा परिषदेचा प्रश्न नसून संपूर्ण राज्यात अशी परिस्थिती थोड्याफार फरकाने भेडसावीत आहे. समितीला यासंदर्भात ग्राम विकास विभागाकडून लेखी स्वरुपात प्राप्त झालेली माहिती अशी आहे की, ग्रामीण भागातील बेकायदेशीर बांधकाम शासनाच्या निदर्शनास आल्याने अशा अनधिकृत बांधकामांबाबत प्रभावीरित्या कार्यवाही करुन अनधिकृत

बांधकामे पूर्ण होऊ न देणे, बांधकाम परवानगीच्या प्रक्रियेचे सुलभीकरण करणे इत्यादीविषयी उपाययोजना व धोरण सुचविणेसाठी शासनाने दिनांक ७-९-२०१२ अन्वये शासन निर्णय निर्गमित करुन श्री.स्वाधीन क्षत्रिय, अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशीनुसार सर्व संबंधित अधिनियमामध्ये दिनांक २८-२-२०१४ रोजीच्या निर्णयानुसार विधानमंडळात महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २००४ पारीत केला. सदर अधिनियमान्वये सुधारेणेद्वारे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम ५२,५३ व १७६ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. उक्त सुधारणा शासन अधिसूचना दिनांक १५ मे, २०१५ पासून लागू करण्यात आली आहे. त्यात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनिमय कलम ५२ नुसार परवानगीबाबत तरतूद आहे. तसेच ग्रामीण भागातील गावठाण व प्रादेशिक योजना नसलेल्या गावांमधील बांधकामांना पंचायत समिती स्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या नगररचना अधिकाऱ्यांच्या पूर्व संमतीने परवानगी देण्याचे अधिकार ग्रामपंचायतींना देण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १२४ अन्वये कर व फी आकारणी बाबतची तरतूद असून त्यानुसार ग्रामपंचायतीला गावाच्या हद्दीतील सर्व इमारतींवर कर बसविण्याचा अधिकार आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखा संहिता, २०११ अन्वये तयार करण्यात आलेल्या नमुन्यांतील नमुना नं. ८ हे कर मागणीचे पत्रक असून या नमुन्यामध्ये ग्रामपंचायत हद्दीतील करपात्र असणाऱ्या सर्व इमारतींची नोंद घेऊन त्यावर वसुलपात्र कराची रक्कम नमूद करण्यात येते व त्यानुसार कराच्या नोटिस पाठविल्या जातात.

समितीला पुणे जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील घराची कर आकारणी बंद केल्यामुळे ग्रामपंचायतींना कराबाबतच्या महसुलापासून मुकावे लागत असणेबाबत महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन जिल्हा शाखा पुणे यांनी दिनांक ११-८-२०१५ रोजी समितीला पत्र देऊन त्या प्रत्रान्वये जिल्हाधिकारी पुणे यांनी दिलेल्या पत्रामुळे कर आकारणी बंद पडली असल्याचे नमूद केले आहे. पुणे जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामपंचायतीचे कार्यक्षेत्रातील घराची कर आकारणी बंद करण्यात आली आहे. त्यामुळे

ग्रामपंचायतींना घरपट्टीच्या महसुलापासून मुकावे लागते आहे व त्यामुळे ग्रामपंचायतीचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असून ग्राम पंचायत क्षेत्रात नवीन बांधकाम होऊन त्यामध्ये नागरिक रहिवास करीत असल्यामुळे त्यांना आवश्यक त्या मुलभूत सुविधा ग्रामपंचायतींना पुरवाव्या लागत असल्याने ग्रामपंचायतीवर मोठ्या प्रमाणावर आर्थिक ताण निर्माण झालेला आहे. मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १५८ च्या नियम १२४ चे ग्रामपंचायतींना कर आकारणीचे अधिकार देण्याबाबत निर्णय घेण्यात यावा. तसेच ग्रामपंचायतींना त्यांच्या कार्यक्षेत्रातील नवीन बांधकामावर कर आकारणी करण्यासंदर्भात अधिकार देण्याबाबत निर्णय घेण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी समितीस असे सांगितले की, पुणे जिल्ह्यात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नियंत्रण सुधारणा अधिनियम लागू झाला असल्यामुळे पुणे जिल्ह्यात होत असलेल्या ग्रामीण क्षेत्रातील बांधकामास जिल्हाधिकारी यांची अनुमती आवश्यक आहे व त्यामुळे ग्रामीण भागातील सर्व बांधकामास परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे गेलेले आहेत. बांधकाम परवानगीचे अधिकारी फक्त जिल्हाधिकाऱ्यांनी वापरावेत ग्रामपंचायतींनी वापरु नयेत असे उक्त पत्रात नमूद आहे. ग्रामपंचायतीने बांधकामाच्या नोंदी घेऊ नयेत किंवा कर आकारणी करु नये असे कोठेही या पत्रात म्हटलेले नाही. विभागीय आयुक्तांनी त्यांच्या दिनांक २२-१२-२०१० रोजीच्या पत्रात केवळ बांधकाम परवानगीबाबतचे मत व्यक्त केले असून कर आकारणी करण्याबाबत कुठेही मत व्यक्त केलेले नाही. दिनांक ३१ मार्च, २०१५ ला पीएमआरडीए ची स्थापना झाली आणि त्यानंतर असे कुठल्याही प्रकारचे पत्र जिल्हा परिषदेला देण्यात आलेले नाही. दिनांक २९ डिसेंबर, २०१४ ला ग्रामपंचायत अधिनियम नियम ८ आणि नियमावलीमध्ये दुरुस्ती करुन गावठाण हद्दीत बांधकामाच्या परवानग्या पुन्हा ग्रामपंचायतींना देण्यात आलेल्या आहेत. कर आकारणीच्या पूर्वी ग्रामपंचायत अधिनियम कलम १२४ प्रमाणेच पूर्वीही कर आकारणी ग्रामपंचायतीकडे होती. जिल्हाधिकाऱ्यांनी या कर आकारणीस कोणतीही स्थगिती दिलेली नाही आणि कर आकारणीमध्ये कोणत्याही प्रकारचा संभ्रम नाही.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकाम होत असल्यामुळे व या बांधकामावर अनधिकृत बांधकामे रोखणेबाबत काही नियंत्रण नसल्यामुळे जिल्हाधिकारी, पुणे यांना त्यांच्या दिनांक १०-२-२०१० रोजीच्या परिपत्रकान्वये अकृषिक परवानगी देण्यासह बांधकाम आराखडे मंजूर करणे, बांधकाम पूर्णत्वाचे दाखले देणे इत्यादी जबाबदारी त्यांच्यावर असल्यामुळे याबाबत जिल्हा परिषद स्तरावर परवानगी देण्यात येऊ नये असे नमूद आहे. तसेच विभागीय आयुक्त यांनीदेखील त्यांच्या दिनांक २२-१२-२०१० च्या पत्रात नमूद केले आहे. ग्रामपंचायतीतील कर आकारणी करणे व ती वसूल करण्यास प्रतिबंध करणे याबाबत जिल्हाधिकारी तथा आयुक्त या दोन्ही प्रतिबंध केलेला नाही. विभागीय आयुक्त यांच्या दिनांक २२-१२-२०१० रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १२४ मध्ये ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात असलेल्या महसूली गावातील प्रत्येक इमारत व अकृषिक जमिनीवर ग्रामपंचायतीला कर आकारणी करण्याचा अधिकार असल्याचे तसेच कार्यक्षेत्रातील इमारत घरांचे सर्व्हे दर ४ वर्षांनी करुन शासनाने ठरवून दिलेल्या दराने करांची फेर आकारणी करावी असे नमूद आहे.

त्यामुळे ग्रामपंचायत हद्दीत होणाऱ्या इमारत घरांच्या बांधकामासाठी असणाऱ्या बांधकाम व टी.पी. परवानगी, पूर्णत्वाचा दाखला याबाबत संबंधित सदरच्या अटी व शर्तीची पूर्तता करीत नसल्याने ग्रामपंचायती दफ्तरी नोंद घेण्यास नकार देतात यासाठी शासनाने जिल्हा परिषदांना सर्वंकष मार्गदर्शन व आदेश करण्याची अत्यंत आवश्यकता आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. त्याचप्रमाणे विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळीदेखील यावर प्रतिबंध केलेला आढळून येत नाही. त्यामुळे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १२४ प्रमाणे कर आकारणी व कराची वसुली करणे हे अधिकार ग्रामपंचायतीला असल्यामुळे त्यावर कुठलीही बाधा येऊ न देता ते अधिकार ग्रामपंचायतीकडेच ठेवण्यात यावेत कारण गावातील निवास करणाऱ्या नागरिकांना विविध सोयी सवलती या ग्रामपंचायतीद्वारेच पुरविल्या जातात उदा.गटारे, पाणी पुरवठा, मलनिःसारण, घनकचरा व्यवस्थापन, दिवाबत्ती, रस्ते इत्यादी. सदरच्या सोयीसुविधा ग्रामपंचायत हद्दीत असल्यामुळे संपूर्ण ग्रामपंचायत क्षेत्रातील कर आकारणीचे अधिकारदेखील हे ग्रामपंचायतीलाच असले पाहिजेत असे समितीला प्रकर्षाने वाटते.

पुणे जिल्हाधिकारी आणि आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील ग्राम पंचायतीने कराची आकारणी अथवा वसुली करु नये असे कुठेही नमूद केले नाही. तेव्हा या कालावधीत काही ग्रामपंचायतीनी ग्रामपंचायत क्षेत्रातील अधिकृत /अनधिकृत बांधकाम आकारणीच्या अथवा घरपट्टी वसुली इत्यादी कर स्वरुपात आकारणी अथवा वसुली ग्रामपंचायतीच्या हिताच्या दृष्टीने केली असल्यास, अशा ग्रामपंचायतींच्या सरपंच व ग्रामसेवक यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई करणे हे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १२४ मधील तरतुदींच्याविरुध्द आहे असेही समितीला प्रकर्षाने वाटते.

त्यामुळे जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांनी या बाबीस प्रतिपादन केले नसल्यामुळे अनौपचारिक चर्चेत कर आकारणी थोपविली असल्याबाबतची जी माहिती समितीला देण्यात आली त्या अनुषंगाने विभागाने सत्वर कार्यवाही करुन उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम ,१९५८ च्या कलम १२४ अन्वये ग्रामपंचाययतीला असणाऱ्या कर आकारणी व वसुलीचे अधिकार संदर्भात शासनाने तातडीने परिपत्रक निर्गमित करुन जनमानसात व जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर करण्याबाबत परिपत्रकाद्वारे तसे सर्व संबंधितांना कळविण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात पाठविण्यात यावी.

प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### मौजे चांबळी, ता.पुरंदर येथील दलित वस्ती सुधार योजनेबाबत.

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन बाबत दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्ह्यातील पूरंदर पंचायत समितीला भेट दिली असता तेथील मौजे चांबळी गावामध्ये केलेल्या दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत गटाराचे १० लाख रुपयाचे काम केल्याचे आढळून आले. त्यावर समितीने विचारणा केली की, यादव वस्तीमध्ये काँक्रीटीकरणाचे काम केव्हापासून सुरु आहे. यावर गट विकास अधिकारी यांनी सदरहू काम २०१४-१५ मध्ये सुरु केले असल्याचे समितीस विदित केले. समितीने आणखी विचारणा केली की, सदरहू कामाचे रेग्युलर पध्दतीने काँक्रीटीकरण केले काय, तसेच ते काम किती रकमेचे होते. त्यावर गट विकास अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर देवून सदरहू कामाचे रेग्युलर पध्दतीने काँक्रीटीकरण केले. असून, हे काम ५ लाख रुपयांचे होते असे समितीस विदित केले. समितीने पुढे विचारणा केली की, चांबळी गावामध्ये दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत गटाराचे १० लाख रुपयांचे काम केलेले आहे काय यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले. समितीच्या मते चांबळी या गावात केवळ १०-२० टक्के काम दलित वस्तीमध्ये झाले असून, उर्वरित काम बिगर दलित वस्तीमध्ये झालेले आहे त्यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, चांबळी गावात दलित वस्तीमध्ये घरे अंतरा-अंतरावर आहेत. त्यामुळे बिगर दलित वस्तीमध्ये कामे झाल्याचे वाटत असावे. परंतु चांबळी गावात दलित वस्ती सुधार योजनेची कामे ही दलित वस्तीमध्येच झालेली आहेत. यावर समितीचे समाधान झाले नाही समितीच्या मते वास्तविक पाहता मागास समाजासाठी विशिष्ट रकमेची तरतूद करुन त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना राबविल्या जातात. परंतु चांबळी गावमध्ये दलित वस्तीच्या नावाखाली बिगर दलित वस्तीमध्ये काम झाल्याचे दिसून येते. समितीने निदेश दिले की, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सदरहू कामाची चौकशी करावी व समितीस अहवाल सादर

करावा. यावर अति मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या कामाची चौकशी करण्यात येईल असे आश्वासन समितीस दिले.

**समितीने साक्षीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून खालील मुद्यांची माहिती मागविली.**

पंचायत समिती पुरंदर अंतर्गत मौजे चांबळी गावामध्ये केलेल्या दलित वस्ती सुधारणेअंतर्गत केलेल्या गटाराच्या कामाची चौकशी करण्याचे समितीने निदेश दिले आहेत. त्यानुसार चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले त्यानुसार संबंधितांवर काय कार्यवाही केली ?

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्द्यांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती पुरंदर अंतर्गत मौजे चांबळी येथील बंदीस्त गटर कामाची चौकशी करण्याचे समितीने निर्देश दिलेले आहे. त्याप्रमाणे सदर कामाची चौकशी करणेत आलेली आहे. त्याची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

मौजे चांबळी. ता.पुरंदर येथील दलित वस्ती भूमिगत गटर बांधणे कामासाठी दलित वस्तीमध्ये गटर बांधणेसाठी रक्कम रु. ७,७०,०००/- मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचेकडील आदेश क्र.समाज कल्याण विभाग जा.क्र.जिप/सभा/प्रमा/२०१४/९८९ पुणे, दि.४-९-२०१५ अन्वये मंजुरी दिलेली आहे तसेच ग्रामपंचायत चांबळी यांनी ग्रामसभा ठराव क्र. १०, दि.२५-११-२०१४ अन्वये पिंपळीखालील बंदिस्त गटाराचे कामास ग्रामपंचायत निधी म्हणून रक्कम रु. २,०१,०४५/- मंजुरी दिलेली आहे. सदर दोन्ही कामाचे एकत्रित अंदाजपत्रक रक्कम रु.९,७१,०४५/- चे तयार करणेत आलेले होते व त्या एकत्रित अंदाजपत्रक .९,७१,०४५/- यास मा. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जि.प,. पुणे यांचेकडील पत्र क्र. १३/२०१४, दि. १४-१-२०१५ अन्वये तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

मूल्यांकन दाखला देताना मूल्यांकन क्रमांक १ अन्वये दलितवस्तीसाठी रक्कम रु. ७,७१,७५६/- चे मुल्यांकन देण्यात आलेले आहे व मूल्यांकन क्र. २ अन्वये इतर

कामाचे मूल्यांकन रु..१,९८,३०९/- चे देण्यात आलेले आहे. त्यामुळे दलितवस्तीमध्येच गटर बांधणे कामासाठी मंजूर रक्कम वापरणेत आलेली आहे. तसेच पिंपळाखाली जागाते कटकेमस यामधील बंदिस्त गटाराचे कामासाठी ग्राम-पंचायत निधीवापरणेत आलेला आहे. यामध्ये कोणत्या ही प्रकारचे गैरवापर किंवा अपहार झालेला नाही.

प्रशासकीय मान्यता दिलेल्या रक्कमेपैकी रु.१,३२,६४३/- इतक्या रक्कमेचे काम दलित वस्ती लगत अन्य वस्तीमध्ये झालेले आहे. या गटर्सचा वापर दोन दलित कुटुंबाना सुध्दा होत आहे. भविष्यात अन्य दलित कुटुंबांना सुध्दा त्याचा उपयोग होऊ शकतो. स्थानिक पातळीवर या योजनेअंतर्गत कामे करताना काही प्रमाणात अन्य वस्तीमधील लोकांना त्याचा लाभ होत असतो ही बाब विचारात घ्यावी हि विनंती.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावर पंचायत समिती पुरंदर येथे भेट देवून गटविकास अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या दरम्यान समितीने पुरंदर पंचायत समिती क्षेत्रात दलित वस्ती सुधारणेची कामासंदर्भात विचारणा केली असता समितीस मौजे चांबळी, ता. पूरंदर येथील दलित वस्तीचे केवळ १०-२० टक्के काम दलितवस्ती मध्ये व उर्वरित काम बिगर दलित वस्तीमध्ये करण्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, दलित वस्तीत घरे अंतरा-अंतरावर असल्यामुळे सरदहू काम बिगर दलित वस्तीमध्ये झाल्याचे वाटत आहे. समाज कल्याणच्या २० टक्के निधीतून काम समाज वस्तीतच होणे आवश्यक आहे. मागास समाज वस्ती त्याकरिता विशिष्ट तरतूद करुन त्यांचेकरिता कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. परंतु चांबळी गावात दलित वस्तीच्या नावाखाली बिगर दलित वस्तीमध्ये काम झाले असेल तर ते उचीत नाही याकरिता समितीने सदरहू प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश दिले.

समितीच्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने चौकशी करुन आपला अहवाल समितीकडे पाठविला. सदरहू अहवालानुसार प्रस्तुत प्रकरणातील बंदीस्त गटराचे कामावर ९,७१,०४५/

रुपयांची तांत्रिक मान्यता देण्यात आली. यावेळी एकूण रू. १,३२,६४३/- इतक्या रकमेचे काम दलित वस्तीच्या लगत अन्य वसतीमध्ये झाले असून याचा फायदा दोन दलित कुटुंबाना सुध्दा होत असून भविष्यात आणखी दलित कुटुंबाना होवू शकेल स्थानिक पातळीवर काम करताना योजनांचा लाभ अन्य लोकांना होऊ शकतो, ही बाब विचारात घेण्याबाबतची विनंती शासनाने केली.

समितीच्या मते समाज कल्याण अंतर्गत दलित वस्ती सुधारणांची कामे बंदीस्त गटार इ. कामे करताना गावातील लागून बिगर दलित वस्ती असल्यास समितीचा उत्तर लक्षात घेवून बंदीस्त गटाराचे शेवटचे तोंड तसेच सोडून देता येत नाही. ते बीगर दलित वस्ती मधून पुढे गावाबाहेर नेण्यात आले आणि सदरची बाब विचारात घेण्यात यावी अशी विनंती जिल्हा परिषदेने समितीला केली. जेव्हा दलित वस्तींच्या सुधारणा किंवा मागासवर्गीयांचे जिवनमान उंचावण्यासाठी शासनाकडून अनुदान दिले जाते तेव्हा ते त्यास कामासाठी वापरले पाहिजे असे समितीला प्रकर्षाने वाटते. बिगर दलित लोकाचे जिवनमान अगोदरच उंचावले असल्याने त्यासाठी सर्वसाधारण निधीत तरतूद केली जाते. परंतु वंचित घटकाचे जिवनमान उंचावणे आवश्यक असल्याने ज्या कारणासाठी निधीत तरतूद केली त्याच कारणासाठी खर्च करणे आवश्यक आहे. काम राबविण्याऱ्या या बाबीची जाणीव ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. **अनेक वेळेला दलित वस्तींचे अनुदान इतर बाबींसाठी देखील खर्च केले जाते त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनाने याबाबीकडे विशेष सतर्क असणे आवश्यक आहे. प्रस्तुत काम हे दलित वस्तीमध्ये केलेले आहे व त्याचा लाभ काही बिगर दलित व्यक्तींना झाल्याचे जिल्हा परिषदेने मान्य केले आहे. आता लोकांचे राहणीमान त्याचप्रमाणे वस्त्यांमध्ये देखील बदल होत आहे. बिगर दलित वस्तीत दलित आणि दलित वस्तीत बिगर दलित लोक वसाहत करुन रहात आहेत हे देखील सदृढ समाजिक ऐक्यासाठी आवश्यकच आहे. अशी समितीची भूमिका असल्यामुळे जिल्हा परिषदेची विनंती मान्य करण्यात येत असताना दलित वस्तीतील मंजूर कामे ही त्या वस्तीसाठीच झाली पाहिजेत असा समितीचा आग्रह आहे.**

प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

**ग्रामपंचायत भूगाव ता. मुळशी, जि. पुणे यांना घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत.**

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी समितीने जिल्हा परिषद पंचायत समिती पदाधिकाऱ्यांशी अनौपचारीक चर्चा केली. त्यावेळी सभापती पंचायत समिती (श्री.कंधारे) यांनी समितीस विदित केले की, मुळशी तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात घनकचऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. हॉटेलचा कचरा गायरान जमिनीवर टाकला जातो. ग्रामीण भागामध्ये नवीन प्रकल्प केला नाही तर घनकचऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण होईल. गायरान जमिनी मोठ्या प्रमाणावर शिक्षण संस्थांना दिल्या जातात. परंतु घनकचरा प्रकल्प किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी गायरान जमिनी मिळत नाहीत. माझ्या गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी ती जागा अपूरी पडते. त्यामुळे गायरान जमीन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी द्यावी म्हणून पीएमआरडीएकडे अर्ज केला. एमएसईबीच्या सब स्टेशन्ससाठी सुध्दा जागा मिळत नाही. त्यामुळे घनकचरा प्रकल्प, प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा सब स्टेशनसारख्या कामांसाठी गायरान जमिनी उपलब्ध झाल्या तर हा प्रश्न मिटू शकतो. तद्नंतर समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन बाबत दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्ह्यातील मुळशी पंचायत समितीला भेट दिली असता तेथील ग्रामपंचायत भूगाव, ता.मुळशी यांनी घनकचऱ्याच्या व्यवस्थापनाकरिता जागेची मागणी केली असल्याचे समितीला आढळून आले.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडून खालील मुद्द्यांची माहिती मागविली.**

ग्रामपंचायत भूगाव, ता.मुळशी यांची घनकचऱ्याच्या व्यवस्थापनाकरिता जागेची मागणी असून त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

## चौकशी अहवाल

सदरहू प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिल्यावरून जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत भुगाव, ता. मुळशी यांचेकडील प्रत्र क्र ५९९-१५, दि ०७-०५-२०१५ च्या आधारे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचा) जिल्हा परिषद पुणे, यांचे कडील पत्र, क्र.जिप-पंचा-५-कावि-५२५-१५, दि..११-०५-२०१५ अन्वये भुगाव ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सं.न.११, १३, ३०, ४६, २६४, २६६, २६७, ४९८ या सरकरी (पड) खानीच्या जागेपैकी ३० आर इतक्या जागेची मागणी घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन या बाबीसाठी खास बाब म्हणून मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे करण्यात आलेली आहे.

याबाबत मा. जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाकडून तहसील कार्यालय मुळशी यांचेकडे जागा उपलब्धतेबाबत उचित कार्यवाहीची प्रक्रिया सुरू आहे.

## समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्द्यांची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.

सरपंच/ग्रामसेवक ग्रामपंचायत भुगाव, ता. मुळशी यांचेकडील प्रत्र क्र. ५९९-१५, दि ०७-०५-२०१५ च्या आधारे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचा), जिल्हा परिषद पुणे यांचेकडील प्रत्र क्र.जिप-पंचा-५-कावि-५२५-१५, दि.११-०५-२०१५ अन्वये भुगाव ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सं. न.११, १३, ३०, ४६, २६४, २६६, २६७, ४९८ या सरकरी (पड) खानीच्या जागेपैकी ३० आर इतक्या जागेची मागणी घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन या बाबीसाठी खास बाब म्हणून मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे करण्यात आलेली आहे.

याबाबत मा. जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाकडून तहसील कार्यालय मुळशी यांचेकडे जागा उपलब्धतेबाबत उचित कार्यवाहीची प्रक्रिया सुरू असून मा. जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाकडून याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राप्त होतास आपणास सादर करण्यात येईल.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती समितीने पुणे जिल्हा परिषदेला दि.१० ते १३ आगॅस्ट, २०१५ या कालावधीत भेट दिली. पदाधिकाऱ्यांशी केलेल्या चर्चेस तसेच मौजे भुगाव ग्रामपंचायतीला

भेट दिली असता घन कचऱ्याच्या व्यवस्थापनाची समस्या प्रकरणे निदर्शनास आली. पुणे शहराच्या झालर क्षेत्रात असलेल्या भूगाव ग्रामपंचायेतील निर्मल ग्राम पुरस्कार, म. गांधी तंटा मुक्ती पुरस्कार पर्यावरण संकुलात ग्राम समृधी योजना पुरस्कार, आय. एस. ओ. नामाकंन, संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता पुरस्कार इत्यादी पुरस्कार प्राप्त झालेली ग्रामपंचायत समितीच्या पाहणीमध्ये आढळून आली. राज्यात पुणे सह इतर महानगरांमध्ये घन कचराऱ्याच्या व्यवस्थापनाच्या समस्या भेडसावत आहेत. पुणे शहराच्या झालर क्षेत्रात असलेल्या भूगाव ग्रामपंचायतीला ही समस्या भेडसावत असल्यामुळे ग्रापंचायतीने शासनाकडे घन कचऱ्याच्या व्यवस्थापनाची करिता जागेची मागणी केलेली असल्यामुळे समितीने याबाबत चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले.

समितीच्या निदेशानुसार चौकशी अहवाल समितीला प्राप्त झाला. परंतु समितीने जागेच्या मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली यावर लेखी माहितीत केवळ जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे जागेची मागणी केली आहे, एवढेच ग्राहक उत्तर प्राप्त झाले. यावर समिती खेद व्यक्त करते. चौकशी अहवालासोबत समितीने यासंदर्भात झालेल्या पत्र व्यवहाराच्या प्रती जोडल्या असून त्यांचे अवलंबन केले असता असे दिसून येते की, मौजे भूगाव ने जागेची केलेल्या मागणीबाबत मुळशी तहसीलदारांवर अर्जदार ग्रामपंचायतने त्यांचे कार्यालयाशी नोटीस घेवून ही, अबकड तक्ता भरुन आवश्यक कागदपत्रकांची पूर्तता करण्यासाठी संपर्क साधला नसल्याने अर्जदारास सदरचे प्रकरणी स्वास्थ नाही असे निदर्शनास आल्यावर प्रकरण निकामी करण्याबाबत दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले. महसूल विभागाकडून त्वरीत कार्यवाही होत असताना ग्रामपंचायत, गट विकास अधिकारी, मुळशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडून कोणताही पुढाकार घेतला नसल्याचे आढळून आल्याबाबत समिती याबाबत खेद व्यक्त करते.

**मुळशी विकास गटातील ग्राम पंचायत भूगाव ग्राम पंचायतीचे क्षेत्रात पूणे महानगरपालिकेच्या हद्दीलगत कचरा टाकण्याकरीता ग्राम पंचायतीच्या हद्दीत होण्याऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी भविष्यात कचरा व सांडपाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होवू शकतो असे समितीचे मत असून याबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत व गट विकास अधिकारी, पंचायत समिती मुळशी यांनी पुढाकार घेवून सदरहू जागेचा प्रश्न तीन महिन्यात मार्गी लावावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला अवगत करावी अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### प्राथमिक आरोग्य केंद्र, मुठा येथे जननी सुरक्षा योजनेचे पैसे रुग्णांना अदा करण्यात आलेले नसल्याबाबत (पंचायत समिती मुळशी)

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधी पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्यावेळी समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन बाबत गट विकास अधिकारी, पंचायत राज समिती, मुळशी यांची साक्ष दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी पंचायत समिती क्षेत्रात किती आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे आहेत, त्यापैकी किती केंद्रांना जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी सन २०१२-१३ मध्ये भेटी दिल्या, भेटीच्या वेळी त्यांना तेथे कोणत्या त्रुटी आढळुन आल्या, त्यांचे निराकरण कशा प्रकारे केले, सन २०१२-१३ मध्ये उक्त केंद्रावरील औषधांच्या साठ्याची किती वेळा तपासणी करण्यात आली व त्यात काय त्रुटी आढळल्या व त्या त्रुटींचे निराकरण कसे केले, यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, मुळशी विकास गटात एकूण ४ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत आणि त्यामध्ये २५ उपकेंद्रे आहेत. डॉ. एन. डी. देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिनांक २८-०८-२०१२ ला भेट दिली, अधिकारी व कर्मचारी यांचा ड्यूटीचार्ट तयार करून त्यानुसार कार्यवाही करावी असे सांगितले, त्यानुसार कार्यवाही करण्यात आली. सूचनांचे अनुपालन केलेआहे. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या हद्दीतील किमान ५० टक्के प्रसुती प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांत व्हाव्यात अशी सूचना केली होती, त्यानुसार नियोजन केले आहे.

समितीने आणखी विचारणा केली की, समितीने पंचायत समिती, मुळशी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र मुठा येथे भेट दिली. त्यावेळी समितीला जननी सुरक्षा योजनेचे पैसे लाभार्थी महिलांना दिले नसल्याबाबत कोणत्या अडचणी आहेत यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, भेट्या पुढे असे होणार नाही, आम्ही त्याची दक्षता घेत आहोत. सदर बाबतीत प्राथमिक आरोग्य केंद्रांना कळविण्यात येईल.

तद्नंतर तालुका आरोग्य अधिकारी यांनी खुलासा केला  की, उपलब्ध निधीतून पैसे द्यावे आणि त्यासाठी मागणी करावी अशा सूचना दिल्या आहेत.

समितीने या अहवालाशी सहमती दर्शविली नाही शासकीय योजनांची  अंमलबजावणी होते की नाही हे पाहणे तालुका आरोग्य अधिकाऱ्यांचे काम आहे. जननी सुरक्षा योजनेचेही पैसे एप्रिल पासून देण्यात आले नाहीत हे योग्य नाही.

त्यावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी खुलासा केला की, त्या वेळी तांत्रिक अडचण निर्माण झाली होती.  चेक बूक मिळायला अडचण आली होती.    जननी सुरक्षा योजनेचे पैसे चेकने देण्यात येतात.   बऱ्याच लाभार्थ्यांचे खाते नसते किंवा बँकेच्या ठिकाणी जाऊन पैसे घेणे जमत नाही. तसेच डॉक्टरांनाही पालखीसाठी जावे लागल्यामुळे चेक देता आले नाहीत.

समितीने प्रतिपादन केले की,जननी सुरक्षा योजनेच्या रजिस्टरमध्ये एप्रिल पासून ३७ जणांना लाभ मिळाला नाही अशी नोंद आहे, ही गंभीर बाब आहे. डॉक्टरांनी सांगितले की,  योजनेचे पैसे आले नाहीत.

त्यावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी खुलासा केला की, आमच्याकडून पैसे दिले जातात. पैसे दिले आहेत. चेक मिळायला अडचणी निर्माण झाल्या होत्या.   तसेच १ महिना डॉक्टर नव्हते, पालखीसाठी गेले होते. डॉक्टरांच्याच सहीने चेक निघू शकतात. आम्ही त्यासंदर्भातील कार्यवाही करीत आहोत.

तालुका आरोग्य अधिकारी यांच्या उत्तराने समितीचे समाधान झाले नाही.    समितीच्या मते अधिकाऱ्यांनी समितीची दिशाभूल केली आहे, तेथे रजिस्टर होते. आम्ही रजिस्टर वरूनच सांगत आहोत.    आपण म्हणता की, चेक बूक मिळत नाही. ही अडचण कशी झाली, २ महिने चेक बूक मिळत नाही का ? हे समाधानकारक उत्तर नाही.    ५ महिने लाभार्थ्यांना लाभ मिळाला नाही, त्याचे हे कारण असू शकत नाही.    पैसे नाहीत म्हणून द्यायचे राहीले असे सांगितले गेले.  आम्हाला नंतर ५ हजार रूपये असल्याचे लक्षात आले आणि तरी खोटे सांगण्यात येत आहे. समितीला चेक तयार आहेत, मात्र पैसे नाहीत असे आम्हाला सांगितले. आपण असे केल्यावर शासनाचे उद्दिष्ट कसे पूर्ण

होईल, त्यावर गट विकास अधिकारी यांनी ४ दिवसांत लाभार्थ्यांना पैसे मिळतील याची व्यवस्था करण्याचे समितीला आश्वासन दिले.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून खालील मुद्द्यांची माहिती मागविली.**

प्राथमिक आरोग्य केंद्र, मुठा येथे जननी सुरक्षा योजनेचे पैसे रुग्णांना अदा करण्यात आलेले नाही. याबाबत चौकशी करण्याचे निदेश समितीने दिले आहे. त्यानुसार चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर काय कारवाई केली आहे?

**चौकशी अहवाल**

सदरहू प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश समितीने दिल्यावरुन जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

डॉ. श्री. नवघरे, वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, मुठा, ता.मुळशी, जि. पुणे हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कार्यरत असून प्राथमिक आरोग्य केंद्र येथे यांच्याकडून वाटप करण्यात आलेल्या अनुदानाचे योग्य वेळी वाटप झाले अथवा नाही यावर लक्ष ठेवणे आवश्यक असताना त्यांनी याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. यावरुन त्यांची वर्तणूक बेजबाबदारपणाची निदर्शनास आली आहे. तसेच पर्यावेक्षकीय कामातील हलगर्जीपणा दिसून आलेला आहे असा ठपका ठेवण्यात येत आहे. श्री. नवघरे, वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, मुठा यांना जननी सुरक्षा व कुटुंबकल्याण लाभार्थ्यांना विलंबाने अनुदान वाटप करणे या कारणास्तव एक वेळ संधी देऊन यापुढे अशा प्रकारचा विलंब होणार नाही, अशी समज देण्यात आली.

**समितीस जिल्हा परिषदे कडून उपरोक्त मुद्द्यांची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सद्य:स्थितीत वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, मुठा, मुळशी यांनी जननी सुरक्षा योजनेअंतर्गत सर्व लाभार्थींना लाभ देणेत आलेले आहे, असे तालुका आरोग्य अधिकारी, मुळशी यांनी त्यांचे पत्र दि. २७-१०-२०१५ अन्वये कळविले आहे. सदर प्रकरणी डॉ. नवघरे, वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ.केंद्र, मुठा, ता.मुळशी व डॉ. कारंजकर, तालुका आरोग्य अधिकारी, मुळशी यांना शिस्तभंगाची कारणे दाखवा नोटीस बजावणेत आली आहे.

श्री. पी. एस. खंडाळे, कनिष्ठ सहाय्यक यांचे इतर काम चांगले असून प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुधारणा करण्यास सक्रिय सहभाग आहे. तथापि याबाबत त्यांचा खुलासा अमान्य करून त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई म्हणून ठपका ठेवणेबाबतची शास्ती करणेत आलेली आहे.

**तसेच समितीस सार्वजनिक आरोग्य विभागाकडून उपरोक्त मुद्द्यांची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

## निष्कर्ष

जिल्हा लेखा व्यवस्थापक व तालुका आरोग्य अधिकारी, मुळशी यांनी दिनांक १२-८-२०१५ रोजी चौकशी करुन अहवाल सादर केला. अहवालानुसार जननी सुरक्षा योजना व कुटुंब कल्याण कार्यक्रामांतर्गत अनुदान उपलब्ध असताना लाभार्थींना लाभ देणेत आलेले नाही.

## केलेली कार्यवाही

याबाबत जिल्हा लेखा व्यवस्थापक व तालुका आरोग्य अधिकारी, मुळशी यांनी चौकशी केली असून सादर केलेल्या अहवालानुसार वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, मुठा, ता. मुळशी,जि.पुणे येथिल जननी सुरक्षा योजनेचे पैसे रुग्णांना अदा केले नसल्याचे आढळुन आले आहे. दिनांक१८-०९-२०१५ रोजी वैद्यकिय अधिकारी व कनिष्ठ सहायक, प्रा. आ. केंद्र, मुठा, ता. मुळशी यांना कारणे दाखवा नोटिस

बजावणेत आलेली आहे.त्यानुसार श्री.खंडाळे, कनिष्ठ सहायक व डॉ.नवघरे,वैद्यकिय अधिकारी यांचा दिनांक ७-१०-२०१५ रोजी याकार्यालयास खुलासा सादर केलेला आहे.

डॉ. नवघरे, वैद्यकिय अधिकारी यांचे वर शिस्तभंगाची कारवाई करणे संदर्भात मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील जा. क्र. आरोग्य-आस्था१-१३४६-१५, दिनांक ३१-१०-२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटिस देणेत आली आहे.

तसेच डॉ. कारंजकर, तालुका आरोग्य अधिकारी यांना या संदर्भात मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडील जा. क्र.आरोग्य-आस्था१-१३१४-१५, दिनांक ३१-१०-२०१५ अन्वये कारणे दाखवा नोटिस देणेत आली आहे.

श्री. पी. एस. खंडाळे, कनिष्ठ सहायक यांचा खुलासा अमान्य करुन यांचेवर शिस्तभंगाची कारवाई म्हणून मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडील आदेश जा.क्र.आरोग्य-आस्था ४-४४७-१५ दिनांक ३१-१०-२०१५अन्वये ठपका ठेवणे बाबतची शास्तीकरणेत आलेली आहे.

तसेच जननी सुरक्षा व कुटुंब कल्याण योजनेच्या लाभार्थ्यांचे पैसे दि. २२-९-२०१५ रोजी सर्व लाभार्थ्यांना अदा करणेत आलेले आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने, पुणे, जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी विचारणा केली की, पंचायत समिती, मुळशी, प्राथमिक आरोग्य केंद्र, मुठा येथे जननी सुरक्षा योजनेचे पैसे रुग्णांना अदा करण्यात आलेले नाही. याबाबत चौकशी करण्याचे निदेश समितीने दिलेले आहेत. त्यानुसार विभागाने चौकशी केली आहे का, यावर विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले की, प्राथमिक आरोग्य केंद्र, मुठा, ता.मुळशी, जिल्हा पुणे या ठिकाणी समितीने भेट दिली होती. त्या ठिकाणी असे निदर्शनास आले की, जननी सुरक्षा योजनेंतर्गत मिळणारा जो लाभ असतो तो लोकांना दिलेला नाही. त्याबाबत मला नमूद करावयाचे आहे की, समितीने भेट दिल्यानंतर नंतरच्या एक

महिन्याच्या कालावधीत तो लाभ संबंधितांना देण्यात आलेला आहे. आता कोणीही लाभापासून वंचित राहिलेले नाही. पण लाभ वेळेत न दिल्याबद्दल संबंधित दोन डॉक्टर्सना शिस्तभंगाची नोटीस दिलेली आहे. तसेच कनिष्ठ सहायक यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आलेली आहे.

समितीने प्रतिपादन केले की क्षेत्रीय स्थरावर अनेकदा काम करताना अडचणी येतात. त्या लक्षात घ्याव्यात जर खरोखरच अनियमितता झालेली असेल तर त्याबाबत कारवाई झाली पाहिजे. पण चुकून एखादी गोष्ट घडली असेल तर त्याबाबतीत आपण सहानुभूतीपूर्वक विचार करावा. आपण समितीच्या समोर असा एखादा विषय नजरेस आणला तर समिती त्याबाबत विचार करील. यावर विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले की, मुठा प्राथमिक आरोग्य केंद्र हे थोडेसे दुर्गम भागात आहे. त्या ठिकाणी काम करणारा कनिष्ठ सहायक याने स्वतःच्या प्रयत्नाने प्राथमिक आरोग्य केंद्र चांगले ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणजे तेथे झाडे लावणे, स्वतः काम करणे, रात्री मुक्काम करुन काम करणे अशाप्रकारचे काम त्याने केलेले आहे. ते प्राथमिक आरोग्य केंद्र आयपीसीएच दर्जाचे आहे. समितीने त्या ठिकाणी भेट दिली असता त्या ठिकाणी काही लॅप्सेस आढळून आल्या ही वस्तुस्थिती आहे. ते प्राथमिक आरोग्य केंद्र चांगले आहे. ते प्राथमिक आरोग्य केंद्र दुर्गम भागातील असताना सुद्धा ते चांगल्या प्रकारचे ठेवण्याचे काम त्यांनी केलेले आहे.

त्यावर समितीने प्रतिपादन केले की, समिती दुर्गम भागात गेली होती. ते प्राथमिक आरोग्य केंद्र चांगले आहे. परंतु त्यांना जननी सुरक्षा योजनेचे रजिस्टर्ड दाखविता आले नाही. त्या योजनेचे पैसे आले. जर पैसे आले असतील तर त्याची नोंद असलेले रजिस्टर्ड कुठे आहे? लाभार्थ्यांना पैसे दिले असतील तर त्याची नोंद दाखवा असे सांगितल्यावर त्यांना ते दाखविता आलेले नाही. त्या कनिष्ठ सहायकाने नोंदी ठेवलेल्या नव्हत्या. समितीने त्यांना एवढेच सांगितले की, अशा प्रकारच्या नोंदी वेळच्या वेळी ठेवल्या पाहिजेत. गरोदर मातांना शासनाकडून जो काही लाभ मिळतो तो त्यांना मिळाला पाहिजे. गरोदर मातांना त्यावेळेसच मदत मिळाली पाहिजे. यावर विभागीय सचिवांनी दुजोरा दिला की, मदत वेळेवर मिळाली नाही या समितीच्या मताशी सहमत आहे.

## अभिप्राय व शिफारशी

प्राथमिक आरोग्य केंद्र, मुठा, जिल्हा पुणे येथे समितीने भेट देऊन पंचायत समिती मुळशी येथील गट विकास अधिकाऱ्यांची प्रश्नावली क्रमांक २ च्या अनुषंगाने दिनांक १८ ऑगस्ट, २०१५ रोजी साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळेस प्राथमिक आरोग्य केंद्र, मुठा येथील जननी सुरक्षा योजनेचे पैसे रुग्णांना अदा करण्यात आलेले नाहीत. याबाबत चौकशी करण्याचे निदेश समितीने दिले असता त्यानुसार जिल्हा परिषदेने चौकशी करुन त्याबाबतचा चौकशी अहवाल समितीला सादर केला. डॉ. श्री. नवघरे, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, मुठा, ता.मुळशी, जिल्हा पुणे हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कार्यरत असून प्राथमिक आरोग्य केंद्र येथे त्यांच्याकडून वाटप करण्यात आलेल्या अनुदानाचे योग्य वेळी वाटप झाले अथवा नाही यावर लक्ष ठेवणे आवश्यक असताना त्यांनी याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. यावरुन त्यांची वर्तणूक बेजबाबदारपणाची असून पर्यवेक्षकाच्या कामातील हलगर्जीपणा दिसून आल्यामुळे व जननी सुरक्षा व कुटुंब कल्याण लाभार्थ्यांना विलंबाने अनुदान वाटप करणे या कारणास्तव त्यांना एक वेळ संधी देऊन यापुढे अशा प्रकारचा विलंब होणार नाही अशी समज देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे श्री.पी.एस.खंडाळे, कनिष्ठ सहायक यांचा या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सुधारणा करण्यास अतिशय सक्रिय सहभाग आहे. सदरचे प्राथमिक केंद्र हे दुर्गम भागात असून त्या ठिकाणी काम करणाऱ्या कनिष्ठ सहायक यांना स्वत:चे प्रयत्नांनी प्राथमिक आरोग्य केंद्र चांगले ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणजे तेथे झाडे लावणे, स्वतः काम करणे, रात्री मुक्काम करुन काम करणे इत्यादीप्रकारे चांगले काम केले आहे. असे असताना देखील कनिष्ठ सहायकांचा खुलासा अमान्य करुन त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करुन त्यांचेवर ठपका ठेवण्याबाबतची शास्ती करण्यात आलेली आहे.

उपरोक्त दोन्ही प्रकरणी जिल्हा परिषदेच्या मुख्य विभागाने समितीने निदेश दिल्याप्रमाणे कार्यवाही केली असल्यामुळे समिती समाधान व्यक्त करीत आहे. **तथापि, दुसरी बाजू विचारात घेता श्री. पी. एस. खंडाळे कनिष्ठ सहाय्य यांची वर्तणूक त्यांनी सदर प्राथमिक आरोग्य केंद्र सुधारणेत जी कर्तव्य परायणतेची भूमिका घेतल्याचे असल्याचे**

विभागीय सचिवांच्या साक्षीत आढळून आले. त्याबाबत समिती उक्त कर्मचाऱ्याबाबत सहानुभूतीची भूमिका घेत असून श्री. खंडाळे यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रात चांगले काम केले असल्याबाबतची दखल समितीला घेणे अत्यंत आवश्यक वाटते. जर चांगले काम करण्याची दखल घेतली नाही तर भविष्यात अशा लोकांना प्रोत्साहन मिळणार नाही, म्हणून ज्या चुका त्यांच्या हातून अनावधानाने अथवा जाणीवपूर्वक झाल्या असतील त्या केवळ जननी सुरक्षा योजनेचे पैसे विलंबाने देण्याबाबतच्या आहेत त्यात शासनाच्या निधीचे नुकसान झालेले नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेने त्यांना शास्ती ठेवण्याबाबतची जी सूचना केली आहे त्याबाबत पुनर्विचार करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### जिल्हा परिषदेचे विभागप्रमुख पंचायत समित्यांच्या मासिक सभेला उपस्थित राहत नसल्याबाबत.

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट,२०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ यावर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवाला वरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन बाबत दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्ह्यातील बारामती पंचायती समितीला भेट देवून गट विकास अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की सन २०१२-१३ मध्ये जि.प. तील कोणकोणत्या विभाग प्रमुखांनी पंचायत समितीला कधी व किती भेटी दिल्या, तसेच किती विभाग प्रमुख पंचायत समितीच्या मासिक सभांना उपस्थित राहिले, भेटी कमी दिल्या असल्यास त्याची कारणे काय आहेत, त्यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, अहवाल वर्षात जिल्हा परिषदेच्या पुढील विभाग प्रमुखांनी पंचायत समितीला भेटी दिलेल्या आहेत. त्यामध्ये अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी २, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांनी १, मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी ५, कार्यकारी अभियंता (ग्रापापु) यांनी १, कार्यकारी अभियंता (छोपावि) यांनी २, पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी २, कार्यकारी अभियंता (इवद) यांनी १, समाजकल्याण अधिकाऱ्यांनी २ भेटी दिल्या असून, कार्यकारी अभियंता (बांधकाम) हे पंचायत समिती स्तरावरील एका मासिक सभेला उपस्थित राहिले.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी पंचायत समितीला एकही भेट न देण्याची कारणे काय आहेत, त्यावर गट विकास अधिकारी यांनी खुलासा केला की, रेकॉर्डवरुन जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी पंचायत समितीला भेट दिल्याचे दिसून येत नाही.

समितीच्या मते वास्तविक पाहता विभाग प्रमुखांनी पंचायत समितीला भेटी देऊन, मासिक सभांना उपस्थित राहणे आवश्यक आहे. परंतु, अनेक विभाग प्रमुखांनी पंचायत

समितीला भेटी दिल्या नसल्याचे दिसून येते. तसेच बहुतांश विभाग प्रमुख पंचायत समितीच्या मासिक सभेला सुध्दा उपस्थित राहिले नाहीत. त्यावर गट विकास अधिकारी यांनी स्पष्ट केले की, केवळ एकच विभाग प्रमुख पंचायत समितीच्या एका मासिक सभेला उपस्थित होते.

समितीने पुन्हा अशी विचारणा केली की, पंचायत समितीच्या मासिक सभांच्या तारखा विभाग प्रमुखांना कळविल्या होत्या काय ? याचे गट विकास अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर दिले. समितीच्या मते जिल्हा परिषदेच्या काही विभाग प्रमुखांनी पंचायत समितीला कमी भेटी दिल्याचे आणि काही विभाग प्रमुखांनी भेटीच दिल्या नसल्याचे दिसून येते. केवळ कार्यकारी अभियंता, (बांधकाम) हे पंचायत समितीच्या एका मासिक सभेस उपस्थित होते. इतर कोणीही विभाग प्रमुख पंचायत समितीच्या मासिक सभेला उपस्थित नव्हते. त्यामुळे हा मुद्दा साक्षीला घेण्यात यावा असे निदेश समितीने दिले.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा आरोग्य अधिकारी, कार्यकारी अभियंता (पाणी व्यवस्थापन कक्ष), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), शिक्षणाधिकारी (माध्यमिक), कार्यकारी अभियंता (बांधकाम) इत्यादींनी पंचायत समितीला एकदाही भेट दिली नाही. त्यामुळे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना पत्र लिहून सदरहू विभाग प्रमुखांनी पंचायत समितीला भेटी का दिल्या नाहीत आणि मासिक सभेला उपस्थित का राहिले नाहीत याबाबत संबंधितांकडून खुलासा मागवावा. असेही निदेश समितीने दिले.

**समितीने साक्षीच्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडून खालील मुद्द्यांची माहिती मागविली.**

प्रश्नावली क्र. २ वरील साक्षी दरम्यान अहवाल वर्षात संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख पंचायत समित्यांच्या मासिक सभेला उपस्थित राहिले नाहीत. याबाबत संबंधितांकडून खुलासा मागवावा असे निदेश समितीने दिले आहेत. त्यानुसार काय कारवाई केली आहे ?

**समितीस जिल्हा परिषदे कडून उपरोक्त मुद्द्यांची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

या कार्यालयाकडील परिपत्रक क्र.साप्रवि-आस्था-१२-१२१-१२, दि. २-४-२०१२ अन्वये जिल्हा परिषदेतील खाते प्रमुखांना पंचायत समिती मासिक सभांना उपस्थित राहणे करिता सन २०१२-१३ या वर्षाकरिता कार्यक्रम देणेत आलेला होता. सदर कार्यक्रमाप्रमाणे १६ खाते प्रमुखांना १३ पंचायत समिती मासिक सभांना उपस्थित रहाणे बाबत एकूण १८६ उद्दिष्ट देणेत आलेले होते. पैकी १३ साध्य झालेले आहे.

तसेच संबंधित खातेप्रमुखांकडून इकडील का.दा.नो. क्र. साप्रवि-आस्था-१२-३८८-१५, दि. २३-१०-२०१५ अन्वये लेखी खुलासा मागविणेत आलेला आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचे स्तरावरील कार्यवाही, प्रधान सचिव, ग्रामविकास यांच्या दि. २३ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या अर्धशासकीय पत्राद्वारे समितीने निर्देशित केलेल्या विहित कालमर्यादेत चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत सूचना देणेत आलेल्या आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने, पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी विचारणा केली की, पंचायत समिती, बारामती प्रश्नावली क्र.२ वरील साक्षी दरम्यान अहवाल वर्षात, संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख पंचायत समित्यांच्या मासिक सभेला उपस्थित राहिले नाहीत. याबाबत संबंधितांकडून खुलासा मागवावा असे निदेश समितीने दिलेले आहेत. त्यानुसार काय कारवाई केली आहे, यावर विभागीय सचिवांनी असे स्पष्ट केले की, पंचायत समिती, बारामती या ठिकाणी पंचायत राज समितीने भेट दिल्यानंतर त्याठिकाणी मासिक सभेला उपस्थिती खातेप्रमुखांनी उपस्थिती लावलेली नाही. या संदर्भातला मुद्दा उपस्थित झालेला होता. आता त्याठिकाणी प्रत्येक पंचायत

समित्यांच्या मासिक सभेला खातेप्रमुख उपस्थित राहतील. या दृष्टीकोनातून सर्वांना सूचित केले आहे. मी गेल्यापासून पंचायत समित्यांना वेळापत्रक करुन दिलेला आहे की, कोणत्या पंचायत समितीमध्ये कोणता खातेप्रमुख उपस्थित राहणार आहे. त्याप्रमाणे कारवाई केलेली आहे व संबंधितांना सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत.

समितीने आणखी विचारणा केली. जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुख यांनी मासिक सभेला उपस्थित राहिले नाहीत, त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली. यावर विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले की, आम्ही संबंधितांविरुध्द मासिक सभेला उपस्थित राहिले नाहीत, त्यांच्यावर दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ अन्वये खुलासा मागविला आहे. अद्याप कोणाचे खुलासे प्राप्त झाले नाहीत.

प्रत्येक जिल्हामध्ये तालुक्यांची संख्या वेगवेगळी आहे. कुठे जास्त आहे किंवा कुठे कमी आहे. परंतु त्या खातेप्रमुखांनी कमीत-कमी वर्षातून एक-दोन वेळा सभेला जाणे आवश्यक आहे. कारण तिथे गेल्यानंतर जिल्हा परिषदेचे वरिष्ठ अधिकारी यांच्यावर प्रेशर येते की, आमचे वरिष्ठ अधिकारी आलेले आहेत. परंतु काही पंचायत समित्यांच्या सभेला खातेप्रमुख अद्यापपर्यंत गेलेच नाहीत. समितीने चार ते पाच पंचायत समितीला भेट दिली, त्यामध्ये असे आढळून आले आहे. असे समितीने मत व्यक्त केले त्यावर विभागीय सचिवांनी मत मांडले की शासनाने याबाबतीत सन २०१२ मध्ये परिपत्रक काढलेले आहे. परंतु एचओडी दौरा करीत नाही असे म्हणताना त्यांना कामानिमित्त डीएचओ, कार्यकारी अभियंता यांच्याकडे जावे लागते. फक्त अनेकदा ते ज्या मिटिंगला जातात त्याचे रेकॉर्ड ठेवत नाहीत. जिल्हापरिषदेकडे आजच्या काळात खूप बैठका असतात.

## अभिप्राय व शिफारशी

समिती राज्यात अनेक ठिकाणी जिल्हा परिषदांना भेट देत असताना जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख, पंचायत समितीच्या मासिक सभांना उपस्थित राहत नाहीत व पंचायत समितीमध्ये आवश्यक तेवढे दौरेदेखील काढत नाहीत असे समितीला आढळून आले आहे. पुणे जिल्ह्यात देखील सदरची बाब समितीच्या निदर्शनास आली आहे. या प्रकरणी जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख पंचायत समितीच्या मासिक सभेला उपस्थित राहिले नाहीत. याबाबत संबंधितांकडून खुलासा मागवावा असे समितीने निदेश दिले होते.

त्यानुसार समितीला चौकशी अहवाल पाठविणे अभिप्रेत होते. तथापि, जिल्हा परिषदेने या प्रकरणी कोणत्याही प्रकारचा चौकशी अहवाल समितीला पाठविला नाही. समिती या बाबत तीव्र नाराजी व्यक्त करते.

जिल्हा परिषदेकडून याबाबत अशी माहिती प्राप्त झाली की या कार्यालयाकडून परिपत्रक क्र.साप्रवि-आस्था-१२-१२१-१२ दिनांक २-४-२०१२ अन्वये जिल्हा परिषदेतील विभाग प्रमुखांना पंचायत समिती मासिक सभांना उपस्थित राहण्याकरिता सन २०१२ या वर्षाअखेर कार्यक्रम देण्यात आलेला होता. सदर कार्यक्रमाप्रमाणे १६ खातेप्रमुखांना, १३ पंचायत समिती मासिक सभांना उपस्थित राहण्याबाबत एकूण १८६ उद्दीष्ट वाटून देण्यात आलेले होते. पैकी १३ साध्य झालेले आहे. तसेच संबंधित गट प्रमुखांकडून दिनांक २३-१०-२०१५ अन्वये लेखी खुलासा देखील मागविण्यात आलेला आहे. ग्रामविकास विभागाकडून देखील या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्या स्तरावरील कार्यवाही प्रधान सचिव ग्रामविकास विभाग यांच्या दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या अर्धशासकीय पत्राद्वारे समितीने विहित केलेल्या कालमर्यादेत चौकशी करुन त्याबाबतचा चौकशी अहवाल सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. उपरोक्त माहिती विचारात घेता अहवाल तयार करीत असल्याबाबत याबाबत, कुठल्याही प्रकारचा लेखी खुलासा समितीला प्राप्त झाला नाही.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी विभाग प्रमुखांनी मासिक सभेला अनुपस्थित राहण्याबाबत त्यांच्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली, याबाबत त्यांचे खुलासे मागविण्यात आले आहेत आणि अद्यापपर्यंत त्यांचे खुलासे प्राप्त झालेले नाहीत असे उत्तर समितीला देण्यात आलेले आहे. सदरची बाब अत्यंत आक्षेपार्ह व गंभीर असून समितीने निदेश देऊन देखील सदरहू अधिकाऱ्यांनी अद्यापपर्यंत खुलासा सादर न करणे हे अत्यंत गंभीर व समितीचा अवमान करणारे कृत्य आहे. **या प्रकरणात जिल्हा परिषदेने ज्या विभाग प्रमुखांना त्यांच्याकडून खुलासे मागविण्यात आले आहेत आणि त्यांचेकडून खुलाशाचे उत्तर वेळेवर  पाठविण्यात आलेले नाही अशा अधिकाऱ्यांच्या खुलाशांची/ त्यांच्या उत्तराची वाट न पाहता सर्व संबंधितांची एक वेतन वाढ तात्पुरती थोपविण्यात यावी व त्यांच्या सेवापुस्तिकेत तशी नोंद घेण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण बारा

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

**कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेच्या अनुदानाबाबत प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, क-हावागज, ता. बारामती (पंचायत समिती बारामती) (वार्षिक प्रशासन २०१२-१३).**

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट,२०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ यावर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन बाबत दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्हयातील बारामती पंचायती समितीला भेट देवून गट विकास अधिकाऱ्यांची साक्ष घेतली, साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, पंचायत समिती क्षेत्रात किती प्राथमिक आरोग्य केंद्रे, उप केंद्रे आहेत. अहवाल वर्षात उक्त ठिकाणी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी किती वेळा भेटी दिल्या, भेटीमध्ये त्यांना त्रुटी आढळून आल्यास त्याचे निराकरण कसे केले, तसेच अहवाल वर्षात उक्त केंद्रांवरील औषध साठ्यांची किती वेळा तपासणी करण्यात आली, त्यामध्ये काही त्रुटी आढळल्या काय, असल्यास, त्यांचे निराकरण कसे केले यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, अहवाल वर्षात पंचायत समिती, बारामती अंतर्गत ९ प्राथमिक केंद्रे व ५२ उपकेंद्रे होती. अहवाल वर्षात तत्कालीन जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी दि.२६/११/२०१३ रोजी ४ प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी दिल्या होत्या. त्यांना भेटीच्या वेळी आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने ज्या सूचना केल्या होत्या त्यांची पूर्तता वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून करुन घेण्यात आली आहे. डोर्लेवाडी व पणदरे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या भेटीच्या वेळी त्यांनी सर्व नोंदवह्या पूर्ण ठेवण्याबाबत सूचना केली होती. त्या त्रुटींच्या संदर्भातील अनुपालन अहवाल तयार करण्यात आला आहे.

चर्चे दरम्यान समितीने प्रतिपादन केले की, समितीने कऱ्हावागज येथील आरोग्य उपकेंद्राला भेट दिली. त्या उपकेंद्रात गरोदर मातांना द्यावयाच्या आयर्न व कॅल्शीयम टॅब्लेटचे स्टॉक रजिस्टर वर्षभरापासून उपलब्ध नाही. याचा अर्थ सदरहू औषधांचा गरोदर मातांना फायदा झालेला नाही. तसेच इतरही औषधांचे स्टॉक रजिस्टर उपलब्ध

नव्हते. त्या उपकेंद्राचे वीज देयक थकीत राहिल्यामुळे तेथील वीज पुरवठा एक वर्षापासून खंडीत करण्यात आलेला आहे. शिवाय त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. एकंदरीत सदरहू उपकेंद्राचा त्या भागातील जनतेला काहीच फायदा होत नाही. तसेच सर्वात गंभीर बाब अशी की, त्या उपकेंद्राला जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांनी एकदाही भेट दिली नाही. त्यामुळे सदरहू उपकेंद्राच्या परिस्थितीला जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. त्या उपकेंद्राचे ८ हजार रुपयांचे देयक प्रलंबित आहे. वास्तविक पाहता सदरहू उपकेंद्राकडे ६ हजार रुपये जमा असताना सुध्दा उर्वरित रकमेची तजवीज करुन थकीत वीज देयक भरलेले नाही. यावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, उपकेंद्राच्या ठिकाणी एएनएम यांनी राहणे बंधनकारक आहे. वास्तविक पाहता त्या उपकेंद्राचे थकीत देयक संबंधित तत्कालीन एएनएम यांनी भरावयास पाहिजे होते. त्यामुळे तत्कालीन आणि विद्यमान एएनएम तोंडी व लेखी स्वरुपात आवश्यक त्या सूचना केलेल्या आहेत. मी तत्कालीन एएनएम यांना सुध्दा पत्र दिले होते. विद्यमान एएनएम या एक वर्षापासून सदरहू उपकेंद्रात कार्यरत आहेत. त्यांची वेतनवाढ रोखण्याच्या बाबतीत नोटीस दिली आहे. मुळात स्टॉक रजिस्टर आणि कॅशबुक रजिस्टर मेंटेन करण्याची जबाबदारी एएनएम यांची आहे. मी आठवड्यातून एकदा त्या उपकेंद्राच्या ठिकाणी जातो. मी एएनएम यांना सांगितले होते की, त्यांनी आपल्या पगारातून वीज देयक भरावे.

समितीने आणखी विचारणा केली की, सांगवी प्राथमिक आरोग्य केंद्रात श्रीमती शुभांगी वाघ यांच्यावर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया झालेली नसताना सुध्दा, त्यांच्यावर जननी सुरक्षा योजनेंतर्गत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झाल्याचे दाखवून अनुदान लाटले हे खरे आहे काय, त्यावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी होकारार्थी उत्तर देवून या प्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी तत्कालीन वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहायक यांना साक्षीसाठी बोलविण्याचे समितीस विदीत केले..

समितीने आणखी विचारणा केली की, श्रीमती प्रियंका निमजे यांची सुध्दा प्राथमिक आरोग्य केंद्रात शस्त्रक्रिया झालेली नसताना, त्यांची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झाल्याचे दाखविण्यात आले आहे. प्रत्यक्षात या महिलेची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

झालेली नाही. परंतु तिच्यावर शस्त्रक्रिया झाल्याचे दाखवून पैसे लाटलेले आहेत. इतर प्रकरणांत असेच झाल्याची शंका येते. त्यामुळे ज्या २४४ महिलांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेपोटी अनुदान दिले आहे त्या सर्व प्रकरणांची चौकशी झाली पाहिजे. अनेक प्रकरणांत बोगस महिलांवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झाल्याचे दाखवून अनुदान लाटलेले आहे. श्रीमती शुभांगी वाघ यांनी सांगवी प्रा.आ.केंद्रात नव्हे तर जिल्ह्याबाहेर शस्त्रक्रिया करुन घेतलेली आहे. त्यामुळे या पंचायत समिती क्षेत्रात करण्यात आलेल्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियांची संपूर्ण चौकशी करुन त्या बाबतचा अहवाल समितीला सादर केला पाहिजे. जेणेकरुन यातील अपहार समोर येईल आणि कोणीही योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही. श्रीमती प्रियंका निमजे यांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झालेली नसल्याचे स्पष्ट सांगितलेले आहे. तरी सुध्दा तिच्या नावे पैसे उचलण्यात आले आहेत. त्यावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी स्पष्ट केले की, या प्रकरणांची जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी दखल घेतलेली आहे. हा अतिशय गंभीर विषय आहे. त्यामुळे या विषयाच्या बाबतीत विभागीय सचिवांची साक्ष घ्यावयास पाहिजे. तसेच तत्कालीन वैद्यकीय अधिकारी आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यावर फौजदारी कारवाई केली पाहिजे, असे निदेश समितीने दिले.

समितीने पुढे असे प्रतिपादन केले की, उपरोक्त महिलांवर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कुटुंब शस्त्रक्रिया झालेली नसताना सुध्दा त्यांच्यावर शस्त्रक्रिया झाल्याचे दाखवून त्यांच्या नावे अनुदान लाटलेले आहे. श्रीमती शुभांगी वाघ या महिलेवर सातारा येथे शस्त्रक्रिया झालेली आहे. तिच्या नावे पुणे जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात शस्त्रक्रिया झाल्याचे दाखवून अनुदान उचलणे ही अतिशय गंभीर बाब आहे. माहितीच्या अधिकारातून हे सर्व प्रकरण उघडकीस आले आहे. त्यामुळे या प्रकरणी त्वरित चौकशी करुन जे दोषी आढळतील त्यांना तत्काळ निलंबित करुन त्याबाबतची माहिती समितीकडे पाठवावी.

स्त्री-पुरुष जन्मदर मेंटेन करण्यासाठी पंचायत समितीने एखादी योजना राबविली आहे काय, अशी विचारणा समितीने केली असता तालुका आरोग्य अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून योजना राबविली जाते. जिल्हा

परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसुती झाली आणि महिलेला मुलगी झाली तर त्या मुलीचे स्वागत म्हणून तिच्या नावे २ हजार रुपयांचे राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र काढून मुलीच्या मातेला दिले जाते. यामागील हेतू हा मुलीचा जन्मदर वाढविणे आहे. ज्या ठिकाणी मोठे मेळावे भरविले जातात त्या ठिकाणी ' बेटी बचाओ' अभियान राबविले जाते. तसेच एखाद्या ठिकाणी भ्रुणहत्या होत असल्याची माहिती मिळाल्यास, त्या ठिकाणी रँडमली व्हिजीट देऊन त्या बाबत खातरजमा केली जाते व आक्षेपार्ह आढळल्यास पीसीपीएनडीटी ॲक्टनुसार कारवाई केली जाते.

समितीने पुढे आणखी विचारणा केली की, ज्यांना दोन मुली आहेत त्यांच्याकडून सोनोग्राफी केल्यानंतर गर्भपात केला जातो काय? तसेच चुकीचे घडलेल्या प्रकरणांत कारवाई केली आहे काय, त्यावर तालुका आरोग्य अधिकारी यांनी स्पष्ट केले की, पहिल्या एक किंवा दोन मुली असतील आणि नंतर महिला गर्भवती राहिली व तिने १६ ते २२ आठवड्याच्या कालावधीत गर्भपात केला असेल तर अशा महिलांची यादी मागविली जाते. अर्भक अपंग असेल तर त्या प्रकरणी गर्भपात करण्यास परवानगी आहे. परंतु सोनोग्राफी करुन गर्भपात केला असेल तर गर्भपात करण्यामागील कारणे काय आहेत या बाबतची सविस्तर माहिती घेतली जाते. या संदर्भात आम्ही एका प्रकरणी कारवाई केली आहे. याबाबतची केस सुरु आहे.

**समितीने साक्षीचेवेळी मुख्य कार्यकारी अधिकारीयांचे कडून खालील मुद्दयांची माहिती मागविली.**

प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, कऱ्हावागज, ता.बारामती येथील ए.एन.एम. मुख्यालयी राहत नाहीत. त्यांची तसेच ज्या २४४ महिलांना कुटूंबनियोजन शस्त्रक्रियेपोटी अनुदान दिले आहे त्या सर्व प्रकरणांची चौकशी करुन दोषींना निलंबित करुन त्यासंबंधीची माहिती समितीकडे पाठवावी असे निदेश समितीने दिले आहेत, त्यानुसार चौकशी केली आहे काय, असल्यास,त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर काय कारवाई केली आहे ?

**चौकशी अहवाल**

प्राथमिक आरोग्य उप केंद्र कऱ्हावागज ता.बारामती, जि. पुणे येथील आरोग्य सेवक महिला मुख्यालयी रहात नाहीत व थकीत वीज देयक न भरणे, दप्तर अद्यावत न ठेवणे बाबत पंचायती राज समितीस निदर्शनास आले. त्या अनुषंगाने अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.पुणे यांचेकडील दिनांक ११-९-२०१५ रोजीचे अहवालानुसार १. श्रीमती दडस आरोग्य सेवक महिला यांना वीज देयक, मुख्यालयीन रहाणे व दप्तर अद्यावत न ठेवणेबाबत शिस्तभंगाची कारवाई करणे. २. श्रीमती भागवत आरोग्य सेवक महिला यांनी विहीत कालावधीत वीज देयक भरणा न केल्याने त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करणे. ३. श्री.गोसावी आरोग्य सहाय्यक यांचे बाबतीत पर्यवेक्षकीय कामकाजामध्ये कसुर केलेला आहे.

१) तत्कालीन श्रीमती दडस आरोग्य सेवक महिला यांना मुख्यालयी न राहणे, थकित वीज देयक न भरणे, दप्तर अद्यावत न ठेवणेबाबत निलंबित करून खाते निहाय चौकशी सुरु करणेत आली आहे.

२) श्रीमती भागवत आरोग्य सेवक महिला वीज देयक न भरणेबाबत निलंबित करून खाते निहाय चौकशी सुरु करणेत आली आहे.

३) श्री. गोसावी यांनी पर्यवेक्षकीय कामकाजामध्ये कसुर केल्याने त्यांना निलंबन करुन खाते निहाय चौकशी करणेचा प्रस्ताव सहसंचालक आरोग्य सेवा पुणे (हत्तीरोग पुणे) यांचेकडे पाठविणेत आलेला आहे.

श्रीमती शुभांगी सचिन वाघ यांची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया प्राथमिक आरोग्य केंद्र सांगवी येथे झालेली नसताना चुकीच्या पध्दतीने सदरची नोंद प्रा.आ.केंद्राच्या नावे घेतल्याचे स्पष्ट होते. याबाबत तत्कालीन वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यिका व आरोग्य सेविका यांच्या जबाबात संबंधितांनी ही बाब नजर चुकीने झाल्याचे म्हटले आहे. परंतु शस्त्रक्रिया झालेली नसताना व लाभार्थी प्रत्यक्षात प्रा.आ.केंद्रात दाखल नसताना अशा प्रकारे संमती पत्रक भरणे, वैद्यकीय अधिकारी व सर्जन यांचे दाखले मान्य करुन

घेणे त्याबाबतची नोंद आर ३ रजिस्टरला घेऊन लाभार्थ्यासह सर्व प्रकारच्या आर्थिक लाभाच्या अदाई करणे ही बाब जाणीवपूर्वक झाल्याचे वाटते. याकरीता तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ.ज्योती घोरपडे, आरोग्य सहाय्यिका श्रीमती चित्रा नारायण गायकवाड, आरोग्य सहाय्यक श्री.घुले, कनिष्ठ सहाय्यक श्री.डी.डी. जगताप, मत प्रवर्तक तथा आरोग्य सेविका श्रीमती सी.एन.दडस यांचेवर प्रशासकीय कारवाई प्रस्तावीत करावी असे वाटते. बिनटाका शस्त्रक्रिया सर्जन डॉ.ओक हे खाजगी वैद्यकीय व्यवसायिक असुन त्यांच्याकडे श्रीमती शुभांगी सचिन वाघ यांचा शस्त्रक्रिया फॉर्म शिबीराच्या गडबडीमध्ये स्वाक्षरीत करुन घेतला असावा अशी शक्यता वाटते. याबाबत प्रा.आ.केंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांची जबाबदारी अधिक महत्वाची वाटते.

उर्वरित आर ३ क्रमांक १२१ ते १२४ अशा चार कुटुंब नियोजन लाभार्थ्यांबाबत चौकशी अंती त्यांच्या शस्त्रक्रिया प्रा.आ.केंद्र सांगवी येथेच झाल्याचे स्पष्ट होते.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

प्राथमिक आरोग्य उपकेंद्र कऱ्हावागज, ता. बारामती, जि. पुणे येथे विद्युत देयक भरून वीज पुरवठा सुरू करण्यात आला आहे. दोषी कर्मचारी श्रीमती दडस, आरोग्य सेवक महिला, श्रीमती भागवत, आरोग्य सेवक महिला यांना निलंबित करून खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करणेत आलेली आहे. श्री. गोसावी आरोग्य सहाय्यक यांनी पर्यवेक्षकीय कामकाजामध्ये कसूर केल्याने त्यांना निलंबन करून खातेनिहाय चौकशी करणेचा प्रस्ताव मा.सह संचालक, आरोग्य सेवा हिवताप यांचेकडे पाठविणेत आलेला आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र सांगवी, ता.बारामती येथील २४४ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया लाभार्थ्यांची चौकशी डॉ.जगताप तालुका आरोग्य अधिकारी व डॉ.जाधव, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी केलेली असून बोगस आढळून आलेल्या शस्त्रक्रियेबाबत श्रीमती चित्रा गायकवाड, आरोग्य सहाय्यक महिला श्री.डी.डी. जगताप, कनिष्ठ सहाय्यक व ७ प्रवर्तक यांना निलंबित करणेत आलेले आहे. डॉ. ज्योती घोरपडे तत्कालीन वैद्यकीय अधिकारी यांना निलंबित करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणेत आला आहे.

**तसेच समितीस सार्वजनिक आरोग्य विभागाकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांनी चौकशी केलेली आहे त्यानुसार पुढील अभिप्राय आहेत.

(१) तत्कालीन श्रीमती दडस आरोग्य सेवक महिला व श्रीमती भागवत आरोग्य सेवक महिला यांना मुख्यलयी न राहणे, थकित वीज देयक न भरणे, दप्तर अद्यावत न ठेवणेबाबत निलंबित करुन विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच श्री. गोसावी पर्यवेक्षक यांनी कामकाजामध्ये कसुर केल्याने त्यांना निलंबन करुन विभागीय चौकशी करण्याचा प्रस्ताव सहसंचालक आरोग्य सेवा (हत्तीरोग पुणे) यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे. सदर बाबतीत कार्यवाही सुरु आहे.

(२) प्रा. आ. केंद्र सांगवी येथील बोगस २४४ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया लाभार्थींची चौकशी डॉ. जगताप, तालुका आरोग्य अधिकारी, बारामती व डॉ. जाधव, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी चौकशी केलेली असून वस्तुस्थितीनुसार २४४ पैकी ४३ शस्त्रक्रिया बोगस आढळून आलेल्या आहेत. श्रीमती चित्रा गायकवाड, एलएचव्ही. श्री.डी.डी. जगताप, कनिष्ठ सहाय्यक व ७ प्रवर्तक यांना निलंबित करण्यात आलेले आहे. तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ. ज्योति घोरपडे, वैद्यकीय अधिकारी, प्रा. आ. केंद्र सांगवी यांना निलंबित करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी उपसंचालक, पुणे मंडळ, पुणे यांच्यामार्फत प्रस्तावित केला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

प्राथमिक आरोग्य उपकेंद्र व कऱ्हावागज, ता.बारामती, जि. पुणे येथे विद्युत देयक भरुन वीज पुरवठा सुरु करण्यात आला आहे. कर्मचाऱ्यांना निलंबित करुन विभागीय चौकशी सुरु करणेत आली आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सदरहू प्रकरणी आपण काय कार्यवाही केलेली आहे, यावर विभागीय सचिवांनी यामध्ये आम्ही चौकशी केलेली आहे. सकृतदर्शनी या चौकशीमध्ये आम्हाला चुका झाल्याचे दिसून आलेले आहे. यामध्ये एकूण ९ लोकांना निलंबित करण्यात आलेले आहे. अशी माहिती समितीला दिली.

समितीने आणखी विचारणा केली की, यामध्ये डीन जबाबदार नाहीत काय? शस्त्रक्रिया झालेली नसतानाही शस्त्रक्रिया झाल्याचे दाखवून पैसे घेणे हे चुकीचेच आहे. आपण जर बोगस नावे दाखवून अनुदान घेत असाल तर याला जबाबदार कोण, यावर विभागीय सचिवांनी याठिकाणी श्रीमती ज्योती घोरपडे ह्या तालुका स्तरावरील एमओ होत्या. त्यांच्याविरूध्द आम्ही शासनाला प्रशासनिक अहवाल सादर केलेला असल्याचे समितीस विदीत करण्यात आले.

समितीने उक्त प्रकरणी कार्यवाही करीत असताना एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही होणार नाही, याची काळजी घेण्यात यावी, असे निदेश दिले.

अशा चुका पुन्हा होऊ नयेत यासाठी भारत सरकारच्या आदेशानुसार आरसीएस रजिस्टर ठेवण्यात येणार आहे. यामध्ये त्या व्यक्तीचे आधारकार्ड, बँक अकाऊंट नंबर घेण्यात येईल. त्याचप्रमाणे त्यांचे फोटो आयडी सुध्दा घेण्यात येणार आहेत. नुकसान भरपाईचे पैसे पेशंटला देण्यात येणार आहेत, ते लगेच न देता दीड महिन्यानंतर देण्यात येतील, असेही विभागीय सचिवांनी स्पष्ट केले.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने कऱ्हावागज, ता.बारामती, जि.पुणे या प्राथमिक आरोग्य उप केंद्राला भेट दिली असता उपकेंद्रात गरोदर मातांना द्यावयाच्या आयर्न व कॅल्शियम टॅब्लेटचे स्टॉक रजिस्टर वर्षभरापासून उपलब्ध नव्हते व सदर औषधांचा गरोदर मातांना फायदा झाला

का नाही, या उपकेंद्राचे वीज देयक थकीत राहिल्यामुळे एक वर्षापासून वीज पुरवठा खंडीत करण्यात आलेला आहे.  शिवाय तेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसून उपकेंद्राला जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांनी एकदाही भेट दिली नाही. उपकेंद्राच्या ठिकाणी एएनएम यांनी राहणे बंधनकारक असताना ते तेथे निवासी राहत नाहीत, त्याचप्रमाणे सांगवी प्राथमिक आरोग्य केंद्रात श्रीमती शुभांगी वाघ यांच्यावर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया झालेली असतानासुध्दा त्यांचेवर जननी सुरक्षा योजनेंतर्गत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया झाली नसता झाल्याचे दाखवून अनुदान लाटले. तसेच श्रीमती प्रियंका निमजे यांचीसुध्दा प्राथमिक आरोग्य केंद्रात शस्त्रक्रिया झालेली नसताना ती दाखविण्यात येणे व अनुदान लाटणे त्यामुळे ज्या २४४ महिलांना कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेपूर्वी अनुदान दिलेले आहे त्या सर्व प्रकरणांची चौकशी करण्याबाबत समितीने निदेशीत केले होते. त्यानुसार जिल्हा परिषदेची चौकशी करुन चौकशीचा अहवाल समितीला पाठविला आहे.

उक्त चौकशी अहवालात प्राथमिक आरोग्य उपकेंद्र कऱ्हावागज, ता.बारामती, जि. पुणे यांच्याकडील श्रीमती दडस, महिला आरोग्य सेवक, श्रीमती भागवत, महिला आरोग्य सेवक यांना निलंबित करुन खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. श्री. गोसावी, आरोग्य सहाय्यक यांनी पर्यवेक्षकीय कामकाजामध्ये कसूर केल्याने त्यांना निलंबन करुन खातेनिहाय चौकशी करण्याचा प्रस्ताव सह संचालक, आरोग्य सेवा, पुणे (हत्तीरोग पुणे) यांचेकडे पाठविण्यात आला आहे. तसेच प्राथमिक आरोग्य सेवा केंद्र सांगवी, ता.बारामती येथील २४४ कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया लाभार्थ्यांची चौकशी डॉ.जगताप, तालुका आरोग्य अधिकारी व डॉ.जाधव, अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी केलेली असून त्यात ४३ शस्त्रक्रिया बोगस आढळून आल्यामुळे श्रीमती चित्रा गायकवाड, एलएचपी, श्री.डी.डी.जगताप, कनिष्ठ सहाय्यक व ७ प्रवर्तक यांना निलंबित करण्यात आलेले आहे. तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ.ज्योती घोरपडे यांच्या निलंबनाचा प्रस्ताव उप संचालक, पुणे यांच्यामार्फत शासनाकडे पाठविण्यात आला आहे असे चौकशीअंती समितीला कळविण्यात आलेले आहे. विभागीय साक्षीच्या वेळी शस्त्रक्रिया झालेल्या नसताना देखील शस्त्रक्रिया झाल्याचे दाखवून पैसे घेणे हे चुकीचे आहे. बोगस नावे दाखवून अनुदान घेतले असणे याला जबाबदार कोण, यावर विभागीय सचिवांनी

श्रीमती ज्योती घोरपडे हे तालुका स्तरावरील वैद्यकीय अधिकारी होत्या, त्यांच्याविरुध्द आम्ही शासनाला प्रशासनिक अहवाल सादर केलेला आहे. समितीने या प्रकरणी कार्यवाही होत असताना सर्वंकष चौकशी करणे आवश्यक असून यामध्ये सर्व संबंधितांना नैसर्गिक न्याय तत्वानुसार त्यांचे म्हणणे मांडण्याचा पूर्णपणे अधिकार देऊन त्यांच्याविरुध्द वस्तुस्थितीला धरुन कार्यवाही करण्यात यावी असे निदेश दिले व यामध्ये निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही होणार नाही याचीही दक्षता घेण्यात यावी असे निदेश दिले.

**जिल्हा परिषद, समितीने निदेश दिल्याप्रमाणे कार्यवाही केली असून त्याबाबत पाठविलेल्या चौकशी अहवालावरुन समिती समाधान व्यक्त करत असे असताना या प्रकरणामध्ये मोठ्या प्रमाणावर कर्मचाऱ्यांवर कार्यवाही केली असल्यामुळे या प्रकरणी उक्त सर्व कर्मचाऱ्यांना नैसर्गिक न्यायतत्वाचा वापर करुन त्यांचे म्हणणे पूर्णपणे मांडण्याची त्यांना संधी देऊन व यामध्ये चौकशी अधिकाऱ्यांनी नेमकी चुकीची बाब कोणाकडून घडली त्यांच्यावर प्रशासकीय स्वरुपाची कडक कार्यवाही करुन त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी. मात्र असे करीत असताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर चुकीची कार्यवाही होणार नाही याची दक्षता चौकशी अधिकाऱ्यांनी घ्यावी व त्यानुसार चौकशी करावी अशी समितीची शिफारस आहे. या प्रकरणी जे दोषी असतील व जे निर्दोष असतील त्या सर्वांची माहिती चौकशीअंती समितीला पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण तेरा

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### मौजे ढाकाळे, ता. बारामती, नळ पाणी पुरवठा योजनेबाबत

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट,२०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ यावर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन बाबत दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्ह्यातील बारामती पंचायत समितीला भेट देवून गट विकास अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, ढाकाळे गावातील योजनेच्याबाबतीत गंभीर बाबी निदर्शनास आणून देऊन सुध्दा त्याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष करण्यात आले. या कामाच्याबाबतीत वेगवेगळ्या माध्यमातून आदेश दिले गेले. या संपूर्ण कामामध्ये गैरप्रकार आणि अनियमितता झाली आहे. तसेच या कामाच्या संदर्भात कारवाई करण्याच्याबाबतीत अक्षम्य दिरंगाई करण्यात आली. मुळात ही पिण्याच्या पाण्याची योजना होती. तरी सुध्दा ढाकाळे गावातील पाणी पुरवठा योजना तेथील लोकांपर्यंत पोहचली नाही. या कामाच्याबाबतीत माननीय न्यायालयाचे आदेश असताना, या कामामध्ये अनियमितता झालेली असताना, या कामातील गैरप्रकार निदर्शनास आणून दिलेला असताना सुध्दा प्रशासनाच्या वतीने संबंधितांवर कारवाई केली जात नसेल तर वाईट प्रवृत्तीला पाठीशी घालण्यात येत आहे असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे या प्रकरणी फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी. तसेच संबंधितांकडून आर्थिक वसुलीची कारवाई केली पाहिजे. या कामाच्याबाबतीत कमीतकमी ५२ वेळा पत्रव्यवहार केला होता. परंतु, तरी सुध्दा त्या अनुषंगाने उचित कार्यवाही झाली नाही. तत्कालीन पाणी पुरवठा मंत्री, माननीय उच्च न्यायालय यांनी आदेश दिलेले असताना सुध्दा त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली नाही. ज्या दिवशी संबंधित कार्यकारी अभियंता निवृत्त झाले त्या दिवशी त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली. या गैरव्यवहाराला जबाबदार असणाऱ्यांनी एमबी रेकॉर्ड सुध्दा बनावट केले आहे. यावर उप अभियंता, ग्रामविकास पाणी पुरवठा यांनी समितीस विदीत केले की, या संपूर्ण प्रकरणाला २००७-०८ या वर्षातील अधिकारी जबाबदार आहेत. ढाकाळे गावातील पाणी

पुरवठा योजनेमध्ये अनियमितता झाल्याबाबत श्री.शिंदे नावाच्या व्यक्तीने उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. त्यांनी निदर्शनास आणून दिले होते की, सदरहू योजनेची पाईप लाईन कमी उंचीवरुन टाकली आहे, तसेच इतरही बाबी निदर्शनास आणून दिल्या होत्या. सदरहू प्रकरणाचा निकाल फेब्रुवारी-२०१५ मध्ये लागला. न्यायालयाने सदरहू योजनेचे काम सुरु करण्याबाबत निर्णय दिला होता. त्यानुसार सदरहू योजनेचे काम सुरु केले आहे. आजच्या घडीला ७० ते ८० टक्के काम पूर्ण केले आहे. उर्वरित काम ऑक्टोबर-२०१५ पर्यंत पूर्ण करणार आहोत.

समितीने आणखी विचारणा केली की, निविदा प्रक्रियेनुसार विहित मुदतीत काम पूर्ण होणे अपेक्षित असताना सुध्दा ते काम मुदतीत पूर्ण केले नाही. त्यामुळे एकप्रकारे त्या गावातील लोकांच्या तोंडचे पाणी पळविले गेले. या कामाची वर्क ऑर्डर कधी दिली, यावर उप अभियंता, ग्रामविकास पाणी पुरवठा यांनी वर्क ऑर्डर २००८ ला दिली आणि २००९ मध्ये काम पूर्ण करणे अपेक्षित होते. वर्क ऑर्डरनुसार एक वर्षात काम पूर्ण करावयाचे होते. परंतु, सदरहू प्रकरण दीड वर्षे उच्च न्यायालयात सुरु होते, असे उप अभियंता (पा.पु.) यांनी समितीस विदीत केले.

समितीने आणखी विचारणा केली की, अशा प्रकारे कामामध्ये अनियमितता करणाऱ्या प्रवृत्तींना आळा घातला पाहिजे. अशा अधिकाऱ्यांच्या माध्यमातून करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला गेला आहे. माननीय मंत्री आणि माननीय न्यायालयाचे आदेश असताना सुध्दा त्या आदेशांना केराची टोपली दाखविली गेली. शिवाय या कामाचे जे एमबी रेकॉर्ड बनविण्यात आले ते चुकीचे आहे. या अनियमिततेमध्ये संपूर्ण यंत्रणा सहभागी आहे. या कामाच्या फाईलवर ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सह्या असतील त्यांच्यावर गुन्हे दाखल करुन त्यांच्याकडून वसुली केली पाहिजे. हे संपूर्ण काम किती रकमेचे होते, यावर उप अभियंता, ग्रामविकास पाणी पुरवठा यांनी समितीस विदीत केले की, हे काम ४४ लाख ६६ हजार रुपयांचे होते. या कामावर २००७-०८ मध्ये १७ लाख ७८ हजार रुपये खर्च झालेला आहे. त्यानंतर हे काम बंद झाले. सदरहू उत्तरावर समितीचे समाधान झाले नाही. समितीने असे निदेश दिले की, या संपूर्ण कामाची चौकशी करण्यात यावी. या योजनेमध्ये अनियमितता झाल्यामुळे गावातील लोकांना ७ वर्षे पिण्याचे पाणी मिळू शकले

नाही. पाणी व्यवस्थापन समितीमध्ये या योजनेतील कामाच्या बाबतीत मतभेद निर्माण झाले. या सर्व प्रकरणाला समितीतील सदस्य जबाबदार असतील तर त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर सुध्दा कारवाई करावी. तसेच या प्रकरणी जे जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करुन एक ते दीड महिन्यात समितीला अहवाल सादर करावा.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून खालील मुद्यांची माहिती मागविली.**

मौजे ढाकाळे, ता.बारामती गावातील पाणी पुरवठा योजनेचे काम ४४ लाख ६६ हजार रुपयांचे असून सदर कामावर १७ लाख ७८ हजार रुपयांचा खर्च होवूनही काम अपूर्ण आहे. या प्रकरणी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, सदरहू कामात अनियमीतता झालेली आहे. त्यावर समितीने संपूर्ण योजनेच्या कामाची चौकशी करण्यात यावी व जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतील त्यांचेवर निलंबनाची कारवाई करुन दीड महिन्यात समितीला अहवाल पाठवावा असे निदेश दिले आहेत, त्यानुसार चौकशी पूर्ण झाली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली आहे ?

**चौकशी अहवाल**

मा. उप आयुक्त (विकास), पुणे यांनी यापुर्वीच दिनांक ३०.०५.२००९ रोजी चौकशी अहवाल सादर केलेला असुन त्यामध्ये खालील बाबी दिसून आलेल्या आहेत.—

**१.** मौजे ढाकाळे, ता. बारामती नळ पाणी पुरवठा योजनेची समिती गठित करण्यासाठी घेण्यात आलेल्या दिनांक १.०५.२००७ रोजीच्या ग्रामसभेत ग्रामस्थांनी दुबार स्वाक्षऱ्या केल्याचे निदर्शनास आले आहे.

**२.** मौजे ढाकाळे,ता. बारामती नळ पाणी पुरवठा योजनेसाठी गठित केलेल्या समित्या या शासनाच्या सूचनेप्रमाणे झालेल्या नाहीत.

**३.** सदर नळ पाणी पुरवठा योजनेची पाईप टाकणेची खोदाई खडक कडक असल्याने व भौगोलिक परिस्थितीनुसार योग्य असेल ते करुन घेणे गरजेचे आहे.

**समितीस उपरोक्त मुद्यांची जिल्हा परिषदेकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मौजे ढाकाळे, ता.बारामती या योजनेचा चौकशी अहवाल मा. उपआयुक्त (विकास), पुणे यांनी यापूर्वीच दिनांक ३०.०५.२००९ व मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी दिनांक २८.०७.२०१० सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने सदर योजनेच्या बाबतीत ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समिती जबाबदार असल्याचे निदर्शनास आले मा. जिल्हाधिकारी यांनी सदर समितीवरील सरपंच तथा अध्यक्ष यांना सरपंच पदावरुन पदावनत केलेले आहे. तसेच संबंधित उप अभियंता, श्री.पवार व शाखा अभियंता श्री. भांडवलकर हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील असलेने त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ नुसार निलंबनाची कारवाई करणेसाठी मा. मुख्य प्रशासकीय अधिकारी, मजीप्रा, मुंबई यांना द्यावयाचे पत्राचे प्रारुप मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दिनांक २९.१०.२०१५ रोजी सामान्य प्रशासन विभागामार्फत सादर केलेले आहे. तसेच शाखा अभियंता श्री. बोराटे यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९६४ नुसार निलंबनाच्या कारवाईचा प्रस्ताव बांधकाम विभाग (उत्त) यांचेमार्फत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करणेत आलेला आहे.

**केलेली कार्यवाही**

सदर योजनेच्या बाबतीत ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समिती जबाबदार असल्याचे निदर्शनास आले असलेने मा. जिल्हाधिकारी यांनी सदर समितीवरील सरपंच तथा अध्यक्ष यांना सरपंच पदावरुन पदावनत केलेले आहे.तसेच संबंधित तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. व्हि. एम. तंवर (सेवानिवृत्त) यांचा शिस्तभंग कारवाईचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद,पुणे कार्यालयाने पत्र जा.क्र. साप्रवि/आस्था-६/५९०/१५, दिनांक ३०.०६.२०१५ अन्वये शासनास सादर केलेला आहे. तसेच तत्कालीन उप अभियंता श्री.मनिष पवार व तत्कालीन शाखा अभियंता श्री.भांडवलकर(सेवानिवृत्त) हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील असलेने त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ नुसार निलंबनाची कारवाई करणेसाठी मा. मुख्य प्रशासकीय अधिकारी, मजीप्रा, मुंबई यांना या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.जिप/ग्रापापु/आस्था/५१६/१५, दिनांक ३.११.२०१५ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

तसेच शाखा अभियंता श्री. बोराटे यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९६४ नुसार शिस्तभंगाची कारवाई करुन एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

**समितीस पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून उपरोक्त मुद्यांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मौजे ढाकाळे, ता. बारामती या योजनेचा चौकशी अहवाल उप आयुक्त (विकास), पुणे यांनी यापूर्वीच दिनांक ३०.०५.२००९ व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अनुषंगाने, जिल्हा परिषद, पुणे यांनी दिनांक २८.०७.२०१० रोजी सादर केलेले आहे. त्या अनुषंगाने सदर योजनेच्या बाबतीत ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समिती जबाबदार असल्याचे निदर्शनास आले असलेने जिल्हाधिकारी यांनी सदर समितीवरील सरपंच तथा अध्यक्ष यांना सरपंच पदावरून पदावनत केलेले आहे. तसेच संबंधित तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.व्ही.एम.तंवर (सेवा निवृत्त) यांचा शिस्तभंग कारवाईचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, पुणे कार्यालयाने पत्र जा.क्र. साप्रतिवि/आस्था-६/५९०/१५, दि. ३०.०६.२०१५ अन्वये शासनास सादर केलेला आहे. तसेच तत्कालीन उपअभियंता श्री.मनिष पवार व तत्कालीन शाखा अभियंता श्री.भांडवलकर(सेवा निवृत्त) हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील असलेने त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ नुसार निलंबनाची कारवाई करणेसाठी मुख्य प्रशासकीय अधिकारी, मजीप्रा., मुंबई यांना जिल्हा परिषद कार्यालयाकडील पत्र जा.क्र. जिप/ग्रापापु/आस्था/५१६/१५, दिनांक ०३.११.२०१५ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

तथापि, जनहित याचिका क्र. १६७/२०१२, दि. १०.०२.२०१५ रोजी मा. उच्च न्यायालयाने मौ. ढाकाळे येथील पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणीस विलंबास जबाबदार असलेल्या व्यक्तींविरुध्द फौजदारी खटला (Prosecution) दाखल करण्याबाबतची शक्यता अजमावण्याबाबतचे आदेश जिल्हा परिषदेला दिलेले आहेत. त्यानुषंगाने सदर प्रकरणी श्री.व्ही.एम.तंवर, कार्यकारी अभियंता (सेवानिवृत्त) यांचेविरुध्द खटला दाखल करण्यात आला आहे का, तसेच सदर प्रकरणी आणखी काही अधिकारी/कर्मचारी जबाबदार असल्यास त्यांचेविरुध्द देखील फौजदारी कार्यवाही करण्यात आली का, याबाबतची

माहिती विभागाच्या दि. ५.११.२०१५ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,पुणे यांचेकडून मागविली आहे.

तसेच शाखा अभियंता श्री. बोराटे यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ नुसार शिस्तभंगाची कारवाई करुन एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

या योजनेतील उर्वरित काम प्रगतीत असून यापैकी ९०% कामे पूर्ण करुन दि. २.१०.२०१५ पासून गावास नवीन पाईप लाईनद्वारे पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली उक्त साक्षीच्या वेळी विचारणा केली की, मौजे ढाकाळे, ता. बारामती गावातील पाणी पुरवठा योजनेचे काम ४४ लक्ष ६६ हजार रुपयांचे असून सदर कामावर १७ लाख ७८ हजार रुपयांचा खर्च होऊनही काम अपूर्ण आहे. या प्रकरणी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, सदरहू कामात अनियमितता झालेली आहे. त्यावर समितीने संपूर्ण योजनेच्या कामाची चौकशी करण्यात यावी व जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतील त्यांचेवर निलंबनाची कारवाई दीड महिन्यात करण्यात यावी असे सांगितले होते. याबाबत जिल्हा परिषदेकडून समितीला अहवाल प्राप्त झालेला आहे. यामध्ये काय ॲक्शन प्रपोज केलेली आहे, यावर विभागीय सचिवांनी उत्तर दिले की, रिसेंटली आमच्याकडे एक एक्झेक्युटिव्ह इंजिनिअर श्री. तंवर आहेत त्यांच्यावर ॲक्शन प्रपोज केलेली आहे आणि २ डेप्युटी इंजिअरवर व १ शाखा अभियंत्यावर ॲक्शन प्रपोज केलेली आहे. यावर समितीने शासनाने कोणती कार्यवाही केल्याची विचारणा केली असता विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले की, एक्झेक्युटिव्ह इंजिनिअरबाबत सांगावयाचे झाले तर हे प्रकरण सन २०१० मध्ये झालेले आहे. हा माणूस सन २०१५ मध्ये रिटायर झालेला आहे. आम्ही फक्त जीएडीकडून हे

तपासून घेत आहोत. त्यांचे असे म्हणणे होते की, ५ वर्षांनंतर डी.ई. सुरु करता येत नाही.

समितीने शंका व्यक्त केली की, जरी सेवानिवृत्त झाले असले तरी, कारवाई करता येत नाही काय, यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, त्यांच्यावर असलेले आरोप हे, सन २०१० मधील आहेत. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यावेळी चौकशी केली होती. त्या चौकशी अहवालाच्या अनुषंगानेच आपल्याला आता कारवाई करावयाची आहे. सेवानिवृत्त झाल्यानंतर ३ वर्षांत कारवाई करता येते. मात्र त्यांना सेवानिवृत्त होऊन ५ वर्षे झालेली आहेत.

यावर समितीने आणखी अशी विचारणा केली की, गैरव्यवहार केला असेल तर ५ वर्षांनंतरही कारवाई करता येते का, यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, त्याबाबत ओपिनियन घेऊन कारवाई करीत आहोत.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या लक्षात आणून दिले की, जेव्हा जिल्हापरिषदेला भेट दिली होती, त्यावेळेस या विषयाबाबत अनेक ग्रामस्थांनी समितीला भेट दिली. हा सन २००९ चा विषय आहे. सीईओंकडून ॲक्शन प्रपोज करण्यात आली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, हा विषय जून, २०१५ मध्ये प्राप्त झालेला आहे. त्यांच्याकडून उशिरा कार्यवाही झालेली आहे. विभाग ते सामान्य प्रशासन विभागाकडून तपासून घेईल. शासन या विषयाबाबत जी काही कारवाई करेल, त्याबाबत समितीला कळवावे. असे निदेश समितीने दिले.

विभागीय सचिवांनी उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती दिली की, योजना सन २००८-२००९ मध्ये हाती घेण्यात आली होती. योजनेत काही अनियमितता निदर्शनास आल्या. त्याबाबत त्या-त्या काळी चौकशा झाल्या. त्यानंतर त्या ठिकाणची गाव पातळीवरची जी पाणी पुरवठा आणि स्वच्छता समिती असते ती दोषी होती. दरम्यानच्या काळात त्याबाबाबत रिट पिटिशन दाखल करण्यात आले होते. माननीय हायकोर्टाचे याबाबत डायरेक्शन्स होते. याबाबत सर्वकष चौकशी करुन जे दोषी अधिकारी आहेत त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईच्या अनुषंगाने प्रास्ताविक केलेले आहे. त्याच्यामध्ये सकृतदर्शनी त्यांच्यामार्फत

ते काम एक्झेक्यूट करण्यात आले होते, त्यांच्या विरुध्द फौजदारी दाखल केलेली आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे ते काम ४४ लाख ६६ हजार रुपयांचे होते. आहे त्या स्थितीत ते पूर्ण करुन दाखवू म्हणजे त्या टप्प्यावर क्लोज करुन नव्याने परत त्याचे टेंडर काढून आता ते काम पूर्ण झालेले आहे. त्या ठिकाणी आता सुरळीतपणे पाणी पुरवठा सुरु झलेला आहे. समितीने याबाबतीत काय कारवाई केली, अशी पुच्छा केल्यावर विभागीय सचिवांनी एक एक्झेक्युटिव्ह इंजिनिअर, एक डेप्युटी इंजिनिअर व एक शाखा अभियंत्याविरुध्द कारवाई प्रपोज केलेली असल्याचे समितीस विदीत केले. त्यावर समितीने त्यांच्या विरुध्द जी ॲक्शन घेतली जाईल त्याचा अहवाल समितीला पाठविण्याचे निदेश दिले. त्यावर विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले. खालचे दोन जे आहेत, त्यांच्याबाबतीत आम्ही १-२ महिन्यात करतो. पहिल्याच्या बाबतीत तर जीएडीचे ओपिनिअन घ्यावे लागेल. या विषयाबाबत कोर्टाचेही डायरेक्शन्स आहेत. असेही विभागीय सचिवांनी स्पष्ट केले.

समितीने आणखी अशी विचारणा केली की. या संदर्भात सदरहू अभियंत्याविरुध्द कारवाई करण्याबाबत न्यायालयाचे आदेश, मंत्री महोदयांचे आदेश, आयुक्त, माहिती आयुक्तांचे आदेश असतानाही खरे तर त्यांच्या विरुध्द आता पर्यंत गुन्हा दाखल झाला पाहिजे होता. त्यांच्या विरुध्द वसुली किंवा इतर कोणती कारवाई आपण करीत आहात त्यांचेवर गुन्हे दाखल केले आहेत काय, त्यावर विभागीय सचिवांनी सदरहू कामाची किंमत ४४ लाख ६६ हजार इतकी होती. आता योजना पूर्ण करण्यासाठी जी रक्कम लागणार आहे ती यापूर्व काळात ज्यांनी काम घेतलेले होते त्यांच्याकडून ती वसूल करण्याची रितसर तरतूदच आहे, त्याप्रमाणे त्याच्यावर कारवाई केली जाईल.

समितीने कार्यकारी अभियंता यांचे नाव विचारले असता त्यांचे नाव श्री. व्ही. एम. तंवर असल्याचे सांगण्यात आले. समितीने पुढे आणखी विचारणा केली की, समिती बारामती मध्ये गेली होती तेव्हाही निदर्शनास आले होते की, श्री. तंवरांच्या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने आदेश दिले होते, त्यावर विभागीय सचिवांनी, त्यांचे नाव घेऊन माननीय उच्च न्यायालयाचे आदेश नव्हते. त्याच्यामध्ये संबंधित जे जे दोषी असतील ते फाईंड आऊट करुन त्यांच्या विरुध्द कारवाई करावी अशाप्रकारचे माननीय उच्च न्यायालयाचे आदेश असल्याचे समितीस विदीत केले.

समितीच्या मते त्या कामाची एमबी रेकॉर्डिंग बोगस केलेली आहे. या कामात श्री. तंवर सर्वस्वी जबाबदार आहेत. आपण आता त्यांच्या विरुध्द काय कारवाई प्रपोज केलेली आहे, यावर सचिवांनी श्री. तंवर जून मध्ये रिटायर झालेले आहेत. रिटायर होण्याच्या त्या टप्प्यावर विभागाचा अहवाल शासनाला पाठविलेला आहे. शासनाने त्यावर कारवाई केलेली आहे. लॉ अँड ज्युडिशिअरीच्या ओपिनिअन नंतर पुढची कारवाई होईल. मात्र ते ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेले असल्याचे ॲक्शन प्रपोज करुन शासनाकडे अहवाल पाठविलेला असल्याचे समितीस विदीत केले.

समितीने श्री. तंवर यांना सेवानिवृत्तीचे वेळी सर्व ना हरकत दाखले का दिले याबाबत त्यांचेवर अद्याप आरोपपत्र का ठेवण्यात आलेले नाही, विचारणा केली असता सदरहू अधिकारी सन २०१५ मध्ये निवृत्त झाल्याचे व प्रकरण सन २०१० मधील असल्याची विभागीय सचिवांकडून समितीस सांगण्यात आले. समितीने त्यावर आक्षेप घेत विभागीय सचिवांना जाणीव करुन दिली की, आपण समितीपुढे जो खुलासा करीत आहात तो अतिशय जबाबदारीने करावा. तत्कालीन पाणीपुरवठा मंत्रीनी आदेश दिले. त्यावरही विभागाने कार्यवाही केली नाही. समोरचे ग्रामस्थ न्यायालयात गेले आणि न्यायालयाने आदेश दिल्यानंतरही विभागाने कार्यवाही केली नाही. त्यावर विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले की, शिस्तभंगाची कारवाई करणे हा देखील कारवाईचा एक भाग आहे.

समितीने विचारणा केली की, समितीसमोर पुरावे आहेत. विभागाकडे त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली असे सांगण्यात आले. आतापर्यंत न्यायालयाचे, माहिती आयुक्तांचे आणि मंत्री महोदयांचे कारवाईचे आदेश असताना आपण त्यांच्यावर रिकव्हरची अमाऊंन्ट फिक्स केली पाहिजे होती. त्यासाठी आपण पाच वर्षे वाट का पाहिली, न्यायालयाचे आदेश होते, माहिती आयुक्तांचे आदेश होते, मंत्री महोदयांचे आदेश होते असे असताना आपण २०१० मध्ये कारवाई करावयास पाहिजे होती. आता सन २०१५ सुरु आहे.आपण अधिकाऱ्यांना पाच-पाच वर्षे पाठिशी घालत असाल तर कसे होणार, यावर विभागीय सचिवांना मधल्या काळामध्ये रिट पिटीशन झाले. प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्यामुळे न्यायालयाच्या निर्देशानुसार कारवाई करता येत नाही, न्यायालयाचा अंतिम निर्णय झाल्यानंतर आम्ही कारवाई केलेली असल्याचे समितीस विदीत केले.

समितीने आणखी विचारणा केली की, संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई केली. विभागाने रिकव्हरी करण्याच्या दृष्टीने कोणती कारवाई केली, त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ठेकेदाराने काम व्यवस्थित न केल्यामुळे त्यांच्याकडून रिकव्हरी करण्यात येणार आहे. कोणत्याही प्रकारची कार्यवाही न केल्यामुळे सदर योजनेतील कामाच्या विलंबाबाबत व गैरव्यवहाराबाबत तक्रारदार श्री. सतीश रामभाऊ शिंदे, सांगली-पुणे यांनी जनहित याचिका क्रमांक १६७/२०१२ दाखल केली होती. त्यानुसार मा.उच्च न्यायालयाने दिनांक १०.२.२०१५ रोजी दिलेल्या अंतिम निर्णयानुसार सदरचे काम निकाल लागल्याच्या दिनांकापासून आठ महिन्यात प्राधान्याने पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच सदर योजनेचे काम गैरपद्धतीने करणारे उप अभियंता यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमानुसार व शाखा अभियंता यांच्यावर महाराष्ट्र जिल्हापरिषद सेवा, (शिस्त व अपील) नियम, १९६४ नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विनाविलंब सादर करण्यात यावा. न्यायालयाने कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे. आता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या स्तरावर किंवा पाणी पुरवठा विभागाच्या स्तरावर ही कार्यवाही अंतिम टप्प्यात होईल. या ठिकाणी न्यायालयाचा देखील निर्णय आहे आणि समितीच्या देखील डायरेक्शन्स आहेत. तेव्हा या प्रकरणी कारवाई होणे अपेक्षितच आहे.

समितीने त्या अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई का केली नाही, श्री.शिंदे यांनी ५२-५३ पत्रे दिली. त्यांनी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविली. त्यानंतर ते नागरीमंचाकडे गेले, त्यांनी असे असतानासुद्धा आपण संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल केले नाहीत, वसुलीसाठी कारवाई केली नाही, आता न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी समितीस खुलासा केला की, सन २०१२ मध्ये रिट पिटीशन दाखल झाले. प्रकरण न्याय प्रविष्ट असल्यामुळे मध्यंतरी चौकशीचे काम थांबले असावे. या संदर्भात फेब्रुवारी, २०१५ मध्ये निर्णय झाला. न्यायालयाच्या निर्देशानुसार आवश्यक ती कारवाई केलेली आहे.

समितीच्या मते सन २००७ ची वर्क ऑर्डर आहे. हे काम २००८ मध्ये पूर्ण होणे आवश्यक होते. सन २००९ मध्ये आपल्या लक्षात आले की, या योजनेमध्ये ४४ लाखांच्या

रुपयांचा अपहार झालेला आहे. सन २००७ च्या प्रकरणासंदर्भात आपण सन २०१० पर्यंत काही कार्यवाही केली नाही. या प्रकरणामध्ये अधिकाऱ्यांनी संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई केली त्याबद्दल समितीने अभिनंदन केले. सन २००७-०८ च्या प्रकरणाबाबत न्यायालयाच्या निर्णयाची २०१५ पर्यंत वाट पाहिली हे शासनाचे आणि प्रशासनाचे खूप मोठे अपयश आहे. या प्रकरणी वेळीच लक्ष देणे आवश्यक होते. अशाप्रकारच्या अनेक पाणीपुरवठा योजना आहेत. श्री. तंवर नावाचा अधिकारी याने पुणे जिल्ह्यातील योजनांमध्ये करोडो रुपयांचा अपहार केलेला आहे. तो प्रशासनाला जुमानत नाही. प्रशासनाला विकत घेतल्याच्या अविर्भावात तो वागतो. या प्रकरणाच्या बाबतीत मंत्री महोदयांनी वेळोवेळी सूचना केलेल्या आहेत. न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई केली. परंतु इतके वर्षे त्यांनी पैसा वापरला, तो ठेकेदाराकडून वसूल करणार का, परंतु असे करण्याची ठेकेदाराची हिम्मत कशी झाली, संबंधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली, या समितीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या कामाची किंमत ४४ लाख ६६ हजार इतकी होती. परंतु प्रत्यक्षात १७ लाख ७८ हजार इतका खर्च झालेला आहे आणि तो ठेकेदाराला अदा करण्यात आलेला आहे. म्हणजे योजनेचा पूर्ण पैसा त्यांच्याकडे अडकून पडला अशी स्थिती नाही.

समितीने असे प्रतिपादन केले की, जर न्यायालयीन विषय असेल आणि एखादी चुकीची गोष्ट घडलेली आहे असे आपल्या लक्षात आले तर आपले हात तर बांधलेले नसतात. न्यायालयाचे काही आदेश असतील तर आपण समजू शकतो. पण न्यायप्रविष्ट विषय आणि न्यायालयीन आदेश यामध्ये बराच फरक पडतो. पाच वर्षामध्ये न्यायालयाने कोणत्याही प्रकारची ॲक्शन घेऊ नये असे काही आदेश होते काय, यावर प्रकरण न्यायप्रविष्ट होते याशिवाय विभागीय सचिवांनी उत्तर देवू शकले नाहीत.

समितीने पुढे असे प्रतिपादन केले की, ॲक्शन म्हणजे काय तर ठेकेदाराला काळ्या यादीत टाकणे. अधिकाऱ्यांकडून काम पूर्ण होण्यास विलंब झाला असेल तर त्या संदर्भात कारवाई करणे अपेक्षित होते. पाच वर्षे प्रकरण न्यायप्रविष्ट होते असे कारण सांगणे उचित नाही. प्रकरण न्यायप्रविष्ट आणि न्यायालयीन आदेश यामध्ये फरक आहे. समितीला साक्षीमध्ये बऱ्याचवेळा सांगण्यात येते की, प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अशी

अनेक प्रकरणे न्यायप्रविष्ट असतात. जर एखाद्या प्रकरणात न्यायालयीन आदेश असतो त्याचा आपण सन्मान करुन पुढे जातो. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, पाणी पुरवठा योजनाची अंमलबजावणी करण्यासाठी तीन प्रकारच्या यंत्रणा आहेत. पहिली ग्राम समिती, दुसरी जिल्हापरिषद आणि तिसरी एमजेपी. ५० लाख रुपयापर्यंत खर्च करण्याचे अधिकार ग्राम समितीला दिलेले आहेत. त्या समितीचा अध्यक्ष असतो आणि त्याच्या नावावर खाते उघडण्यात येते. हे काम समितीमार्फत करण्यात आले. तेव्हा रिपोर्टवरुन असे दिसते की, सर्वप्रथम त्या समितीचे अध्यक्ष आणि सरपंचाला दोषी धरण्यात आले, त्यांच्यावर फौजदार खटला भरण्यात आला आणि त्यांना पदावरुन कमी करण्यात आले आहे. या ठिकाणी सुपरव्हीजनचा प्रश्न आहे. त्या ठिकाणी सुपरव्हीजन करणारे शाखा अभियंता आणि उप अभियंता होते. जे एमबी रेकॉर्डींग तपासतात. या सर्वांवर सुपरव्हीजन कार्यकारी अभियंत्याचे असते. आधी सांगितल्याप्रमाणे ते जरी सेवानिवृत्त झाले असले तरी या ठिकाणी समितीने जे मुद्दे उपस्थित केले ते लक्षात घेऊन चार्जेस फ्रेम करुन निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. आम्ही राहिलेले काम सुरु करीत आहोत. ते काम ठेकेदाराच्या कॉस्टवर आणि रिस्कवर सुरु आहे. आता पाणी पुरवठा सुरळीत झालेला आहे. त्याचे कलरिंग राहिलेले आहे ते आठवडाभरात पूर्ण होईल. काम पूर्ण झाल्यावर ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची नोटीस देऊन त्याच्यावर कारवाई करण्यात येईल.

समितीने आणखी विचारणा केली की, ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्यात येईल असे आपण सांगितले. ती कारवाई योग्य आहे. परंतु समितीच्या मते फक्त ठेकेदाराला शिक्षा करुन चालणार नाही. श्री.तंवर नावाच्या कार्यकारी अभियंत्याने करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. ही जी भ्रष्टाचार करण्याची प्रवृत्ती आहे त्या प्रवृत्तीवर आपण कोणती कारवाई करणार आहात, आपण ठेकेदाराला वेळेवर ब्लॅकलिस्ट केले असते तर ज्या बाकीच्या योजना रखडल्या त्या रखडल्या नसत्या. ज्या अधिकाऱ्यामुळे हा विलंब झालेला आहे त्याच्यावर कोणती कारवाई करणार आहात, यावर समितीला उत्तर प्राप्त झाले नाही शेवटी समितीने असे निदेश दिले की, या प्रकरणामध्ये जबाबदारी निश्चित करण्यात आलेली आहे. या प्रकरणामध्ये अनियमितता झालेली आहे हे कोर्टाच्या

आदेशाने आणि तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केल्यानंतर समोर आले आहे. ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्यात येईल हे ठीक आहे. पण त्याचबरोबर ज्या अधिकाऱ्याच्या हलगर्जीपणामुळे हा विषय झालेला आहे त्याच्यावर देखील जबाबदारी निश्चित करण्यात यावी. तेव्हा संबंधितांवर कारवाई निश्चित करुन त्याचा अहवाल समितीला सादर करावा.

**अभिप्राय व शिफारशी**

मौजे ढाकाळे, ता.बारामती. जि.पुणे या गावातील पाणीपुरवठा योजनेचे काम ६४ लाख ६६ हजार असून सदर कामावर १७ लाख ७८ हजार रुपयांचा खर्च होऊनही काम अपूर्ण आहे. या प्रकरणी कामात अनियमितता व गैरप्रकार झालेला आहे. ही पाणीपुरवठ्याची योजना असून लोकांपर्यंत सदर योजना पोहचलेली नाही व त्याची फलनिष्पती झालेली नाही. या योजनेत गैरप्रकार निर्दशनास आणुनही आपण प्रकर्षाने संबंधितांवर काहीही कारवाई केलेली नसल्यामुळे समितीने या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्यात यावी व जे अधिकारी व कर्मचारी या प्रकरणी जबाबदार असतील त्यांचेवर नियमानुसार कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल समितीस पाठविण्याबाबत निर्देश दिले आहेत.

उक्त निदेशानुसार सदर योजनेच्या बाबतीत ग्रामीण पाणीपुरवठा चौकशी अहवाल निर्दशनास आले असल्याने जिल्हाधिकारी यांनी सदर समितीवरील सरपंच तथा अध्यक्ष यांना काढून टाकले असून उप अभियंता श्री.पवार व शाखा अभियंता श्री.भांडवलकर हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील अधिकारी असल्याने त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९८० नुसार निलंबनाची कारवाई करण्यासाठी मा. मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना दिनांक २९/१०/२०१५ रोजी सामान्य प्रशासन विभागामार्फत सादर केलेले आहे. तसेच शाखा अभियंता श्री.बोराटे यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ नुसार निलंबनाच्या कार्यवाहीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर) यांचेमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करण्यात आला आहे. चौकशीमध्ये आणखी असे निष्कर्ष काढण्यात आले आहे की, दिनांक ०१/०५/२००७ रोजीच्या ग्राम सभेमध्ये ग्रामस्थांनी दुबार स्वाक्षऱ्या केल्याचे निर्दशनास येणे, नळ पाणी पुरवठा योजनेसाठी गठित केलेल्या

समित्या शासनाच्या सूचनेप्रमाणे न होणे, पाईप टाकण्याचे खोदाई खडक कडक असल्याने व भौगोलिक परिस्थितीनुसार योग्य असेल ते करुन घेणे गरजेचे असणे, इत्यादी त्रुटी आढळून आलेल्या आहेत. याप्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष घेऊन उक्त साक्षीत संपूर्ण कामांची चौकशी करण्यात येऊन एका प्रकरणी एका सेवानिवृत्त अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली नसल्याने समितीने याबाबत कार्यवाही करण्याचे निदेश दिले असता विभागीय सचिवांनी यासंदर्भात विधी व न्याय विभागाकडून अभिमत घेऊन याप्रकरणी एका सेवानिवृत्त अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले. सद्यस्थितीत हे काम पूर्ण झाले असून या योजनेतून उक्त गावाच्या ठिकाणी आता सुरळीतपणे पाणीपुरवठा सुरु असल्याचे समितीस सांगण्यात आले. सदर योजनेच्या कामाची किंमत ४४ लाख ६६ हजार इतकी होती. आता योजना पूर्ण करण्यासाठी जी रक्कम लागणार आहे ती यापूर्व काळात ज्यांनी हे काम घेतलेले होते त्याच्यांकडून ती वसूल करण्याची रितसर तरतुद नियमात असल्यामुळे त्या तरतुदीप्रमाणे त्यांच्यावर कारवाई केली जाईल असे समितीस आश्वासित केले. मा.उच्च न्यायालयात देखिल याप्रकरणी जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्याचे निदेश दिले होते.

**उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता याप्रकरणी समितीने सर्व अधिकाऱ्यांविरुध्द जी कार्यवाही प्रस्तावित केली आहे. त्याची चौकशी येत्या तीन महिन्यात पूर्ण करावी तसेच सेवानिवृत्त अधिकाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो किंवा कसे याबाबत अभिमत विधि व न्याय विभागामार्फत घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे योजनेत शासनाच्या झालेल्या नुकसानीबाबत सर्व संबंधित जबाबदार दोषींकडून सदर रक्कम वसुल करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस देण्यात यावी, त्याचप्रमाणे तीन महिन्यात समितीस कळवावी. जो कंत्राटदार दोषी आहे त्याला काळ्या यादीत टाकावे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीकडे तीन महिन्यात सादर करण्यात यावी.**

प्रकरण चौदा

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### पंचायत समिती क्षेत्रांतर्गत त्रिशंकु भागातील घरकुलाच्या भागातील गैरव्यवहाराबाबत.

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत, पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली .भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन बाबत दिनांक १२ ऑगस्ट,२०१५ रोजी पुणे जिल्हयातील बारामती पंचायती समितीला भेट देऊन गट विकास अधिकारी यांची साक्ष घेतली, साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, श्री. पोपट विठोबा धवडे यानीं पुणे जिल्हा कार्यक्षेत्रामध्ये बारामती तालुक्याच्या ठिकाणी फार पुर्वीपासून त्रिशंकू भाग असून, त्या भागात बोगस ग्रामपंचायत दाखवून शासनाची फसवणूक केल्याबाबतचे निवेदन समितीला दिलेले आहे. त्यांचे म्हणणे आहे की, खोटे रेकॉर्ड तयार करुन घरकुलांचे वाटप करण्यात आले आहे. ज्या ठिकाणी सरपंच नाही त्या त्रिशंकू भागात बारामती पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी ग्रामसेवकाची खास नेमणूक करुन २२८ घरकुलांचे प्रस्ताव मंजूर केले आणि १३६ घरकुले दिल्याचे दाखविले. परंतु त्या ग्रामपंचायतीने एकाही घरकुल लाभार्थ्याला आजतागायत ताबेपावती दिलेली नाही. ग्रामसेवकांनी त्यातील ७५ घरकुले जागेअभावी परत असे नमूद करुन, रु.२६,८०,१६१/- रुपयांचा निधी दि.१२/८/२०१० रोजी लाभार्थ्यांचे जाबजबाब न घेता पंचायत समितीकडे वर्ग केले. यासाठी वरिष्ठांचे आदेश नाहीत. तसेच त्रिशंकू भागात ग्रामपंचायत असल्याचे भासवून २००२ साली खंडोबानगर येथे दलितवस्ती दाखवून २० हजार रुपये खर्च काढून घेतल्यानंतर याच त्रिशंकू भागातील ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात सन २००७-०८ मध्ये २२ दलित वस्तीचा आराखडा दाखवून ५५ लाख रुपये जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकारी यांच्याकडून रस्त्यासाठी निधी मागविला. सदरहू निवेदनाची प्रत समितीने गट विकास अधिकाऱ्यांकडे देवुन असे निदेश दिले की, त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन, समितीला अहवाल पाठवावा.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडून खालीलमुद्यांची माहिती मागविली.**

बारामती तालुक्यात त्रिशंकू भाग असून तेथे ग्रामपंचायत आहे असे भासवून घरकुलांच्या कामात गैरव्यवहार झाला असल्याचे निवेदन समितीकडे प्राप्त झाले असता समितीने सदरहू निवेदन गट विकास अधिकारी यांचेकडे सूपूर्द करुन संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन त्याचा अहवाल समितीकडे पाठविण्याचे निदेश दिलेले आहेत, त्यानुसार चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्तमुद्यांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायती राज समितीने त्यांना प्राप्त झालेले निवेदन गट विकास अधिकारी पंचायत समिती बारामती यांना सुपुर्द केलेनुसार त्याबाबतचा गट विकास अधिकारी पंचायत समिती बारामती यांचा चौकशी अहवाल खालील प्रमाणे आहे.

बारामती तालुक्यात ग्रामपंचायत हद्द सोडुन बारामती शहरा लगतचा भाग हा नॉनम्युनिसिपल एरिया म्हणुन संबोधला जातो. शासन परिपत्रक क्र.संकीर्ण/१०९६/ प्र.क्र.२९०/२२दिनांक-३० डिसेंबर १९९६च्या परिपत्रकान्वये शासनाने ज्या गावाचा समावेश नगरपालिका व ग्रामपंचायत मध्ये झालेला नाही. अशा गावांना वाडया, पांडे,तांडे, यांना मुलभूत सुविधा पासुन वंचित ठेवु नये असे कळविले आहे. त्याप्रमाणे जिल्हा परिषद, पंचायत समिती मार्फत बारामती ग्रामीण या भागातील रहिवाश्यांना मुलभूत सुविधा पुरविण्यात येतात हा भाग त्रिशंकु स्वरूपाचा असला तरी तेथील लोक मळद-माळेगाव बु. या जिल्हा परिषद गटाचे मतदार आहेत. सदर भागातील लाभार्थीना मुलभुत सुविधा पासुन वंचित न ठेवता त्यांना आवश्यक त्या सुविधा पुरविणेकामी शासनाच्या विविध योजनांच्या नियमानुसार पात्र लाभार्थीना लाभ देण्यात आलेला असलेचे चौकशी अहवालावरून दिसुन येते.

इकडील पत्र जा.क्र./जिग्रावियं/इंआयो/१५७९/१२ दि..०४/१२/२०१२अन्वये अर्जदार यांचे सर्व मुद्देनिहाय चौकशीकामी तालुक्यातील, तालुकाबाह्य विस्तार अधिकारी, गट

विकास अधिकारी, पंचायत समिती बारामती, उपअभियंता, बांधकाम जिग्राविंय, पुणे, निवासी नायब तहसिलदार, बारामती, तहसिलदार बारामती उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जि.पुणे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीणविकास यंत्रणा, पुणे, समाज कल्याण अधिकारी, पुणे यांनी या पुर्वी सविस्तर मुद्देनिहाय चौकशीकरून अहवाल सहाय्यक प्रबंधक, महाराष्ट्र लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय मुंबई यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

त्यानुसार केलेल्या चौकशी कार्यवाही बाबातपुराव्या निशी विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे (आस्थापना शाखा) यांना अहवाल सादर केले प्रमाणे मा.उपायुक्त (आस्थापना) पुणे विभाग, पुणे यांचे दालनात अनेक सुनावण्या घेवुन उपलब्ध कागद पत्रासह वरील चौकशी समितीने दिलेले मुद्देनिहाय निष्कर्ष अहवालास अनुसरून अर्जानुसार मा.उपायुक्त (आस्थापना), पुणे यांनी उपलोक आयुक्त महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय भवन यांना क्र.विकास/ ग्रामपंचायत/कावि/५६२/१४पुणे दिनांक१९/११/२०१४नुसार सन १९९७-९८ ची दारिद्र्यरेषा खालील सर्व्हेक्षण शासनाच्या दिनांक-०९/०९/१९९७ रोजीच्या पत्रानुसार त्रिशंकु ग्रामीण भागातील सर्व्हेक्षण करण्याच्या सुचनेप्रमाणे प्रगणकांचे जबाब व उपलब्ध घर यादीनुसार सर्व्हेक्षण झालेचे नमुद केले आहे. यावरुन अर्जदाराचे म्हणणे सिध्द होत नाही. असा निष्कर्ष काढला आहे. तसेच पाटबंधारेविभागाने दलेल्या अहवालानुसार घरकुले ही पाटबंधारे विभागाचे हद्दीत बांधली नाहीत असा ही निष्कर्षात नमुद केलेले आहे.त्यांनतर लोक आयुक्त व उपलोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाकडील सहाय्यक प्रबंधक यांचेकडील दि..१०/१२/१४चेअहवालानुसार मा.विभागीय आयुक्त,पुणे यांनी अहवालामध्ये स्वाक्षरी नसले बाबतच्या त्रुटी राहु नयेत याची दक्षता घेणे बाबत निर्देश दिलेले आहेत.

तसेच इंदिरा आवास योजनेमधील अनियमिततेबाबत दि.१६/०५/२०११रोजीच्या मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.पुणे यांचे आदेशान्वये श्री.शहानुर शेख ग्रामसेवक यांना जि.प.सेवेतुन निलंबीत करण्यात आले होते व संबधित ग्रामसेवक यांची खाते निहाय चौकशी करण्यात आली होती. तथापि त्यामध्ये श्री.शहानुर शेख ग्रामसेवक हे दि. ३०-११-२०१२चे मा.सहा.आयुक्त (चौकशी) विभागीय खातेनिहाय चौकशी परिषद

पुणे विभाग, पुणे यांचे आदेशानुसार आरोप सिध्द होत नाही असे निष्कर्षात नमुद केलेले आहे. सदर अहवालानुसार अर्जात तथ्य नसलेचे निदर्शनास येत आहे.

**उपरोक्त मुद्याबाबत समितीस साक्षीचे वेळी ग्रामविकास विभागाकडून खालील मुद्यांची माहिती प्राप्त झाली.**

ग्रामविकास विभागाचे अभिप्राय-मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे यांचे स्तरावरील कार्यवाही प्रधानसचिव, ग्रामविकास यांच्या दि.२३ ऑक्टोबर २०१५ रोजीच्या अर्धशासकीय पत्राद्वारे समितीने निर्देशित केलेल्या विहित कालमर्यादेत चौकशी करून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबतच्या सूचना देणेत आलेल्या आहेत.

**चौकशी अहवाल**

समितीच्या निदेशानुसार जिल्हा परिषदेकडून चौकशी अहवाल प्राप्त झाला. श्री. धवडे यांना.गविअ बारामती यांनी दि. २९-१०-१५ रोजी जा.क्र.वशि/५०४/१५ चे पत्रानुसार दि. २.११.१५ रोजी दुपारी १.०० वाजता पं. स.बारामती कार्यालयात चौकशी कामी व म्हणणे मांडणेस बोलावले होते.परंतु संबधितांनी समक्षपत्र घेण्यास नकार दिला त्यामुळे त्यांना पोस्टाने त्याच दिवशी पत्र पाठवुन दिले. परंतु अद्यापी त्याचा अहवाल तक्रारदाराने दिला नाही. त्यानंतर त्याठिकाणचे त्यावेळेचे कार्यरत ग्रामसेवक श्री. शहानुर शेख व श्री. के.एन. कारंडे यांनी त्यांचे जबाब सादर केले आहेत. त्यामध्ये तक्रारदाराचे आरोपात तथ्य नसल्याचे ग्रामसेवक यांनी नमुद केलेले आहे. त्यामुळे या तक्रारी बाबत पाठीमागील सर्वअहवाल पाहता व आज रोजीचे ग्रामसेवक जबाब या वरून संबधिताच्या तक्रारीमध्ये कोणतेही तथ्य दिसुन येत नाही.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली उक्त साक्षीच्या वेळी विचारणा केली की, पंचायत समिती बारामती तालुक्यात त्रिशंकु भाग असून तेथे ग्रामपंचायत आहे असे भासवून घरकुलांच्या कामात गैरव्यवहार झाला असल्याचे निवेदन समितीकडे

प्राप्त झाले आहे. जिल्हा परिषदेने या निवेदनानुसार कारवाई केली आहे आणि त्याबाबतची माहिती पृष्ठ क्रमांक ५५,५६,५७,५८ वर नमूद केलेली आहे.

पुणे जिल्हयात बारामती पंचायत समिती कार्यक्षेत्रात ग्रामपंचायत कायद्याची अंमलबजावणी न करता त्रिशंकु भाग असलेल्या ठिकाणी बोगस व बनावट ग्रामपंचायत तयार करुन करोडो रुपयांचा अधिका-यांनी घोटाळा केला. पंचायत राज समितीकडे दिनांक १२-८-२०१५ रोजी लेखी तक्रार केली पंचायत राज समितीने इतिवृत्तामध्ये विषय घेतला जिल्हापरिषद अधिकारी यांनी बोगस कागदपत्रे तयार करण्याची घाई केली बोगस कागदपत्रे तयार करणारे अधिकारी यांच्यावरही कारवाई करावी. त्रिशंकू भागात ग्रामपंचायतीची स्थापना झालेली नाही म्हणजे ग्रामपंचायत कायद्याची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे या त्रिशंकू भागात कोणताही संबंध आलेला नाही. बारामती ग्रामीण असे बोगस व बनावट नाव ग्रामपंचायतीला देऊन अनधिकृतपणे जनतेची व शासनाची मोठी फसवणूक केली आहे. त्रिशंकू भागात ग्रामसेवकाची नेमणूक केली ग्रामपंचायत अस्तित्वात नसतांना लेटरहेड तयार केले. घरकुले व दलित वस्तींसंदर्भातही यात उल्लेख केलेला आहे. लोक आयुक्त यांच्यापर्यंत या प्रकरणाची तक्रार गेलेली आहे. याबाबत प्रतिज्ञा पत्र सादर केलेले आहे. यामधील आरोपांची सत्यता पडताळणे आवश्यक आहे. दलित वस्ती सुधार योजना, विशेष घटक योजना, घरकुलांच्या प्रस्तावासंबंधी विचार करणे आदि बाबींचा समावेश असलेले निवेदन समितीच्या निदेशानुसार प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांच्याकडे सुपूर्द करीत आहे. माननीय प्रधान सचिव यांनी यावर योग्य तो निर्णय घेऊन कारवाई करावी. त्यावरील अहवाल समितीला सादर करण्यात यावा. असे निदेश समितीने दिले.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, अशा प्रकारच्या तक्रारी समितीपुढे येत असतील तर स्थानिक यंत्रणा काय करते, स्थानिक पातळीवर हा विषय हाताळला असता तर समितीपुढे हा प्रश्न उपस्थित झाला नसता, बारामती तालुक्यामध्ये जी ग्रामपंचायत अस्तित्वात नाही त्या ग्रामपंचायतीच्या नावाने खर्च करण्यात आला आहे. त्या संबंधीची तक्रार आणि त्याच्या अहवालाबाबत उच्च स्तरावर चौकशी करावी असे निदेश समितीने दिले. आतापर्यंत केलेल्या तक्रारीबाबत काय कारवाई केली याची

माहिती प्राप्त करुन घेऊ. समितीच्या मते बीडीओ यांनी दिलेला अहवाल सुध्दा संदिग्ध आहे. म्हणून विभागाच्या प्रधान सचिवांकडे तक्रार सादर केली आहे. त्या तक्रारीमध्ये अर्जदाराने कोणकोणते मुद्दे लिहिलेले आहेत त्याच्या कार्यवाहीसह अहवाल समितीला देण्यात यावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, त्रिशंकू विभागाचे प्रशासन कसे चालते हा एक महत्वाचा मुद्दा होता. या संदर्भात ग्रामविकास विभागाचे दिनांक ३०.१२.१९९६ चे परिपत्रक आहे. ज्या जिल्हा परिषदेच्या मतदार संघातील एखादा भाग विनिर्दिष्ट ग्रामपंचायतीमध्ये नसेल तर त्या त्रिशंकू भागाला मुलभूत सुविधा देणे हे तेथील जिल्हा परिषदेचे कर्तव्य आहे. त्यानुसार त्या भागातील ग्रामसेवकांकडून त्याचे मॅनेजमेंट केले जाते अशी सध्याची परिस्थिती आहे.

यावर समितीने त्रिशंकू याचा अर्थ काय आहे, अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, एखादे गाव नगरपरिषदेला लागून असते, त्या गावाचा समावेश तेथील नगरपरिषदेमध्ये होतो. नगरपरिषदेमध्ये समावेश होताना गट नंबरचा उल्लेख केला जातो. एखाद्या गावाची सीमा अशी असते की, एका बाजूला गाव आहे आणि दुसऱ्या बाजूला गावाची सीमा अशी स्थिती असते. एका बाजूचा भाग ॲड होतो आणि दुसऱ्या बाजूचा भाग ॲड होत नाही. अशी परिस्थिती बारामती तालुक्यात निदर्शनास आली.

समितीने आणखी विचारणा केली की, ही परिस्थिती किती वर्ष सुरु ठेवायची, तेथील विकासाची कामे कोणी करायची? त्यांना न्याय देण्याची जबाबदारी पुणे जिल्हा परिषदेची आहे. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, २०१३ मध्ये त्रिशंकू भाग नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये घेतलेला आहे. हा कारभार लेखापरीक्षणाच्या अगोदरचा होता. त्या ठिकाणी घरकूल योजना, पिण्याच्या पाण्याच्या योजना, इंदिरा आवास योजना पुरविण्यात आलेल्या आहेत. त्याबाबत काही तक्रारी उद्‌भवलेल्या आहेत. त्या तक्रारी प्रधान सचिवांकडे सोपविलेल्या आहेत. अहवाल स्वरुपाची त्याची माहिती समितीला तीन महिन्यात दिली जाईल.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीमध्ये पुणे, जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन बाबत दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्ह्यातील बारामती पंचायती समितीला भेट देऊन, गट विकास अधिकारी यांची साक्ष घेतली, साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, श्री.पोपट विठोबा धवडे यानी पुणे जिल्हा कार्यक्षेत्रामध्ये बारामती तालुक्याच्या ठिकाणी फार पूर्वीपासून त्रिशंकू भाग असून, त्या भागात बोगस ग्रामपंचायत दाखवून शासनाची फसवणूक केल्याबाबतचे निवेदन समितीला दिलेले, सदरहू निवेदनाची प्रत समितीने गट विकास अधिकाऱ्यांकडे देवून असे निदेश दिले की, त्यांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन, समितीला अहवाल पाठवावा. समितीच्या निदेशानुसार विभागीय सचिवांच्या साक्षीकरीता समितीने ग्रामविकास विभागाकडून बारामती तालुक्यात त्रिशंकू भाग असून तेथे ग्रामपंचायत आहे. असे भासवून घरकुलांच्या कामात गैरव्यवहार झाला असल्याचे निवेदन समितीकडे प्राप्त झाले असता, समितीने सदरहू निवेदन गट विकास अधिकारी यांचेकडे सूपूर्द करुन संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन त्याचा अहवाल समितीकडे पाठविण्याचे निदेश दिलेले आहेत, त्यानुसार चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले, याबाबत माहिती मागविली. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-१०९६- प्र.क्र.२९० २२ दिनांक ३० डिसेंबर, १९९६ च्या परिपत्रकान्वये शासनाने ज्या गावाचा समावेश नगरपालिका व ग्रामपंचायत मध्ये झालेला नाही. अशा गावांना वाडया, पांडे, तांडे, यांना मूलभूत सुविधा पासून वंचित ठेवू नये असे कळविले आहे. त्याप्रमाणे जिल्हा परिषद, पंचायत समिती मार्फत बारामती ग्रामीण याभागातील रहिवाश्यांना मूलभुत सुविधा पुरविण्यात येतात हा भाग त्रिशंकू स्वरूपाचा असला तरी तेथील लोक मळद-माळेगाव बु. या जिल्हा परिषदगटाचे मतदार आहेत, अशी माहिती समितीला देण्यात आली. प्रस्तूत प्रकरणाची चौकशी केली असता तक्रार अर्जात तथ्य नसल्याचे निदर्शनास आल्याचेही समितीस कळविण्यात आली.

विभागीय सचिवांच्या साक्षी दरम्यान राज्यातील त्रिशंकू भागाबाबत एखादे गाव नगर परिषदेला लागून असते, त्या गावाचा समावेश तेथील नगरपरिषदेमध्ये होतो. नगर परिषदेमध्ये समावेश होताना गट नंबरचा उल्लेख केला जातो. एखाद्या गावाची सीमा अशी असते की, एका बाजुला गाव आहे आणि दुसऱ्या बाजुला गावाची सीमा अशी स्थिती असते. एका बाजूच्या भागाचा समावेश होतो आणि दुसऱ्या बाजुच्या भागाचा समावेश होत नाही. **अशी परिस्थिती असल्याचे समितीच्या निदर्शनास आले, तेथील नागरीकांच्या समस्या, विविध कल्याणकारी योजना संदर्भात अशा भागाचा लगतच्या ग्रामपंचायती, नगरपंचायती मध्ये समावेश करणे आवश्यक आहे.**

समितीने श्री. पोपट विठाबा धवडे, यांच्याकडून प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करुन त्या निवेदनात नमूद केलेल्या कामांबाबत व नमूद योजनांबाबत चौकशी करुन त्या चौकशीच्या अनुषंगाने कार्यवाही अहवाल पाठविण्याचे निदेश दिले होते. त्यानुसार जिल्हा परिषदेने केवळ यशवंत निवारा योजना यांची मंजूर लाभार्थी यादी सन २०११-१२ या बाबतची माहिती समितीला पाठविलेली आहे. श्री. पोपट विठोबा धवडे यांनी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने कोणतीही चौकशी केलेली नसून त्याबाबत काहीही माहिती समितीला पाठविलेली नसल्यामुळे समिती याबाबत जिल्हा परिषदेचा तीव्र शब्दात खेद व्यक्त करते आणि जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांना याबाबत समितीची दिशाभूल करणे, कर्तव्यात कसूर करणे इत्यादीबाबत ठपका ठेवते. श्री. पोपट विठोबा धवडे यांनी समितीकडे सादर केलेल्या दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये त्यात त्यांनी श्री. बी. एल. साळवे, विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती बारामती, जि. पुणे यांना दिनांक १-९-२०१२ रोजी सादर केलेल्या अहवालाची प्रत जोडलेली आहे. सदरची झेरॉक्स प्रत श्री.धवडे यांनी माहिती अधिकारांतर्गत प्राप्त केली असल्याचे दिसून येते.

या प्रकरणी उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री. धवड यांनी विस्तार अधिकारी (पंचायत), बारामती, जि.पुणे यांनी गट विकास अधिकारी यांना सादर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत समितीला सादर न करता नुसत्या मंजूर घरकुलाची यादी समितीला पाठविलेली आहे. जिल्हा परिषदेने चौकशी अहवालाची प्रत समितीला पाठविणे बंधनकारक असून देखील त्यांनी या प्रकरणात अर्जदाराचा जबाब, संबंधित कामाची माहिती याबाबत कुठल्याही प्रकारची चौकशी केलेली दिसून येत नाही. शिवाय समितीसमोर सत्य येऊ नये याचीच तजवीज केलेली दिसून येते कारण श्री.धवडे यांनी विस्तार अधिकारी पंचायत यांचा चौकशी अहवाल जर सादर केला नसता तर समितीला सत्यापर्यंत

पोहोंचता आले नसते. ही समितीची अत्यंत दिशाभूल असून समितीची अवमानना आहे असे समितीला ठामपणे वाटते. कारण विस्तार अधिकारी (पंचायत), श्री.बी.एल.साळवे यांच्या अहवालात ११ दलीत वस्त्यांच्या कामांची नावे नमूद केली असून त्यात समर्थ नगर, हनुमान नगर, भीमरत्न नगर, लक्ष्मी नारायण नगर, खंडोबा नगर, शिवाजी नगर, सावंतवाडी, देशमुख वस्ती, माळेगांव कॉलनी, लक्ष्मी नगर, हनुमान नगर इत्यादी ११ कामांचा उल्लेख केला असून त्या-त्या कामांसमोर मंजूर रकमेचा देखील उल्लेख केलेला आहे. या संपूर्ण ११ कामांच्या चौकशीचा अहवाल विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी करुन या अकराही कामांमध्ये ज्या लोकांनी स्वाक्षऱ्या केलेल्या आहेत त्या लोकांचेदेखील जबाब नोंदविले असून सदर साक्षीदार लोकांनी त्यांच्या सदरच्या स्वाक्षऱ्या या बनावट असल्याचे व त्यांनी सदरच्या स्वाक्षऱ्या स्वतः केलेल्या नसल्याचे चौकशी अधिकाऱ्यासमोर साक्ष दिलेली आहे. या चौकशी अधिकाऱ्यांनी यातील १ ते ११ कामे ही मंजूर असून त्यापैकी १ ते ९ कामे केलेली असून २ कामे केली असल्याचे दिसून येत नाही असे नमूद केले आहे. सदरचा चौकशी अहवालात ग्रामसेवक यांनी स्वतः स्थानिक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या न घेता कार्यकर्त्यामार्फत घेतल्या असल्याचेही नमूद केले आहे. श्री. पोपट विठोबा धवडे यांनी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाकडे देखील निवेदन केले असून या प्रकरणात आयोगाने अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्याअंतर्गत कार्यवाही करण्याबाबत आदेश दिल्याचे त्यांनी पत्र सोबत जोडलेले आहे.

श्री. धवडे यांनी सादर केलेल्या तक्रारीनुसार पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्यांनी सादर केलेला अहवाल पुरेसा स्पष्ट आहे. तसेच यात संबंधित ग्रामसेवकाने मोठ्या प्रमाणावर अनियमितता केली असल्याचे आढळून येते असे असताना देखील समितीसमोर हे दडविणे हे अत्यंत गंभीर व समितीची दिशाभूल करणारे कृत्य आहे. **या प्रकरणी जिल्हा परिषदेत समितीसमोर वस्तुस्थिती सादर करणे आवश्यक असताना त्यांनी ती सादर न केल्याने कर्तव्यात कसूर केली असल्यामुळे संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा नियम (शिस्त व वर्तणूक) अन्वये त्यांच्याविरुध्द कडक स्वरुपाची कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच श्री.धवडे यांच्या निवेदनात तथ्य असल्याने याबाबत फेर चौकशी करुन विस्तार अधिकारी, पंचायत, श्री.बी.एल.साळवे, यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शासनाने फेर चौकशी करुन दोषींवर कडक स्वरुपाची कारवाई करावी आणि या केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करावी अशीही समितीची शिफारस आहे.**

प्रकरण पंधरा

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### ग्रामसेवक व शिक्षकांसह इतर कर्मचारी मुख्यालयी राहात नसल्याबाबत.

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीमध्ये पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्यावेळी समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन बाबत दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्ह्यातील इंदापूर व जुन्नर पंचायती समितीला भेट देवून गट विकास अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान समितीने विचारणा केली की, किती ग्रामसेवक मुख्यालयी राहात नाहीत व ते मुख्यालयात न राहण्याची कारणे काय आहेत, अशा ग्रामसेवकांवर काय कारवाई करण्यात आली, यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, आम्हाला प्राप्त झालेल्या दाखल्यांच्या आधारे ग्रामसेवक मुख्यालयी राहतात अशा प्रकारचे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे. परंतु प्रत्यक्षात फिल्डवर मात्र वेगळी परिस्थिती असते हे मी मान्य करतो. यावर समितीने पुढे विचारणा केली की, ग्रामसेवकांनी मुख्यालयी राहावे याबाबत आपण पंचायत समिती स्तरावरुन काय प्रयत्न केले यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस उत्तर दिले नाही. समितीने आणखी विचारणा केली की, दाखल्याच्या आधारावर ग्रामसेवक मुख्यालयी राहात असल्याचे मान्य करावे, अशी नियमात तरतूद आहे काय यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, समितीचे म्हणणे बरोबर असून केवळ दाखल्याच्या आधारावर ग्रामसेवक मुख्यालयी राहात आहेत यावर विश्वास ठेवता कामा नये. या संदर्भातील खातरजमा प्रत्यक्षात फिल्डवर जाऊन करावयास पाहिजे.

समितीच्या मते ग्रामसेवक मुख्यालयी राहात नसताना सुध्दा त्यांनी मुख्यालयी राहात असल्याबाबत सरपंचाचा दाखला सादर करणे योग्य नाही. समितीला वाटते अशा प्रकारांना आपण वेळीच आळा घातला पाहिजे. समितीला भेटीच्या दरम्यान जे चित्र पहावयास मिळाले त्यावरुन ग्रामसेवक मुख्यालयी राहात नसल्याचे स्पष्ट होते. जर ग्रामसेवक मुख्यालयी राहात नसतील तर नियमानुसार त्यांचा घरभाडे भत्ता अदा करता कामा नये. शाळा व्यवस्थापन समिती आणि सरपंचांशी आर्थिक व्यवहार करुन ग्रामसेवक

प्रमाणपत्र मिळवितात. वास्तविक पाहता शासन निर्णयात स्पष्टपणे नमूद आहे की, जे शिक्षक किंवा ग्रामसेवक मुख्यालयी राहात नसतील त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी. त्यामुळे जे ग्रामसेवक मुख्यालयी राहात नाहीत त्यांच्यावर कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात यावे. मध्यंतरी पंचायती राज समितीला दौऱ्याच्या वेळी आढळून आलेल्या बाबींच्या संदर्भात समितीने निर्देश दिल्यानंतर शासनाने मुख्यालयी राहण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला.

समितीने जुन्नर पंचायत समिती येथे गट विकास अधिकारी यांची साक्ष घेऊन अशी विचारणा केली की, किती ग्रामसेवक मुख्यालयी राहात नाहीत व ते मुख्यालयी न राहण्याची कारणे काय आहेत, अशा ग्रामसेवकांवर काय कारवाई करण्यात आली. यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सर्व ग्रामसेवक मुख्यालयी राहतात. आमच्याकडे त्या संदर्भात सरपंचांचे प्रमाणपत्र आहे. यावर समितीने आपण पंचायती राज समितीला असत्य स्वरूपाची माहिती देत आहात. राज्यातील कोणतेही ग्रामसेवक शहरात राहात नाहीत. ग्रामसेवकाला खेडेगावात राहावे लागते, त्यामुळे त्याला भत्ता दिला जातो आणि तरीही ग्रामसेवक मुख्यालयी राहात नसेल तर ते योग्य नाही. शासनाची फसवणूक करीत आहेत.

असे प्रतिपादन करुन जे ग्रामसेवक मुख्यालयी राहात नाहीत त्यांना नोटीस काढण्यात यावी. आदिवासी गावात तर ग्रामसेवकाने राहिले पाहिजे. ग्रामसेवक हा गावाचा सेवक असतो. त्यामुळे त्याने मुख्यालयी राहणे आवश्यकच आहे. त्यामुळे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत यांनी ग्रामसेवकांच्या मुख्यालयी राहण्याच्या विषयाच्या संदर्भातील सत्य माहितीचा अहवाल ८ दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करावा असे समितीने निदेश दिले. त्यावर गट विकास अधिकारी यांनी समितीच्या निर्देशाचे तंतोतंत पालन करून समितीला अहवाल सादर करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

समितीने तद्नंतर दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी जिल्हा परिषद सभागृह पुणे येथे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेऊन सदरहू विषयावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, सन २०१२-१३ वार्षिक प्रशासन अहवाल प्रश्नावलीमधील

शिक्षण विभागाबाबत पान क्रमांक ४८ वरील मुख्यालयी राहण्याबाबतच्या विषयासंदर्भात विचारण्यात आलेल्या प्रश्नास जिल्हा परिषदेने उत्तर दिलेले आहे की, " अहवालवर्षी पंचायत समिती अंतर्गत सर्व ११,१३१ कार्यरत प्राथमिक शिक्षक मुख्यालयी राहत असल्याचे आढळून आले आहे ". सदरील उत्तर चुकीचे आहे, असा समितीचा आक्षेप आहे. जे शिक्षक मुख्यालयी राहात नव्हते, त्यांच्यावर जिल्हा परिषद प्रशासनाने कोणती कारवाई केली आहे तसेच, त्यापुढील प्रश्नास दिलेल्या उत्तरामध्ये त्यांनी म्हटले आहे की, सर्व शिक्षक मुख्यालयी राहात असल्याने त्यांचे विरुध्द कोणतीही कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. समितीला दिलेल्या प्रश्नाचे सदरचे उत्तरही खोटे असून ही अतिशय गंभीर बाब आहे. सर्वच पंचायत समिती क्षेत्रातील शिक्षक खरोखर मुख्यालयी राहतात का, समितीला खोटे उत्तर देण्याचे धाडस जिल्हा परिषदेने कसे केले, समितीने जुन्नर पंचायत समितीस भेट दिली होती. त्यावेळी या विषयाप्रकरणी गट विकास अधिकारी यांनी तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे यांना सादर करण्याबाबत निदेश दिलेले आहेत. जवळपास ८० टक्के ग्रामसेवक हे शहरामध्ये राहात आहेत, मुख्यालयाच्या ठिकाणी राहत नाहीत. शिक्षक व ग्रामसेवक हे मुख्यालयी राहत नाहीत. परंतु समितीला यासंदर्भात उत्तर देताना, सरपंचाच्या दाखल्यानुसार ते मुख्यालयी राहतात, असे गृहीत धरुन उत्तर देण्यात आले आहे, त्यासंदर्भात कोणतीही उलट तपासणी करण्यात आली नाही. सरपंच्याचा दाखला घेऊन ग्रामसेवक व शिक्षक हे शासनाकडून घरभाडे भत्ता घेतात, परंतु प्रत्यक्षात ते सदर ठिकाणी राहात नाहीत. याबाबत समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा करण्यात सांगितल्यावरुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, सदर प्रश्नाचे उत्तर समितीला सादर करीत असताना, संबंधित केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी, गट शिक्षण अधिकारी, गट विकास अधिकारी यांचेकडून अहवाल मागविण्यात आला व त्यानुसार उत्तर देण्यात आले आहे. समितीच्या मते सरपंच व शाळा समितीचे दाखले गृहीत धरुन शिक्षक व ग्रामसेवक मुख्यालयी राहतात, असे उत्तर देऊन जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी समितीची दिशाभूल केली आहे.

जिल्हा परिषदेने या विषयाच्या संदर्भात आढावा घ्यावा. शिक्षक मुख्यालयी राहात नाहीत हे योग्य नाही. सदर बाबतीत नोव्हेंबर, २००० चा शासन निर्णय आहे, त्यानुसार संबंधितांवर कारवाई करावी आणि सदर कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात

यावा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भातील अहवाल एक महिन्याच्या आत समितीला सादर करावा असे अश्वासन दिले.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडून खालील मुद्यांची माहिती मागविली.**

ग्रामसेवक मुख्यालयी राहात असल्याबाबत सरपंचांनी दिलेला दाखला ग्राह्य धरणे योग्य आहे काय, यामध्ये शासनाने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे तेव्हा शासनाची याबाबत नेमकी भूमिका विशद करावी.

**चौकशी अहवाल**

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्द्यांची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शासन परिपत्रक क्र.पराप क्र.२३२-आस्था-९, मंत्रालय मुंबई, दिनांक ५ जुलै, २००८ या परिपत्रकाद्वारे सूचित केलेनूसार मुख्यालयी न राहणाऱ्या जिल्हा कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करणेबाबत सर्व गट विकास अधिकारी यांना या कार्यालयाकडील पत्र जा. क्र. जिप-पंचा-७-४३-२०१५, दिनांक २१-०२-२०१५ नूसार कळविण्यांत आलेले असून जे कर्मचारी मुख्यालयी राहत नसलेबाबतचा दाखला सादर करणार नाहीत अशा कर्मचाऱ्यांचे घरभाडे भत्ता रोखण्यांबाबत स्पष्टपणे कळविण्यांत आले आहे.

सद्यस्थितीमध्ये पुणे जिल्ह्यांतर्गत पंचायत समिती अंतर्गत काम करणाऱ्या ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी हे मुख्यालयी राहात असलेबाबत सरपंच्यांचे दाखले पंचायत समिती स्तरावर घेण्यांत आलेले आहेत. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम ३८ नुसार सरपंच हे पंचायतीचे कार्यकारी अधिकारी आहेत.

**समितीस ग्रामविकास विभागाकडून खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शासन परिपत्रक दि. १३-१-१९८९, दि. १४-११-२०००, दि.१३-१२-२००१, दि.२४-७-२००२, दि.८-३-२००४,दि.६-१-२००६, दि.५-७-२००८,दि.३-११-२००८ अन्वये जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्याबाबत बंधनकारक करण्यात आलेले आहे.या संदर्भात

मा. पंचायतराज  समितीने वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार ग्राम विकास विभागाने याबाबतची कार्यवाही केलेली आहे.

मात्र वित्त विभागाने शासन निर्णय दि.५-२-१९९० अन्वये राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना सुधारीत दराने घरभाडे भत्ता देण्याबाबत जो निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये " ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कामाच्या ठिकाणी राहण्याच्या संबंधात घरभाडेभत्ता पात्रतेसाठी विहित केलेली शर्त काढून टाकण्यात येत आहे." असे विनिर्दिष्टपणे नमूद केलेले आहे. वित्त विभागाने निर्गमित केलेला सदरहू निर्णय व ग्रामविकास विभागाने परिपत्रकान्वये घेतलेला निर्णय परस्पर विरोधी असल्याने शिक्षकांच्या संघटने-मार्फत मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद येथे दाखल झालेल्या रिट याचिका  क्र. ५८२२/२०१५ मध्ये ग्रामविकास विभागाने परिपत्रकान्वये घेतलेला निर्णय मा. न्यायालयाने दि.१९-१०-२०१५ च्या आदेशान्वये रद्दबादल ठरविलेला आहे व कर्मचाऱ्यांचा घरभाडे भत्ता अदा करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. सद्य:स्थितीत मा.न्यायालयाने दिलेले आदेश, मा.पंचायत राज समितीने केलेल्या शिफारशी, ग्रामीण पातळीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी ग्रामीण भागातील सर्वांगीण विचाराच्या दृष्टीने त्यांची मुख्यालयी राहण्याची आवश्यकता याबाबी विचारात घेऊन वित्त विभागाच्या मान्यतेने आवश्यक  तो निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. प्रस्तूत निर्णय घेतानाच कर्मचाऱ्यांनी ग्रामीण पातळीवर रहिवासाचा दाखला निश्चित कसा घ्यावा याबाबतही आवश्यक त्या सूचना देण्यात येतील.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी विचारणा केली की,  ग्रामसेवक मुख्यालयी राहात असल्याबाबत सरपंचांनी दिलेला दाखला ग्राह्य धरणे योग्य आहे काय, यामध्ये शासनाने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. तेव्हा शासनाची याबत भूमिका काय आहे यावर विभागीय सचिवांनी समितीला विदित केले की, ग्रामसेवकांनी मुख्यालयात राहणे आवश्यक आहे. या बाबतीत आम्ही शासनाचे परिपत्रक काढलेले आहे. परंतु, नुकताच माननीय उच्च न्यायालयाचा एक निर्णय

आलेला आहे. रिट पिटिशन क्रमांक ५८२२/२०११ चा निर्णय १९/१० ला आलेला आहे. विभाग याचा थोडा अभ्यास करीत आहेत. त्यांनी काही तरी तांत्रिक मुद्दा काढला आहे, असे दिसून येत आहे. काही विसंगती आहे, वित्त विभागाने काही दिलेले आहे, त्या सर्वांचा आम्ही एकत्रपणे अभ्यास करुन परत सांगू.

समितीच्या मते याच्यामध्ये ग्रामविकास विभागाने काही परिपत्रके काढली आहेत. शिक्षक आणि ग्रामसेवकांनी हजर रहावे, त्याच्यामागे फार व्यापक दृष्टिकोन आहे. सध्या जिल्हा परिषदेतील शाळांतील शिक्षणाची परिस्थिती बिघडली त्याला कारणीभूत शिक्षक आहेत. शिक्षक काय करतात तर ते शहरात राहतात. त्याच्या मुलांना तो कॉन्व्हेंटमध्ये घालतो आणि दुसऱ्यांच्या मुलांना शिकवायला कधी अकराला तर कधी बाराला जातो. हेडमास्तर वगैरे सगळ्यांचे संगनमत असते. सगळे रोज उशिरा येतात म्हणून आमचा उद्देश असा होता की, त्यांनी मुख्यालयी राहिले पाहिजे. काही घटकांनी मुख्यालयी राहणे फार गरजेचे आहे. ग्रामसेवक गावी का राहिला पाहिजे. पण शासनाचा जो नियम आहे की, त्याने मुख्यालयी राहिले पाहिजे. त्यामागे हा कन्स्ट्रक्टिव्ह हेतू आहे की, लोकांना न्याय मिळावा आणि तो उपलब्ध व्हावा. परंतु, तो होत नाही आणि म्हणून यात शासन निर्णयाची पूर्ण पायमल्ली होत आहे. तुम्ही काय लिहिले आहे की, जे ग्रामसेवक आणि शिक्षक मुख्यालयी राहात नाहीत त्यांना घरभाडे भत्ता देऊ नये. घरभाडे भत्ता का देऊ नये, समजा त्यांना घरभाडे भत्ता दिला व शासनाच्या आदेशांचे उल्लंघन करुन अकाऊंटंट किंवा शिक्षण अधिकारी यांनी तो दिला. त्यानंतर समितीच्या असे लक्षात आल्यानंतर बंद केला जातो. काहींनी सरपंचांचा दाखला सादर केला. ग्रामसेवकांनी पत्र दिले की, मी मुख्यालयी राहतो आणि यांनी पास केले व त्यांना बिल अदा केले हे योग्य नाही.

समितीने असे निदेश दिले की, याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा. विधी व न्याय विभागास यासंबंधी सर्वोच्च न्यायालयात किंवा उच्च न्यायालयात रिव्ह्यू पिटीशन दाखल करता येईल किंवा कसे याबाबत विचार करणे आवश्यक आहे. यामध्ये जे रिट पिटीशन दाखल केला आहे ते एका शिक्षक संघटनेने दाखल केलेले असून ते ग्रामसेवकासंदर्भात नाही असे मला वाटते. त्यामुळे वित्त विभागाचे आणि महाराष्ट्र

नागरी सेवा मधील २४८ च्या सेक्शन संदर्भात आपल्याला काय करता येईल आणि शासनाने यासंबंधी काही वेगवेगळी परिपत्रके वेळोवेळी काढली आहेत. ग्रामसेवकांना मुख्यालयी राहण्यामध्ये त्यांच्या काही अडचणी असू शकतात. यामध्ये त्यांना घर भाड्याने मिळत नसेल किंवा अन्य काही अडचणी असतील. या बाबी आपण पिटीशनमध्ये सांगू शकू.

न्यायालयात याबाबत जो निकाल झाला आहे, यामध्ये आपली बाजू कमकुवत मांडली गेली असेल तर त्यासाठी काही करता येईल काय आणि त्या दृष्टीने काही करता येईल काय? त्यासंबंधी नवीन परिपत्रक काढून काही मार्ग काढता येत असेल तर शासनाने तसे बघावे असे निदेश समितीने दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. सदर भेटीच्या वेळी सन २०१२-२०१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील सादर करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक १ व २ बाबत समितीने माहिती घेतली असता ग्रामसेवक, शिक्षक व इतर वर्ग ३ चे कर्मचारी शासनाच्या नियमानुसार बंधनकारक असुनही ते मुख्यालयी राहात नसल्यावर शासन निर्णय व नियमाप्रमाणे अशा कर्मचाऱ्यांना घरभाडे भत्ता अनुज्ञेय नसतानाही तो अदा करण्यात येत असल्याचे समितीस आढळून आले. समितीला सांगण्यात आले की, संबंधीत गावाच्या ग्रामपंचायतीचे सरपंचांचे निवासाचे दाखले घेणे ग्राह्य धरुन कर्मचाऱ्यांना घरभाडे भत्ता अदा केला जात आहे. अशाप्रकारे सरपंचांचे दाखले घेणे नियमानुसार आहे का, याबाबत समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेवून विचारणा केली असता यावर विभागीय सचिवांनी समितीला विदित केले की, ग्रामसेवकांनी मुख्यालयात राहणे आवश्यक आहे. या बाबतीत आम्ही शासनाचे परिपत्रक काढलेले आहे. परंतु, नुकताच माननीय उच्च न्यायालयाचा एक निर्णय आलेला आहे. रिट पिटिशन क्रमांक ५८२२/२०११ चा निर्णय १९/१० ला आलेला आहे. आम्ही याचा थोडा अभ्यास करीत आहोत. त्यांनी काही तरी तांत्रिक मुद्दा काढला आहे असे दिसून येत आहे. काही विसंगती आहे, वित्त विभागाने काही दिलेले आहे, त्या सर्वांचा आम्ही एकत्रपणे अभ्यास करुन परत सांगू.

शिक्षक, ग्रामसेवक, वैद्यकीय अधिकारी इतर वर्ग तीनच्या कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक करण्याच्या निर्णयामागे फार व्यापक दृष्टिकोन आहे. सध्या जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांच्या/ग्रामसेवकांच्या बाबतीतील परिस्थीती त्यांनी निवासस्थानी रहाणे अत्यंत आवश्यक असून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा उद्देश सफल होण्याकरिता  ज्या योजनांचा ज्या समाजाला लाभ, प्रसार व प्रचार होणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे या मुख्यालयी राहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या काही समस्या देखील जाणून घेणे आवश्यक आहे. त्यांना शासनाकडून पुरेसी निवास व्यवस्था उपलब्ध नसणे, ग्रामस्तरावर भाडे तत्वावर निवास व्यवस्था उपलब्ध होण्यास अडचणी असणे इ. मुलांच्या अथवा अन्य कौटुंबिक समस्या इ. बाबत अडचणी शासनाने विचारात घेत असताना सदरचे कर्मचारी मुख्यालयी कसे राहतील याबाबत कार्यकारी संघटनांशी चर्चा करणे. **बदली धोरणात सकारात्मक बदल करावा तसेच मा. उच्च न्यायालयाने अलीकडेच घरभाडे भत्त्यासंदर्भात जो निर्णय दिला त्याचाही सर्वकष विचार करुन यासंदर्भात नव्याने निर्णय होण्याची आवश्यकता आहे.  असे समितीला प्रकर्षाने वाटते म्हणून या प्रकरणी ग्रामविकास विभागाने, वित्त विभाग, विधी व न्याय विभाग, महसूल विभाग इ. सर्वसंबंधित विभागांशी एकत्रित बसून चर्चा करुन मुख्यालयी राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवास व्यवस्था उपलब्ध करुन त्याबरोबरच त्यांना अजून कोणत्या आवश्यक त्या सूविधा देता येतील याबाबत सर्वकष विचारविनिमय करुन सर्वंकष शासन निर्णय घ्यावा अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण सोळा

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### घरकुलांची कामे अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत.

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन बाबत दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्ह्यातील इंदापूर पंचायती समितीला भेट देवून गट विकास अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीदरम्यान समितीने विचारणा केली की, सन २०१२-१३ या वर्षात इंदिरा आवास घरकुल योजनेंतर्गत एकूण किती घरकुले बांधण्यात आली, या योजनेंतर्गत किती घरकुलांचा ताबा लाभार्थ्यांना देण्यात आला, उर्वरित लाभार्थ्यांना ताबा न देण्याची कारणे काय आहेत, उप अभियंता यांनी प्रमाणित न केल्यामुळे किती लाभार्थ्यांना घरकुलाचा ताबा मिळाला नाही. यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदीत केले की,

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात इंदिरा आवास घरकुल योजनेंतर्गत ३३९ घरकुले मंजूर झाली असून, २०१ घरकुले बांधण्यात आली आहेत, उर्वरित १३७ घरकुले रद्द करण्यात आली असून १ घरकुल अपूर्ण आहे. त्याबाबत कार्यवाही सुरू आहे. लाभार्थी स्वतःचे घर बांधत असल्याने ताबा देण्याचा प्रश्न नाही. उप अभियंता यांनी काम पूर्णत्वाचा दाखला दिला आहे. यावर समितीने १३७ घरकुले रद्द होणे बरोबर नाही. त्यामध्ये आदिवासी देखील असतील. असे प्रतिपादन केल्यावर गट विकास अधिकारी यांनी खुलासा केला की,जागेचा अभाव व लाभार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणी यामुळे घरकुले रद्द झाली आहेत. यावर समितीनी असे प्रतिपादन केले. घरकुल योजना ही महत्त्वाची योजना आहे. घरकुल रद्द होणे योग्य नाही.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडून खालील मुद्यांची माहिती मागविली.**

अपूर्ण अवस्थेत असलेली १९ घरकुले लाभार्थ्यांसोबत पाठपुरावा करुन पूर्ण करावीत असे समितीने निर्देश दिले आहेत, त्यानुसार कोणती कारवाई केली आहे?

**चौकशी अहवाल**

पंचायत समिती इंदापुर या विकास गटात मा. पंचायत राज समितीचे साक्षीदरम्यान अपूर्ण अवस्थेत असलेली १९ घरकुले लाभार्थ्यांना गट विकास अधिकारी इंदापुर कार्यालया-कडील पत्रक्र. इंआयो-६४९-१५ दिनांक २६-०८-२०१५ तसेच पत्र क्र.इंआयो १२०९-१५, दिनांक २६ -१०-१५ रोजी वैयक्तिक लाभार्थ्यांना पत्र देवून घरकुल तात्काळ पूर्ण करण्याबाबत अवगत केलेले असून १९ पैकी ३ घरकुले पूर्ण करण्यात आली असून १९ अपूर्ण घरकुले पूर्ण करण्याबाबत ग्रामसेवकांनी हलगर्जीपणा केल्याबाबत ग्रामसेवकांना गटविकास अधिकारी इंदापुर या कार्यालयाचे पत्र क्र.१२९१-१५ दि.३०-१०-१५, अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच या पूर्वी लाभार्थ्यांनी घरकुल पूर्ण करण्याबाबत गटविकास अधिकारी इंदापुर या कार्यालयाचे (१) पत्र क्र.इंआयो-३९२-१५, दि.१९-०६-१५ (२) पत्र क्र.इंआयो-४४३-१५, दि.२२-०६-१५, (३) पत्र क्र.इंआयो-१८१-१५, दि.१६-०२-१५, (४) पत्र क्र. इंआयो-७४९-१४, दि.२८-१०-१४(५), पत्र क्र.इंआयो-८२०-१४, दि.०४-१२-१४, अन्वये अवगत करून पाठपुरावा करण्यात आलेला आहे. अपूर्ण अवस्थेत असलेली घरकुले लाभार्थ्यांना पाठपुरावा करून पूर्ण करण्याची कार्यवाही गटविकास अधिकारी व ग्रामसेवक यांचेकडून तात्काळ करण्यात येत आहे.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्द्यांची खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती इंदापुर या विकास गटात मा. पंचायत राज समितीचे साक्षी दरम्यान अपूर्ण अवस्थेत असलेली १९ घरकुले लाभार्थ्याना गटविकास अधिकारी इंदापुर, कार्यालयाकडील पत्र क्र.इंआयो-६४९-१५, दिनांक २६-०८-२०१५ तसेच पत्र क्र. इंआयो-१२०९-१५, दिनांक २६-१०-२०१५ रोजी वैयक्तिक लाभार्थ्याना पत्र देवून घरकुल तात्काळ

पूर्ण करण्याबाबत अवगत केलेले असून १९ पैकी ३ घरकुले पूर्ण करण्यात आली असून १९ अपूर्ण घरकुले पूर्ण करण्याबाबत ग्रामसेवकांनी हलगर्जीपणा केल्याबाबत ग्रामसेवकांना गटविकास अधिकारी, इंदापुर या कार्यालयाचे पत्र क्र. १२९१-१५, दि. ३०-१०-२०१५ अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. तसेच यापूर्वी लाभार्थ्यांनी घरकुल पूर्ण करण्याबाबत गट विकास अधिकारी, इंदापुर या कार्यालयाचे (१) पत्र क्र.इंआयो -३९२-१५, दि. १९-०६-२०१५, (२) पत्र क्र. इंआयो -४४३-१५, दि. २२-०६-२०१५, (३) पत्र क्र. इंआयो -१८१-१५, दि. १६-०२-२०१५, (४) पत्र क्र. इंआयो -७४९-१४, दि. २८-१०-२०१४, (५) पत्र क्र. इंआयो -८२०-१४, दि. ०४-१२-२०१४ अन्वये अवगत करुन पाठपुरावा करण्यात आलेला आहे. अपूर्ण अवस्थेत असलेली घरकुले लाभार्थ्यांना पाठपुरावा करुन पूर्ण करण्याची कार्यवाही गट विकास अधिकारी व ग्रामसेवक यांचेकडून तात्काळ करण्यात येत आहे.

ग्रामविकास विभागाने समितीस असे कळविले की, घरकुले पूर्ण करण्याबाबत जिल्हा परिषदेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली उक्त साक्षीच्या वेळी विचारणा केली की, यामध्ये अपूर्ण असलेली १९ घरकुले लाभार्थ्यांसोबत पाठपुरावा करून केव्हा पूर्ण करण्यात येतील असे समितीने निर्देश दिले आहेत. ही १९ घरकुले पूर्ण झाली आहेत काय, घरकुलासंबंधी तेवढी माहिती देण्यात यावी. समितीला जे उत्तर दिले आहे त्यामध्ये आणि या उत्तरामध्ये काहीही फरक नाही. ते रद्द करून टाकावे. त्यांच्यावर पण कार्यवाही झाली पाहिजे. त्यांना जर गरज नसेल तर ते रद्द करावे. त्यांना दिलेले पैसे वसूल करावेत. अशा भावना समितीने व्यक्त केल्यावर विभागीय सचिवांनी कधी कधी लाभार्थ्यांना स्वारस्य नसते. लाभार्थ्यांना त्याची गरज नसेल तर ते रद्द करून टाकावे. ते कोणासाठी निवडले आणि ते निवडताना मग त्यांच्याकडून बॉन्ड लिहून घ्यावा. त्याच्यामध्ये दुरुस्ती करण्यात यावी. सर्वसामान्य लोकांची टेंडन्सी काय झाली आहे. लाभार्थ्यांना जर

स्वारस्य नसेल तर आमची पंचायत राज समितीची अशी शिफारस आहे की, इंदिरा आवास योजनेची घरकुले मंजूर करताना त्यांच्याकडून बॉन्ड लिहून घ्यावा की, अमूक इतक्या मुदतीत खर्च झाला नाही तर ही रक्कम परत घेण्यात येईल. या बाबतीत काही लाभार्थी आळशीपणा करतात आणि अधिकाऱ्यांकडून पैसे उकळतात त्यामुळे त्यांचे आणखी फावते. तेव्हा अशा लाभार्थ्यांवर सुध्दा कारवाई करण्यात यावी. त्यांच्याकडून १०० रुपयांच्या बॉंडवर लिहून घ्यावे की, आम्ही एक वर्षामध्ये पूर्ण करू. त्यावर विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, १९ घरकुले जी अपूर्ण आहेत त्यातील तीन घरांना अजून शौचालय नसल्यामुळे ते अपूर्ण दिसत आहेत. शौचालयाव्यतिरिक्त घरकुल पूर्ण झाली आहेत. किरकोळ काम बाकी असलेली चार घरकुले आहेत. बांधकाम अपूर्ण असलेले एक घरकुल आहे आणि जेटे लेवलपर्यंत आलेली ६ घरकुले आहेत. लिंटन लेवलपर्यंत आलेली ५ घरकुले आहेत. यादृष्टीने त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी असे म्हटलेले आहे. यामध्ये फक्त आकडेवारी नमूद केलेली नाही. आपण परवानगी दिली तर एक मुद्दा सांगतो की, महाराष्ट्रात दरवर्षी एक ते दीड लाख घरे आम्ही इंदिरा आवास योजनेमधून तयार करीत असतो. चार ते पाच टक्के काम हे पहिला हप्ता घेऊन तयार करीत आहोत. ९० ते ९५ टक्के काम होत आहे. ७० टक्के घरे आम्ही एस.सी./ एस.टी च्या लोकांना जे गरीब असतात त्यांना बांधून देत आहोत. पाच टक्के कमी पडते त्यात शासन सुधारण्याचा प्रयत्न करित आहे.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायत समिती, इंदापूर येथील इंदिरा आवास घरकुल योजनेंतर्गत ३३९ मंजूर घरकुलांपैकी २०१ घरकुले बांधण्यात येऊन उर्वरित १३७ घरकुले रद्द करण्यात आली आहेत. तर १९ घरकुले अपूर्ण असल्याची माहिती समितीला देण्यात आली. समितीने या अपूर्ण घरकुलांचे काम पाठपुरावा करुन पूर्ण करण्याचे निदेश दिले. त्यानुसार गट विकास अधिकाऱ्यांनी याबाबत चौकशी करुन असे कळविले की पंचायत समिती, इंदापूर या विकास गटात अपूर्ण असलेली १९ पैकी ३ पूर्ण करण्यात आली आहेत. उर्वरित घरकुले पूर्ण करण्याबाबत लाभार्थ्यांना दिनांक २६-१०-१५ रोजी पत्र देऊन अपूर्ण घरकुले पूर्ण करण्याबाबत कळविण्यात आले आहे. यास जबाबदार असणाऱ्या

ग्रामसेवकांना कामात हलगर्जीपणा केल्याबाबत गट विकास अधिकारी, इंदापूर यांनी कारणे दाखवा नोटीसा बजावून त्यांचा खुलासा मागीतला असून त्याद्वारे अपूर्ण घरकुलांच्या लाभार्थ्यांचा पाठपुरावा करुन ती पूर्ण करण्याबाबत संबंधीत ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांचे स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी यासंदर्भात समितीने तीव्र नापसंती व्यक्त करुन लाभार्थ्यांना स्वारस्य नसल्यास त्यांचेकडून घरकुल पूर्ण करण्याबाबतचे शपथपत्र घेण्यात यावे असे समितीचे मत आहे.

राज्यात अनेक ठिकाणी इंदिरा आवास घरकुले मंजूर करण्यात येतात. सदरची घरकुले मंजूर करण्याची कार्यवाही ही ग्रामसभेद्वारे करण्यात येऊन ग्रामसभाच उक्त गावातील पात्र लाभार्थी निवड करुन पंचायत समितीला पाठविते. त्यानंतर या योजने अंतर्गत तपासणी करुन अनुदान दिले जाते. असे करत असताना काही लाभार्थी वैयक्तिक अडचणींसाठी सदरचा पैसा खर्च करण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेक लाभार्थी अपेक्षित घर बांधण्याकरिता मंजूर निधीपेक्षा जास्त पैसे त्या घरांना लावण्याची शक्यता असते. त्या प्रयत्नात निधीची टंचाई भासण्याची शक्यता असते म्हणून संबंधित पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी याबाबत अत्यंत दक्ष रहाणे आवश्यक असून संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकास याबाबत सर्तक ठेवून वेळोवेळी या अपूर्ण घरकुलांचा पाठपुरावा करुन लाभार्थींना झालेल्या कामाइतके पैसे देवून व पूर्वीच्या कामाचे पैसे वेळीच देऊन घरकुले पूर्ण करणे आवश्यक आहे. **काही वेळा पंचायत समिती/ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या अडेलतट्टू भूमिकेमुळे/अवास्तव अपेक्षेमुळे लाभार्थ्यांना निधी उशिरा पोहचण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून इंदिरा आवास घरकुल योजनेमध्ये गटविकास अधिकारी यांचेच नियंत्रण व पर्यवेक्षण असावे अशी समितीची भूमिका आहे. समितीने साक्षीच्या वेळी सूचविल्याप्रमाणे लाभार्थ्यांकडून शपथपत्र/प्रतिज्ञापत्र घेऊन कालावधी नेमून टप्याटप्याने पैसे देण्याबाबत गटविकास अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण सतरा

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

**भारत निर्माण योजनेचे काम अपूर्ण असल्याबाबत.**

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्यावेळी समितीने सन २०१२-१३ यावर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोनबाबत दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्ह्यातील वेल्हे पंचायती समितीला भेट देवून गट विकास अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीने विचारणा केली की, पाणी-पुरवठा योजना कार्यान्वीत आहेत काय, त्यासंदर्भात सद्यस्थिती काय आहे, यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, पाणीपुरवठ्यासंबंधीचे काम पाहण्यासाठी स्वतंत्र अधिकारी आहेत. यावर्षी सन २०१४-१५ करिता राष्ट्रीय ग्रामीण पेयजल आराखड्यामध्ये २७ हॅबीटेशन्स टार्गेट दिले होते. त्यापैकी १७ योजनांना मंजुरी मिळालेली आहे. तसेच, १० प्रस्ताव लोकसंख्येच्या निकषामध्ये बसत नसल्यामुळे रद्द करण्यात आले आहेत.

समितीने आणखी विचारणा केली की, पाणीपुरवठ्याच्या जुन्या काही योजना रखडलेल्या आहेत काय, यावर उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा यांनी स्पष्ट केले की, खाटपेवाडी पाणीपुरवठा योजना अर्धवट आहे. सदर योजना पूर्ण होण्याकरिता थोडासा निधी कमी आहे. सदर योजनेच्या टाकीच्या स्लॅबचे काम पूर्ण झालेले नाही. योजनेचा खर्च पूर्ण झालेला आहे. यावर समितीने विचारणा केली की, सदर योजना किती लाखांची आहे, किती पैसे शिल्लक आहेत, यावर उपअभियंता, पाणीपुरवठा यांनी खुलासा केला की, सदरचे काम ५ लाख ९१ हजार रुपयांचे आहे. यावर उपअभियंता यांचे म्हणने खोडून शाखा अभियंता यांनी स्पष्ट केले की, सदर कामाचे इस्टिमेट १४.६१ लाख रुपयांचे आहे. यावर समितीने आश्चर्य व्यक्त केले की, सदर काम १४.६१ लाखांचे असून ५ लाख ९१ हजार रुपयांमध्ये ठेकेदाराने ९० टक्के काम कसे पूर्ण केले. सदर कामासाठी प्रशासकीय मान्यता कधी देण्यात आली, काम करणारा ठेकेदार कोण आहे, यावर उपअभियंता यांनी समितीस विदित केले की, सदर काम करणाऱ्या ठेकेदाराचे नाव श्री.यु.एस. नलावडे असून सदर काम भारत निर्माण योजना अंतर्गत आहे. समितीने

निदेश दिले की, सदर ठेकेदार विहित कालावधीमध्ये काम पूर्ण करीत नसेल तर त्याला ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्यात यावे व गट विकास अधिकारी यांनी सदर प्रकरणी लक्ष घालून काम लवकरात लवकर पूर्ण करावे.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून खालील मुद्दयांची माहिती मागविली.**

भारत निर्माण योजनेत १४.६१ लक्ष रुपयांचे काम असतांना केवळ ५ लक्ष ९१ हजार रुपयांमध्ये योजनेचे ९०% काम पूर्ण करणाऱ्या श्री.यु.एस. नलावडे या ठेकेदारावर विहित कालावधीमध्ये काम पूर्ण करीत नसल्यामुळे काळ्या यादी मध्ये टाकण्याबाबत समितीने निदेशित केलेले आहेत, त्यानुसार कोणती कारवाई केली आहे?

**चौकशी समितीचा अहवाल**

भारत निर्माण कार्यक्रम योजनेअंतर्गत सन २००८-२००९ मध्ये खाटपेवाडी, ता. वेल्हे गावासाठी पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे. सदर काम ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समितीने श्री.यु.एस.नलावडे यांना दिलेले आहे.

योजनेमध्ये अस्तित्वात असलेले विहिरीचे खोलीकरण, पंपिग मशिनरी-५ अश्वशक्ती २ नग, दाबनलिका ६५ मि.मी. जी.आय. पाईप ७४० मी. २००० लिटर्स क्षमतेची जमिनीवरील टाकी व ११०० मी .वितरण व्यवस्था इ. बाबीचा समावेश आहे. त्यापैकी विहीर खोलकरणे व दाबनलिकेचे काम पूर्ण झाले आहे. जमिनीवरील टाकीचे काम स्लॅब लेव्हलपर्यंत झालेले आहे. व्यवस्थेचे पाईप उपलब्ध झालेले आहे. टाकीच्या कामाच्या जागेबाबत हरकत घेतल्याने पुढील काम होवू शकलेले नाही. सदर काम लवकरात लवकर पूर्ण करणेसाठी समितीकडे वारंवार पाठपुरावा करणेत येत होता. त्यानुसार दिनांक १२-०५-२०१५ रोजी ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समितीने दिलेल्या पत्रानुसार टाकीच्या जागेचा वाद मिटला आहे. त्यानुसार उपअभियंता, जिल्हा परिषद कार्यालयाकडील पत्र दि. १९-०५-२०१५ अन्वये सदर योजनेचे काम डिसेंबर, २०१५ पर्यंत पूर्ण करणेबाबत ठेकेदार श्री.यु.एस.नलावडे यांना कळविले आहे. सदर कामासाठी रु. ५.९१ लक्ष पहिला हप्ता वितरीत केला आहे. तथापि, जागेचा वाद असल्यामुळे ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समितीने दुसऱ्या हप्त्याची मागणी केलेली नाही. सदरच्या दुसऱ्या हप्त्याच्या मागणीच्या प्रस्तावाची पूर्तता करून घेत आहे. जागेच्या वादामुळे सदर कामास विलंब

झाला आहे. यामध्ये ठेकेदार दोषी नसलेने काळ्या यादीमध्ये टाकलेले नाही. सध्या सदर काम सरू केले असून डिसेंबर, २०१५ पर्यंत पूर्ण करणेत येणार आहे.

तसेच जिल्हा परिषद कार्यालयाकडील पत्र दि. १९-०८-२०१५ अन्वये संबंधित ठेकेदारास काम पूर्ण न केल्यास निविदा शर्त ३-क नियमाखाली काम काढून घेणेबाबत नोटीस देण्यात आली असून संबंधितांचे नाव काळ्या यादीत टाकणेबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येईल असे सूचित केलेले आहे. तद्नुषंगाने संबंधित ठेकेदार यांनी दिनांक २६-०८-२०१५ रोजी खुलासा सादर केलेला असून त्यामध्ये माहे डिसेंबर, २०१५ अखेर काम पूर्ण करणार असल्याबाबत कळविलेले आहे.

संबंधित ठेकेदाराने सदरचे काम डिसेंबर, २०१५ अखेर पूर्ण न केल्यास संबंधित ठेकेदारावर उपरोक्तप्रमाणे सूचित केलेली कारवाई करण्यात येईल.

**निष्कर्ष**

सदरचे काम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीमार्फत ठेकेदार नेमून करण्यात येत आहे. सदर ठिकाणी टाकीच्या जागेबाबत हरकत असल्याचे ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समितीने नमूद केले आहे व आता वाद मिटला असून पावसाळा संपताच काम सरू करता येईल असे समितीने उप अभियंता, ग्रा. पा. पु. उपविभाग, वेल्हा यांना दिनांक १२-०५-२०१५ मध्ये कळविले आहे. ठेकेदारानेपण काम डिसेंबर, २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे मान्य केले आहे. काम पूर्ण होण्याच दृष्टीने ठेकेदारास काम पूर्ण करण्यास डिसेंबर,२०१५ पर्यंत मुदत देवून त्यानंतर काम पूर्ण न केल्यास निविदेमधील शर्त ३ (क) खालील कार्यवाही करून ठेकेदारास काळ्या यादीत टाकणे योग्य होईल असे मत आहे.

**समितीस जिल्हा परिषदेकडून उपरोक्त मुद्द्यांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदरचे काम लवकरात लवकर पूर्ण करणेसाठी उपअभियंता, उपविभाग वेल्हे, यांनी वारंवार पाठपुरावा केलेला असून त्या अनुषंगाने ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या दिनांक १२-०५-२०१५ च्या पत्रानुसार सदर जागेचा वाद मिटल्याचे कळविले असून जानेवारी, २०१६ पर्यंत  काम पूर्ण करण्यात येईल, तसे ठेकेदार श्री. यु.एस.नलावडे

यांना कळविले आहे. उपविभागाने दि. १९-०५-२०१५ नुसार सदर योजनेचे काम डिसेंबर, २०१५ पर्यंत पूर्ण करणेबाबत ठेकेदारास पत्र दिलेले आहे. त्यानुसार ठेकेदाराने उर्वरित काम सुरू केलेले असून डिसेंबर,२०१५ पर्यंत सदरचे काम पूर्ण करण्यात येईल असे उपविभागास कळविलेले आहे. सबब ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव गटविकास अधिकारी यांनी तयार केलेला नसून त्याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जा. क्र/ग्रापापु/वशी/५२७/१५, दिनांक २७/१०/२०१५ अन्वये कळविले आहे.

**उपरोक्त मुद्द्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून माहिती प्राप्त झाली.**

ग्रामविकास विभागाचे अभिप्राय- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचे स्तरावरील कार्यवाही. प्रधान सचिव, ग्रामविकास यांच्या दि. २३ ऑक्टोबर,२०१५ रोजीच्या अर्धशासकीय पत्राद्वारे समितीने निर्देशित केलेल्या विहित कालमर्यादेत चौकशी करून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबतच्या सूचना देणेत आलेल्या आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी विचारणा केली की, भारत निर्माण योजनेंतर्गत १४.६१ लक्ष रुपयांचे काम असताना केवळ ५.९१ लक्ष रुपयांमध्ये योजनेचे ९० टक्के काम पूर्ण करणाऱ्या श्री.यु.एस. नलावडे या ठेकेदारावर विहित कालावधीत काम पूर्ण करीत नसल्यामुळे त्याला काळ्या यादीत टाकण्याचे समितीने निर्देश दिलेले आहेत, त्यानुसार कारवाई केली आहे काय, यावर विभागीय सचिवांनी समितीला विदित केले की, जागेचा वाद असल्यामुळे या कामास विलंब झाला होता असे जिल्हा परिषदेचे म्हणणे आहे. जागा ताब्यात देण्यात आली नव्हती म्हणून ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात आले नाही असा त्यांनी रिपोर्ट दिलेला आहे आणि त्याच्याशी विभाग सहमत आहेत.

समितीने उत्तरावर हरकत घेवून पुन्हा विचारणा केली की, समितीने शिफारस केल्यानंतर गट विकास अधिकाऱ्याला फिरवायचा अधिकार आहे का, समितीने शिफारस

केलेली आहे की, कंत्राटदाराला ब्लॅकलिस्टमध्ये टाका आणि उत्तरामध्ये आले की, गटविकास अधिकाऱ्याने फक्त पत्र दिलेले आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, वेल्हे तालुक्यामध्ये सन्माननीय समितीने भेट दिली असता पाणी-पुरवठा योजनेच्या संदर्भात त्रुटी निदर्शनास आल्या होत्या. त्या योजनेचे ९० टक्के काम पूर्ण झालेले होते, १० टक्के काम अपूर्ण होते. ठेकेदाराने विलंब लावल्यामुळे त्याला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्यात यावी असे निर्देश समितीने बीडीओ यांना दिले होते. शिल्लक असलेले १० टक्के काम पूर्ण करून घेऊन त्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यासाठी कलम ३(क) खाली नोटीस द्यायची असते ती नोटीस देऊन त्याच्याविरुध्द निश्चितपणे कारवाई केली जाईल. पाणीपुरवठा विभागाच्या प्रधान सचिवांनी सुध्दा समितीसमोर साक्ष देताना हे सांगितले आहे. त्याप्रमाणे निश्चितपणे कारवाई केली जाईल.

समितीने आणखी अशी विचारणा केली की, काळ्या यादीत टाकण्याच्या स्टेजपर्यंत आपण आलो आहोत. परंतु १० टक्के अपूर्ण असलेले काम पूर्ण झाले की नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, डिसेंबर अखेरपर्यंत पूर्णपणे काम पूर्ण होईल. पाणी सोडण्यात आलेले आहे. किरकोळ बाबी डिसेंबर अखेर पूर्ण करुन घेण्यात येतील अशा प्रकारचे उत्तर मला देण्यात आले आहे. यावर समिती सदस्यांनी काम पूर्ण केले असून पाणी सोडलेले आहे अशी माहिती समितीला दिली. समितीच्या मते या गंभीर बाबीविषयी अधिकारी माहिती घेत नसतील तर ते योग्य नाही. समितीला फाईल पाठविली आहे. टाकीचे, पाईपचे काम पूर्ण केले आहे. याची या अधिकाऱ्यांना माहिती असणे आवश्यक होते. जर कोणाची चूक नसेल तर त्याच्यावर अन्याय होता कामा नये. ज्यावेळी सर्व समिती सदस्यांनी तेथे म्हणणे मांडले त्याची कारवाई बीडीओ यांनी केली नाही म्हणून आता साक्ष घ्यावी लागली. अजूनही तुम्ही खात्री करावी, ८ दिवस वेळ घ्यावा आणि समितीला वस्तुस्थिती कळवावी. साक्षी मधील गाव समिती सदस्यांच्या मतदारसंघाला लागून आहे. समितीकडे जी माहिती उपलब्ध झाली ती अधिकाऱ्यांना का उपलब्ध होऊ शकत नाही, असेही विचारणा समितीने केल्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपण मी स्वतः त्या गावाला भेट देऊन कामाची पूर्ण तपासणी करुन घेतो आणि तपासणीनंतर कामाच्या अहवालाची सद्यस्थिती डिसेंबर अखेर समितीला विदित करतो. असे आश्वासन दिले.

समितीच्या मते ठेकेदाराला डिसेंबर, २०१५ पर्यंत काम पूर्ण करण्याच्या सूचना जरी दिलेल्या असल्या तरी २० नोव्हेंबर २०१५ पर्यंत हे काम पूर्ण झालेले आहे. यासंदर्भातील माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे असणे आवश्यक होते. डिसेंबर, २०१५ ही तारीख दिलेली असली तरी त्या अगोदर काम पूर्ण झालेले आहे याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असायला पाहिजे होती. माहिती नसताना मुख्य कार्यकारी अधिकारी समितीसमोर दिशाभूल करणारी माहिती देत आहात ही बाब योग्य नाही. यावर समितीने निदेश दिले की, या विषयावर सन्माननीय सदस्यांनी जी भूमिका मांडली आहे त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जे मत व्यक्त केले आहे त्याबाबत या कामाच्या संदर्भात काही अनियमितता झाली किंवा कसे याबाबत विभागाच्या सचिवांनी माहिती घ्यावी. यामध्ये गट विकास अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली काय, याबाबत तपासणी करावी त्याचप्रमाणे संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे किंवा कसे याबाबत देखील सचिवांनी कारवाईसह अहवाल समितीला सादर करावा.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पंचायत समिती, वेल्हा येथे भेट देवून गट विकास अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीला खाटपेवाडी पाणीपुरवठा योजना अर्धवट असल्याची माहिती मिळाली. योजनेचे ठेकेदार यांनी योजना विहित कालावधीत पूर्ण केली नसल्यामुळे त्यांस काळ्या यादीत टाकावे व सदरहू प्रकरणी चौकशी करुन अहवाल समितीस पाठविण्यात यावा असे निदेश समितीने दिले. समितीने भारत निर्माण योजनेत १४.६१ लक्ष रुपयांचे काम असतांना केवळ ५ लक्ष ९१ हजार रुपयांमध्ये योजनेचे ९०% काम पूर्ण करणाऱ्या श्री.यु.एस. नलावडे या ठेकेदारावर विहित कालावधीमध्ये काम पूर्ण करीत नसल्यामुळे काळ्या यादीमध्ये टाकण्याबाबत समितीने निदेशित केलेले आहे.

समितीच्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने चौकशी करुन अहवाल समितीस सादर केला. सदरहू योजनेच्या कामात टाकीच्या कामाबाबत वाद उत्पन्न झाल्यामुळे विहित मुदतीत काम पूर्ण होवू शकलेले नाही. त्यामुळे ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात आलेले नाही. परंतु त्यांनी डिसेंबर अखेर वाढीव मुदतीत काम पूर्ण केले नाही तर त्यास काळ्या यादीत टाकण्यात येईल अशी माहिती समितीला देण्यात आली. समिती सदस्यांना

योजनेचे काम पूर्ण होवून पाणीपुरवठा सुरु झाल्याची माहिती होती परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ती नव्हती किंवा त्यांच्या गट विकास अधिकारी यांना माहिती नव्हती याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

**उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता सदरची योजना ही सन २००८-०९ या कालावधीतील असून सन २०१५ पर्यंत देखील पूर्ण करण्यात आली नाही. या प्रकरणी चौकशी अहवालातील समाधानकारक दिली नाही. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला आश्वासित केल्याप्रमाणे स्वत: प्रकल्पस्थळी जाऊन पहाणी करावी आणि तद्नंतर या प्रकरणी दोषीतांवर यापूर्वीच कठोर प्रशासकीय तसेच दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक होते परंतु तसे देखील चौकशीत अधिका-यांनी सूचविले नाही. त्यामुळे एकंदरीत या योजनेतील दोषी अधिका-यांना जिल्हा परिषद पाठीशी घालत असल्याचा संशय समितीस येतो व पाठविलेल्या चौकशी अहवालावर जिल्हा परिषदेने कारवाई करुन या प्रकरणी पुन्हा चौकशी करुन दोषीतांवर त्वरित कठोर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करुन ती तीन महिन्यात निकाली काढावी. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठवावी, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण अठरा

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

**महिला व बालकल्याण समितीमार्फत प्रशिक्षणाकरिता मोठ्या प्रमाणात निधी खर्च करणे बंधनकारक असल्याबाबत.**

पंचायती राज समितीने १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमाक दोन बाबत दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्ह्यातील आंबेगाव पंचायत समितीला भेट दिली असता समितीने पंचायत समिती पदाधिकाऱ्यांशी अनौपचारीक चर्चा केली. चर्चेदरम्यान समितीला जिल्हा परिषद सदस्या श्रीमती वाडेकर यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण समितीमार्फत दीड कोटी रूपये प्रशिक्षणासाठी ठेवणे बंधनकारक आहे. परंतु प्रशिक्षणाचा काहीही उपयोग होत नाही. महिलांचा प्रशिक्षणाला रिस्पॉन्स मिळत नाही. त्यामुळे या समितीला दीड कोटी रूपयांच्या माध्यमातून दुसऱ्या योजना राबविण्याचे अधिकार द्यावेत. महिला व बाल कल्याण समितीच्या पिठाची गिरणी किंवा सौरकंदील अशाप्रकारच्या बऱ्याच योजना कालबाह्य झाल्यामुळे अर्थार्जन करण्यासाठी झेरॉक्स मशिन किंवा इतर आधुनिक योजना दिल्या तर फायदा होऊ शकेल. सौर पथदिव्यांच्या संदर्भात आरसी नसल्यामुळे सर्वच विभागांमध्ये पैसे पडून आहेत. त्यामुळे या संदर्भात निविदा काढण्यास किंवा आरसी करण्यास परवानगी द्यावी. तद्नंतर पंचायत राज सदस्य श्री. गवारी यांनी समितीस विदित केले की, पावसाचे प्रमाण खूप कमी झाले आहे. रोहयोमध्ये जाचक अटी असल्यामुळे लोक काम करीत नाहीत. रोहयोमध्ये पशुपालन, कुक्कुटपालन, कृषी संदर्भातील योजना घ्याव्यात. तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांसाठीही त्यातून योजना घेतल्या तर रोहयोचा पैसा विकास कामांसाठी मार्गी लागेल आणि दुष्काळी स्थितीमध्ये सामान्य माणसांना रोजगार मिळू शकेल. पंचायत समिती स्तरावरील १४ वा वित्त आयोग बंद केला आहे, तो सुरू करावा जेणेकरून कामे होऊ शकतील. यावर समितीने उक्त मुद्द्यावर विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान विचार करण्यात यावा असे निदेश दिले.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून खालील मुद्द्यांची माहिती मागविली.**

समितीने आंबेगाव पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांशी अनौपचारीक चर्चा केली असता (१) जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण समितीमार्फत दीड कोटी रुपये प्रशिक्षणासाठी ठेवणे बंधनकारक असून अशा प्रशिक्षणाचा काहीही उपयोग होत नसल्याचे निदर्शनास आले (२) महिला व बाल कल्याण समिती अंतर्गत पिठाची गिरणी आणि सौरकंदील अशा योजना कालबाह्य झाल्या असून इतर आधुनिक योजनांचा समावेश करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले (३) सौर पथदिव्यांच्या खरेदी करीता दर करार नसल्यामुळे निधी अखर्चित राहिल्याचे निदर्शनास आले (४) चौदाव्या वित्त आयोगाचा निधी वाटप, नियोजन व विनियोग या करीता पंचायत समित्यांना समाविष्ट केले जात नाही असे निदर्शनास आले, सदरहू चारही मुद्यांवर शासनाची भूमिका काय आहे ?

**उपरोक्त मुद्द्यासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीला लेखी माहिती प्राप्त झाली.**

दि.१२/८/२०१५ रोजीचे पंचायती राज समितीचे आंबेगाव भेटी दरम्यान समितीने प्रश्नास केलेले निर्देशापैकी (१) व (२) प्रश्न महिला व बाल कल्याण विभागाशी संबंधित आहेत. या संदर्भात खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आलेले आहेत.

(१) ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय २४/१/२०१५ अन्वये गट " अ " च्या प्रशिक्षण व सक्षमीकरणाच्या योजनासाठी खर्च करावयाच्या ५०% निधी पैकी २०% निधी योजना क्र.१ मधील " मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे " या कौशल्य विकास व व्यावसायिक प्रशिक्षण योजनेवर खर्च करावा. उर्वरित ३०% रक्कम गट " अ " मधील इतर योजनांसाठी खर्च करावी, अशी तरतूद करणेत आलेली आहे.

पंचायती राज समिती प्रश्नावलीच्या अनुषंगाने विभागीय सचिवांच्या साक्षी संदर्भात शासन निर्णय दिनांक २४/०१/२०१४ मधील उपरोक्त शासन निर्णयाचे परिच्छेदामधील प्रशिक्षण व सक्षमीकरणाच्या योजनांसाठी खर्च करवायाच्या ५०% निधी पैकी २०% निधी कौशल्य विकास व व्यवसायिक प्रशिक्षण या योजनेवर खर्च करणेची तरतूद वगळणे विषयी विनंतीचा प्रस्ताव जा.क्र.जिप/ मबाक/ लेखा/ ३८७/२०१५, दिनांक २/११/२०१५ अन्वये ग्राम विकास विभागास पाठविण्यात आलेला आहे.

(२) महिला व बाल कल्याण समितीमार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना या ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.झेडपीए२०१३/प्र.क्र./७६/पंरा-१/ मुबंई, दिनांक २४ जानेवारी, २०१४ अन्वये राबविणेत येतात. या शासन निर्णयामधील अ.क्र. ६ नुसार महिलांना विविध साहित्य पुरविणेचे योजनेमध्ये यामध्ये पिठाची गिरणी, सौर कंदील, शिलाई मशीन, पिको फॉल मशीन असे साहित्य पुरविणेत यावे अशी तरतूद करणेत आलेली आहे. यामुळे सद्यःस्थितीत ग्रामीण भागातील महिलांना पिठाची गिरणी, सौर कंदील, शिलाई मशीन, पिको फॉल मशीन / शिवणयंत्र एवढेच साहित्य पुरवठा करणे शक्य आहे. पंचायती राज समितीचे भेटी दरम्यान दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा परिषदांचे महिला व बाल कल्याण समितीमार्फत खालीलप्रमाणे योजना शासन निर्णयात समाविष्ट करणे योग्य वाटत असल्याबाबत जिल्हा परिषदेकडील प्रस्ताव जा.क्र.जिप/मबाक/लेखा/३८७/२०१५, दिनांक २/११/२०१५ अन्वये ग्रामविकास विभागाकडे सादर करणेत आलेला आहे. या योजना खालीलप्रमाणे आहेत.

(१) महिलांना स्वयंरोजगारासाठी मिरची कांडप मशीन पुरविणे.

(२) महिलांना स्वयंरोजगारासाठी शेवई मशीन पुरविणे.

(३) मुली व महिलांना स्वयंरोजगारासाठी संगणक संच / झेरॉक्स मशीन पुरविणे.

(४) महिलांना कुक्कुटपालन व्यवसायासाठी कोंबडी खुराडा पुरविणे.

(५) महिलांना स्वयंरोजगारासाठी बहुउद्देशीय लोखंडी स्टॉल पुरविणे.

(६) ग्रामीण भागातील महिलांना स्वंयरोजगाराभिमुख व स्वयंपूर्ण होणेसाठी आवश्यक असे साहित्य एकूण अनुदानाच्या १०% मर्यादेत महिला व बाल कल्याण समितीचे मंजुरीने पुरविणे.

प्रश्नावलीतील प्रश्नासंदर्भात वरीलप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे.

**उपरोक्त मुद्दासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे अभिप्राय प्राप्त झाले आहेत.**

(१) जिल्हा परिषदेच्या स्थापन करण्यात आलेल्या महिला व बाल कल्याण समितीने राबवावयाच्या योजनांबाबत ग्रामविकास विभागाचा शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१३/

प्र.क्र. ७६/पंरा-१, दि. २४/०१/२०१४ अन्वये महिला व मुलींना सर्व क्षेत्रात महिला व बाल कल्याण समितीमार्फत जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाच्या १० टक्के निधीतून महिलांसाठी व मुलींसाठी काही योजना राबविण्यात येत आहेत. प्रस्तुत शासन निर्णयान्वये महिलांना व्यवसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देण्याबाबत तरतूद केलेली आहे. सदर योजना जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाच्या १० टक्के स्त्रोतातून भागविल्या जातात. महिला व बाल कल्याण योजनामधील गट-अ च्या प्रशिक्षण व सक्षमीकरण योजनांसाठी समितीच्या एकूण निधीपैकी ५० टक्के आणि गट-ब च्या वस्तू खरेदीच्या योजनेसाठी ५० टक्के निधी खर्च करण्यात येत आहे. जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाचा स्त्रोत राज्याच्या सर्व जिल्हा परिषदेमध्ये कमी-अधिक प्रमाणात असतो. गट-अ च्या प्रशिक्षण व सक्षमीकरण योजनांसाठी खर्च करावयाच्या ५० टक्के निधीपैकी २० टक्के निधी मुलींना व महिलांना व्यवसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे याबाबतील कौशल्य विकास व व्यवसाय प्रशिक्षण योजनेवर खर्च करण्यात येतो व उर्वरित ३० टक्के निधी गट-अ मधील इतर योजनांसाठी खर्च करावा लागतो. प्रस्तुत बाब लक्षात घेता शासन निर्णय दि.२४-०१-२०१४ मधील प्रशिक्षण व सक्षमीकरण योजना समवेत महिला व मुलींना इतर योजना उदा. उद्योजकता विकास व तांत्रिक प्रशिक्षण तसेच ब्युटीपार्लर प्रशिक्षण इत्यादिवर गट-अ खालील पूर्णपणे ५० टक्के तरतूद खर्च करण्याबाबत शासन विचाराधीन आहे.

(२) महिला व बाल कल्याण समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना या जिल्हा परिषदेतील महिला व बाल कल्याण समितीच्या बैठकीत मंजूर करण्यात आलेल्या ठरावाच्या अनुषंगाने घेतल्या जातात. महिला व बाल कल्याण समितीने राबवावयाच्या योजना ह्या मुख्यत्वे ग्रामीण भागातील सद्यःस्थितीला अनुलक्षून असते. शासन निर्णय दि. २४/१/२०१४ मध्ये पिठाची मशीन, पिको फॉल मशीन या साहित्याचा ग्रामीण महिलांच्या मागणीनुसार अंतभूर्त करण्यात आलेले आहे. महिला व बाल कल्याण समितीने राबवावयाच्या योजनेंतर्गत ग्रामीण भागातून महिलांसाठी भविष्यात कोणकोणत्या आधुनिक योजनांचा उपयोग होऊ शकतो याबाबत शासन स्तरावरुन सखोल पडताळणी करुन महिला व बाल कल्याण समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेमध्ये इतर आधुनिक योजनांचा सुध्दा समावेश करणे शासन विचाराधीन आहे.

(३) राज्याचा पारंपरिक ऊर्जेवरील होणारा खर्च व अनुषंगिक नैसर्गिक स्त्रोतांचा ऱ्हास हळूहळू कमी होऊ शकेल. त्यानुसार राज्यात ग्रामपंचायतीतील रस्त्यांवर सौर पथदिवे बसविण्याबाबतचा शासन निर्णय क्र. सौउदि-२०१०/प्र.क्र.१४/पंरा-९, दि. २७/१०/२०१० निर्गमित करणेत आला.

" सन २०१०-२०११ ते २०१२-२०१३ या वर्षात ८१४७ सौरपथदिवे उभारण्यात आले आहेत. सन २०१३-२०१४ मध्ये ८८५० इतक्या सौरदिव्यांकरीता शासन निर्णय दि. २५/०३/२०१४ अन्वये रु.५,८०,७०,८८०/- व शासन निर्णय दि.२८/०३/२०१४ अन्वये रु.१,९९,८६,१२०/- असा एकूण रु ७,८०,५७,०००/- इतका निधी वितरीत करणेत आलेला आहे."

सन २०१३-१४ मध्ये सदर निधी खर्च झालेला नाही. सन २०१३-१४ करीता या आर्थिक वर्षासाठी दि.४/३/१४ च्या शासन निर्णयान्वये महाऊर्जाच्या सन २०१३-१४ च्या दरपत्रकात समावेश असलेल्या संस्थांची जिल्हानिहाय निवड करणेत आलेली होती. परंतु सन २०१२-१३ या वर्षासाठी केंद्र हिस्सा निधी मागणीच्या दि.२८/०२/२०१४ रोजी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणमार्फत पाठविणेत आलेल्या प्रस्तावास केंद्र शासनाकडून मंजुरी प्राप्त झालेली नाही. तसेच सन २०१३-१४ हे आर्थिक वर्ष उलटून गेले असल्यामुळे महाऊर्जाच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या दरकरारपत्रकाची मुदत संपुष्टात आली असल्यामुळे शासन पत्र दि. १/१०/२०१४ रोजी उपरोक्त शासन निर्णयान्वये करण्यात आलेली संस्था निवड रद्द करणेत आलेली आहे.

(४) केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थाकरीता राज्यांना सहाय्यक अनुदान प्राप्त होते. प्राप्त अनुदानाबाबत केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशींच्या आधारे केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार निधीवितरणाचे निकष व वितरीत निधी खर्च करण्यासंदर्भातील धोरणात्मक निर्णय शासनाकडून घेण्यात येतो.

१४ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाकडून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता राज्याला अनुदान उपलब्ध करुन देताना त्याच्या विनियोगाबाबत केंद्र

शासनाकडून देण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचना व धोरणात्मक तरतुदीनुसार राज्य स्तरावर त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक असते. या संदर्भातील केंद्र शासनाच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन निधीच्या विनियोगाच्या कार्यपध्दतीसंबंधीचा सविस्तर जाणीवपूर्वक धोरणात्मक निर्णय शासनाकडून घेण्यात येईल.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी विचारणा केली की, पंचायत समिती, आंबेगाव या चर्चेमध्ये समितीने जे मुद्दे उपस्थित केले होते, त्या सर्व बाबींची तपासणी करून त्यासंबंधी योग्य ती कारवाई करण्यात यावी. समितीने जर त्यावर काही आक्षेप घेतले असतील तर त्यावर योग्य ती कार्यवाही होणे अपेक्षित आहे. लाभार्थ्यांना लाभ होणे आवश्यक आहे. प्रशिक्षणावर इतक्या मोठ्या प्रमाणावर खर्च होत असेल तर ते योग्य नाही. प्रशिक्षणाविषयी आजपर्यंत राज्यात काय तर देशातही कोणी चांगले मत देणार नाही अशी परिस्थिती आहे असे समितीने विदित केले त्यावर उपसचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, या योजनेमध्ये ५० टक्के प्रशिक्षण आणि ५० टक्के सक्षमीकरणाकरिता खर्च करण्यात यावे, असा नियम आहे. ऑन जॉब ट्रेनिंगचाही यामध्ये समावेश आहे. २० टक्के ऑन जॉब ट्रेनिंग करिता खर्च करण्यात यावा, असे नियमात आहे. लायव्हलीहुड एक्स्पेंडिचरचा हा कंपोनंट आहे. याकरिता २० टक्के खर्चाची जी.आर.मध्ये स्पष्ट तरतूद आहे. गट-अ वरील प्रशिक्षणाचा खर्च जर १ कोटी रुपयांच्या वर जात असेल तर वरील रक्कम खरेदीकरिता वळविण्याची मुभा जी.आर.मध्ये देण्यात आलेली आहे. पुण्यासारख्या प्रगत जिल्ह्यामध्ये लायव्हलीहुड मिशन अंतर्गत महिला बचत गटांची स्थापना करण्यात आलेली आहे. यामध्ये कौशल्य विकास, उत्पादन व मार्केटिंगचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच, यामध्ये पॅकेजींगचेही ट्रेनिंग देण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यामध्ये मिटकॉम व यशदा सारख्या संस्थेमार्फत चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, पुण्यासारख्या जिल्ह्यात एवढे चांगले प्रशिक्षण दिले जाते. पुण्यासारख्या विद्येचे माहेरघर असलेल्या जिल्ह्यामध्ये अनेक तज्ज्ञ आहेत. मागास जिल्ह्यामध्ये अशा प्रकारच्या उत्तम प्रतीच्या प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. राज्यातील मागास जिल्ह्यांमध्ये दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाच्या दर्जामध्ये वाढ होणे आवश्यक आहे. यावर प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला अशी माहिती दिली की, संदर्भातील शासन निर्णयामध्ये खरेदी व प्रशिक्षणावरील खर्च आवश्यकतेप्रमाणे वळविण्याची मुभा देण्यात आलेली आहे. तसेच, महिलांना चांगल्या प्रकारे प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्याकरिताही या परिपत्रकामध्ये तरतूद केलेली आहे.

त्यावर समितीने अशी विचारणा केली की, काही ठिकाणी सेसमधील निधी पूर्णपणे योजनेवर खर्च केला जात नाही. दोन्ही जिल्हा परिषदांमध्ये एक कोटींपेक्षा जास्त निधी केवळ प्रशिक्षणावर खर्च केला जात आहे. प्रशिक्षणावर अधिक प्रमाणात खर्च करणे सयुक्तिक वाटत नाही. प्रशिक्षणाकरिता एक कोटी रुपयांचा खर्चही काही कमी होत नाही. यामध्ये जी ५० टक्क्यांची अट आहे, ती रिवाईज्ड करण्यात यावी. परंतु प्रशिक्षणाचा दर्जा व प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेचीही तपासणी होणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रशिक्षणाच्या वेळी एकच लिंक आणि एकच हॉटेल असे सर्व ठरलेले असते. प्रशिक्षणामुळे किती लोक खऱ्या अर्थाने प्रशिक्षित झाले, त्यांचे कौशल्य विकसित झाले का, प्रशिक्षणामुळे रोजगार उपलब्ध झाला का, याचेही मूल्यांकन होणे आवश्यक आहे. प्रशिक्षणाच्या दर्जाचा व उद्दिष्ट पुर्तीचे मूल्यांकन व आढावा घेणे आवश्यक आहे. प्रशिक्षणाचे ऑडिट करुन प्रशिक्षण घेतलेल्यांची परिस्थिती काय आहे, याचाही आढावा घेणे आवश्यक आहे. यावर समितीला पुढे अशी माहिती देण्यात आली की, प्रशिक्षणावरील खर्च जर एक कोटी रुपयांपेक्षा जास्त वाढत असेल तर तो खरेदीकरिता वळविण्याची मुभा जी.आर.मध्ये दिलेली आहे. लायव्हलीहुड ट्रेनिंगकरिता असलेला निधी स्वयंअर्थ सहाय्यिता बचत गटांना जर केंद्र शासनाकडून निधी आला नाही तर प्रशिक्षणाच्या खर्चातून तो भागविता येतो. १०० टक्के खर्च केवळ खरेदीकरिता लावला तर त्यातून आऊटपूट निघणार नाही. त्यापैकी ५० टक्के खर्च जर प्रशिक्षणाकरिता केला तर त्यातून चांगल्या प्रतीचे आऊटपूट निघू शकते.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्ह्यातील आंबेगाव पंचायत समितीस भेट देवून पंचायत समिती पदाधिकाऱ्यांशी अनौपचारीक चर्चे दरम्यान समितीच्या निदर्शनास काही बाबी आणून देण्यात आल्या. समितीने जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण समितीमार्फत दीड कोटी रुपये प्रशिक्षणासाठी ठेवणे बंधनकारक असून अशा प्रशिक्षणाचा काहीही उपयोग होत नसल्याचे निदर्शनास आले, महिला व बाल कल्याण समिती अंतर्गत पिठाची गिरणी आणि सौरकंदील अशा योजना कालबाह्य झाल्या असून इतर आधुनिक योजनांचा समावेश करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले. सौर पथदिव्यांच्या खरेदी करीता दर करार नसल्यामुळे निधी अखर्चीत राहिल्याचे निदर्शनास आले, चौदाव्या वित्त आयोगाचा निधी वाटप, नियोजन व विनियोग या करीता पंचायत समित्यांना समाविष्ट केले जात नाही असे निदर्शनास आले, सदरहू चारही मुद्यांवर शासनाची भूमिका काय आहे. या संदर्भात जिल्हा परिषदेकडून माहिती मागविली. प्रशिक्षण व सक्षमीकरणाच्या योजनांसाठी खर्च करवायाच्या ५०% निधी पैकी २०% निधी कौशल्य विकास व व्यवसायीक प्रशिक्षण या योजनेवर खर्च करणेची तरतुद वगळणेबाबत प्रस्ताव ग्रामविकास विभागाकडे पाठविण्यात आलेले आहे असे जिल्हा परिषदेने कळविले आहे. त्यावर ग्रामविकास विभागाने शासन निर्णय दि.२४-०१-२०१४ मधील प्रशिक्षण व सक्षमिकरण योजना समवेत महिला व मुलींना इतर योजना उदा. उद्योजकता विकास व तांत्रिक प्रशिक्षण तसेच ब्युटीपार्लर प्रशिक्षण इत्यादिवर गट-अ खालील पूर्णपणे ५० टक्के तरतूद खर्च करण्याबाबत शासन विचाराधीन असल्याचे समितीस कळविले आहे. जिल्हा परिषदेने मंजुरीने पुरविण्यात यावेत असे कळविलेले आहे. त्या प्रस्तावा संदर्भात ग्रामविकास विभागाने महिला व बाल कल्याण समितीने राबवावयाच्या योजनेंतर्गत ग्रामीण भागातून महिलांसाठी भविष्यात कोणकोणत्या आधुनिक योजनांचा उपयोग होऊ शकतो याबाबत शासन स्तरावरुन सखोल पडताळणी करुन महिला व बाल कल्याण समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेमध्ये इतर आधुनिक योजनांचा सुध्दा समावेश करणे शासन विचाराधीन आहे असे कळविले आहे. सौर पथदिव्यांच्या खरेदीवरील सन २०१३-१४ च्या दरपत्रकात समावेश असलेल्या संस्थांची जिल्हानिहाय निवड करणे आलेली होती. परंतु सन २०१२-१३ या वर्षासाठी केंद्र हिस्सा निधी मागणीच्या दि.२८/०२/२०१४ रोजी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणमार्फत पाठविणेत आलेल्या प्रस्तावास केंद्र शासनाकडून मंजुरी प्राप्त झालेली नाही. तसेच सन २०१३-१४

हे आर्थिक वर्ष उलटून गेले असल्यामुळे महाऊर्जाच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या दरकरार पत्रकाची मुदत संपुष्टात आली असल्यामुळे शासन पत्र दि. १-१०-२०१४ रोजी उपरोक्त शासन निर्णयान्वये करण्यात आलेली संस्था निवड रद्द करणेत आलेली आहे असे ग्रामविकास विभागाने कळविले आहे. १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या निधी ग्रामविकास विभागाने संदर्भातील केंद्र शासनाच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन निधीच्या विनियोगाच्या कार्यपध्दतीसंबंधीचा सविस्तर जाणीवपूर्वक धोरणात्मक निर्णय शासनाकडून घेण्यात येईल असे कळविले आहे. **शासन निर्णय दि.२४-०१-२०१४ मधील प्रशिक्षण व सक्षमिकरण योजना समवेत महिला व मुलींना इतर योजना उदा. उद्योजकता विकास व तांत्रिक प्रशिक्षण तसेच ब्युटीपार्लर प्रशिक्षण इत्यादि व गट-अ खालील पूर्णपणे ५० टक्के तरतूद खर्च करण्याबाबत शासन विचाराधीन आहे उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता जिल्हा परिषदेने केवळ प्रशिक्षणावर सुमारे दिड कोटी रुपयांची तरतूद करणे हे अत्यंत गंभीर असुन अनाकलनीय आहे. ज्या उद्देशाने शासनाने महिलांच्या विविध कल्याण योजना राबविण्याची जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात तरतुदीतून १० % निधी राखुन ठेवला जातो. त्याच्यां उद्देशाला ठेच लागत आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. राज्यातील जिल्हा परिषदा मोठ्या प्रमाणावर महिलांच्या प्रशिक्षणासाठी निधी राखुन ठेवीत असुन असे प्रशिक्षण हे अशासकीय संस्थाव्दारा दिले जाते. समितींचा या अशासकीय संस्थाव्दारा प्रशिक्षण देण्यास तीव्र आक्षेप आहे कारण यातुन अनेक गैरव्यवहार जन्मास येत आहेत असे समितीचे ठाम मत आहे. तेव्हा प्रशिक्षण देण्यात केवळ शासनमान्य संस्थाकडूनच जसे यशदा, वनामती इ. द्वारा देण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे. तसेच पूणे जिल्हा परिषदेने सुमारे दिड कोटी रुपये प्रशिक्षणासाठी खर्च करणे अथवा राखून ठेवणे या प्रकरणी कोणत्याही प्रकारची जिल्हा परिषदेने चौकशी केली नाही. यात समितीस संशय वाटत असल्याने याबाबतची सखोल चौकशी करण्यात यावी. व तरतूद केली असल्यास आणि अशी तरतूद खर्च केली नसल्यास ती महिलांच्या विविध कल्याणकारी योजनांसाठी खर्च करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**त्याचप्रमाणे पूणे जिल्हा परिषदेने ज्या सदर योजनांचा शासन निर्णयात समावेश करावा असे पत्राव्दारे कळविले आहे त्या योजनांचा उक्त शासन निर्णयात समावेश करण्याबाबत शासनाने सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन विचार करावा अशीही समितीची आग्रहाची शिफारस आहे. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावी.**

प्रकरण एकोणीस

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### पुणे जिल्ह्यातील अंगणवाड्याचा उपक्रम राज्यभर राबविण्याबाबत.

पंचायती राज समितीने दिनांक १०ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ यावर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवाला वरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक दोन बाबत दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी पुणे जिल्ह्याला भेट दिली असता, समितीला पुणे जिल्ह्यातील अंगणवाड्यांचे कामकाज अत्यंत नाविन्य पूर्ण, स्वतंत्र्य अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, विद्यार्थी केंद्रीत आढळून आले त्यानुषंगाने समितीने दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या साक्षी दरम्यान याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली असता, यावर मुख्य कार्यकारी यांनी असा खुलासा केला की, अंगणवाडीमध्ये इंग्रजी माध्यमासारखेच शिक्षण देण्याचा नवीन प्रयोग केला जात असून विद्यार्थ्यांना अतिशय उत्तम प्रकारे शिक्षण देण्यात येत आहे. राज्यभरामध्ये हा उपक्रम राबवावा इतका चांगला हा उपक्रम पुण्यात सुरू आहे. विद्यार्थ्यांची घट होऊ नये यासाठी या प्रकारचा उपक्रम पर्याय होऊ शकतो.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला पूढे विदित केले की, जोपर्यंत आपण इंग्रजी माध्यमाला पर्याय देत नाही तोपर्यंत विद्यार्थी संख्येमध्ये घट होत राहणार. अनेक ठिकाणी अंगणवाड्यांना लोकांनी लोकवर्गणीतून पैसे जमा करुन खुर्च्या व टेबल भेट दिले आहेत, ही बाब अतिशय प्रशंसनीय व कौतुकास्पद आहे. याप्रकारचे धोरण राज्याने स्वीकारले तर जिल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी होऊ नये यासाठी हा एक उत्तम पर्याय होऊ शकतो. यावर समितीने अशी विचारणा केली की, प्रत्येक वेळी जिल्हा परिषदेचे अधिकारी विकास कामासाठी निधीची कमतरता असल्याची सबब सांगत असतात. अनेक ठिकाणी अंगणवाडी प्रशिक्षणासाठी करण्यात आलेली तरतूद शिल्लक आहे, शिक्षणाकरिता तरतूद शिल्लक असेल तर ती रक्कम वळवून ई-लर्नींग सारख्या उपक्रमासाठी उपलब्ध करुन दिली पाहिजे व शिल्लक निधीचा खर्च केला पाहिजे. हा खर्च केला नाही तर जिल्हा परिषदेस सदर निधी कमी प्रमाणात मिळत

राहील. याकरिता पुढील काळामध्ये जिल्हा परिषदेचे धोरण काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले की, सन २०१२-१३ मधील वार्षिक अहवाल पृष्ठ क्रमांक ६ व ७ चे आपण अवलोकन केल्यास असे दिसून येईल की, मागील वर्षीचा निधी चालू वर्षी व चालू वर्षीचा निधी पुढील वर्षी खर्च करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सदरचे नियोजन हे २ वर्षांसाठी करण्यात येते व जवळपास ९९.९९ टक्के निधी खर्च करण्यात येतो.

समितीने इंदापूर येथील शाळेतील कृतीयुक्त अध्ययन पध्दत कार्यक्रमाची माहिती घेतली. सदरचा उपक्रम अतिशय चांगला आहे. प्रत्येक विषयाकरिता एक स्वतंत्र वर्ग आहे, विद्यार्थी पहिल्या विषयाचा तास संपल्यानंतर दुसऱ्या विषयाच्या वर्गात जाऊन बसतात व तेथे त्यांना तो विषय शिकविण्यात येतो. विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठी ही अतिशय चांगली पध्दत आहे. सदर विषयाबाबत समितीला सखोल माहिती देण्यात यावी. तसेच, समितीने सदरील उपक्रम राज्यस्तरावर राबविण्याकरिता हा विषय विभागाच्या सचिवांच्या साक्षीच्या वेळी चर्चेस घेईल असे समितीने प्रतिपादन केले.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून खालील मुद्दयांची माहिती मागविली.**

समितीने जिल्ह्यातील ज्या अंगणवाड्यांना भेट दिली त्यावेळी सदर अंगणवाड्यांचे कामकाज अत्यंत नाविन्यपूर्ण, स्वतंत्र अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, विद्यार्थी केंद्रीत व समाधानकारक आढळून आले आहे अतः अंगणवाड्यांचा पुणे पॅटर्न राज्यभर अंमलात आणण्याकरिता शासनाची भुमिका काय आहे ?

**समितीस जिल्हापरिषदे कडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

दि. १३-८-२०१५ रोजी पंचायती राज समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या आर्थिक प्रशासन अहवालाचे संदर्भात विभाग प्रमुखाचे साक्षवेळी पंचायत राज समितीने या संदर्भात केलेले निर्देशानुसार खालील प्रमाणे अहवाल महिला व बाल विकास विभागास जा.क्र. जि.प/मबाग/लेखा/३६८/२०१५,दिनांक २-११-२०१५ अन्वये सादर केलेला आहे.

सद्यस्थितीत पालक आपल्या बालकांना इंग्रजी माध्यम शाळेत अथवा खाजगी शाळेमध्ये फी भरुन शिकविण्यास प्राधान्य देतात. अंगणवाडीतील पूर्वप्राथमिक शिक्षणाचा दर्जा टिकवून ठेवणे व वाढविणे या अनुषंगाने जिल्हा परिषदेने आदर्श अंगणवाडी संकल्पना अंमलात आणली आहे. आदर्श अंगणवाडी केंद्रामध्ये प्रत्येक मुलास गणवेश, ओळखपत्र, बसण्यासाठी बेबी चेअर, जेवणासाठी लहान डायनिंग टेबल, बालकांच्या मनोरंजनासाठी व शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी खास अभ्यासक्रम टि. व्ही., डी.व्ही.डी. संगणक, स्वच्छनिर्जंतूक पिण्याचे पाण्यासाठी वॉटर फिल्टर, तसेच चित्ररुपी बोलकी अंगणवाडी (बोलक्या भिंती) इ. गोष्टीचा समावेश करण्यात आलेला आहे. ही संकल्पना पुर्णपणे लोक सहभागातून राबविणेत आलेली आहे. एकंदरीत १३१६.०० लक्ष इतका लोकसहभाग या कामासाठी विविध माध्यमातून मिळालेला आहे. अंगणवाडी सेविकांच्या व मदतनीस यांच्या सक्रीय सहभाग असल्याने त्यांच्याबद्दल समाजात व प्रशासनामध्ये मोठया प्रमाणात आदर वाढीस लागला आहे.

या उपक्रमामुळे अंगणवाडीमध्ये बालकांची अंगणवाडीतील उपस्थिती वाढली व एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील लोकसहभाग वाढलेला आहे.

**उपरोक्त मुद्दयासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून माहिती प्राप्त झाली.**

पुणे जिल्ह्यातील अंगणवाडयांचा उपक्रम राज्यभर राबविणेबाबत समितीने जिल्ह्यातील ज्या अंगणवाड्यांना भेट दिली त्यावेळी सदर अंगणवाड्यांचे कामकाज अत्यंत नाविन्यपूर्ण, स्वतंत्र अभ्यासक्रम, पाठयपुस्तके, विद्यार्थी केंद्रीत व समाधानकारक आढळून आले आहे. आता अंगणवाड्यांचा पुणे पॅटर्न राज्यभर अंमलात आणण्याकरिता त्याचा आराखडा व त्यासंबंधी इतर मुख्य बाबी याबाबतची कार्यवाही महिला व बाल कल्याण विभागाकडून करण्यात येत असल्याने या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना त्याबाबतचा अहवाल महिला व बाल कल्याण विभागास पाठविण्याबाबत ग्राम विकास विभागाकडून निर्देशित करण्यात येईल व महिला व बाल कल्याण विभागास याप्रमाणे अंमलबजावणी करण्याबाबत विनंती करण्यात येईल.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली उक्त साक्षीच्या वेळी या विषयाबाबत विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, पुणे जिल्ह्यात अंगणवाडीचा कार्यक्रम राबविलेला आहे. आपल्याकडे जवळपास १ लाख अंगणवाड्या आहेत त्यापैकी जवळपास ५० टक्के अंगणवाड्या स्वत:च्या इमारतीमध्ये आहेत. उर्वरित अंगणवाड्या भाड्याच्या इमारतीमध्ये आहेत. काही जिल्ह्यांनी अंगणवाड्यांच्या बाबतीत स्वंयपुढाकार घेऊन मोठ्या प्रमाणावर लोकांना सहभागी करून घेतले आहे. औरंगाबाद जिल्ह्यामध्ये जवळपास ५०० अंगणवाड्यांचे लोकांच्या सहभागातून स्ट्रेन्दनिंग करण्यात आले. औरंगाबाद जिल्ह्यातील जवळपास ५०० अंगणवाड्यांना आयएसओ ९००० प्रमाणपत्र मिळालेले आहे. तशाच प्रकारचा उपक्रम पुणे जिल्ह्यामध्ये राबविण्यात आला आणि तो उपक्रम यशस्वी झालेला आहे. लोकांच्या सहभागातून असा प्रयोग यशस्वी होऊ शकतो काय,शासकीय स्तरावर अशाप्रकारचा धोरणात्मक निर्णय घेता येईल काय याबाबत विचार करण्यात आला. आमच्याकडे तसा प्रस्ताव आला, आम्ही त्याबाबत अभ्यास करून यामध्ये लोकांना सहभागी करून घेण्या संदर्भातील धोरण तयार करण्याचे काम सुरू केले आहे. ते धोरण पुढील पाच सहा महिन्यांत मूव्ह करणार आहोत. केंद्र सरकारने सुद्धा मॉडेल अंगणवाडीसाठी जवळपास ४ हजार वेंदातसोबत करार करून उपक्रम राबविण्याचे योजले आहे. आम्ही त्याच धर्तीवर महाराष्ट्रात धोरण आणण्याचा प्रयत्न करीत आहोत.

समितीला अनेक जिल्हापरिषदांचा दौरा केला आणि त्या दौऱ्यामध्ये पुणे जिल्ह्यातील मॉडेलचा उल्लेख केला. पुणे जिल्ह्यामध्ये लोकांच्या सहभागातून अंगणवाड्यांचा विकास करण्यात आलेला आहे. पुणे जिल्ह्यातील अंगणवाडीचे मॉडेल आणि औरंगाबाद जिल्ह्यातील अंगणवाड्यांचे मॉडेल यांचे एकत्रित मॉडेल तयार करून ते महाराष्ट्राच्या उर्वरित जिल्ह्यामध्ये राबविता येईल काय, अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, आम्ही या संदर्भात एक प्रारूप अहवाल तयार केलेला आहे, तो प्रारूप अहवाल समितीला सादर करण्यात येईल. त्या प्रारूपासंबंधी समितीच्या काही सूचना असतील तर त्या आपण सांगाव्यात.

समितीने प्रतिपादन केले की, पुणे जिल्ह्यामध्ये अंगणवाड्यांच्या संदर्भात जे काम करण्यात आलेले आहे त्यामध्ये अधिकाऱ्यांचे योगदान आहे. स्थानिक गावकऱ्यांची मदत घेण्यासाठी जो ॲटीट्युड निर्माण करावा लागतो तो पुणे जिल्ह्याने केलेला आहे. तशाप्रकारचा ॲटीट्युड इतर जिल्हे सुद्धा करू शकतात. त्यासाठी राज्य स्तरावर काही प्रयत्न झाले पाहिजेत. पुणे जिल्ह्यातील अधिकारी लोकांना एकत्रित करून काम करू शकतात तर इतर जिल्ह्यातील अधिकारी तसे काम का करीत नाहीत? समितीने हा विषय राज्य स्तरावर मांडण्याचा विचार केला. पुणे जिल्ह्यात अंगणवाड्यांच्या संदर्भात जे काम करण्यात आले ते राज्यातील इतर जिल्ह्यात करण्यात आले तर सर्वत्र सारखेपणा येईल. पैठणजवळील अंगणवाडी अतिशय सुंदर आहे. पुणे जिल्ह्यामध्ये अशा सर्रास शाळा पहावयास मिळाल्या. अंगणवाड्या चांगल्या झाल्यामुळे लोक आपल्या मुलांना बालवाड्यांमध्ये पाठवू लागले. इंग्रजी माध्यमांच्या शाळेत जाणाऱ्यांचा ओघ इकडे आला. जिल्हापरिषदेच्या शाळा आणि बालवाड्या ओस पडत चालल्या आहेत, तेव्हा शाळा आणि बालवाड्या चालल्या पाहिजेत या दृष्टीने काम केले पाहिजे. आपणास खाजगी शाळेच्या तोडीचा दर्जा निर्माण करण्यासाठी शासनामार्फत तसे प्रयत्न व्हावेत, असा उद्देश आहे. विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, समितीची भुमीका अतिशय योग्य आहे. मराठवाड्यामध्ये ५०० अंगणवाड्यांना आयएसओ ९००० प्रमाणपत्र मिळालेले आहे. ज्या अधिकाऱ्यांनी मोटीव्हेटेड होऊन पुढाकार घेतला आणि ते यशस्वी झालेले आहेत. या संदर्भात सर्वंकष विचार करून राज्य स्तरावर मोटीव्हेट करण्याच्या दृष्टीने आणि ते मॉडेल कसे रिप्लीकेट करता येईल, यामध्ये कोणकोणत्या प्रोसेस आहेत या सर्व बाबी आपण प्रशिक्षणामध्ये घेणार आहोत. समितीने प्रस्तावित मसुदा समितला नागपूर अधिवेशनापूर्वी तो मुसदा दिला तर समितीला निश्चितपणे शिफारस करता येईल. असे निदेश दिले असता विभागीय सचिंवानी पुढील आठ दिवसांत समितीला माहिती सादर करण्यात येईल. असे आश्वासन दिले.

पुणे जिल्ह्यातील काही अंगणवाड्या पाहिल्यानंतर समितीने भूमिका मांडली. पुणे जिल्ह्यामध्ये बोलक्या अंगणवाड्या तयार केलेल्या आहेत. पुणे जिल्ह्यामध्ये एकूण ४ हजार ५८९ अंगणवाड्या आहेत. त्यापैकी सुमारे २५०० बोलक्या अंगणवाड्या आम्ही

केलेल्या आहेत. याचे श्रेय द्यायचे असेल तर ते अंगणवाडी सेविका आणि अंगवाडी मदतनीस यांना द्यावे लागेल. यामध्ये दुसरी महत्वाची बाब अशी की, हे सर्व लोकसहभागातून तयार केलेले आहे. तिसरी महत्वाचा बाब अशी की, अंगणवाडी सेविका आणि अंगणवाडी मदतनीस यांनी लोकसहभागातून साडेतेरा कोटी रुपये जमा केले आहेत. अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस यांच्याकडे कोणतेही काम सोपवा ते मोठ्या निर्धाराने आणि आपला शब्द खाली पडू न देण्याची भूमिका त्यांनी घेतलेली आहे, इतकी प्रोत्साहित ही यंत्रणा झालेली आहे. त्यानंतरचा आमचा प्रयोग असा होता की, आम्ही दोन वर्षांसाठी एक मराठी अभ्यासक्रम तयार केला. या ठिकाणी सांगण्यात आले की, आपणास इंग्रजी माध्यमाकडे जाणारा ओघ थांबवावयाचा आहे. आपण अंगणवाडी पातळीवर थांबवू शकलो तरच आपल्या जिल्हापरिषदेच्या शाळांमध्ये मुले दाखल होतील अशाप्रकारची परिस्थिती आहे म्हणून आम्ही मागील तीन वर्षांपासून मराठी अभ्यासक्रम राबवित असलो तरी पायलट बेसिसवर आम्ही मावळ तालुका घेतलेला आहे. ज्या पद्धतीने इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये अभ्यासक्रम शिकवला जातो त्या धर्तीवर तो अभ्यासक्रम तयार केलेला आहे, त्याचा अवलंब आम्ही करीत आहोत.

विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, आम्ही समितीस आठ दिवसांत मसुद्याची माहिती देतो. शाळांमध्ये इन्व्हॉल्व्हमेंट होण्याच्या दृष्टीने पीसफूल एज्युकेशनच्या कम्पोनन्टवर भर देण्याची गरज आहे. शालेय शिक्षणाचे सचिव आणि आमच्या विभागाचे अधिकारी एकत्रित बसून प्री-स्कूल एज्युकेशनमध्ये कोणकोणते करिक्युलम असावे, ॲक्टीव्हीटी बेस कोणकोणता अभ्यासक्रम असावा तो आम्ही निश्चित केलेला आहे. तो अभ्यासक्रम आम्ही त्या मुसद्यामध्ये टाकणार आहोत. आम्ही तो मसुदा समितीस आठ दिवसांत देतो.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत पूणे जिल्हा परिषदेला भेट दिली असता समितीला पुणे जिल्ह्यातील अंगणवाड्यांचे कामकाज अत्यंत नाविन्य पूर्ण, स्वतंत्र्य अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, विद्यार्थी केंद्रीत आढळून आले. अंगणवाड्यांचा

हा पूणे पॅटर्न संपूर्ण राज्यात अमलात आणण्याकरीता शासनाची भूमिका विचारण्याकरीता समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली आंगणवाडी सेवीका आणि मदतनीस यांनी लोक सहभागातून साडेतेरा कोटी रुपयांचा निधी जमा केला. जिल्ह्यातील ४,५८९ अंगणवाड्या त्यापैकी २५०० बोलक्या अंगणवाड्या तयार केलेल्या आहेत. पूणे जिल्हा परिषदेने दोन वर्षांचा विशेष मराठी अभ्यासक्रम सुध्दा तयार केला आणि मावळ तालुक्यात प्रायोगीक तत्वावर इंग्रजी माध्यमाचा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. अशा प्रकारचा उपक्रम संपूर्ण राज्यात सुरु करण्याकरीता समितीने विभागीय सचिवांना विचारणा केली असता त्यांचेकडून अत्यंत सकारात्मक प्रतिसाद समितीस प्राप्त झाला. पूणे जिल्हा परिषदेकडून माहिती घेवून त्याबाबत लोकांना सहभागी करुन घेण्यासंदर्भातील धोरण पूढील पाच सहा महिन्यांत मान्य करण्यात येईल, सदर धोरणाचा मसुदा पंचायती राज समितीच्या सूचनांचा त्यात अंतर्भाव करण्यासाठी नागपूर अधिवेशनापूर्वी समितीला देखील सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासीत केले.

**विभागीय सचिवांच्या आश्वासनानुसार लोक सहभागातुन अंगणवाड्या या धोरणाचा मसुदा नागपूर अधिवेशनापूर्वी समितीस आश्वासीत करुनही समितीस प्राप्त झाला नाही. तथापि अंगणवाड्यांचा पूणे पॅटर्न राज्यभर लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यासंदर्भात विभागाने हे धोरण निश्चित करण्यासंदर्भात पावले उचलावीत यात लोक सहभाग अत्यंत महत्वाचा असल्याने त्याबाबत अत्यंत जागरुकतेने निर्णय घेणे आवश्यक असून यात शासनाकडून अधिकचा निधी जाणार नाही याची काळजी विभागाने घ्यावी. औरंगाबाद आणि पुणे येथील अंगणवाडयासंदर्भात राज्याच्या इतर जिल्ह्यात देखील हा उपक्रम सकारात्मक दृष्टीने राबविण्यासंदर्भात प्रसार आणि प्रचार करुन त्या दृष्टीने सकारात्मक प्रयत्न करुन निर्णय घ्यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

प्रकरण वीस

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### राज्यातील सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांना ड्रेस कोड लागू करण्याबाबत.

पंचायतीराज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत पुणे जिल्हापरिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक एक बाबत दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या दरम्यान समितीने सूचना केली की, रायगड जिल्ह्यात शिक्षक वर्ग आहे, तेथे सकाळी १०.३० वाजता शाळा भरते आणि संध्याकाळी ५ वाजता सुटते, बरेच शिक्षक असे होते जे शाळेच्या वेळेत येत नव्हते आणि शाळेच्या वेळेपूर्वी निघून जात होते, कधी कधी ते दुपारच्या वेळेत बाजारात फिरत असायचे. रायगड जिल्हा परिषदेने त्यामुळे त्यांच्यासाठी ड्रेस कोड केला आहे. विद्यार्थ्यांप्रमाणे स्त्री शिक्षिकांना व पुरूष शिक्षकांना ड्रेस कोड केला आहे, त्यामुळे अगोदर जे काही प्रकार घडत होते ते बऱ्याच प्रमाणात कमी झाले आहेत. ड्रेसमुळे शिक्षक लगेच ओळखले जातात आणि मग ते कोणत्या शाळेचे आहेत याची चौकशी होते. परिणामी शिक्षकांचे शाळेच्या वेळेत बाहेर जाणे हे प्रकार कमी झाले आहेत, त्यांच्यावर दडपण आले आहे. आपण या ड्रेसमध्ये बाजारात गेलो तर दिसून येऊ अशी भावना त्यांच्यामध्ये तयार होऊ लागली आहे. त्यामुळे समितीने सूचना केली की, योग्य वाटली तर त्या सूचनेचा पूणे जिल्हा परिषदेच्या शाळांतील शिक्षक वर्गासाठी उपयोग करावा.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ड्रेस कोडची अतिशय चांगली सूचना मांडली. जिल्हा परिषद स्तरावरून एखादी गोष्ट सुरू करता येते. परंतु ज्यावेळी संख्या जास्त असते त्यावेळी विश्वास तयार करून ती योजना राबवावी लागते. आम्ही जरूर जिल्हा परिषद स्तरावरील शिक्षक संघटनांच्या पातळीवर चर्चा करून त्यांच्या निदर्शनास ही बाब आणून आमचे पदाधिकारी प्रशासन सहकार्याने त्यांच्याशी चर्चा करून ड्रेस कोड लागू करण्याच्या संदर्भात नक्की विचार करू.

समितीच्या मते ड्रेस कोड ही काही योजना नाही. संघटनेशी विचार करण्याची गरज नाही. हा शिस्तीचा विषय आहे. राज्यातील अनेक जिल्हा परिषदांमध्ये ड्रेस कोड आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अध्यक्ष आणि समिती सभापती यांनी ठरवून जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव केला तर तो सर्वानुमते मंजूर होईल. आक्षेप घेण्याची गरज नाही. शिक्षकांचे पगार ४१ हजार रूपयांच्या वर झाले आहेत. उप शिक्षकांचा पगार तर जवळपास ३५ हजार रूपये आहे, मुख्याध्यापकांना त्यांच्या श्रेणीप्रमाणे ५० हजार रूपयांच्या जवळपास पगार झाला आहे. त्यामुळे शिक्षक हे त्या पगाराप्रमाणे असावेत असे समितीने प्रतिपादन केले.

**समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून खालील मुद्दयांची माहिती मागविली.**

समितीने जिल्हापरिषदेच्या शिक्षकांकरिता गणवेश देण्याबाबत सूचना केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यावर सकारात्मक उत्तर दिलेले आहे त्यानुसार गणवेश देण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे ?

**समितीस जिल्हापरिषदे कडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांना एकाच प्रकारचा ड्रेसकोड लागू करणे बाबत जि.प.सर्वसाधारण सभा दि. ३-८-२०१० ठ.क्र. ५८१ अन्वये या संदर्भात ठराव करणेत आला होता. तथापि शिक्षक संघटनांनी याबाबत विरोध दर्शविला असल्याने याबाबत कार्यवाही झालेली नाही. जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांना एकाच प्रकारचा ड्रेसकोड लागू करणे बाबत शिक्षण संघटनांना विश्वासात घेऊन कार्यवाही करणेसंदर्भात जिल्हापरिषद प्रशासन स्तरावर बैठका घेऊन गुणवत्ता वाढ, शिस्त व व्यक्तीमत्व विकासाच्या दृष्टीने तसेच समाजामध्ये व जिल्हा परिषद शाळांमध्ये महत्त्व पटवून देण्यात आले. व्यापक सहमती घेऊन ड्रेसकोड बाबत सद्यस्थितीत सकारात्मकता शिक्षक संघटनांनी नोंदविली आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली उक्त साक्षीच्या वेळी

विचारणा केली की, विभागीय सचिवांनी विदित केले की, समितीने जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना गणवेश देण्याबाबत सूचना केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सकारात्मक उत्तर दिलेले आहे. त्यानुसार सी.ई.ओ. यांनी जिल्हा परिषदेमध्ये चर्चा केलेली आहे आणि जिल्हा परिषदेने देखील हा प्रस्ताव मान्य केला आहे. तसेच शिक्षक संघटनांबरोबर चर्चा सुरू असून ती सकारात्मक दृष्टीने सुरू आहे. मान्य होईल त्यानंतर हे लागू करण्यात येईल.

समितीने विचारणा केली की, विभागीय सचिवांच्या साक्षी करीता सदरहू मुद्दा यामध्ये हा अशासाठी आला की काही जिल्हा परिषदांनी त्यांच्या वैयक्तिक कौशल्याने केलेल्या आहेत. पाणी पुरवठा विभागाने काही जिल्हा परिषदांमध्ये काही नाविन्यपूर्ण गोष्टी केल्या आहेत आणि त्या समिती आपल्यापुढे मांडणार आहे. त्यांनी ते सर्व स्वीकारले आहे. उदाहरण द्यायचे झाले तर एका गावामध्ये पाणी पुरवठा विभागाने राबविलेल्या मोहिमेनुसार एकही डास गावामध्ये नाही. सिमेंटचे पाईप आणून त्यांनी ते काम केले आहे. अशी योजना जर संपूर्ण महाराष्ट्रात राबविली तर ते फार चांगले होईल. ड्रेस कोडच्या बाबतीत सोलापूर आणि नांदेड या दोन जिल्हा परिषदांनी दिले आहेत. यामध्ये वेगळा नियम कायदा किंवा वटहुकूम काढण्याची गरज नाही, परंतु असे करण्यामुळे त्या शाळांच्या शिक्षकांचा दर्जा उंचावला आहे. जर त्या शाळांच्या शिक्षकांचा दर्जा उंचावला असेल तर आणि ही बाब चांगली असेल तर ही स्वागतार्ह बाब म्हणून संपूर्ण महाराष्ट्राने स्वीकारली पाहिजे असे वाटते आणि त्यामुळे आपल्या साक्षीमध्ये हा विषय आणला आहे. एखाद्या जिल्हा परिषदेने ड्रेस कोड ठरविला असेल आणि त्याचे परिणाम जर चांगले दिसले तर आपण देखील हा विषय गांभीर्याने घेतला पाहिजे की, जे समितीला वाटते ते संयुक्तिक आहे. यामुळे शिक्षकांमध्ये शिस्त येत असेल तर शिक्षणामध्ये सुध्दा शिस्त येऊ शकते आणि असे जर होत असेल तर ही योजना संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कशी राबविता येईल याचा विचार झाला पाहिजे. पुणे जिल्हा परिषदेने देखील हे स्वीकारावे. आम्हाला त्यावेळी जिल्हा परिषदेने असे सांगितले की, ही आमच्या अखत्यारीतील बाब नाही म्हणून या प्रकरणी शासनाने काही तरी करावे म्हणून आपल्यासमोर हा विषय ठेवण्यात आला आहे. आपण ही स्वागतार्ह बाब विचारात घेऊन जिल्हा परिषदेचे शिक्षक एका लाईनमध्ये दिसतील. जिल्हा परिषदेची शिक्षकांची बिघडत चाललेली स्थिती काही प्रमाणात सुधारेल. यावर विभागीय सचिवांनी समितीस अश्वासन केले की, यामध्ये

शासनाचा निधी खर्च न करता स्थानिक पातळीवर काही करता येऊन एक मॉडेल तयार करता आले तर आणि ज्या ठिकाणी आपल्याला रिझल्ट आलेले आहेत त्या ठिकाणांचा समितीने दिलेल्या उदाहरणाचा विचार करण्यासाठी असा प्रयत्न व्हायला पाहिजे. यामध्ये गुणवत्ता वाढ झाली असेल तर असा प्रयोग खरोखर केला पाहिजे.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ याकालावधी पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-१३ यावर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील तयार करण्यात आलेल्या प्रश्नावली क्रमांक एकबाबत दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली. शिक्षणाच्या बाबतीत विद्यार्थीमध्ये शिस्त या मुल्याची जोपासना करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या गणवेशासोबतच स्त्री-पुरुष शिक्षकांना ड्रेस कोड सक्तीचा करण्यात यावा. अशा प्रकारचा प्रयोग रायगड जिल्ह्यात यशश्वी झाला आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. उक्त विषयावर संपूर्ण राज्यासाठी धोरण आखण्यासाठी समितीने जिल्हापरिषदेच्या शिक्षकांकरिता गणवेश देण्याबाबत सूचना केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यावर सकारात्मक उत्तर दिलेले आहे त्यानुसार गणवेश देण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे, अशी विभागाकडे विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेमध्ये चर्चा केलेली आहे आणि जिल्हा परिषदेने देखील हा प्रस्ताव मान्य केला आहे.

**राज्यातील शिक्षकांची प्रचंड प्रमाणात संख्या विचारात न घेता शिक्षकांना ड्रेस कोड लागू करतो व त्यावर शासनाद्वारे खर्च करतो हे प्रचंड खर्चिक काम आहे. आधीच शासन विद्यार्थ्यांच्या गणवेशावर कोट्यवधी रुपये खर्च करत असून त्याचा मोठा भार शासनावर पडत आहे. शिक्षक हे वेतन धारक असून ते त्यांच्या वापरासाठी ड्रेस पैशाने विकत घेऊन वापरत असतात. त्यांनी स्वयं प्रेरणेने एकत्र येऊन एक निश्चित असा ड्रेस कोड वापरुन स्वत: शिस्त निर्माण करत विद्यार्थांना प्रेरणा दिल्यास समिती त्या सर्वांचे अभिनंदनच करेल. या गणवेशाचा भार शासनावर न पडू देता शिक्षक स्वंय प्रेरणेने कसा उचलतील व स्वत:वर ड्रेस कोड लागू करुन घेतील याबाबत शासनाने एक परिपत्रक निर्गमित करुन अशा शिक्षकांना प्रोस्ताहीत करावे अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण एकवीस

## जिल्हा परिषद, पुणे (प्रशासन)

### नारायणगांव ग्रामपंचायतीमधील आर्थिक अनियमितता.

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. समितीने जुन्नर तालुक्यातील नारायणगांव ग्रामपंचायतीला भेट दिली. त्यावेळी आढळून आलेल्या काही बाबींवर समितीने दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी प्रश्नावली क्रमांक एक वरील समितीने विचारणा केली की, जुन्नर तालुक्यातील नारायणगांव हे मोठे गाव आहे. या गावाच्या बाबतीत जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये वारंवार विषय चर्चेला आला होता. मला वाटते जी बाब चुकीची असेल, ती चुकीची असल्याचे सांगून जिल्हा परिषदेने आपले कर्तव्य पार पाडावे. त्यामुळे त्या गावातील वस्तुस्थिती बघावी आणि तीन महिन्यात तेथील प्रकार थांबवावा. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, नारायणगांव येथील दोन प्रकरणे आर्थिक अनियमिततेची आणि एक प्रकरण जागेच्या बाबतीत आहे. ही प्रकरणे जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत आणि स्थायी सभेत सुध्दा उपस्थित करण्यात आली होती. या अनुषंगाने सांगू इच्छितो की, जागेच्या बाबतीत रेकॉर्ड ऑफ राईटस्वर मालकी हक्क नेमका कोणाचा आहे या बाबतीत कोर्ट मॅटर झालेले आहे. त्यामुळे या जागेचा मालकी हक्क सिध्द करण्याची बाब न्यायप्रविष्ट आहे. तसेच आर्थिक अनियमिततेच्या बाबतीत तेथील विशेष लेखा परिक्षण करण्यासंदर्भात स्थानिक लेखा परिक्षकांना एक महिन्यापूर्वी पत्र पाठविलेले आहे. त्यांच्याकडून अहवाल आल्यानंतर आम्हाला डिटेल्समध्ये जाता येईल. समितीच्या मते स्पेसिफिक या विषयाचे लेखा परिक्षण करण्यासाठी जास्त वेळ लागणार नाही. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस आश्वस्त केले की, पंचायती राज समितीच्या बैठकीमध्ये सदरहू विषयावर चर्चा झाल्यामुळे या बाबीचे विशेष लेखा परिक्षण लवकरात लवकर करण्याबाबत स्थानिक लेखा परिक्षकांना सांगण्यात येईल. या बाबतीत त्यांना पत्र सुध्दा देण्यात येईल.

**उपरोक्त मुद्दयाबाबत समितीने साक्षीचे वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून खालील मुद्दयांची माहिती मागविली.**

नारायणगांव ग्रामपंचायतीमधील आर्थिक अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू ग्रामपंचायतीचे विशेष लेखा परिक्षण तातडीने करुन घेण्यात येईल असे आश्वासीत केले आहे त्यानुसार केलेल्या लेखा परिक्षण अहवालात काय आढळून आले आहेत ?

**समितीस जिल्हापरिषदेकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

ग्रामपंचायत नारायणगांव ता. जुन्नर येथील ग्रामपंचायतीचे विशेष लेखा परिक्षण करणेबाबत उपमुख्य लेखा परिक्षक(वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा कार्यालय, पुणे या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.जिप/ पंचा/९/३९२/२०१२, दि.४-४-१२ नुसार कळविण्यांत आलेले होते.

तथापि, विशेष लेखा परिक्षण न झाल्याने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.जिप/पंचा/आस्था-८/१८४/१५, दि.५-३-१५ नुसार मा.संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई यांना लेखा परिक्षण करणेबाबत कळविण्यांत आलेले आहे. तसेच या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.जिप/पंचा/९/३५४/२०१५ दि.२८/०४/२०१५ नुसार ग्रामपंचायत नारायणगांव येथील प्राथमिक चौकशी अहवाल पाठविण्यांत आलेला आहे.

तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचेकडील अ.शा.पत्र जा.क्र.जिप/पंचा/आस्था-८/१४६९/ २०१५, नुसार दि.२-११-२०१५ नुसार ग्रामपंचायत नारायणगांव येथील विशेष लेखा परिक्षण करणेबाबत कळविलेले आहे.

**समितीस ग्रामविकास विभागाकडून उपरोक्त मुद्दयांची खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली**

प्रधान सचिव, ग्रामविकास यांच्या दि.२३ ऑक्टोबर २०१५ रोजीच्या अर्धशासकीय पत्राद्वारे समितीने निर्देशित केलेल्या विहित कालमर्यादेत चौकशी करून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबतच्या सूचना देणेत आलेल्या आहेत. असे समितीस कळविले.

## चौकशी अहवाल

ग्रामपंचायत नारायणगांव ता. जुन्नर येथील ग्रामपंचायतीचे विशेष लेखा परिक्षण करणेबाबत उपमुख्य लेखा परिक्षक(वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा कार्यालय, पुणे या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.जिप/ पंचा/९/३९२/२०१२ दि.४-४-१२ नुसार कळविण्यांत आलेले होते.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने पुणे जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. उक्त साक्षीच्या वेळी विचारणा केली की,नारायणगाव ग्रामपंचायत मधील आर्थिक अनियमितता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहु ग्रामपंचायतीचे विशेष लेखा परिक्षण तातडीने करून घेण्यात येईल असे आश्वासित केलेले आहे. त्यानुसार या अहवालात काय आढळून आलेले आहे, त्यावर विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की,मुख्य कार्यकारी अधिकारी,पुणे यांनी मा.संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई यांना लेखा परीक्षण करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. ग्रामपंचायत नारायणगांव येथील प्राथमिक चौकशी अहवाल पाठविण्यात आलेला आहे. याकरिता दोन महिने मुदतवाढ मिळण्याकरिता विनंती केलेली आहे. यावर ग्रामविकास विभागाने असे म्हटलेले आहे की, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचे स्तरावरील कार्यवाही प्रधान सचिव,ग्रामविकास विभाग यांच्या दिनांक २३ ऑक्टोबर,२०१५ रोजीच्या अर्धशासकीय पत्राद्वारे समितीने निर्देशित केलेल्या विहित कालमर्यादेत चौकशी करून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. विशेष लेखा परीक्षण करून घेण्यात यावे, अशा पध्दतीची मागणी करण्यात आली होती. विशेष लेखापरीक्षण झाल्यानंतर यातून मार्ग निघेल. विशेष लेखा परिक्षणाबाबतचा प्रस्ताव व अहवाल लेखा परिक्षण विभागाला पाठविण्यात आलेला आहे.

संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी समितीस या विषयावर विदित केले की, मार्च,२०१५ मध्ये आपल्याकडून आमच्याकडे विशेष लेखा परिक्षणाबाबतचा प्रस्ताव आला होता. १९९५ च्या जी.आर.नुसार विशेष लेखा परिक्षणाचा नियम असा आहे की, प्राथमिक चौकशी अहवाल मूळ स्तरावरुन होऊन त्याचा अहवाल विशेष लेखापरिक्षण विभागाकडे विहित प्रपत्रात नमूद करुन पाठविणे आवश्यक आहे. तसेच, लेखापरिक्षणाविषयी सर्व माहिती देखील लेखा परिक्षण विभागाकडे सुपूर्द होणे आवश्यक आहे. दिनांक २९ मे, २०१५ रोजी आमच्या विभागाकडून आपल्याला असे कळविण्यात आलेले आहे की, सदरहु लेखा परिक्षणाबाबतचा प्राथमिक चौकशी अहवाल सुपूर्द केल्याशिवाय आम्ही विशेष लेखा परिक्षण करु शकत नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहु सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. दिनांक ०२ नोव्हेंबर,२०१५ रोजी लेखा परिक्षण विभागाला आम्ही कळविलेले आहे की, दिनांक ३० नोव्हेंबर,२०१५ रोजी विहित प्रपत्रामध्ये लेखा परिक्षणाबाबतची प्राथमिक चौकशी अहवालातील माहिती पाठविण्यात येईल. असे आश्वासन समितीला दिले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक १० ते १३ ऑगस्ट, २०१५ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेला भेट दिली. समितीने जुन्नर तालुक्यातील नारायणगांव ग्रामपंचायतीला भेट दिली. त्यावेळी आढळून आलेल्या अधिक अनियमिततेच्या बाबतीत चौकशी करुन स्थानिक निधी लेखा परिक्षकाडून विशेष लेखा परिक्षण करण्यासंदर्भात समितीने निदेश दिले. विभागीय सचिवांच्या साक्षी करीता समितीने नारायणगांव ग्रामपंचायतीमधील आर्थिक अनियमिततेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरहू ग्रामपंचायतीचे विशेष लेखा परिक्षण तातडीने करुन घेण्यात येईल असे आश्वासीत केले आहे. त्यानुसार केलेल्या लेखा परिक्षण अहवालात काय आढळून आले आहेत, अशी विचारणा केली. समितीच्या निदेशानुसार जिल्हा परिषदेने नारायणगांव ग्रामपंचायतीची चौकशी करुन दोन खंडामध्ये बृहत अहवाल समितीस सादर केला.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, मार्च,२०१५ मध्ये आपल्याकडून आमच्याकडे विशेष लेखा परिक्षणाबाबतचा प्रस्ताव आला होता. १९९५ च्या जी.आर.नुसार विशेष लेखा परिक्षणाचा नियम असा आहे की,

प्राथमिक चौकशी अहवाल मूळ स्तरावरुन होऊन त्याचा अहवाल विशेष लेखा परिक्षण विभागाकडे विहित प्रपत्रात नमूद करुन पाठविणे आवश्यक आहे. तसेच, लेखापरीक्षणाविषयी सर्व माहिती देखील लेखापरीक्षण विभागाकडे सुपूर्द होणे आवश्यक आहे. **सदरहू लेखा परिक्षण बाबतचा प्राथमिक चौकशी अहवाल संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा यांना प्राप्त झाल्याशिवाय ते विशेष लेखा परिक्षण करु शकत नाहीत. तरी जिल्हा परिषद, पुणे यांनी साक्षीच्या वेळी मान्य केल्याप्रमाणे ३० नोव्हेंबर,२०१५ पर्यंत विहित प्रपत्रामध्ये लेखा परिक्षणाबाबतची प्राथमिक चौकशी अहवालातील माहिती पाठवावी व तीन महिन्याच्या आत विशेष लेखा परिक्षण करुन त्याचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण बावीस

## सर्वसाधारण शिफारशी

**१. गैरव्यवहार/ अपहार / अखर्चित रकमा जमा करण्याबाबत :-** समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असताना विशेषतः हिंगोली व पुणे जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या मोठ मोठ्या रकमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी अनेक प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असताना समितीने या प्रकरणात सदरच्या रकमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची/ अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रकमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करुन वसूल केल्या असत्या तर या रकमा केंव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या. शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेंव्हा हडपला जातो. तेंव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा मोठा परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असून त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यमुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **या प्रकरणी समिती अशी शिफारस करते की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोपपत्र दाखल करुन असे प्रकरण सहा महिन्यात निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी त्याचप्रमाणे अशी कार्यवाही मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविण्यात यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुध्द ती जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रुपयांचा निधी तरतुदी करुन मिळविला जातो व असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती जमादेखील केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिकाऱ्यांकडून रकमा वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणाऱ्या अत्यंत महत्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिकाऱ्यांद्वारा होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुसऱ्या महत्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करुन राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत नैराश्य व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रकमांवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने यासंदर्भात कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे अशीही समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करुन हिंगोली व पुणे जिल्हा परिषदांमधील रकमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसुली केली या बाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

२. **लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे :**-समितीने हिंगोली व पुणे जिल्हा परिषदांना भेट दिली असताना अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखा परीक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखा परीक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखा परिक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखा परिक्षणास कागदपत्रे

उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही ते लेखा परिक्षणास न दाखविणे हे गंभीर आहे. तो सरळ सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखा परीक्षक सुरुवातीला चार महिन्यांचा कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यासाठी वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असूनदेखील संबंधित अधिकारी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम १९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करुन देणाऱ्या अधिकाऱ्यास केवळ १०० रुपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,००० रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखा परिक्षणाचे वेळी लेखा परीक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत अशा जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांना अधिनियमातील तरतुदीनुसार रु.२५,०००/- इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार हिंगोली व पुणे जिल्हा परिषदांमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन जमा करण्यात आली याची संपूर्ण माहिती प्रकरणनिहाय समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**३. नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :-**संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी या समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरुन समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषीविरुध्द जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केलेली नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण दिल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे

आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे न्याय तत्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करु नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निष्पक्षपणे चौकशी करुन चौकशी अहवालामध्ये दोषीविरुध्द कार्यवाही करुन त्यास शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही केल्यास त्यात समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही केली ही बाब समाजाचे लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणता व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तींवर कार्यवाही करुन समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तीला नैसर्गिक न्याय तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच नि:पक्षपातीपणे कार्यवाही करुन दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

## परिशिष्ट “ अ ”

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त.

**बुधवार, दिनांक २४ जून, २०१५**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, हिंगोली**

१) श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

३) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

४) श्री. समीर कुणावार, वि.स.स.

५) श्री. राजेन्द्र नजरधने, वि.स.स.

६) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

७) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

८) श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

९) श्री. अमित झनक, वि.स.स.

१०) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

११) श्री. संदिप बाजोरिया, वि.प.स.

१२) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. एन. आर. थिटे, उप सचिव

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

श्री. न. म. शिंदे, सह सचिव

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. के. एम. विधाते, संचालक

**जिल्हा परिषद, हिंगोली**

श्री. राहुल रेखावार, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. विलास जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

डॉ. ए. बी. लोणे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

डॉ. राहुल गिते, जिल्हा आरोग्य अधिकारी

श्री. ए. बी. कुंभारगावे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

श्री. पी. ए. कच्छवे, कृषि विकास अधिकारी

श्रीमती एस. आर. पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, अर्थ विभाग

श्री. एस. डी. कपाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग

श्री. शिवाजी पवार, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

मोहम्मद फैय्याज, कार्यकारी अभियंता, लघु सिंचन

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने हिंगोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००८-२००९ च्या लेखापरिक्षण पुनर्विलोकन अहवालातील हिंगोली जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक २५ जून, २०१५**

**स्थळ: जिल्हा परिषद सभागृह, हिंगोली**

१) श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

३) श्री. आर. टी.देशमुख, वि.स.स.

४) श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

५) श्री. समीर कुणावार, वि.स.स.

६) श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

७) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

८) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

९) श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१०) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

११) श्री. अमित झनक, वि.स.स.

१२) श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.

१३) श्री. रामहरी रूपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय.**

श्री.विलास आठवले, उप सचिव

श्री.ना.रा.थिटे, अवर सचिव

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

श्री. न. म. शिंदे, सह सचिव

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. के. एम. विधाते, संचालक

**जिल्हा परिषद, हिंगोली**

१) श्री. राहुल रेखावार, मुख्य कार्यकारी अधिकारी
२) श्री. विलास जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
३) डॉ. ए. बी. लोणे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
४) डॉ. राहुल गिते, जिल्हा आरोग्य अधिकारी
५) श्री. ए. बी. कुंभारगावे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी
६) श्री. पी. ए. कच्छवे, कृषि विकास अधिकारी
७) श्रीमती एस. आर. पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, अर्थ विभाग
८) श्री. एस. डी. कपाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग
९) श्री.शिवाजी पवार, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
१०) मोहम्मद फैय्याज, कार्यकारी अभियंता, लघु सिंचन
११) श्री. जी. एस. यंबडवार, कार्यकारी अभियंता (प्र.) पाणी पुरवठा
१२) श्री. अ. ज. भोसले, कार्यकारी अभियंता प्र.ग्रा.स.यो.
१३) श्री. आर. ए. चंदाले, उप का.अ.(बांधकाम)
१४) श्री.जे. एम. साहू, गट विकास अधिकारी, पं.स.सेनगाव
१५) श्रीमती कल्पना क्षीरसागर, गट विकास अधिकारी, पं.स.कळमनुरी
१६) डॉ. विशाल राठोड, गट विकास अधिकारी, पं.स.हिंगोली
१७) श्री. एन. एन. घुले, गट विकास अधिकारी, पं.स.वसमत
१८) श्री.विठ्ठल सुरोशे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औंढा
१९) श्री. एन. एस. मानकर, उप अभियंता (यांत्रिकी)
२०) श्री. एस. एस. जोशी, कार्यकारी अभियंता (प्र.) ग्रामीण पाणी पुरवठा
२१) श्री. एच. डी. वसुकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने हिंगोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००९-२०१० च्या लेखापरिक्षण पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील हिंगोली जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक २६ जून, २०१५**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, हिंगोली**

१) श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

३) श्री. आर.टी. देशमुख वि.स.स.

४) श्री. उन्मेष पाटील, वि.स.स.

५) श्री. समीर कुणावार, वि.स.स.

६) श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

७) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

८) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

९) श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१०) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

११) श्री. अमित झनक, वि.स.स.

१३) श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**

१) श्री.विलास आठवले, उप सचिव,

२) श्री.एन.आर. थिटे, उप सचिव.

**स्थानिक निधी लेखा संचालनालय**

श्री. के. एम. विधाते, संचालक, स्थानिक निधी लेखा, मुंबई

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय,**

श्री. न. म. शिंदे, सह सचिव,

**जिल्हा परिषद, हिंगोली**

१) श्री. राहुल रेखावार, मुख्य कार्यकारी अधिकारी
२) श्री. व्ही. पी. जाधव, प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
३) श्रीमती एस. आर. पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
४) श्री. एस. डी. कपाळे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन)
५) श्रीमती तृप्ती ढेरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)
६) श्री. ए. बी. लोणे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
७) डॉ. हरिश जगताप, प्रकल्प संचालक, जि.प.कोल्हापूर
८) श्री.पी. ए. कच्छवे, कृषि विकास अधिकारी,
९) श्री. एस. बी. वराडे, कार्यकारी अभियंता, बां.जि.प.
१०) श्री. मोहम्मद फैयाज, कार्यकारी अभियंता, लघु सिंचन
११) श्री. जी. एस. एंबडवार, प्रभारी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१२) श्री. अ. ज. भोसले, कार्यकारी अभियंता, पीएमजेएसवाय
१३) श्री. एच.ढी. वसुकर, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१४) श्री. एस .पी. किवळेकर, तत्कालीन कार्यकारी अभियंता, बांधकाम
१५) श्री. ए. बी. कुंभारगावे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
१६) श्री. आर .ए. चंदाले, उप का.अ.(बांधकाम)
१७) श्री. शिवाजी पवार, शिक्षणाधिकारी
१८) श्री. डी.आर. गुप्ता, प्र.उप शिक्षणाधिकारी, निरंतर शिक्षण
१९) श्री. अ. अं. गावडे, सहायक संचालक, स्था.नि.जि.प.हिंगोली
२०) श्री. व्ही. यू. सुरोशे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वसमत
२१) श्री. एन. एन. घुले, गट विकास अधिकारी, वसमत
२२) श्री. व्ही. पी. राठोड, गट विकास अधिकारी, हिंगोली,
२३) श्रीमती कल्पना क्षीरसागर, गट विकास अधिकारी, कळमनुरी,
२४) श्री. जे. एम. साहू, प्रभारी गटविकास अधिकारी, सेनगाव

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने हिंगोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील हिंगोली जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**सोमवार, दिनांक १० ऑगस्ट,२०१५**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, पुणे**

**उपस्थिती**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.

३. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.

४. श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.

५. श्री.समीर कुणावार, वि.स.स.

६. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.

७. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.

८. श्री.अनिल बाबर, वि.स.स.

९. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१०. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.

११. श्री.राजाभाऊ वाजे वि.स.स.

१२. ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.

१३. श्री.अमित झनक, वि.स.स.

१४. श्री.राहुल मोटे, वि.स.स.

१५. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१६. श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.

१७. श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

१८. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

१९. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

श्री.विलास आठवले, उप सचिव

श्री.ना.रा. थिटे, उप सचिव

श्री.प्र.स.मयेकर, अवर सचिव (समिती)

श्री.सचिन बाभळगावकर, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

श्री. अ.ए.कुलकर्णी, उप सचिव

श्री. प्रियदर्शन कांबळे, अवर सचिव

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री.के.एम.विधाते, संचालक

**जिल्हा परिषद, पुणे**

श्री. कांतीलाल उमाप, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. यशवंत शितोळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. दिनेश डोके, प्रकल्प संचालक

श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

श्री. दत्तात्रय मुंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक)

श्री. राहूल साकोरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.पु. व स्वच्छता)

श्री. एम.एस.बोंगाळे, कार्यकारी अभियंता (दक्षिण)

श्री. जन्नाप्पा विभूते, कार्यकारी अभियंता (उत्तर)

श्री. रामलाल पवार, कार्यकारी अभियंता (छोपावि)

श्री. डी.एन.कुलकर्णी, प्र. कार्यकारी अभियंता (ग्रापापु)

श्री. मुस्ताक शेख, शिक्षण अधिकारी (प्राथमिक)

श्री. रमेश धुमाळ, कृषी विकास अधिकारी

श्री. संजय कदम, समाज कल्याण अधिकारी

डॉ. भगवान पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

डॉ. शिवाजी विधाटे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

श्री. हरुन आतार, प्र. शिक्षण अधिकारी (माध्यमिक)

श्री. संदीप भुसे, उप अभियंता (भुसविय)

श्रीमती नम्रता जगताप, प्रभारी गट विकास अधिकारी, जुन्नर

श्री. जे. के. लहामटे, प्रभारी गट विकास अधिकारी, आंबेगाव

श्री. संजय चिल्लाळ, गट विकास अधिकारी, शिरुर

श्री. अजिंक्य पवार, गट विकास अधिकारी, खेड

डॉ. स्मिता पाटील, गट विकास अधिकारी, मावळ

श्रीमती शालिनी कडू, गट विकास अधिकारी, मुळशी

श्री. संदीप कोहिनकर, गट विकास अधिकारी, हवेली

श्री. संतोष हराळे, गट विकास अधिकारी, दौंड

श्रीमती सुवर्णा चव्हाण, गट विकास अधिकारी, पुरंदर

श्री. जी. व्ही. बैरागी, गट विकास अधिकारी, वेल्हा

श्री. एस. एम. गायकवाड, गट विकास अधिकारी, भोर

श्री. मिलींद मोरे, प्रभारी गट विकास अधिकारी, बारामती

डॉ. एल. बी. वडापुरे, प्रभारी गट विकास अधिकारी, इंदापूर

श्री. आनंद भंडारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), सातारा

श्री. बी. के. दहिफळे, शिक्षण अधिकारी (माध्यमिक), पुणे (तत्कालीन)

श्री. विवेक इलमे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्धा

श्री. संजय मस्कर, उप प्रकल्प संचालक, आरजीपीएसए, पुणे.

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील पुणे जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

## मंगळवार, दिनांक ११ ऑगस्ट,२०१५

## स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, पुणे

**उपस्थिती**

१) श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

३) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

४) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

५) श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

६) श्री. समीर कुणावार, वि.स.स.

७) श्री. राजेन्द्र नजरधने, वि.स.स.

८) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

९) श्री. अनिल बाबर, वि.स.स.

१०) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

११) श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१२) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

१३) ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.

१४) श्री. अमित झनक, वि.स.स.

१५) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१६) श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१७) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

१८) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

१९) श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

२०) ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. एन. आर. थिटे, उप सचिव

श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव

श्री. सचिन बाभळगावकर, कक्ष अधिकारी

**संचालक, स्थानिक निधी लेखा**

श्री. का. मा. विधाते

**ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय**

श्री. अ. ए. कुलकर्णी, उप सचिव

श्री. प्रियदर्शन कांबळे, अवर सचिव

**जिल्हा परिषद पुणे येथील अधिकारी**

१) श्री. कांतीलाल उमाप, मुख्य कार्यकारी अधिकारी
२) श्री. यशवंत शितोळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
३) श्री. दिनेश डोके, प्रकल्प संचालक
४) श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
५) श्री. दत्तात्रय मुंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक)
६) श्री. राहूल साकोरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.पु. व स्वच्छता)
७) श्री. एम. एस.बोंगाळे, कार्यकारी अभियंता (दक्षिण)
८) श्री. जन्नाप्पा विभूते, कार्यकारी अभियंता (उत्तर)

९) श्री. रामलाल पवार, कार्यकारी अभियंता (छोपावि)

१०) श्री. डी. एन. कुलकर्णी, प्र. कार्यकारी अभियंता (ग्रापापु)

११) श्री. मुस्ताक शेख, शिक्षण अधिकारी (प्राथमिक)

१२) श्री. रमेश धुमाळ, कृषी विकास अधिकारी

१३) श्री. संजय कदम, समाज कल्याण अधिकारी

१४) डॉ. भगवान पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

१५) डॉ. शिवाजी विधाटे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

१६) श्री. हरुन आतार, प्र. शिक्षण अधिकारी (माध्यमिक)

१७) श्री. संदीप भुसे, उप अभियंता (भुसविय)

१८) श्रीमती नम्रता जगताप, प्रभारी गट विकास अधिकारी, जुन्नर

१९) श्री. जे .के. लहामटे, प्रभारी गट विकास अधिकारी, आंबेगाव

२०) श्री. संजय चिल्लाळ, गट विकास अधिकारी, शिरुर

२१) श्री. अजिंक्य पवार, गट विकास अधिकारी, खेड

२२) डॉ. स्मिता पाटील, गट विकास अधिकारी, मावळ

२३) श्रीमती शालिनी कडू, गट विकास अधिकारी, मुळशी

२४) श्री. संदीप कोहिनकर, गट विकास अधिकारी, हवेली

२५) श्री. संतोष हराळे, गट विकास अधिकारी, दौंड

२६) श्रीमती सुवर्णा चव्हाण, गट विकास अधिकारी, पुरंदर

२७) श्री. जी. व्ही. बैरागी, गट विकास अधिकारी, वेल्हा

२८) श्री. एस. एम. गायकवाड, गट विकास अधिकारी, भोर

२९) श्री. मिलींद मोरे, प्रभारी गट विकास अधिकारी, बारामती

३०) डॉ. एल. बी. वडापुरे, प्रभारी गट विकास अधिकारी, इंदापूर

३१) श्री. आनंद भंडारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), सातारा

३२) श्री. बी. के. दहिफळे, शिक्षण अधिकारी (माध्यमिक), पुणे (तत्कालीन)

३३) श्री. विवेक इलमे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्धा

३४) श्री. संजय मस्कर, उप प्रकल्प संचालक, आरजीपीएसए, पुणे.

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील पुणे जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०१५**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, पुणे**

**उपस्थिती**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

३. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

५. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

६. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

७. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

८. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

९. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

१०. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

११. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१२. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.

१३. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.

१४. श्री. अमित झनक, वि.स.स.

१५. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१६. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१७. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

१८. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स

१९. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

२०. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती)

श्री. सचिन बाभळगावकर, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

श्री. अ. ए. कुलकर्णी, उप सचिव

श्री. प्रियदर्शन कांबळे, अवर सचिव

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. के. एम. विधाते, संचालक

**जिल्हा परिषद, पुणे**

श्री. कांतीलाल उमाप, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. यशवंत शितोळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. दिनेश डोके, प्रकल्प संचालक

श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

श्री. दत्तात्रय मुंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक)

श्री. राहूल साकोरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.पु. व स्वच्छता)

श्री. एम. एस. बोंगाळे, कार्यकारी अभियंता (दक्षिण)

श्री. जन्नाप्पा विभूते, कार्यकारी अभियंता (उत्तर)

श्री. रामलाल पवार, कार्यकारी अभियंता (छोपावि)

श्री. डी. एन. कुलकर्णी, प्र. कार्यकारी अभियंता (ग्रापापु)

श्री. मुस्ताक शेख, शिक्षण अधिकारी (प्राथमिक)

श्री. रमेश धुमाळ, कृषी विकास अधिकारी

श्री. संजय कदम, समाज कल्याण अधिकारी

डॉ. भगवान पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

डॉ. शिवाजी विधाटे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

श्री. हरुन आतार, प्र.शिक्षण अधिकारी (माध्यमिक)

श्री. संदीप भुसे, उप अभियंता (भुसविय)

श्रीमती नम्रता जगताप, प्रभारी गट विकास अधिकारी, जुन्नर

श्री. जे. के. लहामटे, प्रभारी गट विकास अधिकारी, आंबेगाव

श्री. संजय चिल्लाळ, गट विकास अधिकारी, शिरुर

श्री. अजिंक्य पवार, गट विकास अधिकारी, खेड

डॉ. स्मिता पाटील, गट विकास अधिकारी, मावळ

श्रीमती शालिनी कडू, गट विकास अधिकारी, मुळशी

श्री. संदीप कोहिनकर, गट विकास अधिकारी, हवेली

श्री. संतोष हराळे, गट विकास अधिकारी, दौंड

श्रीमती सुवर्णा चव्हाण, गट विकास अधिकारी, पुरंदर

श्री. जी. व्ही. बैरागी, गट विकास अधिकारी, वेल्हा

श्री. एस. एम.गायकवाड, गट विकास अधिकारी, भोर

श्री. मिलींद मोरे, प्रभारी गट विकास अधिकारी,बारामती

डॉ. एल. बी. वडापुरे, प्रभारी गट विकास अधिकारी, इंदापूर

श्री. आनंद भंडारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), सातारा

श्री. बी. के. दहिफळे, शिक्षण अधिकारी (माध्यमिक), पुणे (तत्कालीन)

श्री. विवेक इलमे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्धा

श्री. संजय मस्कर, उप प्रकल्प संचालक, आरजीपीएसए, पुणे.

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील पुणे जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक १३ ऑगस्ट, २०१५**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, पुणे**

**उपस्थिती**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

३. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

५. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

६. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

७. श्री. राजेद्र नजरधाने, वि.स.स.

८. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

९. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

१०. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

११. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

१२. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.

१३. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.

१४. श्री. अमित झनक, वि.स.स.

१५. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१६. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१७. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

१८. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

१९. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

२०. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती)

श्री. सचिन बाभळगावकर, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय**

श्री. अ. ए. कुलकर्णी, उप सचिव

श्री. प्रियदर्शन कांबळे, अवर सचिव

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्री. के. एम. विधाते, संचालक

**जिल्हा परिषद, पुणे**

श्री. कांतीलाल उमाप, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. यशवंत शितोळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. दिनेश डोके, प्रकल्प संचालक

श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

श्री. दत्तात्रय मुंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक)

श्री. राहूल साकोरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा.पु. व स्वच्छता)

श्री. एम.एस.बोंगाळे, कार्यकारी अभियंता (दक्षिण)

श्री. जन्नाप्पा विभूते, कार्यकारी अभियंता (उत्तर)

श्री. रामलाल पवार, कार्यकारी अभियंता (छोपावि)

श्री. डी. एन. कुलकर्णी, प्र.कार्यकारी अभियंता (ग्रापापु)

श्री. मुस्ताक शेख, शिक्षण अधिकारी (प्राथमिक)

श्री. रमेश धुमाळ, कृषी विकास अधिकारी

श्री. संजय कदम, समाज कल्याण अधिकारी

डॉ. भगवान पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

डॉ. शिवाजी विधाटे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

श्री. हरुन आतार, प्र.शिक्षण अधिकारी (माध्यमिक)

श्री. संदीप भुसे, उप अभियंता (भुसविय)

श्रीमती नम्रता जगताप, प्रभारी गट विकास अधिकारी, जुन्नर

श्री. जे. के. लहामटे, प्रभारी गट विकास अधिकारी, आंबेगाव

श्री. संजय चिल्लाळ, गट विकास अधिकारी, शिरुर

श्री. अजिंक्य पवार, गट विकास अधिकारी, खेड

डॉ. स्मिता पाटील, गट विकास अधिकारी, मावळ

श्रीमती शालिनी कडू, गट विकास अधिकारी, मुळशी

श्री. संदीप कोहिनकर, गट विकास अधिकारी, हवेली

श्री. संतोष हराळे, गट विकास अधिकारी, दौंड

श्रीमती सुवर्णा चव्हाण, गट विकास अधिकारी,पुरंदर

श्री. जी. व्ही. बैरागी, गट विकास अधिकारी, वेल्हा

श्री. एस. एम. गायकवाड, गट विकास अधिकारी, भोर

श्री. मिलींद मोरे, प्रभारी गट विकास अधिकारी,बारामती

डॉ. एल. बी. वडापुरे, प्रभारी गट विकास अधिकारी, इंदापूर

श्री. आनंद भंडारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), सातारा

श्री. बी. के. दहिफळे, शिक्षण अधिकारी (माध्यमिक), पुणे (तत्कालीन)

श्री. विवेक इलमे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्धा

श्री. संजय मस्कर, उप प्रकल्प संचालक, आरजीपीएसए, पुणे.

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील पुणे जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

४. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.

५. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

६. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

७. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

८. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

९. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

१०. श्री. अमित झनक, वि.स.स.

११. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१२. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१३. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

१४. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

१५. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

१६. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.

१७. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती)

श्री.सचिन बाभळगावकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय :**

श्री. के. एम. विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी :**

श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

श्री. उज्वल उके, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग

श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग

श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, महसूल विभाग

श्री. महेश झगडे, महानगर आयुक्त, पु.म.प्र.क्षे.प्रा.

श्री. महेश पाठक, सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग

श्री. दीपक कपूर, सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग

श्री. स. भ. तामसेकर, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

श्री. महेश झगडे, महानगर आयुक्त, नगरविकास विभाग, पुणे

डॉ. साधना तायडे, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय

डॉ. रा.म.कुंभार, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा संचालनालय

**पुणे जिल्हा परिषद :**

श्री. कांतीलाल उमाप, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. यशवंत शितोळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्रीमती भारती देशमुख, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २०१०-२०११ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०११-२०१२ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात पुणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, महसूल विभाग, सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, महानगर आयुक्त, पु.म.प्र.क्षे.प्रा. सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १८ नोव्हेंबर,२०१५**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

२. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.

३. श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.

४. श्री.समीर कुणावार, वि.स.स.

५. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.

६. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.

७. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

८. श्री.अमित झनक, वि.स.स.

९. श्री.राहुल मोटे, वि.स.स.

१०. श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.

११. श्री.अनिल तटकरे, वि.प.स.

१२. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.

१३. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

१४.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती)

श्री. सचिन बाभळगावकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय :**

श्री. के.एम.विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी :**

श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

श्री. स. भ. तामसेकर, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

डॉ. साधना तायडे, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय

श्री. ता. मा. कोळेकर, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

**हिंगोली जिल्हा परिषद :**

श्री. मधुकर अर्दड, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्रीमती शिल्पा पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात हिंगोली जिल्हा परिषदेकडून व सन २००९-२०१० व २०११-२०१२ च्या लेखापरिक्षण पुनर्विलोकन सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात पुणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.

४. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.

५. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

६. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

७. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

८. श्री. अमित झनक, वि.स.स.

९. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१०. श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

११. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.

१२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

१३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती)

श्री. सचिन बाभळगावकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय :**

श्री. के. एम. विधाते, संचालक

**विभागीय प्रतिनिधी :**

श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

श्री. संजय बनकर, अवर सचिव, ग्रामविकास विभाग

**हिंगोली जिल्हा परिषद :**

श्री. विलास जाधव, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

श्रीमती शिल्पा पवार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१०-२०११ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात हिंगोली जिल्हा परिषदेकडून व सन २००९-२०१० व २०११-२०१२ च्या लेखापरिक्षण पुनर्विलोकन सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात पुणे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, अवर सचिव, ग्रामविकास विभाग, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १६ डिसेंबर, २०१५**

**स्थळ : विधान भवन, नागपूर**

**समिती प्रमुख :**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य :**

२. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.

३. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

४. श्री. समीर कुणावार, वि.स.स.

५. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

६. श्री. अनिल बाबर, वि.स.स.

७. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

८. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.

९. श्री. अमित झनक, वि.स.स.

१०. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

११. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

१२. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

१३. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.

१४. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत तिसऱ्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणासह संमत केले.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.